॥ ॐ ॥

अनसूया आईच्या जीवन लिलांवर आधारीत

एकविस अध्याची ओविबद्ध चरित्र ग्रंथ



# श्री परमेष्टी अनसूया गाथा

रचिता - पुरुषोत्तम शं. भड, श्री क्षेत्र पारडसिंगा

।। ॐ नमो भगवती अनसूया माता।।



# परमेष्टी अनसूया माता



रामयणाचार्य ह.भ.प. श्री रामराव महाराज ढोक विमोचना साठी श्री परमेष्ठी साठी श्री परमेष्ठी अनसूया गाथा ग्रंथ देतांना

जगद्गुरु शंकराचार्य प. पू. विद्याशंकरजी करविरपीठ ग्रंथाचे विमोचन करतांना.

उपस्थित मा. ना. श्री. नितीनजी गडकरी (विरोधापक्ष नेता), मा. श्री. सुबोधजी मोहिते(केन्द्रीय अवजड उद्योग मंत्री)

मा. श्री. अनिल बाबू देशमुख (उत्पादन शुल्क मंत्री, म. रा.), मा. श्री. चरणसिंग ठाकुर (अध्यक्ष, श्री सती अनसुया माता संस्थान, पारडसिंगा)

अनसूया आईच्या जीवन लिलांवर आधारीत

एकविस अध्यायी ओविबद्ध चरित्र ग्रंथ

# श्री परमेष्टी अनसूया गाथा

रचिता - पुरुषोत्तम शं. भड, श्री क्षेत्र पारडसिंगा

## अनसूया आईच्या जीवन लिलांवर आधारीत
## श्री सती अनसूया माता पारडसिंगा संस्थानचा अधिकृत
## एकविस अध्यायी ओविबद्ध चरित्र ग्रंथ


**रचिता** —— दासपुरु (पुरुषोत्तम शं. भड), श्री क्षेत्र पारडसिंगा

**प्रकाशन तिथी** — ६ एप्रिल २००१

**प्रकाशक** —— श्री सती अनसूया माता संस्थान, पारडसिंगा त. काटोल जि. नागपूर
र.नं. १०७० ई,

**मुद्रक** —— केशवा मुद्रण, काटोल

**मुल्य** —— ९०/- (नव्वद) रूपये




## - हृदगत -

प्रिय माता भक्तांनो !!

विदेही अनसूया माऊलीच्या असीम कृपेने व प्रेरणेने प्रस्तुत '**श्री परमेष्टी अनसूया गाथा**' हा माताजींच्या जीवन लीला वर आधारित एकविस अध्यायी ओवीबद्ध चरित्र ग्रंथ विनम्र होवून भक्ती भावाने माताचरणी सादर समर्पित करीत आहो.

संत संगे हरे पाप। संत संगे निरसे ताप।
संत संगे निर्विकल्प। होय मानस निच्छैल।।

या संत निळोबाच्या वचनानुसार सत्संग लाभला व पूर्व सुकृत थोर म्हणून मातेने आपल्या आशिर्वादाचा वरदहस्त शिरी ठेवून माझ्या सारख्या पतित अज्ञानी व यत्किंचितही पात्रता नसलेल्या अपात्र दासाला पात्र ठरविले व निमित्त मात्र करुन ग्रंथाचे लेखन केले. या अगोदर १९८२ साली 'अनसूया माता स्तोत्र' व १९९२ साली 'मा की दिल्ली नैनिताल यात्रा' हे प्रवास वर्णन पर पुस्तक प्रकाशित झाले.

मला आई सोबत संपुर्ण भारतातील प्रमुख शहरात व ग्रामीण भागात ठिकठिकाणी जाण्याचा योग आला आणि मातेची दिव्य लिला प्रत्यक्ष बघता आली व भक्तांच्या अनुभवांचे संकलन करता आले परंतु प्रयत्न

करुनही अनुभव ओवी बद्ध होत नव्हते व ग्रंथाचे लेखनही जमत नव्हते. शेवटी मातेवर भार टाकून तिच्या जवळ बसून राहून या विचित्र व विचारमग्न स्थितीतून बाहेर काढण्यासाठी प्रार्थना केली. अशातच मातेने रविवार दि. २१/४/९६ ला सायं. ७ वा. चार वेळा माझ्या मस्तकावरुन आपला कृपाहस्त फिरविला. भृकुटीतील ज्ञानज्योतीस स्पर्ष करुन व डोळ्यात डोळे टाकून चक्रपाणी मातेने एक नवी दृष्टी प्रदान केली. त्यानंतर या ग्रंथाचे लेखन वेगाने होवू लागले. झालेल्या ओव्यांचे वाचन माताजी समोर बसून करु लागलो. माताजी शांत चित्ताने व आनंदाने ओव्या ऐकत होत्या. अश्याप्रकारे उचित ज्ञानदान करून कृपाप्रसाद देवून या अज्ञानी लेकराकडून आपली गाथा लिहून घेतली.

या मध्ये प्रारंभापासून तर ब्रह्मलिन अवस्थे पर्यंत क्रमवार दृष्टांत कथन करण्याचा प्रयत्न केला. कालक्रमना लक्षात घेवून त्या त्या वेळेच्या घटनेचे, भक्तांच्या अनुभवांचे अध्याया नुसार संकलन करण्यात आले. जन्म, ग्राम महात्म्य, संसारबंधन, तपश्चर्या, विदेही अवस्था, संतसमागम, संस्थानची निर्मिती, मंदिर बांधकाम, श्वानमहिमा, संजीवन समाधी, भक्तोद्धारार्थ माताकृती, कैवल्यपाद महिमा, अवतरणिका वभक्तांना आलेले आदी भौतीक, आदी दैविक व आध्यात्मिक अनुभव असा क्रम ठेवून त्या त्या अध्यायात तो तो भाग समाविष्ट करण्यात आला. आईचा भक्तपरीवार देशविदेशात व्यापकपणे विखुरलेला आहे. यापैकी ज्या भक्तांनी मला प्रत्यक्ष वा परोक्ष दृष्टांताच तोंडी वा लेखी कथन केल, ज्या लीला मी प्रत्यक्ष बघितल्या व भक्तांनी श्रद्धेने व



निष्ठेने केलेले कार्य बघितले त्याच वर्णन

**"काय मी पामर जाणे अर्थ भेद। वदवि गोविंद तेचि वदे ।।"**

या न्यायाने भगवती कृपेने करण्याचा प्रयत्न केला. याही पलीकडे आईचे अमाप भक्त आहेत की ज्यांचे दृष्टांत या गाथेत आलेले नाहीत. अशा सर्वच ज्ञात अज्ञात भक्तांना मी आदरपुर्वक व भक्ती भावाने वंदन करतो. या गाथेत माझे काहीही पदरचे नसून

**"फोडीले भांडार धन्याचा हा माल। तेथे मी हमाल भारवाही"**

या ऊक्ती नुसार भक्तांनी कथन केलेले अनुभव साध्या सरळ सोप्या व ममतेच्या बोली भाषेत ओविबद्ध करून कोणताही अलंकारिक कृत्रिम पणा न येवू देता भक्तांच्याच भाषेत भक्तांपर्यंत हमाल बनून या गाथेद्वारे पोचविण्याचा, प्रचार प्रसार करण्याचा, माता गुण गाण्याचा प्रामाणिकपणे केलेला अल्पसा प्रयत्न आहे. कर्ता करवती भगवती आहे. या ग्रंथाचे पारायण करतांना आईच्या भक्त परिवारात आपण बसलो असल्याचा व प्रत्यक्ष आई आपल्याकडे पाहून स्मित हास्य करीत असल्याचा अनुभव क्षणोक्षणी येतो. या गाथेचं पारायण दर पोर्णिमेला, नवरात्रीत व दररोज नववा अध्याय वाचल्यास आपल्या कार्यात यश मिळेल व कार्य करण्याची युक्ती व शक्ती माताजी प्रदान करेल. पारायणाच्या समाप्ती नंतर अष्टोत्तर शत नामावली घेवून होम हवन करून पारायणाची पुर्तता करावी.

या चरित्र ग्रंथा साठी श्री सती अनसूया माता संस्थेचे अध्यक्ष श्री चरणसिंग ठाकूर व सर्व विश्वस्त यांनी प्रस्तुत गाथा संस्थानचा अधिकृत ग्रंथ म्हणून प्रकाशीत करण्याचे ठरविले व मला वेळोवेळी मार्गदर्शन करुन या कामासाठी प्रवृत्त केले. श्री विठ्ठलराव ठाकरे गुरुजींनी संपूर्ण देशात माताजीं बरोबर दृष्टांत कथन व अनुभव संकलना करिता नेले व माता चरणाची व चरित्राची गोडी वाढविली, स्व. श्री विठ्ठलरावजी ढोले यांनी माता चारित्राचे हस्तलिखीत माझ्या सुपूर्द करुन अनुभवांच्या संकलना करिता मोलाचे सहकार्य केले. तसेच पुजनिय श्री जंगलुजी खंडाईत, स्व. श्री आनंदरावजी भक्ते, स्व. श्री वामनरावजी येवले, स्व. श्री आबाजी महानकाळ, श्री यादवराव चोपडे, मेरेराम बाबांचे शिष्य, श्री तुळशिराम (खापरी) तसेच संदर्भग्रंथ म्हणून संतकवी श्री कमलासुत, श्री पांडुरंगजी फरकासे, पांढुर्णा, स्व. श्री दिनकरराव ढोले, श्री ताजने महाराज यांचे अनसूया मातेघर प्रकाशित झालेले चरित्र ग्रंथ व स्तोत्राचा आधार या गाथेसाठी मला मोलाचा ठरला आणि या गावातील व परिसरातील वयस्क वरिष्ठ मंडळींनी माहिती पुरविली. उमरी, छिंदवाडा, नागपूर, भोपाल, मुंबई, दिल्ली, नैनिताल, हैदराबाद, पुणे व ठिकठिकाणच्या भक्तांनी आपल्या दृष्टांताचे लेखी वा तोंडी कथन केले. पुस्तक छपाईच्या कामात सृष्टी पब्लीकेशन काटोल च्या संचालिका सौ. अर्चना राजकुमार जयस्वाल, केशवा मुद्रण काटोल च्या संचालिका सौ. रेणू भास्कर लुंगे, श्री सुरेश दामोधरराव कन्हेरे, नागपूर यांनी आर्थिक भार सहन करुन कमी वेळात सुरेख छाया चित्र व उत्कृष्ट छपाई करून दिली त्या बद्दल मी सर्वांचा ऋणी असून आभारी आहो.



आई अनसूया आपल्याला मनोवांछित फल प्रदान करेल या श्रद्धेने व दृढ विश्वासाने प्रस्तुत गाथा भाविक भक्तांनी गोड करुन घ्यावी ही विनंती करून सर्व माता भक्तांना अभिवादन करतो व आईचरणाचा एकच ध्यास या अज्ञानी लेकराला असू दे व तव नामाचे सदैव गुण गायन करु दे हिच माझी माता चरणी आर्त अर्चना।

बोलीले लेकुरे। वेडी वाकुडी उत्तरे।
करा क्षमा अपराध। महाराज तुम्ही सिद्ध।
नाही विचारला। अधिकार म्या आपुला।
तुका म्हणे ज्ञानेश्वरा। राखा पाया पै किंकरा।।

आपला दासानुदास

**पुरुषोत्तम शंकरराव भड**

श्री क्षेत्र पारडसिंगा

# ।। माँ अनसूया : संक्षिप्त परिचय ।।

परमेष्टी अनसूया मातेची जीवनलीला अथांग व अपार आहे. वेदांनी सुद्धा 'नेति नेति', म्हणून जेथे हात टेकले तेथे मी यत्किंचित दास अशा महाशक्तीचा जीवन वृत्तान्त काय सांगणार ? तरी पण या अथांग भक्तिसागरातील पळभर चरित्र तिर्थ भाविक भक्तांना देण्याचा व अनाकलनीय व अगम्य असे चरित्र भाविक भक्तांच्या भक्ती सामर्थ्यामुळे व मातेच्या ममतेमुळे माताकृपेने आकलनीय व सुगम्य करण्याचां हा अल्पसा प्रयत्न।

पारडसिंगा हे महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यात नागपूर पासून ७० कि.मी. दुर असलेले काटोल तालुक्यातील ७००० लोकवस्तीचे गाव, निसर्गरम्य व ऋषीमुनीच्या तपश्चर्येने व वास्तव्याने पुनित झालेला हा भूभाग याच पावन गावातील भक्त कुटुंबात पिता रामजी पाटील व माता आणाईच्या उदरी ५ मे १९२६ साली मिती चैत्र अष्टमीला बुधवारी भक्त वत्सल आई अनसूयेचा जन्म झाला. आई-वडील योगेश्वर मेरेराम बाबांचे शिष्य नारायणपूरला हनुमंत रायाच्या देवळात बाबांचे वास्तव्य. सत्संग घडला. सुवास भक्त कुटुंबात दरवळला. एके दिवशी आणाई मातेस पाणगा सेवन करावयास देवून बाबांनी कृपाप्रसाद दिला व आई अनसूयेच्या रुपाने तो फळा आला.

बालपणापासून आईचे ओठ हलायचे व त्यातून अखंड नामस्मरण व्हायचे. तीन वर्षाच्या असतांना वडीलांनी आईला मांडीवर घेवूनच उमरी येथील श्री जंगलुजी खंडाईत यांच्याशी विवाह संस्कार पार पाडला.





उमरीला सोहमनाथ बाबांचा ध्यास लागला. त्यांचे शिष्य बाळा महाराजांची अखंड ध्यान धारणा व योग साधना माता बघायची. बाळा महाराजांची कृपादृष्टी लाभली व मातेत बदल जाणवू लागले. उमरी येथे पाणी भरायला माताजी गेल्या असतांना एका खोल विहिरीत पडून त्यांना कोणताच अपाय झाला नाही. त्यानंतर त्यांना माहेरी आणण्यात आले. आईची भ्रमंती एकसारखी सुरु होती. कुठेही जाणे काहीही खाणे, कुणाची ओळख नाही, कुणाची आसक्ती नाही. देवळात नाही तर नदीनाल्याचा आश्रय घेवून रात्रभर राहणे अशा विरक्त वृत्तीमुळे सर्व चिंतित झाले. पागलपणाचा ठपका मातेवर ठेवण्यात आला व हा पागलपणा घालविण्यासाठी उपचार करण्यात आले. परंतु काहीच परिणाम झाला नाही. शेवटी उपचार करणारेच मातेला शरण आले. श्री जंगलुजींनी दुसरे लग्न केले. माताजी नाममात्र असलेल्या संसार बंधनातून मुक्त झाल्या व विदेही अनसूया माता बनल्या.

मातेने घरदार सोडले. रानावनात, हिंस्त्र श्वापदाच्या सहवासात, भर उन्हात, वादळी मुसळधार पावसात, थंडीत दिगंबर अवस्थेत त्या भटकू लागल्या. त्यांना असहय यातना सहन कराव्या लागल्या पागल पागल म्हणून त्यांचा छळ होवू लागला. त्यांचेवर विषप्रयोग करण्यात आला. एकदा सापाने दंश केला. परंतु कशाचाच विपरीत परिणाम आईच्या शरीरावर झाला नाही. विषारी किटकनाशके, काच, माती, गोटे, पालापाचोळा खाऊन जगत होत्या. आई घरोघरी जावून "आण काय रांधल थे?" अस म्हणून भिक्षा मागायच्या. कुणी द्यायचे तर कुणी टवाळी करायचे. आईची कृपादृष्टी सर्वांवर होती. रात्रीला आई कुठेतरी अंधारात बसून राहत असे तेव्हा जाणारे येणारे घाबरायचे. आई त्यांना म्हणायची 'भिऊ नको ! मी होय अनसूया'। अस म्हणून प्रेमळपणे त्यांना हाक द्यायची. स्वदेहाला तापवून वज्राप्रमाणे त्यांनी आपला देह कठीण बनविला. अशा प्रकारे लोकात राहून लोकाघात

सहन करीत मातेची कठोर तपश्चर्या सुरु होती.

एकनाथ महाराज, शंकरानंद महाराज, चरणदास महाराज, लहानुजी बाबा, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, कैकाडी बाबा आदि संतांनी मातेच्या महानतेचा परिचय जनतेला करुन दिला. १९६६ साली परमहंस पुंडलिक बाबा पारडसिंगा गावात हरिनाम सप्ताहा निमित्त समाप्तीला आले असता मातेची व त्यांची दृष्टादृष्ट झाली व दहीहांडी न फोडता निघून गेले. आई अनसूया सर्व समर्थ असल्याची जाणीव त्यांनी करुन दिली व मातेला शरण जाण्यास सांगितले. शेवटी दहीलाहीचा कार्यक्रम आईच्या हस्ते पार पाडण्यात आला. तेव्हापासून अधिक भक्त माता चरणी येवू लागले. माताजी सुद्धा भक्तोद्धारार्थ दूर दूर जावू लागल्या.

भक्तांना मातेच्या दिव्यशक्तीचा अनुभव येवू लागल्यामुळे दिवसेंदिवस लोकांची श्रद्धा आईचरणी दृढ होवू लागली. अनेकांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे लाभ होवू लागला, दुर्धर व्याधितून अनेकांची मुक्तता झाली. विभक्त संसार जुळविले, संसारिक सौख्य लाभले. भक्तांना अपघाती वाचविले. न कळत अकस्मात रोग्यांच्या घरी जावून मरणासन्न अवस्थेतून त्यांना उठविले, विकलांगाचे अपंगत्व दूर केले, पारडसिंगा नगरीला पाणशेत होण्यापासून वाचविले, आंधळ्याला दृष्टिदान दिले, मृताला जीवंत केले, मंदिरावर वीज पडली असता विजेचा प्रखर गोळा मुखी पचविला. आई भक्तोद्धारार्थ दूरदेशी दूर प्रान्ती गेल्या. गुजरात उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र आदी प्रांतातील प्रमुख शहरी कधी विमानाने तर कधी मोटारीने आई स्वत: गेल्या या प्रान्तात मोठ्या प्रमाणात मातेचा भक्त परिवार आहे. भक्त ज्या स्वरुपात मातेला पाहिल व आळविल त्या स्वरुपात आईने त्यांना दर्शन दिले. दिल्लीला साई मंदिरात साईरुपात साईभक्तांना दर्शन दिले. गाणगापूरला नृसिंह सरस्वती भीमा अमरजा





संगमावर औदुम्बरातली माताजींना दर्शन देण्यासाठी आले व हा सोहळा हैद्राबादच्या भक्तांनी डोळे भरुन पाहला. तसेच महालक्ष्मी, दुर्गा, पार्वती, अंबादेवी, सद्‌गुरु गजानन स्वरुपात दर्शन दिले, जो ज्या देवाचा–देवीचा उपासक असेल त्यांची मनोकामना त्या त्या रुपात दर्शन देवून मातेने पूर्ण केली. आई त्रिकालज्ञानी आहेत. भक्ताने काय आणले ते जाणून नेमक्या त्याच वस्तु त्या मागतात. भुत भविष्य वर्तमान सांगुन भक्तांना सावध करतात. भक्तासोबत त्यांच्याच भाषेत बोलून त्यांच्या समस्या सोडवितात. 'मल मूत्र विष्टा। अमृतासमान।' याचाही अनुभव भक्तांना आलेला आहे. कॅन्सर सारख्या दुर्धर व्याधी मलमूत्र सेवनाने क्षणात दूर झालेल्या आहे. अमेरिकेत राहणाऱ्या नलिनी कनोजाला अपघाती वाचविले तर स्पेन मध्ये स्वामी सत्यानन्द जीला दर्शन दिले. फ्रेंच पती पत्नी सोबत त्यांच्याच भाषेत बोलल्या. होळीत पाय टाकून बसल्या असतांना अग्नी त्यांना भाजू शकला नाही. एका गुरुपौर्णिमेला पाण्याने दिवा रात्रभर जळत राहला. त्याचबरोबर देशाचे कसे होईल। खऱ्याची ओळख नाही अस म्हणून देशाविषयी आई नेहमी चिंतीत असायच्या व 'जिथ देवाचा हात पुरत नाही तेथं अनसूयेचा पुरते' अस म्हणून सामर्थ्याची जाणीव करुन द्यायचा. "जे जे भेटे भूत। ते ते मानी भगवंत।" याची जाणीव आईने आपल्या कृतितून करुन दिली. मानवावर तसेच पशू, पक्षी, कृमी, किटक या सर्वांवर आईची सारखी प्रीती, कुत्रा आईचा अती लाडका, त्याला सोबत घेवून आई जेवू घालायची, पाणी पाजायची, जवळ झोपवायची, थोपटायची. एकदा एका लहान पिलाचे शेपूट धरुन आई झोके देवू लागली व म्हणाली "माझ्या बापूच कौतुक सार जग पाहीनं" म्हणून त्याचे पटापट मुके घ्यायची. म्हणूनच कुत्रे सदैव आई सोबत असायचे. कुत्र्याच्या रुपात प्रत्यक्ष माऊलीने दर्शन सुद्धा भक्तांना दिलेले आहे. ईथे पंढरपूर नांदेल म्हणून कर कटेवर ठेवून भविष्यवाणी

सुद्धा केली. अशाप्रकारे देशातील अनेक भक्तांना अनेक ठिकाणी दर्शन देवून मातेने कृतार्थ केले व कृपादृष्टीचा वर्षाव करुन समृद्ध केले. विज्ञानाला अतर्क्य व असाध्य गोष्टी मातेने सहज साध्य केल्या. मानव, निसर्ग व यंत्रावर मात करणारे व भक्तांना आदिभौतिक, आदिदैविक व आध्यात्मिक सुख प्रदान करणारे अनेक दृष्टान्त विस्तृतपणे या गाथेत आहेतच.

देशातील साधु-संत, पंडित-महंत, बुद्धीवादी, वकील, डॉक्टर, राव-रंक अशा सर्व स्तरातील आईचा भक्त परिवार देश विदेशात विखुरलेला आहे. आईच्या जीवन गाथेत चमत्कार मुळीच नाही. प्रत्यक्ष आईने कोणताच चमत्कार केलेला नाही. भक्तांना वरवर वाटणारे चमत्कार हा त्यांच्या दिव्यशक्तीचा साक्षात्कार असून भक्तांसाठी तो निर्मळ जीवनाचा अविष्कार आहे. कृपादृष्टीचाच हा वर्षाव आहे. ढोंगी साधू किंवा बुवाबाजी करणारे लोक आईसमोर क्षणभरही थांबत नव्हते.

"जो थो उठला। बुवा व्हायला बसला।"

अशाप्रकारे कणखरपणे अशा ढोंगी बुवांना आई बजावून सांगत असे म्हणूनच सर्व स्तरातील भक्त आईकडे दृढ होवू लागले.

आईची भक्तोद्धाराची कृती साधी सरळ आहे त्यांच्या कृपादृष्टीचा वर्षावच भक्तांना तारक आहे. भक्तांच्या जवळ जावून डोळ्यात डोळे घालुन ममतेने आई आपल्या लेकराकडे पाहायच्या व पाठीवरुन, डोक्यावरुन हात फिरवायच्या. भक्तांनी अर्पण केलेले नारळ नारळाकडे न पाहता दोन बोटाने धरुन व भक्तांच्या डोळ्यात पाहून लिलया फोडीत असे. तिन तिनशे ओले नारळ रात्रभर जागून व अखंड नाम स्मरण करुन आई फोडत बसायच्या.





त्यांनी अर्पण केलेले हार निरखून त्यातील फुले त्या भक्ताकडे फेकून दिव्याजवळ जावून हारातील धागा जाळीत असे. ही उठण्या बसण्याची कृती प्रत्येक भक्तासाठी माताजी दिवसभर करीत असे. कुठेच थकवा नाही की त्रास नाही. आईची डावी मुठ सदैव बंद असे. दोन बोटानेच बदाम किंवा नारळ आई फोडत असे. भक्तांनी अर्पण केलेला नैवेद्य जीभेने चाटून आई दूरवर फेकत असे व 'फेकते थे काय-व्हय' म्हणून विचारायच्या व 'भुकेलेल्याला जेवू घालते' म्हणून सांगायच्या व हजारो जीवांची क्षुधा व तृषा अन्न पाणी फेकून शांत करायच्या "आण काय रांधल थे", 'काय काय जेवला' 'मार कट कट', म्हण गाणं बसून जाण, "फेकते थे काय व्हाय।" हे वाक्य आईने वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या वेळी भक्तांना दिशा दाखवून त्यांच्या उद्धारार्थ सदैव उच्चारन करून भवसागर पार करण्याची गुरुकिल्ली भक्ताकडे सोपविली. अशाप्रकारे ७० वर्षपर्यंत आई आपल्या लेकरासाठी आवश्यक अन्न पाणी सेवन न करता चंदनाप्रमाणे झिजून व त्यागून आपल्या लेकरांना सुगंधित व सुसंस्कारीत करण्यासाठी अहोरात्र झटल्या.

अशातच १९९६ सालात ऑगस्ट महिण्यापासून आईची प्रकृती दिवसेंदिवस खालावू लागली. सलाईन लावण्याकरीता गुंगीचे इंजेक्शन जबरदस्तीने देण्यात आले. परंतु ते इंजेक्शन आईला गुंगी आणू शकले नाही. कोणताच औषधोपचार चालला नाही. शेवटी स्वत: यातना सहन करून दुसऱ्या मध्ये चेतना निर्माण करणारी माता अनसूया पौष वद्य द्वितीया १० जानेवारी १९९७ रोज शुक्रवारला सकाळी ९.४० वाजता सुर्य नारायणाचे अंतिम दर्शन घेवून ब्रह्मलीन झाल्या. अनंत अनंतात विलीन झाले. आपल्या असंख्य लेकरांना पोरकं करून आई एकाएकी देह सोडून गेली. "जळाविण जैसी मासोळी।" त्याचप्रमाणे देशविदेशातील आईच्या भक्तांची स्थिती

झाली.

आई देहाने गेल्या तरी त्यांच भक्तोद्धाराच कार्य अखंड सुरुच आहे. मुर्तीरुपात श्रीक्षेत्र पारडसिंगा येथे माताजी विराजमान आहे. संजीवन समाधीतील काया भक्तांची अमृत संजीवनी आहे. आजही भक्तांना याबाबत अनेक अनुभव येत आहे. मातेचे प्रत्यक्ष दर्शन होत आहे. म्हणून भक्तांची पावले कळत नकळत श्रीक्षेत्र पारडसिंगयाची वाट चालत आहे.

अशाप्रकारे माताजी निष्काम व विरक्त जीवन जगून असामान्य व अलौकीक कार्य करीत आहे. जगाला नियंत्रित करणारी ती एकमेव शक्ती असून अखिल ब्रह्मांडाची जनिता आहे. परमेश्वराला ही जन्म देणारी परमेष्टी माता आहे.

अशा अनादी अनंत भक्त वत्सल भगवती अनसूया माते चरणी विनम्र लोटांगण ॥

घालीन लोटांगण वंदिन चरण । डोळ्यांनी पाहिन रुप तुझे ।
प्रेमे आलिंगन आनंदे पुजिन । भावे ओवाळीन म्हणे नामा ॥
॥ ॐ श्री जय जय अनसूया माता ॥





अध्याय १

# मंगलाचरण

जगदम्बा जगज्जीवनी।
त्रिकालदर्शी कमलनयनी।
भक्तवत्सला वरदायिनी।
ॐ नमो अनसूया भवानी

# मंगलाचरण

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैंनमः श्री गुरुदेवायनमः

ॐ नमो जी गणनायका । सकलसिद्धी विनायका । तूचि असे आद्यपूजका । मंगलमूर्ति मोरया ॥१॥ छटषास्त्र अठरा पुराण । चार वेद सप्रमाण । सार्थ करी नामाभिधान । वक्रतुंड गणेशा ॥२॥ तुज न करता वंदन । क्षण भासे काळासमान । म्हणौनि तव स्मरण । कार्यारंभी होतसे ॥३॥ कृपादृष्टी तुझी होता । न भासे मज न्यूनता । धैर्य दे गिरजासुता । गुण गाण्या आईचे ॥४॥ गणेशाला करुनि वंदन । गाऊ शारदेचे गाण । पूर्ण करी माता कवन । सकलसिद्धी भगवती ॥५॥ ब्रह्मसुता तू शारदामाई । नमन माझे तव पायी । दासाला बुद्धी देई । सुबुद्ध करुनिया ॥६॥ गणेशाने आचार केला । शारदेने उच्चार केला । कांतकांताचा मेळ झाला । अक्षरबांध फुटतसे ॥७॥ त्रिमूर्तिशी माझे वंदन । पुर्ण करी भगवत गाण । तुमचेनि आशीर्वचन । वाक्यज्ञ आरंभिला ॥८॥ वंदितो सर्व सुरवरा । गंधर्व यक्ष किन्नरा । सर्वसकल ऋषीश्वरा । रिद्धी सिद्धी जया ठायी ॥९॥ पाराशर व्यास वाल्मीक । कवी कुळ हेचि नेक । भजती सर्व देवलोक । बुद्धिवंत म्हणूनिया ॥१०॥ रामकृष्ण हरी । मंत्रोच्चार छडाक्षरी । अंध:कार दूर करी । भक्तिज्योत तेवूनि ॥११॥ वंदन माझे भूमातेला । रामकृष्ण जेथे जन्मला । संत महंतांचा बालेकिल्ला । नमो नम: मातृभूमि ॥१२॥ कथितो आता इतिहास । या भूमिचा रहिवास । देवादिकांचा निवास । वंदूनिया तव चरणी ॥१३॥ मार्कंडेय चंद्रपुरी । गौतममुनी कळमतिरी । अहिल्योद्धार याच नगरी । पदस्पर्शे रघुनायका ॥१४॥परमपवित्र चिंतामनी । वसतसे कळंब ग्रामी । निरंजन ऋषी अग्रनि । बुद्धीदाता मज असे ॥१५॥ कोराडीची लक्ष्मीदेवी । आग्यारामची

अंबादेवी। अमरावतीची जगदम्बामाई। चंद्रपुरची महाकाली ।।१६ ।। करवीरवासिनी लक्ष्मी माई। नेरची असे पिंगळाई। तुळजापुरची भवानी आई। नमस्कार तुम्हा असो ।।१७ ।। वर्धा जिल्हा वर्धा तिरी। देवळी तालुक्का घोटेश्वर पुरी। वसिष्ठ मुनी यज्ञ करी। रक्षावया जपी तपी ।।१८ ।। वाशिमातील अनशिंगी। शृंगऋषीची समाधी। अरण्याच्या मध्यभागी। वर्ततसे कथापुराण ।।१९ ।। धौम्यमुनीचा निवास। आर्वीतील धामकुंडांस। रुक्मिणीची आरास। कौंडण्यपूर नगरी ।।२० ।। महासाध्वी दमयंती। नलराजाची सती। महाराणी इंदूमती। विदर्भभूमि शोभतसे ।।२१ ।। संत कबीरासी नमन। रामानंदाचे शिष्योत्तम। सदा मुखी रामनाम। सत्मार्ग दावितसे ।।२२ ।। म्हणौनि त्यांची वाणी। सुखवि सर्व जनी। वंदन तव चरणी। लीनदीन होवूनिया ।।२३ ।। बालान्ध निरक्षर संत। गुलाबराव महाराज प्रख्यात। झाले याच वऱ्हाडात। दृष्टी देई सर्वांना ।।२४ ।। वल्लभाचार्याचे शिष्य। प्रसिद्ध संत सूरदास। बिल्वमंगल म्हणती त्यास। परिमार्जन जे करी ।।२५ ।। चिंतामनी वेश्येच्या नादाने। धुंद झाले स्वजीवने। फोडूनि घेतली नयने। म्हणौनि तुम्हा वंदन ।।२६ ।। आद्य शंकराचार्य। प्रतिभेचे आचार्य। सफल करावे कार्य। आशीर्वाद देवूनि ।।२७ ।। निवृत्तिनाथ गुरुमाऊ ली। कृपेची परमावली। भक्ताची कृपासावली। भावभक्ती मंदिरी ।।२८ ।। ज्ञानराज ज्ञाननाथा। बुद्धी दे तू अनाथा। भगवतीची चरित्र गाथा। तव कृपे गातसे ।।२९ ।। सोपान मुक्ताबाई। भजतसे विठ्ठल रखमाई। घेवूनि पताका डोई। भागवत धर्माची ।।३० ।। संत दामाजी महाराज। मंगलवेढ्यासी करी राज। धान्य लुटूनि साधी काज। प्राण वेचूनिया ।।३१ ।। सर्वाभूति भगवंत। पाही नामदेव संत। भक्तीत सदा रत। नमस्कार तया असे ।।३२ ।। संत एकनाथाला वंदन। अधिकार त्यांचा महान। देवालाही







पडलं भरणं। पाणी त्यांच्या घरी ।।३३ ।। श्री संत गोरा कुंभार। थापटीने करी नामोच्चार। मुखी चाले एक गजर। जय जय विठ्ठल म्हणौनि ।।३४ ।। श्री संत सावता गाई। श्रमसाफल्याची नवलाई। शेताभातात विठ्ठल पाही। वंदन माझे तयाला ।।३५ ।। दासबोधाची पताका। फडकवितसे जनहिता। समर्थ रामदासाची कथा। जय जय रघुवीर समर्थ ।।३६ ।। श्री संत चोखामेळा। विठ्ठलाशी लावी लळा। फुलवूनि भक्तिमळा। वंदन तव चरणी ।।३७ ।। जनाबाई सखुबाई। कान्होपात्रा मिराबाई। भक्तिमहिमा गाई। देहभान विसरुनि ।।३८ ।। सदेह वैकुंठ गमन। करी संत तुकाराम। तयासी माझे नमन। श्री संत सद्गुरुपायी ।।३९ ।। पंढरीचे वारकरी। गाई भागवत थोरी। तया माझा अत्यादरी। नमस्कार असो ।।४० ।। सद्गुरु साईनाथ देवा। राहूनि शिरडी गावा। वाजवी भक्ती पावा। श्रद्धा सबुरी म्हणूनि ।।४१ ।। करीतो तुज वंदन। गाण्या भगवत गाण। देई आशीर्वचन। दयासिंधू रमावरा ।।४२ ।। गजानन बाबा शेगावी। आलो मी तव पायी। तूच मज शक्ती देई। कृपाप्रसाद देवूनि ।।४३ ।। गणगणात बोले। मुखी ज्याच्या जप चाले। उणे काय असे त्याले। गुरुमाऊली गुरुराया ।।४४ ।। नागपूरचे ताजुद्दीन बाबा। उमरीचे सोहंम्नाथ बाबा। वरखेडचे आडकुजी बाबा। टाकरखेडी संत लहानुजी ।।४५ ।। राष्ट्रसंत तुकडोजी बाबा। कर्मयोगी गाडगेबाबा। माधानचे गुलाबबाबा। पुंडलिक देव मुर्तिजापूरी ।।४६ ।। केजाजी महाराज घोराडचे। कोलबा स्वामी धापेवाड्याचे। लटारेबाबा कारंज्याचे। मोर्शीशी रामदेवबाबा ।।४७ ।। खंडव्याचे दादाजी धुनीवाले। वित्तुबाबा टाकळघाटीले। जनहिता गात्र थकविले। नमन माझे तवचरणी ।।४८ ।। सत्यदेवबाबा भारवाडीला। मुंगसाजी धामनगावाला। यशवंतबाबा मुसळ खेड्याला। उद्धरती नरनारी ।।४९ ।। देवीदेवता करुनि वंदन। गातो

आता भगवत गाण। सार्थ करी नामभिधान। आशीर्वाद देवूनि ।।५०।। जगदम्बा जगज्जीवनी। त्रिकालदर्शी कमलनयनी। भक्तवत्सला वरदायिनी। ॐ नमो अनसूया भवानी ।।५१।। देवादिक तुजला वंदिती। तूच जगदम्बा सरस्वती। त्रिभूवन एकत्र होती। नमूनि तव पायी ।।५२।। रुक्मिणी सीता पार्वती। लक्ष्मी रेणूका महासती। महाकाली तुज म्हणती। तूच असे महामाया ।।५३।। ब्रम्ह विष्णू हर। तू तयाहूनि थोर। करितसे जयजयकार। माता तव नामाचा ।।५४।। तूच असे आदीअंती। जगताची मायावती। अवधूत दत्ताची ख्याती। तुजमुळे होतसे ।।५५।। सतयुगाची अनसूया। तूच असे आदीमाया। मी आलो तव पाया। ठाव देई चरणासी ।।५६।। "लोक जाती पंढरपूरा। आपण जावू कौंडण्यपुरा। रुक्मिणीच्या माहेरा" । म्हणौनि तू सांगितसे ।।५७।। मातेचे हे प्रसिद्ध गाण। गाई माता स्वज्ञान। गाऊनिया स्ववदन। ज्ञानदान करितसे ।।५८।। म्हणौनि आई तू रुक्मिणी। तूच रेणूका माहूरवाशिनी। शक्ती देई मज अज्ञानी। जीवन गाथा गाण्यासी ।।५९।। मी अनाथ पामर। तूच माझी कृपावर। देई मज आधार। पैलतिरी जावया ।।६०।। न जाणे शब्दमहिमा। काय कळे अर्थ अज्ञाना। गातसे तव भजना। तुझीच कृपा म्हणौनि ।।६१।। मी एक संसारी जीव। विकारी वाटते भय। कैसे धरावे तुझे पाय। अज्ञानी मी असे ।।६२।। वाल्याचा वाल्मिकी झाला। रामनामे तो तरला। प्रायश्चिते शुद्ध झाला। मरा मरा म्हणूनिया ।।६३।। तूच आशीर्वाद दिला। वाक्यज्ञ आरंभिला। पूर्ण करी समयाला। कृपादृष्टी ठेवूनिया ।।६४।। निमित्त दासा केले। लेखनी स्व चालविले। अक्षरेही उमटविले। तूच माता सरस्वती ।।६५।। अनसूयेचे पावन गाव। पारडसिंगा असे नाव। तीर्थक्षेत्र जगी ठाव। शरण येई तव दारी ।।६६।। ग्राम महात्म्याचा महिमा। पुढील अध्यायी जाणा।





माऊलीची भाकू करुणा। जन्मवृत्तान्त सांगूनि ।।६७।। ऐसी ही सुरस कथा। भक्ता नेई मोक्षपथा। अनसूयेची पावन गाथा। वाचता वर्तताही ।।६८।। इतिश्री परमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। प्रथमोऽध्याय सम्पूर्ण ।।६९।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती ।। शांती ।।।

**|| ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ||**

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

जय जय अनसूया आई। वंदन माझे तव पायी। गाथा गाण्यासी देई। बुद्धी अज्ञानी दासाला ॥१॥ तुझ्याच कृपेने लिहणे। चालणे, बोलणे, वागणे। तुझ्याविना भासे सुने। जग बापुड्याला ॥२॥ कथितो आता जन्मवृत्तान्त। सांगूनि ग्रामाचे महत्व। ऐका श्रोते हो एकचित्त। शरणागत मी असे ॥३॥ संतांचे माहेर महाराष्ट्र। त्यात विदर्भ भूमि पवित्र। ऋषीमुनी सत्पुरुषाचे गोत्र। नांदते या तपोभूमी ॥४॥ विदर्भात नागपूर जिल्हा। संत महंताचा बालेकिल्ला। दावीतसे अद् भूतलीला। अनादीकाळापासूनि ॥५॥ नागपूरपासूनि साठ किलोमीटर। काटोल असे तालुक्का शहर। तेथूनि आठ किलोमीटर। श्री क्षेत्र पारडसिंगा ॥६॥ नागपूर जलालखेडा मार्गावर। वरुड मोर्शी असे समोर। याच मार्गी आहे मंदीर। महाशक्ती अनसूयेचे ॥७॥ आता घेऊ दर्शन। देवीदेवता ऋषीगण। करुनि पंचक्रोशीचे वर्णन। महिमा गाऊ श्रीक्षेत्राचा ॥८॥ काटोल नगरी पावन। करी चक्रधराचे चरण। महानुभवीयांचे धाम। कुंतलापूर म्हणतसे ॥९॥ तेथचि असे मंदीर। जेथे राही प्रभू चक्रधर। माझा तया नमस्कार। दोन्ही कर जोडूनिया ॥१०॥ सुधार्मिक राजाचा पुत्र। चंद्रहास म्हणती सर्वत्र। मातापिता झाले मृत। म्हणून येती कुंतलापूरी ॥११॥ होता दुष्टबुद्धी प्रधान। पेठ बुधवार त्याचे ठिकाण। मारण्याचे केले प्रयत्न। चंद्रहास राजाला ॥१२॥ एका नवरात्री उत्सवास। आरती नेई चंद्रहास। चंडीका देवीच्या मंदीरास। दुष्टबुद्धी पाहतसे ॥१३॥ त्याने केला कट। मारेकरी ठेवी मंदिरात। मारण्याचा रचला घाट। चंद्रहास राजासी ॥१४॥ आरती घेवून राजा





श्री रामजी भक्ते पाटील यांचे घर
दर्शविलेल्या जागी माताजीचा जन्म झाला
५ मे १९२६-चैत्र कृ. अष्टमी रोज बुधवार

# अध्याय २
# पंचक्रोश महात्म्य व जन्मवृतान्त



चिंतामन गड (तांबेबरडी)





नारायणपूरचे हनुमान मंदिर येथे योगेश्वर मेरेराम बाबा ने
श्री रामजी भक्ते पाटील (वडील) व माता आणाईला (आई)
कृपाप्रसाद दिला

निघाला । वाटेत मदन त्यास भेटला । तो प्रधानाचा मुलगा भला । आरती नेई स्वहस्ते ।।१५ ।। मारेकऱ्याने मारले त्यास । मंदिराच्या दारासमीप । पाहूनिं मुलाचे प्रेत । शोक करीं दृष्टबुद्धी ।।१६ ।। दुष्टबुद्धीने दिला प्राण । मंदिरात डोके आपटून । चंद्रहास होई शोकमग्न । शव पाहता बापलेकाचे ।।१७ ।। केली देवीची आराधना । जीवंत करण्या मृतांना । जगत्जननी चंडीका जाणा । कुंतीलापूरी असे ।।१८ ।। देवी चंडीका असे जेथे । भावभक्तीचा ठाव तेथे । पावे भक्ता भक्ती परते । आदीमाया मूळरूप ।।१९ ।। चंडीका म्हणती तुला । स्थित असे काटोलला । देवीदेवता आश्रयाला । म्हणूनि येती तुझ्या ।।२० ।। श्रीकृष्ण अर्जुनाचे चरणं । पावन करी काटोलधाम । देवी सरस्वतीचे धाम। याच क्षेत्री वसतसे ।।२१ ।। पुरुषोत्तम महाराजाचे मंदिर । पावनतेचे असे घर । भक्तांचे वेड अनिवार । सदासर्वदा असे ।।२२ ।। येथील प्रसिद्ध ऋषीधरी । प्राचीनतम भक्ती सरी । बकदालमयऋषी वास करी । अहर्निश याठायी ।।२३ ।। रुखडगीर बाबाचा आश्रम । पावन करी डिग्रस ग्राम । योग याग साधन । करुनि निवास करी ।।२४ ।। त्यांच्याच नामाची महती । गाती सदा भक्त गीती । करुनि सप्ताह यथामती । वंदन करी योगेश्वरा ।।२५ ।। नारायणपूरचे हनुमान मंदिर । आईचे तपश्चर्येचे घर । ईच्छा पूर्ण करी सत्वर । पवनसुत हनुमान ।।२६ ।। लमधामचा मारोती राया । जागृत ज्याची काया । सदैव भक्ताला छाया । वायूपूत देतसे ।।२७ ।। अनसूया मंदिरा शेजारी । टेकडी दिसे साजरी । भाव भक्तिची दरी । पाहतसे सर्वज्ञ ।।२८ ।। याच मनोहर टेकडीवरी । ऋषीमुनी तप करी । परिसर पावन करी । वास्तव्य करुनिया ।।२९ ।। नाव ऋषीचे चिंतामन । योग याग निधान । निवडले हेचि ठिकाण । तपश्चर्या करण्यासी ।।३० ।। शिवाची करुनि आराधना । केली खंडयोग साधना । पूर्ण करी स्तवना । यज्ञयागकरुनिया ।।३१ ।।

अलग करी अवयव। एकापासून एक बाह्य। ईश्वरप्राप्ती तया होय। योगेश्वर स्वामीसी ।।३२ ।। टेकडीवर केले भुयार। आणीले ते रस्त्यावर। तेथे असे एक विहीर। बाहुली तया म्हणती ।।३३ ।। याच भुयारातून। ये जा करी आतून। परी न दिसे तन। कदापि कुणालाही ।।३४ ।। स्नानसंध्या करावयासी। येई आतून बाहुलीसी। करी साधना अहर्निशी। टेकडीवरी भुयारात ।।३५ ।। पावन केला परिसर। वास्तव्य करुनि टेकडीवर। तपश्चर्येचे हे घर। चिंतामन ऋषीचे ।।३६ ।। त्याच खाली राही। घोडदेवबाबा महाकायी। दर्शना ते येई। ऋषी चिंतामनीच्या ।।३७ ।। शुभ्र उंच अश्वावर। घोडदेव बाबा होई स्वार। वंदन करी योगेश्वर। प्रदक्षिणा गडा मारुनि ।।३८ ।। वंदन माझे चिंतामनीला। तसेच घोडदेव बाबाला। पूनित केले भूमिला। वास्तव्य करुनिया ।।३९ ।। एकदा महाशिवरात्रीला। भुजंग तेथे निघाला। होते तेथे समयाला। सिद्ध संत महंत ।।४० ।। संतांनी जना सांगितले। चिंतामन बाबा आले। शेषरुपात दर्शन दिले। एका वृक्षाखाली ।।४१ ।। म्हणून सांगी भक्ताला। समाधी तेथे बांधायला। शेषशाही जेथे प्रगटला। त्याच ठायी चिंतामनी ।।४२ ।। नवसाला पावी चिंतामनी। म्हणून नवस बोली कोणी। ऐका आता ती कहानी। पूर्णत्व जया मिळे ।।४३ ।। होता एक पांडू तेली। दृष्टी त्यांची हरपली। आंधळा शापकली। शिरला लोचनी ।।४४ ।। म्हणून केला नवस। चिंतामन योगेश्वरास। बांधिल तव मंदिरास। दृष्टीलाभ मज होता ।।४५ ।। चवथ्या दिनी दृष्टी आली। प्रकाश ज्योत तेवविली। डोळस झाला पांडू तेली। चिंतामनी कृपेने ।।४६ ।। म्हणून बांधीले मंदिर। त्याच पावन टेकडीवर। नवसाला पावे हर। जो भजे ज्या भावे ।।४७ ।। म्हणौनि महाशिवरात्रीला। भक्त येती दर्शनाला। यात्रा भरी स्थलाला। तांबे बरडीवरी ।।४८ ।।




शंकराचे तेथे मंदिर। तैसेच ठाणं नागद्वार। जवळच आहे भुयार। योगेश्वर स्वामीचे ।।४९ ।। आई अनसूयेने केली। सुरुवात कामाची झाली। गणेश मंदिराची प्रथमावली। बाहुली शेजारी ।।५० ।। स्वत: मंदिरी येवूनि। बाहुलीसी निरखूनि। अन्नदान करी भवानी। कृपाप्रसाद देवूनि ।।५१ ।। असे हे पावन ठिकाण। भक्त अर्पिती तनमनधन। दर्शन देई शेषभगवान। सूक्ष्म दिव्य रुपांत ।।५२ ।। खोपडी भगत बुवाची। भक्ती देवीदेवतांची। शोभा वाढवी गावाची। वास तेथे करुनिया ।।५३ ।। रातोरात जाई बुवा। कैलास शिखरी महादेवा। सूर्योदया येई गावा। चवऱ्या मठाठे बांधूनि ।।५४ ।। सखा माता तूचि दाता। तव नामे पावनता। मिळतसे ग्रामापरता। गाव तुझे म्हणूनिया ।।५५ ।। यमुना गोदा कृष्णातीर। पावन करी परिसर। देवीदेवतांचे वसे घर। तीर्थक्षेत्र म्हणूनिया ।।५६ ।। तैसीच जीवना नदी। पावनतेची पयोधी। भक्तांची करुणानिधी। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।५७ ।। जीवनदायी जीवना ठायी। उत्तरवाहिनी होवूनि वाही। देवीदेवता निवारा घेई। तिरावरी जीवनेच्या ।।५८ ।। जेथील नदी उत्तरवाहीनी। ऋषीमुनीची असती ठाणी। अवतरली माता भवानी। पारडसिंगा धामात ।।५९ ।। विठ्ठल रखमाई मंदिर। याच पावन तिरावर। श्री संत सावताचे घर। येथेचि वसतसे ।।६० ।। एकनाथ महाराजाची समाधी। आहे या भूभागी। हाती घेवूनि चांदीची छडी। नाम संकीर्तन करीतसे ।।६१ ।। शिष्य गाडगेबाबांचे। वैरागी जीवन सच्चे। भोक्ते कर्मयोगाचे। ज्ञानदान करीतसे ।।६२ ।। आले एकनाथबुवा गावी। शिष्य संप्रदाय वाढवी। भक्तीरसाची थोरवी। सांगी कथा किर्तनी ।।६३ ।। १०१ खंडीचे अन्नदान। केले करुनि यज्ञ। तुकडोजीच्या आशिर्वचन। यज्ञ पूर्ण करितसे ।।६४ ।। म्हणून समाधी पावन। जीवनातीरी असे ठाम। एकनाथबुवाचे ठिकाण। विठ्ठलरुखमीणी

शेजारी ।।६५ ।। माता मंदिराचा शेजार । साईबाबा रमावर । दत्तसाई अनसूया मंदिर । या पावन परिसरी ।।६६ ।। बाह्य परिसर जसा सजला । सौंदर्य लाभे अंत:रंगाला । ऋषीमुनीने पावन केला । महिमा श्रीक्षेत्राचा ।।६७ ।। गर्दवनराईचा वेढा । लताफुलांनी घातला सडा । झरणे झरी दरी दरडा । संमार्जन करुनिया ।।६८ ।। ऋषीमुनीची अविरत छाया । पावन करी ही गया । म्हणून अवतरली महामाया । पुण्यपावन श्री क्षेत्री ।।६९ ।। मध्यभागी आहे एक । म्हणती त्यास गांधी चौक । भक्तीस्थळ हेचि नेक । ऋषीमुनी सत्पुरुषांचे ।।७० ।। हनुमानाचे तेथे मंदिर । भजती सर्व नारी नर । पिंपळवृक्षाचा शेजार । या मंदिरालागूनि ।।७१ ।। वृन्दावनी बन्सीवट । जगन्नाथाचा कल्पवट । शिरडीचा निबंवट । अक्षयवट प्रयागचा ।।७२ ।। गया येथे बंछावट । तैसा येथेचि पिंपळवट । जेथे असे अनसूया मठ । गावी गांधी चौकात ।।७३ ।। योगमाया जया अवगत । नाथ संप्रदायी भक्त । राहतसे श्रीक्षेत्रात । सिद्धता करावया ।।७४ ।। योगी सांगे लोकांती । योग बाधा न करिती । जो करेल त्यांना प्रचिती । येईल तात्काळ ।।७५ ।। ईच्छा झाली एकाची । सिद्धता पाहावी बाबाची । चोरुन पाहतसे योग्याची । तपसाधना त्यावेळी ।।७६ ।। एकएक अवयव अलग करी । धडापासून शिर दूरी । बाजूला ठेवून देई सारी । अवयव शरीराचे ।।७७ ।। पुन्हा ते जोडून घेती । एकेठायी लावून ठेविती । सिद्धाची ही सिद्धकृती । जाणतसे तयेवेळी ।।७८ ।। योग्याच्या ध्यानी आले । शाप तत्क्षणी दिले । कायमचे दारिद्र्य आले । नशीबी अजानते ।।७९ ।। घेतली समाधी जेथे । पिंपळवृक्ष लावी तेथे । कायावाचा भजतसे । योगेश्वर बाबासी ।।८० ।। वानराचा होता त्रास । म्हणून तोडी पिंपळफांद्यास । परी मृत्यू आला त्यास । अनुभवी गावकरी ।।८१ ।। तीन ईसमांनी तीन वेळा । पिंपळाच्या फांद्या तोडल्या । म्हणून मृत्यू






त्यांना आला । परिणाम जाणतसे ।।८२ ।। जुणे जाणते सांगती । पिंपळाची फांदी जे तोडती । मृत्यू येई अवचिती । पिंपळाचा महिमा असा ।।८३ ।। याच पिंपळवृक्षातली । योग्याने समाधी घेतली । पावनता तया आली । सांगतसे ज्ञानीजन ।।८४ ।। त्याच पावन जागेवर । उभारीले मातेचे मंदिर । बसूनि आसनावर । दु:ख निवारी भक्तांचे ।।८५ ।। समाधीचे घेवूनि दर्शन । पावन करीती तनमन । नवनाथांना भजून । ईडापीडा टळतसे ।।८६ ।। ऐसा हा परिसर । पावनतेचे माहेर । मध्यभागी असे घर । अनसूया मातेचे ।।८७ ।। देवमुनीऋषीश्वर । संत महंतांचे आगर । पावन करी परिसर । निवास करुनिया ।।८८ ।। पंचक्रोषिचा हा महिमा । कथन करी तुम्हा ज्ञाना । सर्वज्ञ श्रोता सज्ञना । वंदन माझे तयासी ।।८९ ।। निवडले हेचि ठिकाण । आदीनाथाचे निधान । जाणूनि पूर्व गाण । अवतार घेतसे ।।९० ।। ऋषीमुनीच्या पुण्यप्रतापे । देवी अवतरे या भूभागे । पवित्रधामी पवित्र काजे । महाशक्ती अनसूया ।।९१ ।। म्हणून आली महामाया । भगवती अनसूया । पारडसिंगा नाव तया । पावन करी त्रिलोकी ।।९२ ।। पावन रमनीय डगर । सिंहासनी गायत्री हार । अनुदिन चाले नाम गजर । माता तव नामाचा ।।९३ ।। चराचरी अधिकार । सत्ता केंद्र येथे स्थिर । जेथून चाले व्यवहार । मूळ ठिकाण हेचि ।।९४ ।। देवीदेवता ऋषीमुनी । पशुपक्षी नरखाणी । सर्वांची अधिकारवाणी । श्रीक्षेत्र पारडसिंगा ।।९५ ।। घेतला अवतार । रुप सगुण साकार । करी भक्तोद्धार । भगवती अनसूया ।।९६ ।। ऐसे महत्व श्रीक्षेत्राचे । सर्वांचे भाग्य साचे । म्हणौनि भजती वाचे । जय जय अनसूया ।।९७ ।। ऐसे हे पारडसिंगा ग्राम । आई अनसूयेचे जन्मस्थान । वैकुंठीचे भूधाम । भगवती चरणासी ।।९८ ।। कथिला ग्राममहिमा । माउलीची कृपा जाणा । बुद्धी देई तव कवणा । जन्मवृत्तान्त सांगण्यासी ।।९९ ।। पारडसिंगा गावी एक

गोत्र। नामे बोलती भक्ते सर्वत्र। विठ्ठलरुखमीणी पूजी अहोरात्र। भाव भक्ती अर्पूनि ।।१००।। आराध्य दैवत त्यांचे। विठ्ठल रुक्मिणी साचे। सदैव वदे वाचे। विठ्ठल विठ्ठलम्हणौनि ।।१०१।। काशीनाथ भक्ते पाटील। नारायणपूरचे मालगुजार। वारकरी संप्रदायी घर। नांदतसे गावात ।।१०२।। त्यांचीं ऐका वंशावली। पाच मुल दोन मुली। तिही भक्तीसागरी न्हाली। विठाई माऊ लीच्या ।।१०३।। लहानुजी रामचंद्र लक्ष्मण। रामजी शामराव पाच जन। सकवार पीखोली कन्या जाण। सात अपत्ये तयाची ।।१०४।। नारायणपूरची मालगुजारी। असे भक्ते कुटूंबाघरी। हनुमंताची करी चाकरी। अनन्य शरण येवूनिया ।।१०५।। सात अपत्यापैकी एक। काशीनाथ भक्ते पाटलाचा लेक। रामजी भक्ते पाटील नेक। भाग्यविधाता जो असे ।।१०६।। रामजीची पत्नी आणाई। जैसी असे देवकामाई। दिनरात भजे रखमाई। एकचित ठेवूनिया ।।१०७।। रामजी भक्ते पाटील। आणाई पत्नी सोज्वळ। आठ अपत्यांची माळ। गुंफीतसे संसारी ।।१०८।। राजाराम आनंदराव। सिताराम नामदेवराव। सरु वेणू कांताबाईसव। अनसूया जन्मा आली ।।१०९।। ऐसे आठ मुलमुली। रामजीच्या संसार वेली। भावभक्ती फुलली। भक्ते कुटूम्बांत ।।११०।। वंदन माझे उभयता। रामजी आणाई मातापिता। उदरी आली भक्ति सरिता। भगवती अनसूया ।।१११।। आता ऐका कथा। भगवतीची अवतार गाथा। मातापित्याची गीता। पावनता जया मिळे ।।११२।। नारायणपूर रिठी गाव। तेथे नांदते हनुमंतराव। सर्वसिद्धी जागृत देव। मोहाच्या झाडाखाली ।।११३।। रामजीकडे मालगुजारी। शेती त्यांची नारायणपूरी। रात्रंदिन राबता करी। विठ्ठल विठ्ठल म्हणौनिया ।।११४।। भर दुपारच्या प्रहरी। उभयता करी न्याहारी। हनुमंत असे शेजारी। मोहवृक्षाखाली ।।११५।। तेथे असे सिद्धपुरुष। काया वाचा मने सात्विक।







कांती झळाळे सर्वत्र। या परम् पुरुषाची ।।११६।। तेचि मेरे रामबाबा। भक्तीचा प्रचंड धबधबा। मेरा राम वदे वाचा। वंदन माझे तयाला ।।११७।। हिमालय ते कन्याकुमारी। तिर्थाटन बाबा करी। करुनि भ्रमंती सारी। तपाचरण करितसे ।।११८।। शुभ्र वल्कला जटाधारी। तेजपुंज तपाचारी। राही हनुमंता शेजारी। नारायणपूरात ।।११९।। का आले येथे। निमित्त करी कोणते। परिसावे एकचित्ते। अवधान देवूनि ।।१२०।। खापरीचे गणपतराव केने गेले। बद्रीनारायणी दर्शनाले। तेथे कॉलऱ्याने ग्रासले। काय करावे कळेना ।।१२१।। मेरे रामबाबा तेथे आले। औषधादी उपचार केले। भावभक्तीचे भुकेले। श्रद्धा जडे तवपायी ।।१२२।। बाबाशी केली विनंती। यावे अमुच्या ग्रामाती। भक्ताची आर्तता चित्ती। मनी धरा योगेश्वरा ।।१२३।। जाणितसे अंतर्ज्ञानी। आलो मी ज्या कामी। पूर्ण होई याच ग्रामी। खेळ सारा मायेचा ।।१२४।। म्हणून खापरी गावी आले। केने घरी राहू लागले। परी ना मन रमले। एकेठायी बसूनिया ।।१२५।। बाबा त्यांना वदती। घरादाराची आम्हा न प्रीती। अहर्निश अमुची भ्रमंती। ठाव ना एके ठायी ।।१२६।। बाबांची आज्ञा ऐकून। केने देई झोपडी बांधून। हनुमंताशेजारी जाण। नारायणपूर रिठी गावी ।।१२७।। केनेकडून नेवेद्य येई। दूध दही लवलाई। सुवर्णादि अलंकार देई। श्रद्धाभाव ठेवूनिया ।।१२८।। सुवर्णाचे कडे दोन। करी बाबास अर्पण। करुनि त्यासी वंदन। शिष्यत्व स्विकारीले ।।१२९।। बाबांनी गुरुपदेश केला। गावातील काही भक्ताला। परी तो फळा आला। रामजी आणाईसी ।।१३०।। सुभागे शिष्य बनले। गुरुपदी दृढ झाले। एकचित्ते भजीले। मेरेरामबाबास ।।१३१।। रामजी आणाईची सेवा। सुखबी मेरे राम बुवा। नारायणपूरी ठाव घ्यावा। बाबांच्या चरणासी ।।१३२।। नारायणपूरचा

परीसर। स्वच्छ करी दूरवर। बाबांना जोडूनि कर। पादपूजा करितसे ।।१३३।। सोडीला कामधंदा। भजू लागले गोविंदा। मेरे राम बाबाचा बंदा। गुणगायन करी ।।१३४।। दुरुन लोक येवू लागले। बाबाच्या दर्शनाले। कृपाप्रसादे कृत्तार्थ झाले। योगेश्वर बाबांच्या ।।१३५।। रामजी विनवी बाबाला। चलावे अमुच्या घराला। मी तर तपस्वी भला। न येई गावात ।।१३६।। करु लागले तेथेच सेवा। अनुदिन राहूनि गावा। भजतसे हनुमंत देवा। चरणी भाव अपूर्नि ।।१३७।। पूजाअर्चा होवू लागली। किर्ती बाबाची दूर गेली। मंदिराची उभारणी केली। हनुमंत रायाच्या ।।१३८।। मुका मिस्त्री व भावाने। सुरु केले फाडी फोडणे। चुनखडी राख जमविणे। मंदिर बांधण्यासी ।।१३९।। भक्तांच्या सहकारे। मंदिर त्वरीत उभारे। हनुमंत तेथे अवतरे। झाडाखालूनि मोहाच्या ।।१४०।। एके दिवशी अकस्मात। बाबा गेले रातोरात। न वर्तता काही मात। निघून जाई दूरदेशी ।।१४१।। नाही झाले बाबाचे दर्शन। रामजी होतसे खिन्न। शोधाशोध करी तत्क्षण। मेरे रामबाबांचा ।।१४२।। बाबा, तुम्ही लाविला लळा। भक्तीचा फुलविला मळा। सांभाळी मम गोतावळा। योगेश्वर मेरे रामा ।।१४३।। जैसे आई न दिसे लेकरा। जीव होई कावराबावरा। तैसे भासे तव कुमारा। सद्गुरु दीनानाथा ।।१४४।। म्हणून करी बाबाचा शोध। जाई छिंदवाडा जिल्ह्यात। रागादेवीच्या घोर अरण्यात। तप जेथे करीतसे ।।१४५।। शेजारी होती पंचधारा। गंगा येई तव उद्धारा। रागादेवीच्या भुयारा। बसती बाबा दगडावर ।।१४६।। बाबांनी पेटविली धुनी। भव्य शीला घेई आसनी। रागादेवीच्या घोर वनी। एका भव्य गुहेत ।।१४७।। दोन व्याघ्र बसले येवूनि। तपस्या न बाधी कुणी। तेच असे तया रक्षणी। योगेश्वर बाबांच्या ।।१४८।। रामजी येई बग्गु बिछव्याला। तेथून गेले



रागादेवीला। मेरे रामाच्या दर्शनाला। कृपापात्र होण्यासी ।।१४९।। प्रसंग पाहूनि अरण्यात। रामजी घाबरले मनात। परी बाबा जाणी मनोगत। अभय त्यास देतसे ।।१५०।। बाबाने डोळे उघडले। रामजी कृतार्थ झाले। कैसे येणे जाहले। विचारिती शिष्याला ।।१५१।। जाणितले सर्व मनी। लोकोद्धाराची कहानी। वंदितसे भक्ता लागूनि। जाणते जरी असती ।।१५२।। रामजी विनवी बाबाला। चालावे नारायणपूरला। तुम्हापरता न कुणी मला। कृपाछत्र देतसे ।।१५३।। बाबा वदले रामजीला। जावू उद्या सुर्योदयाला। पूर्ण करु अवतारलीला। पारडसिंगा जावूनिया ।।१५४।। मध्यरात्रीच्या समयी। दोन ताटे भरुन येई। तयेवेळी ते प्रसाद घेई। समक्ष वाघांच्या ।।१५५।। ताटातील एक फळ। बाबा ठेवी अपुल्याजवळ। सुर्योदयाचा उचित काळ। येतसे पारडसिंगा ।।१५६।। पुन्हा गेले पंजाबला। भक्त आला घ्यावयाला। नंतर आले काटोलला। भीकूलाल मारवाडी घरी ।।१५७।। रेंगी घेवूनि बसायला। रामजी गेले काटोलला। परत आणिले बाबाला। नारायणपूर मंदिरी ।।१५८।। धरतसे भक्तीची कास। भजूनि मेरे रामास। अनुदिनी एकच ध्यास। मेरा राम मेरा राम ।।१५९।। एके दिनी मुनीवरांनी। पहिले अंत:दृष्टीनी। भाग्याचे थोर धनी। आहात तुम्ही उभयता ।।१६०।। रामजीस आज्ञा करी। गवऱ्या आण सत्वरी। पानगे शिजवूनि त्यावरी। भोजन येथे करावे ।।१६१।। रामजीने गवऱ्या आणल्या। आणाईने त्या पेटविल्या। जगरावर शिजू घातल्या। पानगे करुनिया ।।१६२।। शिजविले तिन पानगे। सिद्धता करी स्वअंगे। मिळतसे जव भागे। भाग्यवंत जे असे ।।१६३।। एक पानगा करी घेवूनि। ठेविला हनुमंत चरणी। तोच प्रसाद देई वदनी। सेवन करण्या आणाईसी ।।१६४।। एक बाबांनी घेतला। रामजीला एक दिला। त्रिमूर्तीची ही कला। तिन पानगे करुनिया ।।१६५।।

रागादेवीच्या अरण्यी। होते जे फळ ध्यानी। जपवूनि ठेवी तनी। प्रसाद त्याचा देतसे ।।१६६ ।। असा हा कृपाप्रसाद। मिळाला आणाई मातेस। भक्तिभावे घेवूनि घास। सेवन करितसे ।।१६७ ।। पानग्याची मधुरता। वाचा न वदे वर्तता। अनुभूति अनभवता। ध्यावा [illegible] ।।१६८ ।। पानगा करुनि सेवन। कृतार्थ झाले जीवन। अनुदिन सेवेचा परिणाम। कृपाप्रसाद मिळतसे ।।१६९ ।। कौसल्येच्या पोटी राम। अंजनीच्या उदरी हनुमान। प्रसादाचा हा परिणाम। वेदपुराण सांगतसे ।।१७० ।। तैसीच आणाईची कथा। गुरुप्रसादाची गाथा। भवतारक भावगीता। उद्धरती नरनारी ।।१७१ ।। मेरे राम निघून गेले। रामजी पोरके झाले। परी प्रंसादाचे अंकुर फुलले। आणाईच्या उदरी ।।१७२ ।। फळ टाकूनि वदनी। अंतरी प्रगटे नारायणी। अवतार लीलेची कहाणी। पूर्ण करितसे ।।१७३ ।। पूर्वपुण्याईचे फळ। भावभक्तीची माळ। म्हणून येतसे जवळ। परब्रम्ह घरासी ।।१७४ ।। प्रभात समयास। प्रसववेदनेचा त्रास। कष्ट देई जीवास। माता आणाईला ।।१७५ ।। सूर्योदयांची प्रभा पसरली। एकाएकी कळा थांबली। नारायणी अवतरली। आणाईच्या उदरी ।।१७६ ।। ५ मे १९२६ साली। बुधवार दिनी मंगल काली। आदिमाया अवतरली। मिती चैत्र अष्टमीला ।।१७७ ।। सहस्त्र सूर्याच्या रश्मी। दिसतसे तव नयनी। तेजपूंज तपस्वीनी। कांती झळाळे सर्वत्र ।।१७८ ।। कोटी सूर्याची प्रभा। घेवूनि आली जगदम्बा। लक्षदीपांची प्रभा। पडली भक्तेघरी ।।१७९ ।। दूर करण्या अंध:कार। सूर्योदयी हा अवतार। जैसा प्रकाशवी भवसागर। आदीत्य नारायण ।।१८० ।। पाहूनि मुलीचे वदन। आणाई हर्षी मनोमन। घेवूनि पापा क्षणोक्षण। धन्य माता होतसे ।।१८१ ।। मुखकमल पाहतां बाले। सानथोर आनंदले। करिता दुग्धपान बाले। सार्थक होई जन्माचे ।।१८२ ।। बाराव्या दिवसी बारशे केले। मेरे राम






तेथे आले। स्वहस्ते पाळण्यात टाकले। चुंबुनिया बाळाला ।।१८३ ।। नाव दिले अनसूया। नसे तिला असूया। तीच असे महामाया। वंदिती जया देवदेवी ।।१८४ ।। हलवी बाबा पाळणा। झोका गेला देवांगना। नमन करी त्याक्षणा। गुहय जाणोनि अंतरी ।।१८५ ।। जो जो रे बाळा जो जो म्हणती। तूच अमुची यशोमती। अंगाई गाऊ तुला किती। खुंटते वाचा माझी ।।१८६ ।। अनसूया तुज नाव दिले। नामकरण तव केले। मातापिता गहीवरले। रम्य सोहळा पाहूनि ।।१८७ ।। असा हा जन्मसोहळा। पार पडला भक्ते कुळा। पारडसिंगा श्री क्षेत्राला। माता तव कृपेने ।।१८८ ।। नमूनि अनसूया माता। स्फूर्ती दे भाग्यविधाता। कथन करण्या तव गीता। लोटांगण तव चरणी ।।१८९ ।। याहूनि सुरस कथा। लौकीक जीवनाची गाथा। संसारी संसार व्यथा। भवसिंधू तारक ती ।।१९० ।। परिसावी पुढील अध्यायी। संसारातील नवलाई। कैसी त्रासवी जीवा माई। संसार बंधन बांधूनि ।।१९१ ।। ही कथा अती गोड। पुरवी भक्तीची चाड। परी न चाले लाड। भावभक्तीविना ।।१९२ ।। इतिश्री परमेष्ठी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। द्वितीयोऽध्याय सम्पूर्ण ।।१९३ ।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती ।। शांती ।।।

**।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।**

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

जय जय अनसूया माता । करुणाघना कृपावंता । साधण्यासी जनहिता । जगत्पाळ करितसे ॥१॥ बुद्धी दे मज देवी । गाथा गाऊन पाही । तुझ्याच कृपेची ग्वाही । सर्वज्ञ तू असे ॥२॥ कथितो आता कहाणी । अमर करी जी जीवनी । निजध्यास निजमनी । सत्संग ठेवूनिया ॥३॥ बालरुप बाललीला । दाविसी जनतेला । सुखविले मातेला । खेळ करुनिया ॥४॥ आईची लीला सुरु झाली । परी अज्ञ जना न कळली । ऐका आता बालबोली । आई अनसूयेची ॥५॥ भजनाचा भारी नाद । विठ्ठलास घाली साद । टाळ्यांचा करुनि निनाद । विठ्ठल विठ्ठल म्हणतसे ॥६॥ मातापिता विठ्ठल भक्त । म्हणूनि भजी अहोरात्र । घराजवळील मंदिरात । ध्यान धारना करुनि ॥७॥ सोबत घेई लेकीला । नेई विठ्ठल दर्शनाला । लाविला भक्तीचा लळा । बाल अनसूयेशी ॥८॥ सदैव करी चिंतन । अहर्निश एक ध्यान । मनी धरी नारायण । एकरुप होवूनि ॥९॥ कोठे ही जावे, काहीही खावे । माती, गोटे, समभावे । शिक्षेस पात्र व्हावे । माता आणाईच्या ॥१०॥ जैसे यशोदा मातेला । सुखवितसे कृष्णलीला । बालपणीचा गोपालकाला । नंदनंदा देवूनिया ॥११॥ दहीदुधांचे चोरणे । गोपीकांचे माठ फोडणे । यशोदा ऐकी गाऱ्हाणे । बालगोपालांचे ॥१२॥ तैसेच आणाई माता त्रस्त । गाऱ्हाणी सांगे समस्त । म्हणे कपडे फाडी तुझी लेक । सांभाळ बाई मुलीला ॥१३॥ काल होती माझ्या घरी । मारितसे मम पोरी । पाणी फेकी दूरवरी । काय करावे कळेना ॥१४॥ कोठेही जावून बसावे । मनी वाटेल ते करावे । मातेने गाऱ्हाणे ऐकावे । बाल अनसूयेचे ॥१५॥ करी आणाईस त्रस्त । बाललीला समस्त । परी अनसूयेस निजध्यास । परब्रह्म स्वरुपाचा ॥१६॥ आले तुझ्या मनी । करावी जीवाची खेळणी ।







## अध्याय ३

## संसार बंधन





उमरी गावातील या विहीरीत
माताजी पाणी भरण्यासाठी
गेल्या असतांना पडल्या मातेच्या लौकीक
जीवनातील प्रथम दृष्टान्त

जावून यावे देवांगनी। साध्य करण्या काज ॥१७॥ भक्ते घरी असे विहीर। अती खोल तिचे तळ। पाणी असे
भरपूर। त्या आडामधी ॥१८॥ एकदा तू खेळत होती। पिंगा पिंगा म्हणत होती। अकस्मात तोल गेला खालती।
पडली विहिरीत ॥१९॥ अनसूया विहिरीत पडली। जोराची हाकाटी झाली। मातापिता धावत आली। हंबरडा
फोडूनिया ॥२०॥ बाजीराव तिजारे येई धावत। काढाया उतरले विहिरीत। तू बसली होती आत। निर्विकार
नि:स्तब्ध ॥२१॥ घेवूनि तुला कडेवर। बाजीराव आणि वरवर। करु लागले उपचार। वैद्य डॉक्टर बोलावूनि ॥२२॥
मांत्रिक मंत्र टाकिती। वैद्य नाडी पाहती। डॉक्टर उपचार करिती। परी न होई आचार ॥२३॥ काहीच न झाले
मुलीला। कैसे घडे ही कला। टळली बाईची बला। समाधान पावतसे ॥२४॥ एकोनविसशे एकोनतीस सालात।
सारडा बील येई अवचित। बालपणीच विवाह बंधनात। टाकितसे मुलमूली ॥२५॥ (बालविवाह नियंत्रण कायदा।
प्रणेता हरिविलास सारडा। याच साली झाला कायदा। सारडा विधेयक म्हणूनि ॥२६॥ अठरा वर्ष मुलाचे वय।
चौदा वर्ष मुलीचे वय। कायद्याचे बंधन होय। बालविवाह थांबविण्याकरीता ॥२७॥ म्हणून माता पिता विचार
करी। रामजी सवे आणाई घरी। करुन टाकावे लग्न पोरी। सारडा विधेयक येतसे ॥२८॥ जर नाही केले लग्न
आता। चौदा वर्ष लांबेल अक्षता। म्हणौनि वर पाही उभयता। बाल अनसूयेशी ॥२९॥ वर पाहूनि अति सावध।
नामे जंगलूजी खंडाईत। लग्न लाविले रुढीजात। एकोनविसशे एकोनतीस साली ॥३०॥ करुनि तया वंदन।
गातो त्यांचे कवन। का बांधिले बंधन। महामाया भगवती ॥३१॥ जंगलूजी अती भाग्यवान। पावन करी त्यांचे
सदन। फळा आले पूर्व पुण्य। करी कर जोडूनिया ॥३२॥राजाराम खंडाईतचे मूळ गाव। बग्गू बिछवा त्याचे नाव।

छिंदवाडा जिल्हा सौंसर तालुक्का ठाव। नरु पाटलाकडे राहती ।।३३।। नरु पाटील निपुत्रिक। काळाने ग्रासले एकाएक। मागू लागले वारसा हक्क। झगडे होती त्यासाठी ।।३४।। झाली संपत्तीची धुळधान। भांडणाचे मूळ कारण। रामराम ठोकती राजाराम। बग्गू बिछवा गावाला ।।३५।। चार मुले दोन मुली। राजारामजीला अपत्ये झाली। उदर निर्वाह करता चाली। कठीण समय आला ।।३६।। धाकटी बहीन बायजाबाई। होती उमरी गावी। जागोबाजी महाजनाच्या नावी। संसारी रमतसे ।।३७।। बहीन जावयाच्या सहवासे। चरितार्थ चाले बिनसायासे। उमरी ग्रामी राहतसे। राजारामजी खंडाईत ।।३८।। तेथेच घेतली शेती। पिकवी शेतीत मोती। स्थायिक झाले उमरीप्रती। उदर निर्वाह करावया ।।३९।। जंगलूजी त्यांचे तृतीय पुत्र। थकवी अपुले गात्र। काम करुनि अहोरात्र। मळा फुलवितसे ।।४०।। जंगलूजीचे भाग्य थोर। दैव करी फेरफार। परमेष्ठीचा अवतार। येतसे उमरी ग्रामी ।।४१।। ऐकून घ्या ही कथा। जंगलूजी विवाहाची गाथा। पूर्व जन्माची सुकृता। म्हणूनिया गातसे ।।४२।। एकाच मंडपी पाच लग्न। लावितसे होवूनि मग्न। मातापिता होई निर्विघ्न। सारडा बिलातूनि ।।४३।। काशीबाई, सरुबाई। अन्नपूर्णा, वेणूबाई। पाचवी असे माई। म्हणती तुज अनसूया ।।४४।। अनसूया तीन वर्षाची पोर। घेतले तिला मांडीवर। का लावला जीवाला घोर। म्हणूनि सांगतसे ।।४५।। वरवधू सावध झाले। निमीत्तमात्र लग्न केले। मातापिता आनंदिले। लग्न लावूनिया ।।४६।। तीन वर्षाची अनसूया। लग्न लावी त्या समया। बालपणीची बालकाया। लाजवी नारायणा ।।४७।। बालपण गेले माहेरी। दहा वर्ष लग्न झाल्यावरी। संसाराचे बंधन झुगारी। वेडेपणा दावूनिया ।।४८।। अनसूयेचा बालीशपणा। त्रास देई आप्तजना। नेई मग उमरी ग्रामा। सासरी







नांदावया ।।४९।। जागोबाजी महाजनांचे जेष्ठ पुत्र। बाळासाहेब नामे असे ख्यात। पूजेचा ध्यास अहोरात्र। सोहम्‌नाथ बाबांचा ।।५०।। अखंड धुनी दिगंबर राहणी। लीन सदा परमेश्वर भजनी। सिद्धावस्था प्राप्त करुनि। ध्यान धारना करितसे ।।५१।। जंगलूजी खंडाईतचे घर। बाळासाहेबांचा लाभे शेजार। भक्तिमार्गाचे हे दार। आपोआप उघडिले ।।५२।। नित्य पाही अनसूया। जागृत करी सिद्ध राया। ऋद्धीसिद्धीची माया। ओढ लावी अनसूया ।।५३।। सोहमनाथ बाबांनी कृपा केली। बाळासाहेबांची दृष्टी मिळाली। अंतर्मुख अनसूया झाली। बघूनि एकटक ।।५४।। भजनी पूजनि रंगले मन। भक्तिवाचून न वाटे चैन। देवीदेवतांचे करी स्मरण। अहर्निश सेवाभावे ।।५५।। होवू लागला साक्षात्कार। मनी सोडणे होते घर। सार्थ कराया अवतार। सत्संग लाभतसे ।।५६।। आई तुझे महिमान। पावन करी उमरी ग्राम। करितो गावाचे कथन। माता तव कृपेने ।।५७।। वर्धा जिल्हा कारंजा गाव। आर्वी तालुक्यात ठाव। संत लटारे बाबांचे नाव। कारंजा घाडगे बोलती ।।५८।। नमन माझे लटारे बाबा। कर्मयोगांचा आबा। संतमहंतांचा दबदबा। कारंज्यात वास करी ।।५९।। कारंजावरुन तीन मैलासी। एका टेकडीच्या पायथ्याशी। वसविले उमरी ग्रामाशी। खडकाळ प्रदेशी ।।६०।। खोल विहीरी खोदूनि। न जाहले गावी पाणी। आणावे लागे शेतातूनि। दोन फर्लांग वरुनिया ।।६१।। भांडी घासणे पाणी भरणे। स्वयंपाक करून शेतात जाणे। संसाराचे हेच जीणे। पार पाडी अनसूया ।।६२।। परी न लक्ष कामात। चित्त सर्व देवात। म्हणून साधी एकांत। अंतर्मुख व्हावया ।।६३।। सासूबाई सांगी घरकाम। अनसूया करी निष्काम। परी दिसे त्यात राम। सर्वात्मक सुंदर ।।६४।। कामाची होई हेटाळणी। घरी नसे मनी तनी। म्हणून सासूची बोलणी। ऐकावि लागतसे ।।६५।।

त्रास जरी दिला अज्ञानी। ऐकतसे जगत्जननी। तेच हरीनाम समजूनि। गोड करी अनसूया ।।६६।। जनाबाईने भांडी घासली। संत सखूने धुनी केली। तिच कामे करावी लागली। अनसूया मातेला ।।६७।।

जनी गवताले चाल। पंढरी भोवती जोंधळ्याचे वेल।

विळा घेवून जनी चाल। (अनसूया माता)

नारायणपूरच्या वाटेवर। होता दिन मंगळवार। वदे अनसूया माता सत्वर। स्वमुखे गाऊनिया ।।६८।। म्हणूनि सासूरवाडीत। विळा घेवून जाई शेतात। परी विठ्ठल असे मुखात। मायमाऊलीच्या ।।६९।। सर्व संतांचा मेळा। पाही अनसूया डोळा। काम करुनि मळा। समृद्ध करितसे ।।७०।। का करावे लागे काम। न कळे कुणा मर्म। तव महिमा तूच जाण। नमन माझे सर्वेश्वरा ।।७१।। घेवून गुंड दोर बादली। पाणी भरण्या आडा गेली। भरुन घेण्या आत सोडली। दोरासवे बादली ।।७२।। काय दिसले तुला आत। कुणी न जाणे तुझी मात। कांय असे तुझ्या मनात। सर्वज्ञ तू असे ।।७३।। बादली टाकता विहिरीत। तोल गेला अकस्मात। जावून पडली पाण्यात। विहिरीच्या तळाशी ।।७४।। आडावर होत्या बाया। थरथरली त्यांची काया। कैसी पडली अनसूया। न कळे कुणालाही ।।७५।। विहिरीत होते भरपूर पाणी। कैसी वाचेलं ही भवानी। सर्व बाया हळहळती मनी। गेली लेक पाटलाची ।।७६।। धावत गेल्या गावात। एकच केला आकांत। अनसूया पडली विहिरीत। धावा धावा जन हो ।।७७।। गावात जे हजर होते। धावतच आले आडाते। डोकावूनि आत पाहते। परि न दिसे काहीही ।।७८।। सर्वजन घाबरुन गेले। अनसूयेला तळाशी बुडविले। आत जावू तिला काढाले। म्हणून उतरी विहिरीत ।।७९।। पाहतसे तुला आत।







परी न दिसे तू कूपात। कुठे शोधावे अज्ञात। मार्ग काही सूचेना ।।८०।। वरुन दिसली एकाच्या नयनी। प्रगट झाली मनोमनी। म्हणे मोटेवर आहे भवानी। काढूया वर तिला ।।८१।। मोटेवर पाहून अनसूयेले। सर्व चकीत झाले। म्हणे हे कैसे घडले। विश्वास न बसे लोचनी ।।८२।। मोटरपंप नव्हते त्यावेळी। म्हणून मोटबैलाची सोय केली। शेतकरी पाणी ओली। मोट बैलाच्या साह्याने ।।८३।। भर दुपारच्या वेळेत। पाणी न देई बागेत। म्हणून टांगून ठेवी मोट। अधांतरी विहिरीत ।।८४।। अशाच अधांतरी मोटेत। येवून बसली अनसूया आत। लीला तुझी तुला ज्ञात। समर्थ तूचि असे ।।८५।। बैलवेट साथ करी। मोट आणि वरवरी। घेवूनि तुला करी। बाहेर काढितसे ।।८६।। अनसूये हे कैसे घडले। विहिरीत पडल्याचे आम्ही पाहिले। सांगती बाया म्हणणे अपुले। परी कुणी ऐकेना ।।८७।। जलदेवीची भक्तिवाणी। ऐकणे होते मनी। म्हणून केली करणी। विहिरीत पडण्याची ।।८८।। जीवंत पाहून अनसूयेला। हर्षति सर्व बालबाला। अपाय काही न झाला। आनंदिती नरनारी ।।८९।। आप्तस्वकिय आनंदिले। जंगलूजी गहिवरले। देवानेच रक्षण केले। या अनसूयेचे ।।९०।। अनसूयेच्या अद्‌भूत लीला। त्रस्त करी आप्तजनाला। काय करावे न कळे कुणाला। पडती संभ्रमात ।।९१।। विहिरीत पडल्याचे ऐकूनि। राजाराम आनंदराव बंधू आले धावूनि। अनसूयेस न्यावे पारडसिंगा ग्रामी। म्हणून विचारी महाजनाशी ।।९२।। सासऱ्यांनी नकार दिला। राहू द्यावे अनसूयेला। जगन्नाथ महाजनांनी केला। आटापीटा पाठविण्याचा ।।९३।। बसविले बाईला रेंगीत। आणिले पारडसिंग्यात। मातापिता होई चिंतीत। विचारपूस करुनिया ।।९४।। पारडसिंगावासी विठ्ठलराव ढोले। जागोबाजी महाजनाकडे गेले। सासरे ह्यांचे असती भले। म्हणून जाई उमरी गावी ।।९५।।

राजारामजी खंडाईतची भेट घेतली। जंगलूजीबाबत विचारणा केली। येईल का शेती कामावरी। पारडसिंगा गावात ।।९६ ।। तात परवानगी देती। जंगलूजी पारडसिंगा येती। विठ्ठलराव ढोलेकडे राहती। सवे अनसूयेच्या ।।९७ ।। खोली घेवून तेथं। राहू लागले गावात। राबती शेताभातात। विठ्ठलराव ढोले कडे ।।९८।। शांताबाई ढोले भाविक। विठ्ठलरावांची पत्नी सात्विक। घरकामात करी साथ। लेक आणाईची ।।९९ ।। राहूनिया त्यांच्या घरी। करितसे सेवा चाकरी। कामधंदा बरोबरी। करू लागे अनसूया ।।१०० ।। दोन तोळ्याची अंगठी पडली। शांताबाई खिन्न झाली। भांडे घासतांना हरपली। म्हणूनिया सांगतसे ।।१०१ ।। अंगठी दिसली अनसूयेला। निरखितसे सुवर्णाला। मृत्तिका समान भासे तिला। दागिना अनमोल हा ।।१०२ ।। राजे शिवाजी पाठवी नजराना। वस्त्र सुवर्णादि अलंकार जाणा। तुकारामाची श्रद्धाभावना। देहू दरबारी नेतसे ।।१०३ ।। सुवर्ण आम्हा मृत्तिका समान। म्हणती संत तुकाराम। न वाटे ऐश्वर्याचे भूषण। वापस करी नजराना ।।१०४ ।। ऐसे हे संत महंत। न जाणे सोन्या चांदीची मात। त्यागती सर्व एकजात। मातीमोल म्हणूनिया ।।१०५ ।। तैसेच अनसूयेने केले। न सोन्याचे भूषण तिले। काय करु या अंगठीले। मातीमोल जी असे ।।१०६ ।। म्हणून विचारी शांताबाईला। काय हरवले तुला। गम्मत करी समयाला। अंगठी दावूनिया ।।१०७ ।। तयेवेळी उपदेश केला। दक्ष असावे संसारपूरला। नाही तर दैवाचा हेला। धावेल तुज घरी ।।१०८ ।। कर्माची अशी गाथा। गाईली तू अनंता। सुरस तुझी कथा। श्रद्धाभावे आळविती ।।१०९ ।। सोळा सोमवारचे व्रत। केले तू बालपणात। शिवपार्वती अद्वैत। जाणतसे तुजलागी ।।११० ।। शिवपार्वतीचा महिमा। विठ्ठलराव ढोले सदना। चतुर्थ अध्यायी सूत्र जाणा। शिवशक्ती





स्वरुपाचे ।।१११ ।। इतिश्री परमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। तृतीयोऽध्याय सम्पूर्ण ।।११२ ।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती ।। शांती ।।।

**।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।**

**हरी ॐ शांती । शांती ।। शांती ।।।**

ॐ नमो अनसूया। आदीशक्ती आदीमाया। करुणावती महामाया। नमन तव चरणी ।।१।। तूच दुर्गा तूच पार्वती। तूच असे आदीअंती। म्हणून नमती त्रिजगती। वंदन करुनिया ।।२।। तूच करविरवासिनी। तूच महीषासूरमर्दिनी। तूच तूळजापूर भवानी। लोटांगण तव चरणी ।।३।। शिवशक्तीची कथा। गाईण्या तुझी गाथा। बुद्धी दे मज अनाथा। दीनानाथ भगवंता ।।४।। शरदाचे चांदणे। जाणते वेचिती मने। सुज्ञश्रवती कवणे। चकोरापरी ।।५।। ऐकूण घ्या ही कथा। अनसूयेची पावन गाथा। भगवती रचिता वर्तिता। निमित्त मात्र दास हा ।।६।। श्रावणमासाचा महिमा। दिला विठ्ठलराव ढोले सदना। शिवशक्तीचे रुप जाणा। आदीमाया तू असे ।।७।। धार्मिक ग्रंथाचे पारायण। श्रावण मासी होते पूर्ण। विठ्ठलराव करी गुणगाण। शिव पार्वतीचे ।।८।। पारायणाच्या समाप्ती। होम हवनादी होती। परी येई तव प्रचिती। शिवपार्वती म्हणूनि ।।९।। शिवभक्त दादा महाराज हींगे। योगेश्वर असे पूर्णांगे। पूर्णाहूतिच्या वेळी संगे। स्वयंमेव येतसे ।।१०।। या पूर्णाहूतिच्या कामी। शिवपार्वती लागती पूजनि। महाराज सांगती सदनी। विठ्ठलरावांना ।।११।। संसारी असूनि अलीप्त। जोडपे मिळवा त्वरीत। शिवपार्वतीचे रुप ज्ञात। शोध घ्यावा तयांचा ।।१२।। हिंगे महाराज वदती। बोलवा जंगलूजी अनसूयाती। संसारी जे लिप्त न होती। शिवपार्वती करा तया ।।१३।। पूजेला बसले उभयता। प्रचलीत नाव विसरा आता। तुम्ही शिवपार्वती माता। वदती तया महाराज ।।१४।। करुनि तुमचे पुण्यस्मरण। तुम्हा उभयता माझे वंदन। करितसे तुमचे पूजन।






## अध्याय ४

पागलपणाचा ठपका मातेवर ठेवण्यात येवून वेडेपणा घालविण्या करिता औषधोपचार करण्यात आला.

आद्यरुप ओंकारा ।।१५ ।। शिवपिंड अर्पण केली। यथासांग पूजा केली। कपडे देवून बोळवण केली। शिवपार्वती म्हणूनि ।।१६ ।। शेषनाग येई तत्क्षणी। ओढ लागी दर्शनी। परी तू दूर करी नागमणी। आज्ञा त्यासी देवूनिया ।।१७ ।। नाग बघूनि अवचित। घाबरती जन मनात। आरिष्ट कैसे हे पूजेत। दबा धरुनि बसती ।।१८ ।। पाहूनि हा गलबला। जा म्हणाली तू त्याला। तोच तो निघून गेला। नमन करुनिया ।।१९ ।। आई तू दाविले मूळरुप। ओळखिले तुला सारुप। शिवशक्तीचे तुझे स्वरुप। ॐ नमो भगवती ।।२० ।। श्रावणमासाचा महिमा। सार्थकरी बसूनि पूजना। सोळा सोमवार व्रत जाणा। म्हणून करी बालपणी ।।२१ ।। तूच शिव तूच शक्ती। तूच दूर्गा तूच पार्वती। सर्व तुझ्या ठायी नांदती। महामाया महासती ।।२२ ।। करुनि तुला वंदन। तव पायी लोटांगन। सदैव लाभो चरण। भवसागरी तरावया ।।२३ ।। प्रसंग आहे हा बाका। तू पुरविला तुझा हेका। दिशा बदलविसी जगदीशा। जड देही कार्याची ।।२४ ।। या पूजनापासून। स्वरुप जाणिले भिन्न। ऐका श्रोते हो महिमान। आई अनसूयेचे ।।२५ ।। अवतारलीला सुरु झाली। ज्यासाठी तू अवतरली। पूजनाचे निमित्तावली। करुनि तू घेतसे ।।२६ ।। उद्धरण्या नरनारी। जडदेहा वज्र करी। तपश्चर्या सुरु करी। रानोवनी हिंडूनिया ।।२७ ।। त्यासाठी सोडले घरदार। फेरले पाणी संसारावर। हिंडू लागली दारोदार। पूर्णाहूति होण्यासी ।।२८ ।। शिवपार्वती तू बनली। एकाएकी घरुन निघून गेली। न सांगता अदृश्य झाली। एक सप्ताहानंतर ।।२९ ।। कोठे गेली कशी गेली। वार्ता कुणाला न कळली। सर्व हवालदिल झाली। शोधता अनसूया ।।३० ।। जंगलूजी पाही तुला। पिता रामजी घेवून मुलाला। दोन दिस ना दिसे नयनाला। म्हणौनि चिंता करी ।।३१ ।। तू होती नारायणपूरी। हनुमंत राया

शेजारी। करितसे भक्ती खरी। शेतामध्ये बसूनिया ॥३२॥ बंधू तव जाई शेतात। पाही नारायणपूर शिवारात। बळजबरीने आणिले घरात। तृतीय दिनी माते तुला ॥३३॥ पुन्हा तू निघून गेली। नारायणपूरी रमली। क्रमवारी सुरु झाली। अबाधित अखंडित ॥३४॥ अनसूयेचे असे वागणे। न सांगता निघून जाणे। वेडेपणाची दिसे लक्षणे। आप्तेष्ट बोलती ॥३५॥ अनसूया वेडी झाली। म्हणून वागणे एककल्ली। फिरतसे गल्लोगल्ली। करावा काही उपचार ॥३६॥ वेडेपणा दूर कराया। कोठे तरी न्यावे अनसूया। जोगणी खापा जावया। निश्चय करी रामजी ॥३७॥ छिंदवाडा जिल्हा सौंसर तालुका। गाव असे जोगणी खापा। कन्हान नदीच्या काठा। वसे सातपुडा कुशीत ॥३८॥ देवराव पाटील मालगुजार। सज्जन करी परोपकार। औषध देण्याचा व्यवहार। विनामूल्य करितसे ॥३९॥ पागलांचा करी उपचार। पिढ्या न पिढ्या हाच आचार। त्यासाठी बांधले घरदार। राहण्यासी तयांना ॥४०॥ येथेच न्यावे अनसूयेला। आप्तेष्टांनी विचार केला। वेडेपणा घालवायला। औषध देवूनिया ॥४१॥ जंगलूजी व रामजी। आले जोगणी खाप्याशी। सवे घेवून अनसूयेशी। रोगमुक्त करावया ॥४२॥ साक्षात जे असे परब्रह्म। दुरुस्त कराया निघाले अज्ञ। आई तुझे महिमान। काय कळे अज्ञाना ॥४३॥ अनसूयेची नाडी पाहूनि। देवराव पाटील जाणी मनी। औषधाची मात्रा करुनि। देतसे अनसूयेला ॥४४॥ मुक्काम तेथेच केला। पिता पती जाई सामानाला। एकटे ठेवूनि अनसूयेला। सिद्ध कराया भोजन ॥४५॥ आठ दिवस पुरेल ईतुके। जुलाबाचे औषध तितुके। भरुन ठेविले शिशीते। अनसूया पाहतसे ॥४६॥ पाहून कोणी नाही घरी। घेई तू शिशी करी। रिचविली ती स्वउदरी। वदनी टाकूनिया ॥४७॥ जंगलूजी रामजी आले। शिषी पाहून चकीत झाले। सगळे





औषध फस्त केले। एकाएकी अनसूयेने ॥४८॥ पाहूनि रिकाम्या शिषीले। अनसूयेस विचारु लागले। औषध तू काय केले। सांग ते आम्हांसी ॥४९॥ म्हणे औषध तोंडात टाकले। एकाएकी गट्ट केले। तुम्ही का चिंतीत झाले। बोले निश्चिंत होवूनिया ॥५०॥ घाबरती दोघेही जन। जाणूनि औषधाचे तिव्रपण। देवराव पाटील करी सज्ञान। जहालपणा सांगूनि ॥५१॥ पिता पती चिंता करिती। कैसी आली आपत्ती। न होई आता दुरुस्ती। न वाची आता यातूनि ॥५२॥ वैद्याकडे धावत गेले। म्हणे वाचवा अनसूयेले। औषध सर्व फस्त केले। एकाएकी गिळूनिया ॥५३॥ देवराव पाटील थक्क होती। जाणती औषधाची महती। संडासवाटे बाहेर पाडती। आतडेही मुलीचे ॥५४॥ ऐसा औषधाचा जहालपणा। प्राण घेई विषारीपणा। गावातून भरपूर दही आणा। पाजा म्हणे अनसूयेला ॥५५॥ दही पाजून शांत करा। मग न्यावे कन्हान तिरा। टाका डोई जलधारा। दाह शमविण्यासी ॥५६॥ जंगलूजीने दही आणले। अनसूयेस पाजू लागले। कन्हान नदी तिरी नेले। पाणी टाकी डोईवरी ॥५७॥ तोच तू पाण्यात गेली। एकाएकी अदृश्य झाली। डोहात बुडू लागली। कन्हान नदीच्या ॥५८॥ पिता रामजी विचार करी। कुठे असशील तू पोरी। पाहू लागले नदी तिरी। परी ठाव ना लागे ॥५९॥ पदर तुझा दिसल्यावरी। जंगलूजी धावत येई तिरी। ओढले पदराबरोबरी। अनसूया आईला ॥६०॥ जली राहूनि काही न झाले। महिमा न कळे अज्ञानाले। स्मित हास्य तू केले। सामर्थ्य दावूनिया ॥६१॥ आणिले अनसूयेला गावात। देवराव पाटला सांगी वृत्तान्त। म्हणे ही तर जगदम्बा साक्षात। औषध न लागे हिला ॥६२॥ वेडी हिला समजू नका। औषध कोणतेच देवू नका। उपदेश केला त्यांनी बाका। वंदन करुनि मातेला ॥६३॥ देवराव पाटील अचम्बिती।

औषधाची न हिला गणती। ही तर साक्षात भगवती। नमन माझे तव पायी ।।६४ ।। घेवून आले पारडसिंगा गावी। ठेवून पाही एके ठायी। परी न राहे लवलाही। एके ठायी बैसूनि ।।६५ ।। सर्व प्रयत्न निष्फळ ठरले। मग सर्वांनी दुर्लक्ष केले। जंगलूजीने दुसरे लग्न केले। मीराबाईसी ।।६६ ।। संसाराचा मोहपसारा। अडचणीचा हा डेरा। दूर करी संसार निखारा। मोहमायापाशाचा ।।६७ ।। असूनि देही संसारी। अलीप्त असे अंतरी। जीवाची ही हेराफेरी। करितसे भगवती ।।६८ ।। न जाणे मातेची महिमा। अंतरीच्या खुणा जाणा। सोडूनि संसार बंधना। विरक्त होतसे ।।६९ ।। अवतार कहाणी सुरु झाली। ज्यासाठी तू अवतरली। तपश्चर्येची कास धरली। नारायणपूरी राहूनि ।।७० ।। तपश्चर्येचे तपाचरण। पंचम अध्यायी ऐका सृजन। कथितो मस्तक टेकवून। माँ भगवती चरणी ।।७१ ।। इतिश्री परमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। चतुर्थोऽध्याय सम्पूर्ण ।।७२ ।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती ।। शांती ।।।

**।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।**



# अध्याय ५
## तपस्चर्या



जंगल पहाडात दिगंबर अवस्थेत फिरुन मातेने खडतर तपस्चर्या केली, ऊन, वारा, पावसाचे आघात सोसले हिंस्त्र श्वापदाच्या सहवासात रात्रंदिवस काढले.

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

गणपती गजानना। सर्वज्ञ नारायणा। पोषी तू जनजीवना। सर्वत्र नांदूनिया ।।१ ।। ॐ नमो अनसूया माता। तपश्चर्येची ऐका गाथा। भगीरथ प्रयत्नांची पराकाष्टा। जडजीव तारण्या ।।२ ।। सोडिला संसार घरदार। नामाचा एक व्यवहार। करितसे एक उच्चार। जय जय विठ्ठल म्हणूनि ।।३ ।। आचार उपचार झाला। वेडेपणा जना दिसला। तपश्चर्येची असे कला। तुझी तूच जाणतसे ।।४ ।। फेडिले वस्त्रादि भूषणे। मोहपाशाची आवरणे। तू मी पणाची बंधने। त्यागिली सर्वथा ।।५ ।। दिगंबरी बाणा तुझा। अनवाणी पादपूजा। देतसे देहाला सजा। विदेही अनसूया ।।६ ।। नारायणपूरचा परिसर। गाठितसे वारंवार। ठाव असे हनुमान मंदिर। भक्ती मार्ग दाखवी ।।७ ।। ईथेच गुरुकृपा झाली। रामजी आणाई उद्धरली। मेरे रामाची कृपासावली। उद्धरी मातापिता ।।८ ।। अनुदिन तेथेच राही। नदीनाल्याचा आश्रय घेई। शेतबागातून फिरी माई। अनवानी पायाने ।।९ ।। दत्तसंप्रदायाची दीक्षा। दररोज मागावी भिक्षा। जावूनिया प्रत्येक कक्षा। रावरंकाघरी ।।१० ।। तेच व्रत तू घेतले। दत्ताचे पीठ रक्षिले। भिक्षेसाठी हात पसरले। जावूनि घरोघरी ।।११ ।। तुझ्या सतीत्वाचा परिणाम। देवालाही मिळे लहानपण। दत्तात्रयाचा अवतार जाण। तव कृपे भगवती ।।१२ ।। म्हणून तू गाणगापूरी गेली। नृसिंह सरस्वतीसी भेटली। दीक्षा देवूनि पूर्ण केली। आदीमाया तू असे ।।१३ ।। गोपीचंदाचे गुणगायन। करिती सर्व नाथ मनन। भिक्षेनेच आले अवसान। राजा गोपीचंदाला ।।१४ ।। माता असो या कांता। बहीन असो या भ्राता। भिक्षा देई मज दूता। गोपीचंद

वदतसे ॥१५॥ तेणेच देवत्व आले। अहंभावपण गेले। मोक्षपदी लाभले। जिणे तयाला ॥१६॥ सुदामा जाता द्वापारी। कृष्ण तया विचारी। काय आणलं ते दे झडकरी। भूक मज लागली ॥१७॥ सुदाम्याचे पोहे मूठभर। शांत करी जगदीश्वर। भावभक्तीचा अहेर। प्रेमभावे घेतसे ॥१८॥ माता तू घरोघरी गेली। काय रान्धलं थे आण म्हणाली। नाते गोते सर्व विसरली। माय माझी अनसूया ॥१९॥ कुणी देती भिक्षा। कुणी म्हणे अवदशा। मानपानाची कक्षा। सोडीली मातेने ॥२०॥ मातापित्याकडे जाई। भिक्षा दे म्हणे बाई। अश्रू लोचनी वाही। माऊली आणाईच्या ॥२१॥ बाई तू ये घरी। जेवण कर पोटभरी। फिरु नको दारोदारी। काय कमी तुज असे ॥२२॥ परी न ऐके अनसूया आई। न राही एके ठायी। बंधू भगिनी पिता माई। लोभ नसे कुणाचा ॥२३॥ म्हातारी आली मंदिरी। घेवूनि बांगड्या करी। करण्या मातेची चाकरी। सेवाभाव धरुनि ॥२४॥ माता तू वदली तिला। काय आणलं थे दे मला। तूच पुरविला लळा। भावभक्ती जाणूनि ॥२५॥ नव्हते पैसे गाठीला। न आणी हार नारळाला। बांगड्या आणी पूजेला। स्विकार त्याचा तू करी ॥२६॥ बांगड्या घेतल्या आईने। खाऊन टाकी लगीने। अचम्बित होती नयने। पाहूनि लीला मातेची ॥२७॥ ऐसी तू तपस्वीनी। काच पचवी वदनी। समसमान तुज भवानी। न बाधी काही तुला ॥२८॥ पालापाचोळा खाऊनि। विषारी द्रव्ये सेवूनि। पोषितसे तू तनी। दारोदारी जावूनिया ॥२९॥ वेडी म्हणूनि मागे धावती। टवाळ पोरं गोटे मारती। पागल म्हणूनि अव्हेरती। अजाणते म्हणूनिया ॥३०॥ तुकारामाच्या वाटेवरी। काटे टाकती टवाळी। अभंगगाथा बुडवी तळी। इंद्रायणी नदीत ॥३१॥ ज्ञानेश्वरादी बंधू भगिनी। त्रास दिला पाखंड्यानी। मातापित्याचे छत्र हरवूनि। देहान्त प्रायश्चीत देतसे ॥३२॥







देवादिकांना झाला त्रास। पूर्विपासून हा इतिहास। नाही चुकला वनवास। रघुपती राघवांना ॥३३॥ आई तुझी हीच कथा। भोगितसे जनव्यथा। दूर कराया अज्ञमता। अवतार तुझा असे ॥३४॥ अज्ञजनाचे अज्ञानीपण। अंध:कारमय करी जीवन। म्हणून अवतार घेई नारायण। ज्ञानदीप लावावया ॥३५॥ जन काय करतील बिचारे। न ओळखी तुला सारे। भक्तिमार्गाची वाट पुरे। तूच त्यांना दावितसे ॥३६॥ जनपिडा सहन करुनि। लोकनिंदा स्विकारुनि। चित्त न ढळू दिले मनी। प्रेमस्वरुप तू असे ॥३७॥ जावूनि रावरंकाच्या घरी। काय रांधल थे आण उच्चारी। तपश्चर्येची हीच पायरी। पार करी भगवती ॥३८॥ उन्हाळा पावसाळा हिवाळा। तिन्ही ऋतुंचा सम जिव्हाळा। न लागे उनपावसाच्या झळा। समर्थ तूचि असे ॥३९॥ तप्त अशा उन्हाळ्यात। फिरत राही तू वनात। कोटी सूर्याची प्रभा अंगात। घेवूनि तू मिरवितसे ॥४०॥ एकदा चिंतामन गडावरुनि। सुगनाबाई तळे पार करुनि। चालत निघाली पांधननी। भक्तवत्सला भगवती ॥४१॥ नव्हते डांबरी रस्ते। मध्ये मध्ये होते गड्डे। निघाली तू त्या पंथे। अनवानीपायाने ॥४२॥ ज्वालापरी होती माती। उष्ण झाला त्या लागती। सामान्याचे पाय भाजती। चालता रस्त्यातूनि ॥४३॥ आली साई मंदिरा समीप। लोळू लागली उष्ण मातीत। अंगावर नव्हते वस्त्र। निर्वस्त्र लोळितसे ॥४४॥ घोळूनि पूर्ण शरीर। अग्नी करी प्रबळ। जवळ करी नगर। त्याच रस्ती जावूनि ॥४५॥ आली तू गावात। बसली बस स्थानकात। भाजली पूर्ण कात। घोगले सर्व तनी ॥४६॥ विद्रूप बनले शरीर। व्रण सर्वांगावर। आश्चर्य करती नारीनर। कोण रक्षी बयेला ॥४७॥ तेवढ्यात आला श्वान। चाटू लागला सर्व तन। फोडूनि सर्व व्रण। उपचार करितसे ॥४८॥ क्षणात तजेला आला। माता तव सर्वांगाला।

खंडोबाने दिला हवाला । क्षणात येवूनिया ।।४९ ।। नारायणाचे पचवूनि उन । जड देहाचे आभूषण । स्वयं अग्नीकुंड होवून । एकरुप होतसे ।।५० ।। उन्हाच्या उष्ण करा । न घेई छायेचा आसरा । वस्त्र नसे शरिरा । जंगल पहाडी राहतसे ।।५१ ।। सूर्यापरी तप्त केले । आई तू निजदेहाले । जनजीवन उद्धरण्याले । घेई वाण सतीचे ।।५२ ।। वर्षादेवी वर्षवि धारा । पावसात नसे थारा । न घेई कशाचा आसरा । माय माझी अनसूया ।।५३ ।। उघड्या अंगावर पाऊस पडी । मुसळधाराचिही गोडी । तरी तू न जागा सोडी । शेताभातातूनि ।।५४ ।। एकसारखी झडी चाले । परी तुझे चित्त न ढळले । वरुणराजाच्या संतापाले । भीक न घाली कदापि ।।५५ ।। नदीनाल्याला पूर येई । तू तिरी बसून राही । पूराची भीती न लवलाई । झाली तूज महामाया ।।५६ ।। थंडी वाजे कडकडा । जो तो म्हणे जाऊन पडा । रजईचे आवरण धडा । घरात दडून राहतसे ।।५७ ।। परी तुझी लीला । न कळे पामराला । म्हणून आलो चरणाला । माय माऊली तुझिया ।।५८ ।। रानीवनी फिरत राही । दिगंबरी बाणा विदेही । रात्रभर पडून राही । कडाक्याच्या थंडीत ।।५९ ।। वस्त्र न घेई अंगावर । रजईचा न करी उपचार । रात्रदिंन फिरे घरोघर । माय माझी अनसूया ।।६० ।। न पडे शरिरी भेगा । सर्दी न होई तव अंगा । उन न लागे तुला गंगा । महाशक्ती महामाया ।।६१ ।। पारडसिंगा खापरी वाटेत । नाला आहे खोलवट । बोरांगा म्हणती त्यास लोक । ये जा करी तेथूनि ।।६२ ।। पाणी वाहे रस्त्यातूनि । फिरत असे हिंस्त्र प्राणी । सापाची भीती क्षणोक्षणी । वाटत असे जनलोका ।।६३ ।। अशा घनदाट अरण्यात । किर्र अंधाऱ्या रात्रीत । बसतसे भर पाण्यात । माता पाय पसरुनि ।।६४ ।। हिंस्त्रश्वापदे येती । साप विंचू सोबती । परी न वाटे भीती । आई अनसूयेला ।।६५ ।। येणारे जाणारे पाहती । मनात ते घाबरती । भीऊ







नका त्यांना सांगती । मी होय अनसूया म्हणूनि ।।६६ ।। तिन्ही ऋतुचे परिणाम । न होई मातेस जाण । काळही करी गुणगाण । महाशक्ती माऊलीचे ।।६७ ।। घेतले ऋतुचे वाण । उद्धरण्या जनजीवन । स्वत: तापी स्वजीवन । ताप हराया भक्तांचा ।।६८ ।। लोक आश्चर्य करिती । उन वारा पाऊस झेलती । अनिष्ट परिणाम न होती । विदेही माउलीशी ।।६९ ।। आईच्या कृपेचा प्रसाद । मिळाला वामनराव येवलेस । धंदा चाले बिनसायास । उपहारगृहाचा ।।७० ।। उपहारगृही माऊली गेली । भजे मागू लागली । ते होते तप्त तेली । म्हणून न दिले मातेस ।।७१ ।। थांबा आई थोडा वेळ । मग देतो तुम्हा फराळ । परी मातेच्या मनी वेगळं । कोण जाणी महिमा ।।७२ ।। आई तू कढईत हात घातला । तप्त तेलातून काढी भज्याला । परी न ये फोड हाताला । पहा कैसे दिव्यत्व ।।७३ ।। माता तू वनात गेली । बिब्याच्या झाडाखाली बसली । बिबे बघूनि वृक्षतली । ठेचू लागे तयांना ।।७४ ।। कपडे नव्हते अंगावर । बिबे ठेचि दगडावर । तेल उडे शरीरावर । बिबे ठेचतांना ।।७५ ।। उघड्या अंगावर तेल सांडले । बाह्यांगावर डाग पडले । परी त्याचे काहीच न झाले । वज्रदेही मातेसी ।।७६ ।। काही न केला उपचार । पूर्ववत झाले शरीर । थोडा घडला आचार । जडजीवा दावया ।।७७ ।। आई तू गावातून फिरी । केरकचरा धरी करी । शेणमाती गोळा करी । एके ठायी ठेवूनिया ।।७८ ।। एकदा गेली लेंडीतिरी । गवत कचरा साफ करी । शेषनागाची आली स्वारी । दर्शन घ्यावे म्हणूनि ।।७९ ।। सापाने चावा घेतला । दुजा हात समोर केला । "खा खा" म्हणे सापाला । पूर्ण करी मनोरथ ।।८० ।। हवे तेवढे चाव मला । न दिसे पुन्हा नयनाला । निघून जा या क्षणाला । आज्ञा करी नागास ।।८१ .। साप क्षणात गेला । आला होता दर्शनाला । परी जन करिती गलबला । कैसे घडे विपरीत ।।८२ ।।

जनतेचा पाहूनि गलबला । खाखा म्हणे सापाला । दु:खाचा लवलेश न आला । अगाध लीला मातेची ।।८३ ।।
लोक घाबरुन गेले । सानथोर हवालदील झाले । म्हणे कैसे संकट आले । कोण तारी अनसूयेस ।।८४ ।।
बोलवा बैरागी मांत्रिकी । आणा लवकर आणिकासी । माता हसतसे मनासी । कैसे हे पागलपण ।।८५ ।।
टोपलीभर मिरचे आणले । एका क्षणात फस्त केले । म्हणतसे विष वर चढले । म्हणून न लागी तिखट ।।८६ ।।
आता न वाचे अनसूया । जहाल विषाची ही छाया । निळी दिसतसे तव काया । उपचार काही चालेना ।।८७ ।।
परी तुज काहीच न झाले । पूर्ववत शरीर दिसले । विष न बाधी तनाले । भगवती अनसूयेच्या ।।८८ ।।
सट्टयाने धरला जोर । लोक लावितसे नंबर । म्हणून संता जोडी कर । नंबर घ्यावया ।।८९ ।। सट्टा मागण्या
येई । आई अनसूया पायी । श्रीमंत कर मला माई । ओपन क्लोज सांगूनि ।।९० ।। आई त्रिकालज्ञानी ।
बोलतसे सहज मनी । तोच नंबर ध्यानी । सटोडे ठेवितसे ।।९१ ।। मातेच्या वचनाचा अर्थ । जन लावी
निजस्वार्थ । परी मिळे त्यांना अर्थ । योगायोग म्हणूनि ।।९२ ।। सट्टा मालक त्रस्त झाला । तो डबघाईस
आला । खजिना खाली झाला । म्हणून चिंता करितसे ।।९३ ।। कोण असे ही बाई । नंबर बरोबर देई ।
पाहावे जावूनि गावी । पारडसिंग्यास ।।९४ ।। दुष्ट विचार मनी केला । नष्ट करावे या बयेला । मिठाई घेई
प्रसादाला । विष कालवूनी ।।९५ ।। विषमिश्रीत मिठाई । ठेवी माता तव पायी । निघून जाई लवलाई । दुष्ट





हेतू धरुनि ।।९६ ।। आईने जाणितले मनी । ही तर मरणाची निशानी । क्षणात मिठाई टाकी वदनी । फस्त
करी त्वरीत ।।९७ ।। जहाल विष पचवी । वदनी गोडी वाढवी । संपविली मिठाई । न कुणा देता घेता ।।९८ ।।
प्रसाद तव ठायी ठेवता । प्रथम देई अपुल्या पुता । फेकितसे तू जनहिता । लाड न पुरवि देहाचे ।।९९ ।।
कुत्रे आई बरोबरी । यावेळी न देई परी । दूर लोटी सर्वाकरी । जहालपणा जाणूनि ।।१०० ।। मेवा पूर्ण
खाऊनि । निचेष्ट पडली भवानी । निळसर काया त्याक्षणी । दिसतसे माऊलीची ।।१०१ ।। बोलाविले वैद्य
डॉक्टर । न लावू देई माता कर । दोन तासात आली शुद्धीवर । विशुद्ध होवूनिया ।।१०२ ।। उठताच सांगे
लोकांना । सट्टा गेला गणगणा । सोडा हा जुगारी बहाना । सार्थक करा जन्माचे ।।१०३ ।। सट्टा मागणारे
गेले । मारणारे दूर पळाले । दिव्यत्व लोकां कळले । शरण येई तव पायी ।।१०४ ।। निलकंठ तुज म्हणती ।
हलाहल पचवी उराती । शेषगाती तुझी गीती । ॐ नमो शिवाय ।।१०५ ।। असा तुझा शेषमहिमा । सार्थ
करी अनसूया नामा । शरण आलो तुझिया चरणा । बुद्धी देई अनंता ।।१०६ ।। सूर्याच्या सहस्त्र रश्मी ।
वसतसे तुझ्या धामी । शांत होतसे अग्नी । रुप तुझे पहातां ।।१०७ ।। आता ऐका अग्नीपुराण । घ्या
नारायणाचे दर्शन । तपश्चर्येची कास जाण । आई अनसूयेची ।।१०८ ।। आबाजी महानकाळ भाविक ।
भाव भक्ती सात्विक । सुख समृद्धीची आवक । श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।१०९ ।। तुझे राहणे तया घरी । येता

जाता बरोबरी। प्रचिती देई दारी। आबाजीच्या वाड्यात ॥११०॥ होळीच्या पावन दिनी। गेली तू त्यांच्या सदनी। होलीकोत्सव साजरा मनी। करण्या तुझ्या होता ॥१११॥ आबाजीने पेटविली होळी। पूजा अर्चा तव केली। तू तेथे जाऊन बसली। होळीत पाय टाकूनि ॥११२॥ काष्ट जळत होती होळीत। प्रखर ज्वाला बाहेर निघत। तू पद घातला पेटत्या अग्नीत। लाकडासवे अपुला ॥११३॥ नैवेद्य अर्पण करण्यास। आबाजी आले समक्ष। म्हणाले आई करा लक्ष। होळीचा प्रसाद सेवूनि ॥११४॥ ताट आईच्या समोरी। पाय जळत्या निखारी। माता तू जेवन करी। पाय होळीत टाकूनि ॥११५॥ एक घास जाई वदनी। एक होळीस अर्पण करुनि। पूर्ण प्रसादाची पर्वनी। करितसे भगवती ॥११६॥ प्रसाद पूर्ण सेवूनि। पाय काढीला अग्नीतूनि। लाकडे जळाली हवनी। परी ईजा न होतसे ॥११७॥ पायाला स्पर्श केला। गरम चटका लागला। अग्नी सुखवी मातेला। स्वस्वरुप जाणूनि ॥११८॥ होळीत टाकले प्रल्हादाला। तप्त तेली उकळले त्याला। परी तूच येई रक्षायाला। भावभक्ती जाणूनि ॥११९॥ गळाला हिरण्यकश्यपूचा अहंकार। त्यासाठी तू घेतला अवतार। तूच असे भक्तांचा धरोहर। वात्सल्यसिंधू अनसूया ॥१२०॥ प्रल्हादाची ही गाथा। सांगतसे अनसूया माता। अग्नीनारायणाची कथा। करुनि दावितसे ॥१२१॥ सूर्याची प्रखर प्रभा। तुझ्यामध्ये जगदम्बा। नृसिंहाची अभा। देवीदेवता वंदिती ॥१२२॥







तूच सर्वाच्या आदीअंती। तूच माता मूळ प्रकृति। देवदेवी सर्व गाती। जय जय अनसूया ॥१२३॥ गाऊनि हे अग्नीपुराण। वाचा खुंटते मम जाण। न होई काही कवन। लोटांगण तव चरणी ॥१२४॥ तपश्चर्येची ही कास। त्रासवि तू स्वदेहास। भावभक्ती फुलविण्यास। होळी करी जीवाची ॥१२५॥ एकदा तू शेतात गेली। कापूस बोंडी वेचली। जमा करुनि बांधली। गाठोडी तयाची ॥१२६॥ तोच शेतमालक आला। पाहूनि तुला ओरडला। चोरीचा आळ आला। तुजवरी भवानी ॥१२७॥ पागलाचा करुनि बहाना। फिरतं तू रानोवना। कापूस चोरुनि नेई दुकाना। पैसे गाठी बांधावया ॥१२८॥ तोच त्याने दोर घेतला। माते तुझा हात धरला। फेकी दूर गाठोडीला। कलीप्रताप दावितसे ॥१२९॥ दोरांनी मारी मातेला। आई तू आक्रोश केला। चोरीचा दोष न मला। म्हणूनि सांगतसे ॥१३०॥ दिसला विठ्ठल बोंडीत। म्हणून बसली वेचित। देवाच नाव घेतं। फिरी शेताभातात ॥१३१॥ परी न ऐके तो शेतकरी। संतापला अंतरी। ओढत आणी बाजारी। पारडसिंगा गावात ॥१३२॥ मारत मारत आणले गावी। ओळ उमटले तव देही। आई तू दीनवाणी पाही। कुणी न येई मदतिला ॥१३३॥ काही म्हणे त्या अधमाला। मारु नको या बाईला। बरे होणार नाही मुला। दुर्गति होईल तुझी ॥१३४॥ परी न ऐकी कुणाचे। काम करी क्रोधाचे। केले वाटोळे जन्माचे। निर्बुद्ध बनूनिया ॥१३५॥ आई बसली लपूनि। जनहिता मार खाऊनि। परी क्षमाशील बनूनि।

कृपा करी त्यावरी ।।१३६ ।। काम क्रोध न मनात। द्वेष न अंतरात। सर्वत्र भगवंत। माता तू पाहतसे ।।१३७ ।। एकदा उपहारगृही। गेली अनसूया आई। फेकू लागली वस्तू काही। चाखूनि तयास ।।१३८ ।। मालकाला क्रोध आला। थापड मारी गालाला। ओढत काढिले मातेला। पागल पागल म्हणूनि ।।१३९ ।। जो देई त्रास तुला। दूर करी त्याची बला। ऐसी माते तू कृपाला। नमन माझे तव पायी ।।१४० ।। माते तू जाई दारोदारी। भीती वाटे त्या घरी। फेकफाक तू करसी पोरी। म्हणून वस्तू झाकतसे ।।१४१ ।। आई तुझ्या भीतीने। लपवून ठेवि सामाने। लोकांचे हे रडगाणे। ऐकतसे माऊली ।।१४२ ।। वाळण वाळी रस्त्यावर। माता जाई घरोघर। लावूनि अपुला कर। चव त्याची घेतसे ।।१४३ ।। एकदा एका अंगणी। तुरी होत्या वाळणी। मातेला मिळे पर्वणी। ओल्या तुरी खाण्याची ।।१४४ ।। परी झटकला हात। घांस न गेला तोंडात। पागल म्हणूनि अव्हेरत। दूर करुनिया ।।१४५ ।। अशी ही जनव्यथा। भोगितसे अज्ञमता। लोकनिंदा लोकहिता। स्विकारी तू भगवती ।।१४६ ।। तुझी ही योगसाधना। करी अखंड आराधना। तापवूनि तनमना। वज्रदेह करितसे ।।१४७ ।। तपश्चर्या ही खडतर। करितसे आई दिगंबर। भक्तांचा कल्पतरुवर। झिजवी काया आपुली ।।१४८ ।। तुज म्हणती विदेही माऊली ।साक्ष लोकांना पटू लागली। तूच असे जगतवल्ली। म्हणूनि वंदितसे ।।१४९ ।। इतिश्री परमेष्ठी अनसूया गाथा। कवन करी अनसूया





माता। निमित्त करुनि तव सुता। पंचमोऽध्याय सम्पूर्ण ।।१५० ।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती ।। शांती ।।।

## ।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

जय जय श्री आद्यगणा। नमितो तव चरणा। बुद्धी देई तव कवना। विद्यापती विद्याधरा।।१।। भक्ति वाचून मी भिकारी। माते आलो तव दारी। झोळी भरुनिया पामरी। कृतार्थ करी आता।।२।। गीताई माउली आई। वेदशास्त्र तव ठायी। सरस्वती तू विद्यादेवी। नमस्कार तव चरणी।।३।। तूच ज्ञानेश्वरी माउली। ज्ञानेश्वरी अवगत केली। प्रचिती कैसी आली। ऐकून घ्या सृजनहो।।४।। श्रीक्षेत्री आनंदराव बडवाईक। भक्त तुझा सात्विक। लीन दीन असे नेक। गुण तुझे गातसे।।५।। एकदा गेले पंढरपूरला। पांडुरंगाच्या दर्शनाला। आणिले ज्ञानेश्वरीला। पारायण करण्यासी।।६।। पारायण सुरु असता। येवून बसे अनसूया माता। ज्ञानेशाची ज्ञानकथा। सांगतसे भगवती।।७।। एक ओवी वाचल्यावरी। माता सांगे ज्ञानेश्वरी। पुढील ओव्यांचे वाचन करी। ज्ञानेश्वरी न पाहता।।८।। माता न गेली शाळेत। न जाणे अक्षर मात। परी ओव्या मुखोद्‌गत। सद्‌गुरु माऊलीला।।९।। अचम्बित होई सर्वजन। पुढे चाले पारायण। न वाची न पाही पुराण। वेदमाता अनसूया।।१०।। भक्त होतसे थक्क। जोडती तुला हात। लोक बोलती जगन्नाथ। अनुभव घेवूनिया।।११।। अनुभव हा पारडसिंगा ग्रामी। ज्ञानेश्वरीच्या पारायणी। आला आनंदराव सदनी। एकोणविसशे बावन साली।।१२।। आई तूच ज्ञानेश्वर। तूच असे रमावर। जगताचा तू ईश्वर। देवांगण तव ठायी।।१३।। सकल विद्येचे माहेर। व्यापिले तू चराचर। चार वेद छट् शास्त्राचे घर। अठरा पुराण तुज पायी।।१४।। नमन माझे तुला आई। तूच माझी शारदा माई। जीवन गाथा गाण्या देई।





## अध्याय ६

# दिगंबर अवस्थेत मातेची भ्रमंती व झालेला साक्षात्कार

शक्ती युक्ती सर्वदा ।।१५ ।। दमडूजी सरोदेच्या दुकानी। महादेव आप्पा करी पाहनी। जाऊन त्यांना विचारी भवानी। "गोरक्षनाथ पाहिले कां" ।।१६ ।। गोरक्षनाथाचे दर्शन। दिले दुकानी जावून। परी न जाणे अज्ञजन। आई तुझा महिमा ।।१७ ।। अनिल जयस्वाल नागपूरवासी। असे साई चरणासी। महालक्ष्मी भजी मानसी। कोराडी जावूनिया ।।१८ ।। व्यवसायाने ते डॉक्टर। अध्यात्माची चाड फार। रोंगावर करिती उपचार। नाम घेता अनसूया ।।१९ ।। दसऱ्याला नवरात्रात। महालक्ष्मी येई स्वप्नात। दर्शन देई साक्षात। श्री क्षेत्री पारडसिंगा ।।२० ।। माझेच प्रत्यक्ष रुप। नाम अनसूया प्रारुप। तेच माझे स्वरुप। शरण जा मातेला ।।२१ ।। जाणूनि हा दृष्टांत। आले अनिल पारडसिंग्यात। सर्वांगे होवूनि शुचिर्भूत। दर्शन घेई मातेचे ।।२२ ।। यथासांग पूजा केली। कृपा करी अनसूया वल्ली। महालक्ष्मी तव दिसली। आई अनसूया रुपात ।।२३ ।। "महालक्ष्मी काय म्हणते। दर्शन घेनं म्हणते" ।। म्हणूनि आला येथे। ओळख करावया ।।२४ ।। मातेचे ऐकूनि वचन। धन्य होई जीवन। म्हणे तू जाणिले मर्म। महालक्ष्मी तूचि असे ।।२५ ।। आई तुझेच गुणगाण। करितसे तव लेखन। रोग्यांचे करी निधान। गाण तुझे गाऊनी ।।२६ ।। मरणाच्या दारात जो जाई। तव औषधे परत येई। डॉ. अनिल अनुभव घेई। आशीर्वादे मातेच्या ।।२७ ।। असे हे महालक्ष्मीचे रुप। जाहले मातेत एकरुप। म्हणूनि भजती देवलोक। वंदन करुनिया ।।२८ ।। भविष्याची ठेवी जाण। उद्धराया जनजीवन। भूतभविष्य वर्तमान। वर्तितसे माऊली ।।२९ ।। विठ्ठलराव ढोलेच्या सदनी। चोरी होई नागपूर मुक्कामी। प्रचिती देई माँ भवानी। श्री क्षेत्री पारडसिंगा ।।३० ।। घराचे कुलूप तोडले। चोर चोरी करुन गेले। सांगी विठ्ठलरावाले। भगवती अनसूया ।।३१ ।। "शेवळ्या दाळ तूप आण। पांघराले दुलई

देणं" । भगवतीचे हेचि वचन । चकीत करे सर्वाला ।।३२ ।। दुज्या दिनी निरोप आला । चोरी झाली नागपूरला । विठ्ठलराव जाई क्षणाला । नागपूर सदनासी ।।३३ ।। आईने जे मागितले । तेच सर्व चोरी गेले । महिमान मातेचे कळले । त्रिकालज्ञानी म्हणूनिया ।।३४ ।। एकदा शांताबाईनी । उकळविले पाणी । त्यात सोडा टाकूनि । गंज घेई डोईवर ।।३५ ।। तोच पाय घसरला । पाणी भाजी सर्वांगाला । फोडेच फोडे तनाला । दाह करितसे ।।३६ ।। माता आली त्याक्षणी । बघितसे अमृत लोचनी । कृपादृष्टीची पर्वनी । लाभतसे शांताबाईना ।।३७ ।। तूच केले औषधपान । करुनि अमृतसिंचन । दुरुस्त करितसे तन । कृपादृष्टी फिरवूनि ।।३८ ।। न केला काही उपचार । तुजवरी टाकूनि भार । पूर्ण करी तू सत्वर । अढळ श्रद्धा म्हणौनि ।।३९ ।। झिंगुजी गोहत्रे धनगर । भक्त तुझे खरोखर । दाढ दु:खीने होई बेजार । काय करावे कळेना ।।४० ।। जेवणं बंद झाले । गावठी उपचार केले । रात्रंदिन तडपू लागले । दाढदु:खीच्या त्रासाने ।।४१ ।। झिंगुजी बसले असतां घरी । तू गेली सकाळ प्रहरी । थापड जोराची गाली मारी । दु:खणाऱ्या दाढीवर ।।४२ ।। जोराची वेदना झाली । थापड बसता गाली । क्षणात दाड दु:खी संपली । माता तव कृपेने ।।४३ ।। नारायण झुंझुरकर बिमार । श्रद्धा असे मातेवर । मुलगा रमेश बिमार । सदैव राहतसे ।।४४ ।। आजार कोणता कळेना । उपचार काही समजेना । आईची करी प्रार्थना । भजूनि मनोभावे ।।४५ ।। रमेश घरी जेवण करी । माता गेली त्यांच्या दारी । ओढूनि ताट स्वकरी । सवे जेवू लागतसे ।।४६ ।। ताटातील अन्न सेवूनि । रमेशचा रोग घेई तनी । भक्ताला रोगमुक्त करुनि । स्वत: दु:खी होतसे ।।४७ ।। रमेश एकदम बरा झाला । चालू फिरु बोलू लागला । जाणतसे मातेची लीला । पारडसिंगा गावात ।।४८ ।। आई तुझा आशीर्वाद । मिळाला पांडुरंग जैवारास । राहतसे

श्रीक्षेत्रास । तुझ्याच कृपाप्रसादे ।।४९ ।। बालपणी पांडुरंगला । घेई तू कडेला । प्रदक्षिणा घाली गावाला । कडेवर घेवूनिया ।।५० ।। लोक म्हणती त्या क्षणाला । कशास दिले मुलाला । टाकून देईल त्याला । वेडेपणाच्या भरात ।।५१ ।। परी तू जाई घरी । घेई तया कडेवरी । न चुके क्रमवारी । कृपापात्र होतसे ।।५२ ।। तोच आशीर्वाद फळा आला । दुकानाच्या भरभराटीला । म्हणून नाव दिले दुकानाला । आशीर्वाद म्हणूनि ।।५३ ।। हरीष जैवारचा आजार । घट सर्पाने होई बेजार । तूच घाली रोगाला आवर । शेजारी बसूनिया ।।५४ ।। रोग त्याचा बरा केला । झोपडीचा महाल झाला । सुखसमृद्धी आली घराला । आई तव कृपेने ।।५५ ।। नंदलाल सिंधीच्या दुकानी । माता तू होती बैसूनि । तेव्हाच केली भविष्यवाणी । पेरणं धरा म्हणूनि ।।५६ ।। तेथे होते गावकरी । पाहू लागले नभांतरी । ढग न दिसे अंबरी । अंतराळ तप्त असे ।।५७ ।। न वाटे त्यांच्या मना । पाणी न येई याक्षणा । न दिसे काही लक्षणा । पाऊस येण्याची ।।५८ ।। मग माता का म्हणाली । पेरणी करा का वदली । न कळे कुणा बोली । साशंक होतसे ।।५९ ।। अविरत तेच बोलणे । पेराले चला हेचि वदने । दुर्लक्ष करी सर्वजने । न जाणी शब्दकला ।।६० ।। मग गेला शेतावरी । ढग जमले नभांतरी । गडगडाट होता पूरी । पाऊस आला एकाएकी ।।६१ ।। एकसारखा आला पाऊस । झडी लागली समयास । न जाई कोणी शेतास । कामधंदा करण्यासी ।।६२ ।। हेचि वर्तविले मातेने । जाणूनि पूर्व संधाने । न जाणिले अज्ञ मने । म्हणूनि बसती घरी ।।६३ ।। मातेने दिला संकेत । पेरणे करा पूर्ववत । परी न जाणे मात । दुर्लक्ष ते करी ।।६४ ।। आई तुझी ममता । जाणिव देई पुता । जो जाणी महत्ता । लाभ तया मिळतसे ।।६५ ।। राधेश्याम अग्रवाल काटोलचे । व्यापारी तंबाखूचे । पोट दु:खी व्याधी जाचे । उपचार करी

नानापरी ।।६६ ।। शस्त्रक्रिया केल्या विना। पोट दु:खी न हटेना। तज्ञ डॉक्टर सांगी त्यांना। नागपूर मेडीकलला ।।६७ ।। नेले नव्हते साहित्य पैसे। काटोल वापस आले तैसे। शस्त्रक्रिया होई कैसे। विचार करी राधेशाम ।।६८ ।। ज्या गाडीने वापस आले। त्यात होते विठ्ठलराव ढोले। व्यथा त्यांना सांगू लागले। पोटदु:खी विकाराची ।।६९ ।। विठ्ठलराव सांगती त्यांना। शरण जा अनसूया चरणा। समर्थ आहे दुरुस्त करण्या। माऊली अनसूया ।।७० ।। घेण्या मातेचा आशीर्वाद। आले पारडसिंगा गावात। दु:ख निवारी तव पुत। कृपादृष्टी ठेवूनि ।।७१ ।। भवानी वट्यावर माता होती। राधेश्याम मनोभावे भजती। पूर्णरात्र काढे संगती। नामस्मरण करुनि ।।७२ ।। पहाटे चारचा सुमार। दया करी करुणासागर। दृष्टादृष्ट होई सत्वर। कृपादान मिळतसे ।।७३ ।। कापकूप काही करु नका। चांगला होशील तू लेका। बोले माता एकटका। आशीर्वाद देवूनि ।।७४ ।। पाच गुरुवारला येई। पारडसिंगा तव पायी। "टीकोरीच पक्क" म्हणती माई। नारळ फोडतांना ।।७५ ।। एक नारळ फोडायला। एक तास तू लाविला। परि आचार दूर केला। राधेश्याम अग्रवालचा ।।७६ ।। सहाव्या गुरुवारी नेले। दवाखाणी दावाले। डॉक्टर अचम्बित झाले। न दिसता लक्षण ।।७७ ।। शस्त्रक्रिया न करावी लागती। तंदुरुस्त झाली प्रकृति। कैसी लाभली गती। औषध न घेता किंचीत ।।७८ ।। आईने कृपा केली। पोटदु:खी बंद झाली। न कधीच पुन्हा शिवली। राधेशामजीला ।।७९ ।। शस्त्रक्रिया न करावी लागे। बरे होई कृपाप्रसादे। परमभक्त बनले भागे। पुर्वसुकृत म्हणूनिया ।।८० ।। अमरावतीचा एक व्यापारी। येई राधेशाम बरोबरी। अंबादेवीची भक्तीकरी। म्हणून न येई मंदिरात ।।८१ ।। राधेशामजीने आग्रह केला। नेले मातेच्या दर्शनाला। त्याला कळली तुझी लीला। दर्शन





घेता भगवती ।।८२ ।। आई, तुझे दर्शन घेतले। परी अंबादेवीचे स्मरण केले। अंबादेवीच्या रुपात दिले। दर्शन तूचि भक्ताला ।।८३ ।। पाहूनि आई अंबेचे रुप। गळाला अहंकार आपोआप। अंबा अनसूया एकरुप। जाणूनि येई शरण ।।८४ ।। आई तू अंबादेवी। तूच असे रेणूकामाई। ठाव दे तवपायी। महालक्ष्मी अनसूया ।।८५ ।। श्रीक्षेत्री पुंडलीकराव उपासे। श्री दत्ताचे त्यांना पिसे। तनी मनी भजतसे। दृढभाव धरुनि ।।८६ ।। आई तू गेली शेतात। लक्ष करितसे आत। निरखूनि वृक्ष पात। म्हणे "गुंड पाण्याचा उणा" ।।८७ ।। पाणी नव्हते विहिरीला। खोदी क्षणा क्षणाला। परी चमत्कार घडला। झरा लागला पाण्याचा ।।८८ ।। पाणी लागले आडाला। संत्रा येई झाडाला। तुझा महिमा कळला। कृपासिंधू अनसूया ।।८९ ।। माता, तव कृपे घडले। दारिद्रय दूर झाले। दत्तपूजेचे फळ दिले। तूच माता अनसूया ।।९० ।। तूच दिली कल्पना। परी काय कळे अज्ञ जना। तूच असे माझी करुणा। शरणागत मी असे ।।९१ ।। एके दिवशी अचानक। रडायला लागली एकाएक। काही कुणास ना ठाऊक। काय होई माऊ लीला ।।९२ ।। अरेरे। घात झाला। कैसा कोप जाहला। देशाचा दिवा विझला। म्हणून लोका सांगतसे ।।९३ ।। सत्ताविस मे एकोणविसशे चौसष्टला। अशुभ वार्ता कळे जनाला। नेहरुचा देहान्त झाला। जनता झाली हवालदील ।।९४ ।। अखील ब्रम्हाडांची वार्ता। ठेवितसे तू अनंता। शास्त्रीजीची निधन वार्ता। वर्तविली पूर्विच ।।९५ ।। काशीनाथ हेडाऊ गुरुजीस। जाऊनि त्यांच्या घरास। दिधला दृष्टांत खास। सावध करावया ।।९६ ।। संबोधूनि गणेशाला। वदली भक्तवत्सला। "लोंढा आला वाहत गेला"। "आता कसं होईलं" ।।९७ ।। म्हणून केला आकांत। त्रेधा उडाली लोकांत। तू कैसा बसला स्वस्थ। गणपती गजानना ।।९८ ।।

नदीनाल्याला पूर आला। वर्धेने हाहा:कार केला। जनजीवनाची अवकळा। सांगितली आधीच ।।९९ ।। असे हे वर्तमान। भविष्याची देवूनि जाण। अंतरीच्या खुणा जाणून। भूतात वर्ततसे ।।१०० ।। देता अनंत हस्ते कमलावरे। घेता घेशिल किती दो करे। वचन तू हे केले खरे। प्रमाण देवूनिया ।।१०१ ।। तू स्पर्श करी जेथे। महालक्ष्मी वसे तेथे। म्हणून डोळे लावी वाटे। जगदीश्वराच्या ।।१०२ ।। ग्रामपंचायत पटांगणात। होते संत्रा मार्केट। संत्रा ढिगावर बसूनि सत। संत्रे फेकितसे ।।१०३ ।। ज्या ढिगाचे संत्रे फेकले। भाव दुप्पट तया आले। म्हणून न कुणी रोखले। संत्रे फेकण्यापासूनि ।।१०४ ।। फिरी तू बाजारात। जावून बसे दुकानात। वस्तू फेकी क्षणात। कृपादृष्टी ठेवूनिया ।।१०५ ।। जे होते अज्ञानी। अपमान करी भवानी। न जाणी तुझी करणी। लाभ तया कैसा होई ।।१०६ ।। परी जे होते श्रद्धावान। न रोखी यापासून। मिळे त्यांना दुप्पट दाम। हस्तस्पर्श तुझा होता ।।१०७ ।। म्हणून फेका म्हणती जन। जे जाणी महिमान। मिळे त्यांना कृपादान। तव कृपे भगवती ।।१०८ ।। आबाजी महानकाळच्या वाड्यात। कापूस होता एका खोलीत। राहतसे माता तू तेथं। सवे कुत्रे घेवूनिया ।।१०९ ।। रात्रीला आराम करी। झोपूनि कापसावरी। मलमूत्र विष्टा त्यावरी। पडून राही अनुदिन ।।११० ।। अश्रेणीचा कापूस। श्वेतवर्ण होई भकास। लागला तयाला वास। खराब होई पूर्णत: ।।१११ ।। बघता कापूस नयनी। आबाजी चिंतीत मनी। काय करावे मळधामी। कोण घेई आता याला ।।११२ ।। न येई उचित दाम। वाया गेले सर्व श्रम। गेला त्याचा मूळ वाण। काय केले अनसूया ।।११३ ।। तरी त्यांनी विचार केला। न्यावा असाच बाजाराला। झोडा म्हणून विकू त्याला। पदरी पडेल काहीतरी ।।११४ ।। कापूस नेला बाजारात। व्यापारी आले तेथं। दिपले डोळे क्षणात।







चकाकी पाहूनिया ।।११५ ।। पुन्हा पुन्हा पाही कापसाला। शुभ्रता दिसे नयनाला। अश्रेणी दिली त्याला। उत्तम पत म्हणूनि ।।११६ ।। नव्हता तसा कापूस। बाजारात त्या क्षणास। भाव मिळाला त्यास। अघटित अकल्पित ।।११७ ।। दामदूप्पट पैसे झाले। क्षयाचे अक्षय केले। आबाजी अचम्बित झाले। दाम पाहूनिया ।।११८ ।। जाणीतले त्या क्षणी। ही तर मातेची करणी। ऐसी तू कृपाळू भवानी। माऊली अनसूया ।।११९ ।। भक्त नामदेवराव भक्ते। बंधू आईचे लौकिकाते। परी न जाणे आपपरते। सर्वाभूति समभाव ।।१२० ।। कैकाडी बाबाच्या किर्तनी। होती आई भवानी। विचारी तया त्याक्षणी। काय हवं म्हणूनि ।।१२१ ।। तव कृपेची असू दे ठेव। यापरतां काय हवं। तव नामाची एक धाव। म्हणून आलो किर्तनी ।।१२२ ।। परी तू जाणली मात। दिला स्वप्न दृष्टांन्त। पाणी दाखवी आडात। शेतात नामदेवरावच्या ।।१२३ ।। मातेने जे स्थळ दाविले। तेथेच ते खोदू लागले। पाणी लागे विहिरीले। महासतीच्या कृपेने ।।१२४ ।। सुखसंपत्ती असे घरी। आईच सर्व व्यवहार करी। तिनेच दिली आम्हा भाकरी। सांभाळ करी सर्वांचा ।।१२५ ।। काय घडले किर्तनी। पुढील अध्यायी श्रवणी। मातेची अद्भूत करणी। ज्ञात करी अज्ञ जना ।।१२६ ।। पुंडलिक बाबा आले। पारडसिंगा श्रीक्षेत्राले। तव त्यांनी ओळखले। आई अनसूयेला ।।१२७ ।। संत महंत गाती। महिमा तुझा भगवती। अज्ञाना ज्ञानी करती। सामर्थ्य दावूनिया ।।१२८ ।। परमहंसाचे ओळखपत्र। पुढील अध्यायाचे सूत्र। श्रवण करावे सर्वत्र। संत सज्जना वंदूनि ।।१२९ ।। इतिश्री परमेष्ठी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। षठोऽध्याय सम्पूर्ण ।।१३० ।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती।। शांती ।।।

**।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।**

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

जय जय अनसूया माता। संत सांगे महत्ता। गाऊनी तव गीता। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।१।। नमन माझे संत महंता। तुम्ही कृपावंत असता। काय उणे असे पुता। गाथा गावया ।।२।। माय माऊली महामाया। आलो मी तव पाया। उद्धरी तू मम काया। आशीर्वाद देवूनि ।।३।। झाला गावी एक यज्ञ। अन्नपूर्णेचे महिमान। एकशे एक खंडीचे अन्नदान। करितसे गावकरी ।।४।। आले सर्व संत महंत। तुकडोजी गाडगे बाबा संत। एकनाथ महाराज समवेत। नाम संकिर्तन कराया ।।५।। पाहूनि बालकाया। अनसूया महामाया। वदले तुकडोजी समया। ग्रामी वसेल पंढरपूर ।।६।। गाडगेबाबा सांगती। येईल सर्वा प्रचिती। अवतरली महाशक्ती। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।७।। बालपणीचे वचन। न जाणे महिमान। परी संतच जाणी लक्षण। बाल अनसूयेचे ।।८।। शिष्य दादाजी धुनीवालेचे। शंकरानंद असे सच्चे। दर्शन घेई भगवतीचे। महानकाळच्या वाड्यात ।।९।। दृष्टादृष्ट होता क्षणी। स्वामी जोडी कर दोन्ही। म्हणे ही तर साक्षात भवानी। कदापिही विसरु नका ।।१०।। विदेही संत वास करी। अनसूया कृपासागरी। भाग्योदय गावाचा करी। शंकरानंद सांगती ।।११।। नेले त्यांनी नागपूरात। श्री दादाजीच्या आश्रमात। पूजापाठ करी विधिवत। स्वस्वरुप जाणूनि ।।१२।। कच्छगुज काठेवाड। चरणदास महाराज प्रसिद्ध। जाणते करी अज्ञात। सेवा चाकरी करुनि ।।१३।। आई तुझा अधिकार। चालतसे निसर्गावर। आले याचे प्रत्यंतर। किर्तनी कैकाडी बाबांच्या ।।१४।। कैकाडी बाबा थोर संत। गाडगे बाबांचे शिष्य ज्ञात। गोरगरीबांची सेवा अविरत। करी किर्तन करुनिया ।।१५।। वंदन माझे तयाला। कर्मयोगी कैकाडी बाबाला। बुद्धी देई वदण्याला। गौरव गाथा





आईची ।।१६ ।। गाबातील भाविक भक्तांनी। बाबास बोलाविले किर्तनी। म्हणून येतसे ग्रामी। किर्तन सेवा करावया ।।१७ ।। जाऊनी हनुमानमंदीरी। दर्शन घेई सत्वरी। किर्तन सुरु करी। पाऊस येई तक्षणी ।।१८ ।। माता बसली होती दूर। भवानी मातेच्या वट्यावर। येवू लागे सरीवर सर। परी न उठे तेथूनि ।।१९ ।। कैसे करावे किर्तन। पावसात भिजती जन। पांगू लागले त्याक्षण। किर्तनी बाबांच्या ।।२० ।। कैकाडी बाबा आले शरणा। आई अनसूया चरणा। म्हणे आज्ञा कर तू घना। बंद करी जलधारा ।।२१ ।। बाबांनी जाणिले मातेला। माता जाणी बुवाला। ओळख होई जनाला। भगवती अनसूयेची ।।२२ ।। माता प्रसन्न झाली। लोहपत्रा शिरी धरली। वर ढगाकडे पाहू लागली। आज्ञा करी वरुणाला ।।२३ ।। "थांबव तुझ बरसनं। होवू दे बुवाच किर्तन"। निस्पृह सेवेचे कण। वेचू दे भक्तांना ।।२४ ।। अकस्मात पाऊस बंद झाला। आईचा अधिकार कळला। जमाव पुन्हा जमू लागला। बाबांच्या किर्तनी ।।२५ ।। किर्तन सुरु झाले। बाबा भजनी रंगले। भगवतीने पूर्ण केले। किर्तन बाबांचे ।।२६ ।। माते तू पाऊस थांबविला। किर्तनासाठी खेळ केला। कैकाडी बाबांना प्रत्यय आला। आई अनसूयेचा ।।२७ ।। बाबा जना सांगती। धन्य आहे महासती। निसर्गाची ही अधिपती। शरण जा माउलीला ।।२८ ।। मनोभावे सेवा करा। मातेचे चरण धरा। कळीकाळाचा न बाधे वारा। भजता अनसूया ।।२९ ।। लहानुजी बाबा टाकरखेडा धामी। जाणती तुझी करणी। भजतसे ध्यानी मनी। महत्ता जाणूनिया ।।३० ।। आज्ञा करी भक्ताला। जा अनसूया दर्शनाला। भवसागरी तरण्याला। धरा चरण मातेचे ।।३१ ।। नामदेवराव लोखंडे काटोलचे। लहानुजीचे भक्त सच्चे। काडी मारुन वदे वाचे। "चालतं का लहाण्या दर्शनाले" ।।३२ ।। गावी तुझ्या सती माय। कशाला करी येथे धाव। धर तू तिचेच पाय। दृढभाव धरुनिया ।।३३ ।। म्हणून आले दर्शना। लागले तव चरणा। सफल

करी जीवना। पादसेवा करुनिया ।।३४।। आता ऐका महिमान। परमहंस पुंडलिक गाण। दूर करी अज्ञान। सज्ञान करुनिया ।।३५।। पारडसिंग्याचे सद्‌गृहस्थ। यादवराव चोपडे सुशील भक्त। लीन सदा भक्तित रत। संत सज्जना नमूनि ।।३६।। पुंडलिक बाबांची करती सेवा। भजनी पूजनी पुंडलिक देवा। सार्थक कराया नरदेहा। भजतसे दिनरात ।।३७।। जात असता शेगावी दर्शना। वाटेतच मिळाली प्रेरणा। पुंडलिकाच्या जावे दर्शना। उत्कंठा मनी लागे ।।३८।। काटेपूर्णा ते गोरेगाव। दर्शनास गेले यादवराव। भजती पुंडलिक देव। लोटांगण घालूनि ।।३९।। भाऊ कोण्या गावी राहता। प्रेमळ शब्द कानी ऐकता। अती आनंद झाला चित्ता। अमृतवाणी ऐकोंनि ।।४०।। दर्शनाने समाधान झाले। पुन्हा जावेसेच वाटले। म्हणून अनेकदा जाणे झाले। बाबा आज्ञा म्हणौनि ।।४१।। केली बाबांना विनवणी। यावे पारडसिंगा धामी। भाग्य थोर म्हणूनि। वदले येतो "भाऊ मी" ।।४२।। चार फरवरी एकोनविसशे सासष्टला। आगमन दिन ठरला। आनंद वार्ता गावकऱ्याला। येवूनि सांगतसे ।।४३।। देव येते अपुल्या गावास। आई अनसूया सांगे जनास। शब्दावरी न बसे विश्वास। तुझिया मायमाऊली ।।४४।। भविष्याची देवूनि जाण। माता सांगे वर्तमान। बाबांचे जाणी स्थान। दूरदृष्टी ठेवूनि ।।४५।। चार फरवरी सासष्ट सालास। बाबा आले श्रीक्षेत्रास। मिरवणूक निघाली खास। रथावरी बैसूनि ।।४६।। दिंडयापताका ढोल पुढती। बारुदचे बार उडवती। अमाप भक्त गण मागुती। जयजयकार करितसे ।।४७।। ध्वनिक्षेपन रथावरी। पुंडलिका धाव लवकरी। भक्ताला तूच तारी। गजर करी आनंदे ।।४८।। महांकाळचे वाडयानजीक। बाबांची आली मिरवणूक। बसूनि होती माता तेथं। मंगल सोहळा पाहतसे ।।४९।। मिरवणूक तेथे थांबली। भाविकांनी पूजा केली। बाबांची नजर गेली। अनसूया मातेवर ।।५०।। स्मित हास्य करुनिया। बाबास पाही अनसूया। संतांचे संतच जाणतिया।





समर्थ तेचि असे ।।५१।। "बापू कसा साजरा दिसते"। वदे माता स्वमुखे। बाबा झाले जाणते। परब्रह्म अनसूयेला ।।५२।। म्हणे असता अनसूया माता। निसर्गावर जिची सत्ता। नसे अधिकार माझा आता। दहीहांडी फोडण्याचा ।।५३।। कळीकाळाची ही स्वामीनी। लक्ष्मी उमा दूर्गा भवानी। जगताची ही जननी। अवतरली या ग्रामी ।।५४।। जाणूनि अनसूयेचे स्वरुप। न करता सप्ताहाचा समारोप। निघून गेले आपोआप। टाकूनि भार मातेवरी ।।५५।। दुःखी चिंताग्रस्त सर्वही। कुणाहस्ते करावी दहीलाही। पुंडलिक देव दिशा दावी। अकस्मात जावूनिया ।।५६।। आहे गावी अनसूया। राग लोभ नाही माया। तिलाच आपण आणू या। दहीकाला करण्यासी ।।५७।। एकमुखे विचार केला। आणिले अनसूया मातेला। संकटी मार्ग दाविला। परमहंस पुंडलिकाने ।।५८।। बाबांच्या आसनी बसण्याची। विनवणी करी मातेशी। परी न शिवता आसनाशी। दहीहांडी फोडितसे ।।५९।। गोपालकाला आटोपला। मातेने सर्वा प्रसाद दिला। सुरुवात झाली सत्कार्याला। प्रसिद्ध होई जगतामाजी ।।६०।। अनसूया हस्ते दहीकाला। व्हावा वाटले बाबाला। म्हणून सोडूनि कार्यक्रमाला। बाबा निघूनि गेले हो ।।६१।। प्रसिद्धि अपूर्व जाहली। मातेची कीर्ती पसरली। कालांतराने गुढता कळली। बाबा का गेले ते ।।६२।। मातेची खरी ओळख झाली। गावोगावची मंडळी आली। भजनी पूजनी रंगू लागली। आई अनसूयेच्या ।।६३।। मातेहस्ते करुनि काला। दर्शनी लाभ घडविला। ओळखपत्र दिले जनाला। श्री पुंडलिक देवाने ।।६४।। असे हे पुंडलिक महिमान। गातसे भाविक जन। तव चरणी लोटांगण। शक्ती बुद्धी देई सदा ।।६५।। यादवरावांचे चिरंजीव। डॉ. प्रकाश चोपडे नाव। माता अनसूया देई ठाव। कृपा करुनि त्यावरी ।।६६।। प्रकाशचे लग्न अमरावतीला। परी आजारी घरी पडला। कैसे न्यावे नवरदेवाला। लग्न मुहूर्त साधावया ।।६७।। विचार करी मातापिता। एक दिवसाचा अवधी असता। उपचार करितसे सर्वथा। परी व्यर्थ जातसे ।।६८।। प्रभातसमयी

प्रात:काली। रिक्षात बसूनि माता आली। घरात येवूनि बैसली। दु:ख निवारण्यासी ।।६९।। "कायले घाबरता" बोलल्या। जेवण करतो म्हणाल्या। होते ते वाढले मातेला। दृढश्रद्धा ठेवूनि ।।७०।। खाऊनी चार घास। प्रसाद दिला सर्वास। फेकूनि अन्न दशदिशास। संकट दूर करितसे ।।७१।। कृपादृष्टीने प्रकाशला। उभे केले लग्नाला। रोग त्याचा दूर नेला। प्रसाद तया देवूनि ।।७२।। नवरदेव गेला अमरावतीस। पुंडलिकबाबा होते लग्नास। दिला आशीर्वाद सर्वास। सुखरुप ठेवूनिया ।।७३।। संकट पडता भक्ताघरी। संत येवूनि ते निवारी। गोष्ट अनुभवती खरी। मंगलमय प्रसंगी ।।७४।। नथ्थुजी ठाकरे सद्भक्त। साधुतुल्य अती सात्विक। विठ्ठलराव कृष्णराव सुपुत्र। संत सज्ञना वंदिती ।।७५।। सत्संग सदाचार। लिनता करी परोपकार। भावभक्तीचे हे घर। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।७६।। नथ्थुजीची भावभक्ती। आली मुलानातवाप्रती। ऐका त्यांची आता गीती। कृपा करी जगदम्बा ।।७७।। गुलाबपुष्प घेवूनि। जाई मंदिरी दर्शनी। नित्य नेमाने पूजि भवानी। अहर्निश सेवाभावे ।।७८।। चेष्मा होता डोळ्याला। दगड तू तया मारला। परी काच ना फुटला। भावभक्ती फळतसे ।।७९।। ऐसी नथ्थुजीची भक्ती। सवे पत्नी पार्वती। सुखवितसे महासती। दृढभाव धरुनिया ।।८०।। कष्टमय जीवन जगे। काबाडकष्ट करी अंगे। येवूनि बससी तू गंगे। दु:ख दूर करावया ।।८१।। गरिबीने त्रस्त होती। मुले शहरी शिकत होती। कामे सर्व करणे लागती। साथ करी भगवती ।।८२।। ठाकरे घरी आहे पाळणा। येवून बसे अनसूया भवना। झोका घेई हलवूनि पाळणा। गाणं तू गातसे ।।८३।।

"पाटाच्या पायण्याचे हलकारे झिजले। नातू गिरीजाचे निजले ।।
पायण्याचे हलकारे झाले जुणे। नातू गिरीजाचें तान्हे ।।" (अनसूया माता)





पार्वताबाई दळी दळण। मिरच्याचे करी कांडण। आई तू जाई त्यक्षण। विचारपूस करावया ।।८४।। एकटीच दळंत का बाई। आण, दळू लागते काही। म्हणूनि सांगतसे माई। सवे दळू लागूनिया ।।८५।। जात्याचा खुंटा धरी। मुखाने नाम उच्चारी। हाचि पाळणा अंतरी। ठेवूनि तू गातसे ।।८६।। भक्ताघरी जावूनि। काम करी भवानी। दळिता कांडिता जननी। साथ करी पार्वताबाईला ।।८७।। असाच दिवस राहणार नाही। वदली अनसूया आई। पाहूनि गरिबी नवलाई। रंकाचा राव करी ।।८८।। सुखसमृद्धी संपन्नता। तव कृपेची ही पात्रता। शिक्षण करी तू पुता। अभय देवूनिया ।।८९।। शब्द तुझे खरे झाले। तव कृपे सर्व मिळाले। सदैव राहो तव चरणाले। पूर्ण करी मनोरथ ।।९०।। कृष्णराव गेले मुंबईला। शैक्षणिक सहलीला। चालू लागले रस्त्याला। सडक पार करण्यासी ।।९१।। जोराने आली एक कार। कृष्णरावच्या अंगावर। करुनि त्यांना आरपार। पुढे निघूनि जातसे ।।९२।। धक्का बसला त्यांना। आई वाचव या क्षणा। गाती माता भजना। दृढश्रद्धा ठेवूनिया ।।९३।। लेकाची हाक ऐकूनि। आई गेली धावूनि। कृष्णाला वर उचलूनि। सुरक्षित ठेवितसे ।।९४।। मित्र विचार करिती। कृष्णा आला गाडीखालती। मिळाली त्याला सद्गती। शोकमग्न होतसे ।।९५।। चालकाने गाडी थांबविली।कोण मेले गाडीखाली। सर्व मित्रमंडळी जमली। बघाया कृष्ण मित्राला ।।९६।। गाडीच्या समोर भागावर। दिसे कृष्णा बरोबर। अपघात कुणाचा झाला तर। आश्चर्य करितसे ।।९७।। आईने हात दिला। अलगत उचलले मुला। अपघाती वाचवी बाळाला। गाडीसमोर ठेवूनि ।।९८।। सर्वजन आश्चर्य करिती। आली कशी मुंबई प्रती। कोण ही महासती। चला घेवू दर्शन ।।९९।। संकटी माता तू रक्षिले। इजा न होई तनाले। काय उणे लेकराले। भवसागर तरण्यासी ।।१००।। जन्मोत्सव सप्ताहाला। मंडळी येई भजनाला। आमंत्रित करी जेवणाला। भाविक मंडळी गावाची ।।१०१।। सांगितले

विठ्ठलरावाला। जेवू घाला दहा पंधरा भक्ताला। येतील ते सदनाला। भोजन करावया ॥१०२॥ पाच मे च्या मंगल दिनी। भजनी मंडळी आली सदनी। केली थोडी जुळवणी। महाप्रसादाची ॥१०३॥ परी आले अधिक जन। न संपे तरी अन्न। भगवतीचे कृपापान। सेविती सर्वजन ॥१०४॥ तेव्हापासून सुरु झाला। आईचा जन्मोत्सव सोहळा। पांच मे च्या पावन पर्वाला। साजरा करितसे ॥१०५॥ नरकचतुर्दशी दिनाला। जावूनि ठाकरे सदनाला। वदली माता लेकाला। "ठाकऱ्याच्या वाडीत पंढरपूर आहे" ॥१०६॥ सर्पदंश होई माधव गौतमला। उपचार त्याने बराच केला। परी काही गुण न आला। विष चढे वरवरी ॥१०७॥ आई तू गेली धावूनि। माधवरावाच्या अंगणी। ताक आण म्हणे तत्क्षणी। उपचार करावया ॥१०८॥ ताक मंतरलेले होते। कैसे द्यावे ते माते। परी माता घेई स्वहस्ते। प्राशन करी समस्त ॥१०९॥ जन विचार करिती। काय घडेल भगवती। परी न होय जे कल्पिती। विष उतरवी माधवचे ॥११०॥ पचविले विष उरी। घेतले ताकाबरोबरी। दुरुस्त भक्ता करी। जगदम्बा अनसूया ॥१११॥ पुढील अध्यायी जाणा। वाजविली तू लोकविणा। येवू लागले तव दर्शना। श्री क्षेत्री पारडसिंगा ॥११२॥ तूज म्हणती विदेही माऊली। साक्ष लोकांना पटू लागली। तूच असे जगतवल्ली। म्हणौनि वंदितसे ॥११३॥ इतिश्री परमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। सप्तमोऽध्याय सम्पूर्ण ॥११४॥ श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती॥ शांती॥।

**॥ ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ॥**




## अध्याय ८





नवीन संस्थानची स्थापना व मंदिराची निर्मिती - नवीन मंदिरात भक्तो ध्दार करतांना माताजी
मातेचा गावातील जुना मठ
गावातील जुन्या मंदिरात बसून भक्तांना आशीर्वाद देतांना माताजी

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

ॐ नमो भवानी माता। कृपा करी दीनानाथा। बुद्धी देई पतिता। सुबुद्ध करुनिया ।।१ ।। असता तुझी सावली। पूर्ण होई नामावली। पालनहार जगत्वल्ली। भगवती अनसूया ।।२ ।। मी मंद अविचारी। तू थोर मनोहारी। देई दान पामरी। कृपासिंधू योगीनी ।।३ ।। भक्त येई दर्शना। मिळे अपार करुणा। अखंड वाजवी लोकविणा। जनहीत साधाया ।।४ ।। दिनकरराव ढोले पूजक। पारडसिंग्याचे भक्त भाविक। अनसूया स्तोत्राचे लेखक। निर्मळ असे जीवनी ।।५ ।। सती अनसूयेची प्रेरणा। लाभली दिनकररावांना। करी स्तोत्राची रचना। आई अनसूयेच्या ।।६ ।। आरती त्यांचीच गाती। भक्त आज जगती। देतसे तया प्रसिद्धी। आरती मातेची ।।७ ।। शिवलीलामृताचे पठन। करितसे नित्यनेमान। योगेश्वर हिंगे महाराज जाण। गुरु त्यांचे शिवभक्त ।।८ ।। आईने दृष्टांत दिला। मरणातून वाचवि दिनकरला। आग्यामोहोळाचा हमला। परतावूनि लावितसे ।।९ ।। मेटपांजरा पगारी गेले। आग्यामोहोळाने घेरले। गांधीलमाशा हाकलू लागले। परी हमला करितसे ।।१० ।। रस्त्यावरील लोक म्हणती। उडी घ्या पाण्याती। परी दिनकरराव मनी भजती। दयासिंधू मातेला ।।११ ।। माते तू धाव आता। तूच माझी कृपावंता। कोण रक्षी या अनाथा। तुजविण अनसूया ।।१२ ।। ऐकूनि भक्ताचा धावा। संकट दूर करी लीलया। जैवारच्या हॉटेलात बसूनिया। रक्षितसे लेकरा ।।१३ ।। क्रिया केली तू पारडसिंग्यात। प्रत्यय आला मेटपांजऱ्यात। दूर करी संकट क्षणात। एकलक्ष साधूनि ।।१४ ।। काढी चुलीतूनि काडी पेटती। फिरवी स्वत:भोवती। “पळापळा” त्यांना म्हणती। दूर करण्या आग्यामोहोळ ।।१५ ।। गांधील माशा होती दूर। आई अनसूयेचा चमत्कार। सांगू लागले दिनकर। पारडसिंगा

येवूनि ।।१६ ।। होते गोपाळराव ढोले तेथं। सांगे आईची मात। करितसे दिनकरा ज्ञात। कालक्रिया देवीची ।।१७ ।। ज्यावेळी हमला होई। त्यावेळी काडी फिरवी। वेळकाळ तू जुळवि। सर्वज्ञ तू असे ।।१८ ।। बसूनि एके ठायी। लक्ष तुझे दिशा दाही। भक्तासाठी धावून जाई। माय माझी अनसूया ।।१९ ।। वामनराव येवले भजी मातेला। राहूनि श्रीक्षेत्री पारडसिंग्याला। पूजितसे भक्तवत्सला। सेवाचाकरी करुनि ।।२० ।। भक्ताची सेवाभक्ती। सुखवि महाशक्ती। देत से तया प्रचिती। संकटी धावूनिया ।।२१ ।। वामनरावचा आजार। मरणासी करी शेजार। रात्रंदिवस करी बेजार। मरणयातना भोगितसे ।।२२ ।। तैसेच आले मंदिरी। आसवांनी पूजा करी। चरण धरुनि हाक मारी। मुक्त करी भगवती ।।२३ ।। काय माझे असे चुकले। ऐसे कोणते गुन्हे घडले। का शासन मज केले। भगवती अनसूया ।।२४ ।। मुक्त करी जीवनातूनि। प्राणज्योत मालवूनि। कष्ट होई यमयातनी। न सोसवे मज आता ।।२५ ।। पतितपावन तू असशी। परी पतितांना शिक्षा देशी। कलंक लागेल तव नामाशी। म्हणौनि रक्षावे लेकरा ।।२६ ।। ऐशी करुनि विनवणी। गेले पुन्हा दवाखानी। भजी अनसूया जननी। श्रद्धाभाव ठेवूनि ।।२७ ।। कृष झाले सर्व शरीर। रक्त आटे वरवर। न चाले काही उपचार। म्हणून शरण येतसे ।।२८ ।। वामनरावांनी केली सेवा। भजूनि अनसूया देवा। येई कामा तेधवा। पूर्वसुकृत म्हणूनिया ।।२९ ।। पूर्वपुण्याईचे फळ। मिळे तया सबळ। नाम अनसूया प्रबळ। सोडवी यमपाश ।।३० ।। पाहूनि लेकाची भक्ती। धावत जाई महासती। जैसे येई द्वारकापती। द्रौपदीच्या हाकेला ।।३१ ।। दूर करी रोगराई। महाशक्ती अनसूया आई। तवकृपेची नवलाई। दिसतसे भक्तगणा ।।३२ ।। जव तव दृष्टी पडली। काळ व्याधी दूर गेली। यमपाशातून मुक्त केली। काया वामनरावांची ।।३३ ।। असता मातेची छाया। दूर होई भवभया। न घडे काही असूया। कृपादृष्टी फिरविता ।।३४ ।। पुनर्जन्म हा झाला।





म्हणून दिसलो क्षणाला। गेलो असतो मसनाला। नसता ठाव महामाया ।।३५ ।। म्हणून आलो चरणाला। स्विकार करी सेवेला। मरणाचा फेरा चुकला। आशीर्वादे भगवती ।।३६ ।। तूच माझी असे भक्ती। तूच माझी किर्ती प्रचिती। तवकृपेची यशोमती। मिळतसे मम पामरा ।।३७ ।। निर्धन असूनि सधन। अज्ञानी असूनि सज्ञान। तव नामाचे करी किर्तन। सुखसंपदा मिळे ।।३८ ।। तूच केले लग्न मुलीचे। स्थळ पाहिले तृप्तीचे। म्हणौनि सर्व वदे वाचे। जय जय अनसूया ।।३९ ।। वर शोधणे तुझ्यावरी। लग्नाचा भार तव शिरी। तूच करी सर्व तयारी। मुलीच्या लग्नाची ।।४० ।। मी तर असे चाकर। सेवा घडू दे बरोबर। हेच मागणे कृपावर। दूर न करी दासाला ।।४१ ।। तूच करी सांभाळ। न होई काही आबाळ। घरदार मुलबाळ। सुखसौख्य नांदतसे ।।४२ ।। म्हणून आहे सेवेला। आद्यापासून अंत्यवेळेला। भार वाही भक्तवत्सला। तारण्या भवसागरी ।।४३ ।। वर्धेचे माधवराव अहीरराव। होते पोलीस सबइनस्पेक्टर। निघून गेला त्यांचा पोर। न सांगता न बोलता ।।४४ ।। माते तुझा धावा केला। परत आण आई लेकाला। प्रतिमेला पूजू लागला। भावभक्ती अर्पूनि ।।४५ ।। पहाटे चारच्या समयाला। दार उघडी त्याक्षणाला। कोणीतरी आत आला। म्हणूनि सर्व पाहतसे ।।४६ ।। परी न दिसे कुणी। शोधाशोध करी सदनी। कोण आले असेल भवनी। म्हणून चिंता करितसे ।।४७ ।। दुज्या दिनी लेक आला। गेला होता नाशिकला। भगवती पाठवि त्याला। स्वगृही अपुल्या ।।४८ ।। म्हणून अहीरराव गाती। आई अनसूयेची महती। खुंटते माझी मती। गुण गाता मातेचे ।।४९ ।। खापरीचे नानासाहेब केने। अर्पितसे श्रद्धा सुमने। सुखसमृद्धीचे देणे। केने पाटला लाभतसे ।।५० ।। या लेकाले सार ठांव। वदली अनसूया माय। जाणूनि भक्ताचा भाव। कृपा तू करितसे ।।५१ ।। नानासाहेब गेले मुंबईला। तांडेलांनी त्रास दिला। तोच संकेत मिळाला। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।५२ ।। "कशी तांडेलांन जिरवली"।

आई अनसूया वदली। वचनाची साक्ष पटली। त्रिकालज्ञानी मातेच्या ।।५३ ।। ऐसा आई तुझा महिमा। सार्थ करी तव नामा। भूत भविष्याच्या खुणा। जाणतसे भगवती ।।५४ ।। सिंधूताई मोहोड परतवाड्यासी। भजिती आई मानसी। दूर करी व्याधिसी। अंगारा सेवूनिया ।।५५ ।। आजारी पडल्या गावाला। हात जोडी मातेला। अंगारा सेवी क्षणाक्षणाला। नामस्मरण करुनिया ।।५६ ।। अंगाऱ्याचा गुण आला। सिंधूताईचा रोग गेला। दुरुस्त करी लेकीला। वरदहस्त ठेवूनि ।।५७ ।। रेखाच्या लग्नाची संमती। तूच दिली भगवती। "जाण रे टवलार ले" वदती। माता अनसूया ।।५८ ।। तिथेच योग जुळून आला। अशोक चित्रकार पति शोभला। मुक्त करी तव बाळाला। आशीर्वाद देवूनि ।।५९ ।। अंजनाबाई मोतीराम आंडे। वरुड राहती संगे। भजती अनसूया गंगे। बाळ नव्हते म्हणूनि ।।६० ।। हर एक मासी येई मंदिरा। दर्शन घेण्या कृपावरा। म्हणे आई दु:ख निवारा। बाळ एक देवूनि ।।६१ ।। माताजी आशीष देई। दिवा लागेल घरी बाई। अंजनाबाई हर्षित होई। ऐकूनि बोल मातेचे ।।६२ ।। दिवस मास पूर्ण होता। बाळ येई उदरी माता। पूर्ण करी ईच्छा भक्ता। कृपाप्रसाद देवूनि ।।६३ ।। ठेवी बाळ आईच्या पायावर। निरखी तू वारंवार। आईचे अनंत उपकार। म्हणून कूस उजळतसे ।।६४ ।। लहानाचा मोठा झाला। तव कृपे डॉक्टर बनला। परी लोभ असे त्याला। आई तव नामाचा ।।६५ ।। असे तुझे हे महिमान। तव कृपे मिळे संतान। जन्मोजन्मी ठेवि निधान। जगत्जननी अनसूया ।।६६ ।। हरबंससिंग सूभेदार। ध्यानात विघ्न वरचेवर। तरुणी सोडूनि लटाळ। उभी राहतसे ।।६७ ।। म्हणून आले धामी। दूर करी विघ्नी। सांगतसे तया जननी। "काय म्हणते गा" ती लटाबगळी ।।६८ ।। तोच तू फोडी नारळ। दूर करी विघ्न प्रबळ। म्हणून करी चरण जवळ। भवतापी तरावया ।।६९ ।। राजस्थानच्या खेड्यात। राही कुटूम्बा समवेत। भजती माता अहोरात। पादपूजा





करुनिया ।।७० ।। एके दिनी झाला सर्पदंश। गावातील एका महिलेस। हरबंससिंगच्या घरास। उपचार करण्या येतसे ।।७१ ।। सांगितला तिला उपाय। धरा अनसूयेचे पाय। तोच एक तरणोपाय। जडदेहा उद्धरण्या ।।७२ ।। लावी तेथेच उदी। नाव घेवूनि दयानिधी। दहा मिनिटात येई शुद्धी। तुझी कृपा म्हणौनि ।।७३ ।। दूर करी रोगराई। घेवूनि नाम माई। तीर्थ उदी उपचार ठाई। गावात करितसे ।।७४ ।। तवध्यान दूरवरी। जो भजे ज्या नगरी। धावत जावूनि रक्षा करी। माय माझी अनसूया ।।७५ ।। आई तुझा परम्भक्त। अजाबराव देशमुख पुत। तव महिमा सदोदित। गातसे मनोभावे ।।७६ ।। वडविहीरा गावी। शेती पाहण्या जाई। जाता येता दर्शन घेई। महाशक्ती अनसूयेचे ।।७७ ।। माता वदली तयेला। गवत काडीचा कचरा आला। खाली पाहून चाली बाला। नाही तर अनर्थ ओढवेल ।।७८ ।। मातेची आज्ञा घेई लक्षात। पाहून चाली शेताभातात। बसला होता नाग गवतात। फणा वर करुनिया ।।७९ ।। शहारे येती अंगावरी। आठवि माता अंतरी। तोच साप गेला दूरी। आई तव आज्ञेने ।।८० ।। ऐसे आईचे महिमान। करी भक्ता सावधान। संकटाचे परिमाण। माऊ ली सांगतसे ।।८१ ।। शेतातूनि चालता। माता आज्ञा न पाळता। प्राण गेला असता। पामर देशमुखाचा ।।८२ ।। परी आई रक्षण करी। धावत येवूनि परोपरी। येवू न देई संकट शेजारी। पतितपावन नाम तुझे ।।८३ ।। तूच सांगितले लेकाला। "मनसुख" मंत्र दिला। आळवि क्षणाक्षणाला। आई आई म्हणूनिया ।।८४ ।। मन करारे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण। संत तुकारामाचे कवन। तूच माता सांगतसे ।।८५ ।। आदी अंती असे मन। सुख दु:खाचे कारण।म्हणून करा भजन। आई अनसूयेचे ।।८६ ।। ठेविता ही भावभक्ती। प्रसन्न असे मनचित्ती। मग मिळे धनसंपत्ती। शांती जया ठायी ।।८७ ।। ऐसा हा अधिकार। मातृसुखाची धार। दिली जागा चरणावर। कृपापात्र म्हणौनि ।।८८ ।।

अडबे गुरुजी नेक। दयाळू तसेच भाविक। आई तव भक्ती एक। श्रद्धाभावे करितसे।।८९।। हृदय रोगाचा झटका आला। तव कृपे निघून गेला। भजू लागले मातेला। कृतार्थ होवूनिया।।९०।। असता नागपूर मुक्कामी। हृदय रोग जाचे तनी। दु:ख होई अपार जीवनी। मरण यातना भोगितसे।।९१।। तज्ञ डॉक्टर तपासती। रोगावरील औषध देती। परी न जाई आपत्ती। सदा बेशुद्ध असे।।९२।। एकदा बेशुद्ध अवस्थेत। काळ येई अकस्मात। दोन्ही बाजूस भयानक। क्रुर व्यक्ती दिसतसे।।९३।। घेवूनि अपुला फास। गळ्यात घाली खास। ओढू लागले अडबेस। परी समोर जाईना।।९४।। आई तू क्षणात गेली। काळाला आज्ञा केली। पळपळ त्यांना म्हणाली। थाप देवूनि पाठीवर।।९५।। स्पर्शिता तव कर। उठून बसे पलंगावर। विश्वास न बसी नयनावर। बघितले जे लोचनी।।९६।। कुठे आहे माझी आई। आली होती याच ठायी। यमपाशातून मुक्त होई। माता तव कृपेने।।९७।। हृदय रोग बरा झाला। न घेता औषधाला। आई तुझी ही लीला। अनुभवती भक्त तुझे।।९८।। गर्दी होवू लागली गावी। नव्हता ठाव एके ठायी। दूर गावी कीर्ती जाई। आई अनसूयेची।।९९।। येवू लागले अनुभव। भक्त घेई धाव। देई भगवती ठाव। दु:ख दूर करुनि।।१००।। मातेची महिमा कळली। दूर करी अज्ञान कली। वेडी नाही ही जगतवल्ली। साक्षात भगवती।।१०१।। माता फिरी दिगंबर। या घरची त्या घर। दूर कराया अंध:कार। ज्ञानदीप लावतसे।।१०२।। गावकरी विचार करी। बांधावे मंदिर पावनपुरी। म्हणून समिती स्थापन करी। पारडसिंगा गावात।।१०३।। आईचे निस्सीम भक्त। डॉ. कामटकर व अरविंद खंडाईत। नंदलाल व हेडाऊ गुरुजी सोबत। करी आखणी कामाची।।१०४।। नंदलाल अध्यक्षपदी। सचिव झाले हेडाऊ गुरुजी। निर्माण केली समिती। मंदिर बांधण्यासी।।१०५।। बांधावे कुठे मंदिर। विचार करिती पोरं। वडीलधारी सांगती घर।






अनसूया मातेचे।।१०६।। पिंपळवृक्ष गांधी चौकात। योगी तेथ समाधिस्त। तेथचं कराविं सुरुवात। मंगलमय धामाची।।१०७।। स्थळ हेचि पावन। तपश्चर्येचे ठिकाण। करावे तेथेचं निर्माण। धाम भगवतीचे।।१०८।। समितीतिल भाविक जन। फिरु लागले रानोवन। मदत करी गावातील जन। या पुण्य कार्याला।।१०९।। निस्वार्थ सेवेचे व्रत। घेई समिती निश्चित। परिश्रम केले एक जात। वर्गणी करावया।।११०।। कष्ट यांचे खरे। गावकरी आप्तेष्ट साथ करे। पूर्तता होई सत्वरे। एकोणविसशे अडुसष्ट साली।।१११।। बसली माता आसनी। ऐकी भक्ता गाऱ्हाणी। भक्त येई दूरवरुनि। मातेच्या मंदिरात।।११२।। हेडाऊ गुरुजी बदलले। नंदलाल निघून गेले। डॉ. कामटकर सचिव झाले। शामदेवजी येवले अध्यक्ष।।११३।। केला आणखी विस्तार। उचलावया हा भार। करु लागले कारभार। भक्त तुझे भगवती।।११४।। जन्मोत्सव सुरु झाला। पाच मे च्या जन्मदिनाला। गांधी चौकी जुन्या मठाला। श्री क्षेत्री पारडसिंगा।।११५।। आई तू प्रथम दर्शनी। गेली छिलेवाडा ग्रामी। एकशे एक्कावन रु. वर्गणी। देई भक्त जनार्दन।।११६।। त्यावरी माया खरी। म्हणून गेली तया घरी। सदन तू पावन करी। पदस्पर्श करुनिया।।११७।। तेव्हापासून सुरु झाली। वारी तुझी जगतवल्ली। दूर करी अज्ञान कली। गावोगावी जावूनि।।११८।। वाढला तुझा व्याप। गंगाजळी येई आपोआप। न राहले आता माप। मोजमाप करावया।।११९।। मेवा पाहूनि मक्षिका येती। संपता तो निघून जाती। तैशीच झाली स्थिती। पारडसिंगा गावात।।१२०।। समितीवर समिती आली। जो तो म्हणे मीच वाली। भांडणाचा शिरला कली। माता तव धामात।।१२१।। प्रकरण गेले कचेरीत। भांडू लागले आपसात। सांगी धर्मदाय आयुक्त। तडजोड करण्यासी।।१२२।। आयुक्ताने दिली संमती। तेरा विश्वस्तांची समिती। र. न. दहाशे सत्तर ई वरती। ७-१-

१९८२ साली ।।१२३ ।। तेव्हा पासून काम पाही। हीच समिती भार वाही। भल्याबुऱ्याची जाण होई। कार्य करता मंदिरी ।।१२४ ।। वाढला भक्त परिवार। कीर्ती गेली दूरवर। अपुरा मंदिर परिसर। पडतसे भक्ताला ।।१२५ ।। भक्त माता विचारी। बांधू का मंदिरी। धर्मशाळा बांधा सत्वरी। म्हणून तू सांगतसे ।।१२६ ।। भक्ताची करा सोय। तेच आहे देव। वदली अनसूया माय। भावभक्ती पाहूनि ।।१२७ ।। म्हणून बांधी धर्मशाळा। तव धामाच्या बाजूला। चिंतावाही भक्तवत्सला। अपुल्या लेकरांची ।।१२८ ।। घेतले चौदा एकर शेत। काटोल पारडसिंगा मार्गात। तांबे बरडीच्या समीप। देवीदास मांडवगडेचे ।।१२९ ।। मोतीराम आंडे सद्भक्त। करी दान या कार्यात। साथ करी अन्य भक्त। विक्री करावयासी ।।१३० ।। एक एक एकोणविसशे चौऱ्यांशीला। मालकी मिळाली संस्थानला। उभारण्या भव्य वास्तूला। परिसर शोभतसे ।।१३१ ।। तेथेच केली सुरुवात। मंदिराची रुजवात। मदत करी माता भक्त। दिव्य धाम करण्यासी ।।१३२ ।। माता तूच केले निश्चित। स्थळ हेच प्रख्यात। देवूनि भक्ता दृष्टांन्त। येथे येण्यापूर्विच ।।१३३ ।। होशंगाबादचे प्रकाशचंद्र चौरे। माता तव दर्शना आले। नर्मदा माता सोबतिले। घेवून येई श्रीक्षेत्री ।।१३४ ।। फिरायला चाल माता वदली। पुष्पा चौरे घेवून निघाली। नवीन मंदिरी भगवती आली। चौरे कुटूम्बियासवे ।।१३५ ।। याच ठायी दोन्ही हात। जोऱ्याने आपटी एकजात। स्थळ केले होते निश्चित। तूच आई पूर्वकाली ।।१३६ ।। यावी कामात गती। आणावे स्थळी भगवती। विचार करी समिती। पूर्णत: होण्यासी ।।१३७ ।। विजयादशमीच्या पावन दिनी। आली माता नूतन धामी। गावातील जुन्या मठातूनि। १-१०-१९९२ साली ।।१३८ ।। सुरु झाले अखंड काम। करण्या दिव्य वास्तू निर्माण। लाखो भक्त देई दान। श्रद्धासुमने अर्पूनि ।।१३९ ।। करी भक्तांचे दु:ख दूर। नूतन धामी करुणाकर। न लागी तुझा पार। भगवती



अनसूया ।।१४० ।। याच नवीन मंदिरात। झाली माता समाधिस्त। संजीवन काया अविरत। नवजीवन देतसे ।।१४१ ।। केला कथन वृतान्त। मंदिर निर्मितीची सुरुवात। वर्तिला अति संक्षिप्त। तव कृपे भगवती ।।१४२ ।। आई तुझा लाडका लेक। नागो म्हणती तया लोक। सेवक तुझा सच्चा नेक। साथसंगत सदा करी ।।१४३ ।। पुढील अध्यायी जाणा। अक्षय श्वान महिमा। अमर करी जो जीवना। वाचता वर्तताही ।।१४४ ।। इतिश्री परमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। अष्टमोऽध्याय सम्पूर्ण ।।१४५ ।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती ।। शांती ।।।

**।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।**

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतेनमः श्री गुरुदेवायनमः

जय जय सद्गुरु अनसूया। आलो मी तव पाया। बुद्धी देई तू गाया। गाथा तुझी भगवती ।।१ ।। असता माते तुझी साथ। कसा राही मी अनाथ। पूर्ण करी मनोरथ। आशीष देवूनिया ।।२ ।। लेखनी हाती दिली। तूच माता जगतवल्ली। पूर्ण करी नामावली। कृपासिंधू महामाया ।।३ ।। श्रोते हो ऐका कथन। संजीवन श्वान पुराण। देतसे जीवनदान। मृत श्वानाशिया ।।४ ।। आईची प्रीती भारी। श्वानावरी लेकरापरी। म्हणून येवूनि दारी। चरणावरी लोळतसे ।।५ ।। माहा बापू आला। भूक लागली त्याला। कुरवाळी तू कुत्र्याला। हस्त फिरवूनिया ।।६ ।। घेई त्याचा मुका। दूर न करी लेका। न्याहाळूनि एकटका। घास भरवी वदनी ।।७ ।। ऐसा एक होता श्वान। नागो म्हणती सर्वजन। दिले त्यासी जीवनदान। पुनर्जन्म देवूनि ।।८ ।। ऐकून घ्या ही कथा। श्रोते हो एकचित्ता। दूर करी भवव्यथा। भगवती अनसूया ।।९ ।। चैतू मेहतर होता गावी। पारडसिंगा तो राही। मलमूत्रादि साफसफाई। पत्नीसवे करितसे ।।१० ।। एकदा त्याच्या पत्नीला। मेलेला कुत्रा दिसला। पडला होता रस्त्याला। जीवनयात्रा संपवूनि ।।११ ।। होता गळ्यात दोर। ओढत आणि लेंडीतीर। मलाची पाटी डोईवर। घेवून ती निघाली ।।१२ ।। मृतश्वान व मलासी। टाकून देई लेंडीतिरासी। निघून जाई स्वकामासी। उदर भरण कराया ।।१३ ।। तोच येथे स्वारी आली। अनसूया जगत्वल्ली। दृष्टी त्यावर रोधिली। कृपादृष्टी ठेवूनिया ।।१४ ।। जाणतसे कालमहिमा। जीवाशिवाच्या खुणा। तूच असे त्रिकालज्ञाना। जगत्जननी अनसूया ।।१५ ।। माता उचली श्वानाला। घेई कडेवर त्याला। आणी गांधी चौकाला। पारडसिंगा गावात ।।१६ ।। "सुखी ठेव माता माय याला"। थोपटूनि





आईचा आवडता ''नागो कुत्रा''
याच नागो कुत्र्याला आईने जीवंत केले.

नागो कुत्रा माताजी कुत्र्याच्या
मुखात मुख टाकतांना माताजी



## अध्याय ९
## श्वान महिमा



म्हणे श्वानाला । जाणी तू दैवाच्या लीला । देवदेव म्हणूनिया ।।१७ ।। डोके होते वरती । पाय करी खालती । घेवून कडकडे श्वानाती । फिरतसे महामाया ।।१८ ।। नंतर गेली हनुमान मंदिरी । मृतश्वान कडेवरी । सभोवताल चक्कर मारी । मारोती रायाच्या ।।१९ ।। प्रदक्षिणा केल्यावरी । घेतला कुत्रा करी । 'खेळ पळ जा' सत्वरी । थोपटूनि म्हणतसे ।।२० ।। तोच कुत्रा खळबळला । एकाएकी उठून बसला । दोरी घेवूनि पळाला । शब्दप्रमाण मानूनि ।।२१ ।। अचेतना येई चेतना । जीवंत केले तू श्वाना । काय वर्णावा महिमा । संजीवन नाम तुझे ।।२२ ।। पुनर्जन्म दिला त्याला । पूर्व संचिती जो भला । नागो म्हणती कुत्र्याला । नामकरण तू करी ।।२३ ।। नागो फिरी गावात । या दारीचा त्या दारात । आईचा तो कृपावन्त । म्हणून मानपान होई ।।२४ ।। गुलाबरावाने त्यास नेले । नागो कुत्र्याशी घराले । मातेने ज्यास जीवंत केले । त्यास ते पाळतसे ।।२५ ।। तरी तो वापस येई । आई अनसूयेच्या पायी । तेथेच लोळत राही । न सोडी चरण कदा ।।२६ ।। आई थोपटी त्याला । वदनी भरवी घासाला । कृपेचा महिमा कळला । नागो नागो म्हणूनिया ।।२७ ।। दिवसामागून दिवस गेले । नागोला प्रौढत्व आले । काटे आता उलटे फिरले । कालचक्री सापडला ।।२८ ।। नागो कुत्रा कावरला । भीती वाटे जनाला । हाकलून लावी त्याला । चावेल म्हणूनिया ।।२९ ।। त्रस्त करी जनमन । नागोच कावरण । कसे करावे संरक्षण । या कुत्र्यापासूनिया ।।३० ।। आईचा प्रसाद ज्याला । कसे मारावे त्या कुत्र्याला । म्हणून आळवि मातेला । तूच रक्षी यापासूनि ।।३१ ।। नागो आला मंदिरी । लोळण घेई चरणावरी । तोच तू त्यास आज्ञा करी । निघून जा म्हणौनिया ।।३२ ।। जाणूनि जनाचे हीत । दूर करी भवकात । परी मानूनि अंतर्हित । तोच मार्ग दावितसे ।।३३ ।। पाळूनि आज्ञा प्रमाण । निघून गेला नागो श्वान । न जाणे कोणी ठिकाण । कोठे गेला म्हणौनि ।।३४ ।। न पाहिले जातांना । न पाहिले मरतांना । परी न दिसे लोचना । पारडसिंगा

गावात ॥३५॥ ऐशी माझी आई। काय गाऊ नवलाई। मृताला जीवनदान देई। जय जय अनसूया ॥३६॥ कितीही करावे कवन। पूर्ण न होई कथन। सदा वाटतसे अपूर्ण। अगाध लीला मातेची ॥३७॥ एक कुत्रा मरुन पडला। वामनराव येवलेच्या उपहारगृहाला। माऊली उचली त्याला। घेवूनि खांद्यावर ॥३८॥ मृत कुत्राघेवोनि। बसशी पिंपळ आसनी। शेवचिवडा सोबत आणी। गावातील मठात ॥३९॥ आहे तेथे पिंपळवट। योग्याची समाधी स्थित। तेथेच होई आसनस्थ। मृतश्वानाशी घेवोनि ॥४०॥ घेतला कुत्रा मांडीवर। शेव टाकी वदनावर। खा खा म्हणे सत्वर। आज्ञा त्यास करुनि ॥४१॥ तोच उघडले तोंड त्याने। सुरु झाले चघळणे। शेवचिवड्याचे खाणे। पाहतसे सर्व लोक ॥४२॥ संजीवन मंत्र मिळाला। मृतश्वान जीवीत झाला। घटना घडली जुन्या मठाला। श्री क्षेत्री पारडसिंगा ॥४३॥ कुत्रा लोळू लागला। माता थोपटी त्याला। जैसी धेनू वत्सला। प्रेमपाश देतसे ॥४४॥ तुझी प्रीती सर्वावर। मानवपक्षी प्राण्यावर। तूच व्यापी चराचर। कृपासिंधू अनसूया ॥४५॥ ऐसी तुझी लीला। असमर्थ मी वदण्याला। शक्ती देई दासाला। कृपादृष्टी ठेवूनि ॥४६॥ नंदलाल सिंधी व्यापारी। किराणा दुकान सुरु करी। दुकानाची भरभराट भारी। दिवसेंदिवस होतसे ॥४७॥ माता तुझी करी भक्ती। तुझी कृपा तया होती। तुझाच महिमा गाती। भक्त तुझा नंदलाल ॥४८॥ तू पडून राही दुकानात। रात्री तू झोपे आत। दुकान बंद करुनि जात। नमस्कार करुनिया ॥४९॥ दुकानातील कळीचा चुना। तू पसरवी मकाना। करुनि त्याचा बिछाना। झोपतसे त्यावरी ॥५०॥ झोप कुठली माते तुला। तू जाणे तुझी कला। भेट देई देवादिकाला। सोंग घेवूनि झोपेचे ॥५१॥ हाती घेवूनि चुना। टाकी तू स्ववदना। खाऊ लागली मनमाना। गोळ्याबिस्कीटापरी ॥५२॥ रात्रभर चूना खाई। खंडोबाचे नाव घेई। काय वर्णू ही नवलाई। मायमाऊली तुझी मी ॥५३॥ दिवस उजाडल्यावरी।






नंदलाल दुकान उघडे करी। आत जाताच तो घाबरी। रुप पाहूनि मातेचे ॥५४॥ काली मातेचा अवतार। अक्राळरुप विद्रूप भार। फोडेच फोडे वदनावर। महाकाली दिसतसे ॥५५॥ शिवशंभूचा अपमान। करितसे दक्ष जाण। उमा करी आत्मसमर्पण। धगधगत्या यज्ञकुंडात ॥५६॥ तयेवेळी तिचे रुप। दाखवि तिचा प्रताप। तेच होई तुझे स्वरुप। रेणूका तुज म्हणती ॥५७॥ चुण्याचा गुण आला। चेहरा विद्रूप झाला। कोण रक्षिल मातेला। म्हणून हळहळती जन ॥५८॥ एकाएकी श्वान आला। पाय ठेवूनि खांद्याला। जीभेने तो चाटू लागला। आई अनसूयेस ॥५९॥ जेथे जेथे फोड आला। तेथे तेथे चाटू लागला। जिव्हा साफ करी व्रणाला। स्वारी खंडोबाची ॥६०॥ उंच पांढरा कुत्रा। पाहण्या भरली जत्रा। भगवतीला देवूनि मात्रा। उपचार करितसे ॥६१॥ पुर्ण चाटून झाल्यावरी। निघून गेला तो सत्वरी। ज्या घरचा त्या घरी। अंतर्धान पावतसे ॥६२॥ लोक पाहती अनसूयेला। म्हणे चमत्कार कैसा घडला। सुस्वरुपाचा हा तजेला। कोठून येत असे ॥६३॥ फोडे नाहीसे झाले। व्रण सगळे मिटले। विद्रूपाचे सुरुप बनले। वदन अनसूयेचे ॥६४॥ असा कुत्रा गावात नाही। कोठून आला कळेना काही। गावभर शोधी ठायी ठायी। परी न दिसे कुठेच ॥६५॥ श्वेत श्वान कोठून आला। अकस्मात कोठे गेला। कळेना आईची लीला। क्षमा करी अपराध ॥६६॥ गजाननाची निघे स्वारी। मूषकावर करी वारी। त्याची आवड तया भारी। वंदन माझे श्री गणेशा ॥६७॥ तैसीच खंडोबाची स्वारी। सदैव कुत्रा शेजारी। क्षणभरही न दूर करी। लाडक्या बापूला ॥६८॥ एकदा नंदलालच्या दुकानी। गेली नैवेद्य घेवोनि। अर्पन कराया जननी। सौ. शांताबाई ढोले ॥६९॥ नैवेद्य सेवन करुनि। मागितले तू पाणी। आणिला ग्लास भरुनि। दृढभाव धरुनिया ॥७०॥ तोच समयी कुत्रा आला। पाणी पाजी माता त्याला। पुन्हा आण म्हणाली तिला। तृप्त कराया श्वानासी ॥७१॥

दुजा प्याला आणला। पुन्हा पाजी श्वानाला। तृषा शमवूनि तृप्त केला। आत्मा त्या श्वानाचा ।।७२ ।। आई तू जाणी मनोमनी। दोन पेल्यांची तृषा श्वानी। म्हणून मागी तेवढेच पाणी। शांताबाई ढोलेंना ।।७३ ।। कुत्र्याचा तू लाड करी। स्वहस्ते अन्न चारी। सदैव असे तव मंदिरी। बापू बापू म्हणतसे ।।७४ ।। श्वानाला कोणी मारले। दु:ख त्याचे तुला झाले। दु:ख भोगावे लागे त्याले। अवमान जे करिती ।।७५ ।। म्हणून न मारी कुत्र्याला। असति जे सेवेला। दावूनि दृष्टांन्त भक्ताला। रक्षितसे खंडोबा ।।७६ ।। असे तुझे लाडके श्वान। सदैव राखी तव चरण। भरवी तू तया वदन। बापू बापू म्हणौनिया ।।७७ ।। मुक्या प्राण्याची करुणा। येतसे अनसूया जीवना। काय हवे कोण्या क्षणा। तेच तू मागतसे ।।७८।। जाणितसे अंतरंग। यथामती यथासांग। पशुपक्षीकृमी किटकी संग। लाभतसे सर्व स्थळी ।।७९ ।। खंडोबाची पावन कथा। परमेष्टीची ही गीता। भक्ता लाभे पावनता। ऐकता गाथा आईची ।।८० ।। माता तुझी लेक। पुष्पाताई काळे भाविक। तव नामाचा ध्यास एक। सदासर्वदा असे ।।८१ ।। ५.५.१९९३ ला। नागपूर वरुन येई दर्शनाला। माता तव जन्मोत्सवाला। श्रद्धापुष्प अर्पावया ।।८२ ।। जाणूनि भक्ताचे मन। दर्शन देई करुणाघन। पूर्व सुकृताचे पुण्य। तेचि फळा येतसे ।।८३ ।। जन्मोत्सवाची पर्वणी। भक्त आले दशदिशातूनि। दर्शन घेई दूरवरुनि। अनसूया मातेचे ।।८४ ।। होवूनि खिन्न दर्शनी। न पूजता येई चरणी। काय करावे जननी। विचार मनी करितसे ।।८५ ।। मातेचे करुनि नामस्मरण। होई निद्रेच्या आधीन। अचानक येई श्वान। शेजारी झोपावया ।।८६ ।। खरुज होती कुत्र्याला। म्हणून दूर केले त्याला। दोन दिवस दृष्टांत घडला। शेजारी येवूनिया ।।८७ ।। तिसऱ्या दिनी पुन्हा आला। हाकलून लावले त्याला। मंडपात आणून सोडला। त्रास देई म्हणौनि ।।८८ ।। तोच घडला चमत्कार। कुत्रा न दिसे दूरवर। गायब झाला सत्वर। कोठे गेला





कळेना ।।८९ ।। त्याच जागी माता दिसली। एकाएकी प्रगट झाली। दर्शन देवूनि गुप्त झाली। कामना पूर्ण करुनि ।।९० ।। पुष्पाताईचे भाग्य थोर। दर्शन देई करुणाकर। श्वान बनूनि धरतीवर। आशीर्वाद देतसे ।।९१ ।। म्हणून धरितसे चरण। करी आसवांनी पादपूजन। आई तव लेकरु अज्ञान। क्षमा करी अपराध ।।९२ ।। आई म्हणाली लेकीला। "काऊन मारलं बापूला"। "एका रंगाच मारावं त्याला। कायले आता बोंबलत" ।।९३ ।। जळी स्थळी काष्ठीपाषाणी। तूच असे अनसूया भवानी। श्वान बनूनि जाई दर्शनी। अगाध लीला मातेची ।।९४ ।। म्हणौनि देवीदेवता येई। माता तव आश्रय घेई। दत्त दिगंबर तव ठायी। गुणगाण करितसे ।।९५ ।। नाही ओळखली लीला। आलो तव चरणाला। बुद्धी दे मम पतिताला। सर्वज्ञ तू असे ।।९६ ।। भक्तासाठी बनूनि श्वान। तूच सांगे तव निधान। जे जे भेटे ते ते मान। भगवंत ठायी ठायी ।।९७ ।। खरजूल्या डोमा नागो म्हणूनि। हाका मारी तू जननी। लोळतसे तव चरणी। कृपापात्र म्हणूनिया ।।९८ ।। वदली तू कुत्र्याला। शेपूट धरुन हलवी त्याला। माह्या बापूच सार जग। कौतूक पाहील म्हणौनि ।।९९ ।। माते तू होता ब्रह्मलीन। अतिशोक करी श्वान। अश्रूने भिजले लोचन। आई तुझ्या बापूचे ।।१०० ।। तू देह सोडला म्हणूनि। शोक करी कुत्रे धामी। दूरवर एकांतात बसूनि। रडती ठायी ठायी ।।१०१ ।। सदैव करी धडपड। खाण्यासाठी लडीवाड। आज त्यांचा असे पाड। मंदिराबाहेरी ।।१०२ ।। या तीन दिवसात। एकही कुत्रा न आला मंदिरात। न व्हावा तुला त्रास आत। म्हणून पडून राहतसे ।।१०३ ।। न हाकलावे लागले आता। गर्दी मंदिरात असता। त्रास न होई भक्ता। या कुत्र्यापासूनिया ।।१०४ ।। अश्रूला न आवर। शोक करी अनावर। तुझा बापू असे थोर। जगदम्बा अनसूया ।।१०५ ।। असा हा श्वानमहिमा। उद्धारी जनजीवना। सार्थ करी तव नामा। अमरता देवूनि ।।१०६ ।। वंदन माझे तयाला। तुझ्या लाडक्या

बापूला। पूर्ण करी कवनाला। जय खंडोबा राया ॥१०७॥ एरंडा तलावाचा बांध। फुटला माते अचानक। तूच रक्षिले तव पुत। श्री क्षेत्री पारडसिंगा ॥१०८॥ पाणशेत होण्यापासून। वाचविले पारडसिंगा ग्राम। पुढील अध्यायी करा श्रवण। प्रकोप निसर्गाचा ॥१०९॥ इति श्रीपरमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। नवमोऽध्याय सम्पूर्ण ॥११०॥ श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती ॥ शांती ॥।

**॥ ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ॥**



## अध्याय १०

जुन्या मठात बसून भक्तांचा उद्धार करतांना आई अनसूयेच्या विविध मुद्रा



# श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः



जय जय माँ भवानी। अनसूया जगत्जननी। आलो मी तव चरणी। कृपा तुझी म्हणौनिया ।।१ ।। कृपा करी लेकरी। अज्ञानी दासावरी। तव नामाची शिदोरी। सेवू दे सर्वदा ।।२ ।। कथितो आता वृतान्त। वंदूनिया भगवंत। निसर्गावर करी मात। माय माझी अनसूया।।३ ।। पारडसिंगा नगरीला। वाचवि भक्तवत्सला। कैसी दाविली लीला। ऐकून घ्या सूजनहो ।।४ ।। गावाच्या दक्षिण दिशेला। एरंडा तलाव बांधला। अडवी जीवना नदीला। शेतभात पिकतसे ।।५ ।। येरंडा तलावाचे पाणी। पिकवी शेती किसानी। वाहे जीवना नदी ग्रामी। उत्तरवाहिनी बनूनि ।।६ ।। याच एरंडा तलावाने। झाले असते गाव सुने। परी वाचले आईकृपेने। स्मशान होण्यापासूनि ।।७ ।। पाऊस आला अतोनात। न थांबतसे दिनरात। तुडूंब पाणी तलावात। भरुनि वाहतसे ।।८ ।। होता मातीचा बंधारा। पाणी वाही भरभरा। कैसे होई परमेश्वरा। जन करती विचार ।।९ ।। सर्व लोक पाहून येती। बांध फुटण्याची वाटे भीती। एस. डी. ओ. कलेक्टरा सांगती। भीषणता तलावाची ।।१० ।। आमदार अधिकारी येती। तलावाची स्थिती पाहती। तेव्हा ते आदेश देती। गाव खाली करण्याचा ।।११ ।। घरची मंडळी निघून गेली। घर करुन देवाच्या हवाली। टेकडीवर आश्रया आली। कोणी गेले बाहेर गावी ।।१२ ।। पावसाने थैमान मांडले। भीतीचे सावट दाटले। कोण तारी नगरीले। पाणशेत होण्यापासूनि ।।१३ ।। करुनि मातेचा धावा। म्हणे वाचवी तू गावा। समर्थ असे तूचि देवा। विनवितसे परोपरी ।।१४ ।। माता होती मंदिरी। लोक गेले गावाबाहेरी। जाणतसे सर्व अंतरी। एके ठायी बैसूनि ।।१५ ।। आग्रह करती मातेला। चलावे बाहेर आश्रयाला। जीवनेला पूर आला।

नाश करील सर्वांचा ॥१६॥ परी न माता गेली बाहेरी। बसून राहिली मंदिरी। काही भक्त असे शेजारी। माता तव मंदिरात ॥१७॥ जेव्हा पावसाचा वाढला जोर। एकाएकी गेली तू नदीवर। नदीला होता महापूर। पाणीच पाणी चोहीकडे ॥१८॥ पाय टाकूनि बसली पूरात। वर पाहूनि स्मरे मनात। अधिकाऱ्याचा घेवूनि टोप। भिरकाविला नदीत ॥१९॥ बंद कर आता येणं। खूप ऐकलं तुझ गाणं। आज्ञा करी तू वरुण। पाणी दूरवर फेकूनि ॥२०॥ पाऊस बंद झाला एकाएकी। टळली गावाची आपत्ती। बांध मग दुरुस्त करती। निर्धोक होवूनिया ॥२१॥ बंद नसते झाले पाणी। गाव गेले असते वाहूनि। बांध फुटला असता क्षणी। परी वाचवि तू आई ॥२२॥ ऐसे हे मातेचे महिमान। जाणती पारडसिंगा जन। म्हणून गाती अनसूया गाण। श्रद्धाभाव अर्पूनिया ॥२३॥ श्रोते हो तुम्ही सुज्ञ। मी तर असे अनभिज्ञ। आरंभिला वाक्यज्ञ। आई तव कृपेने ॥२४॥ आनंदराव भक्ते सेवक। सालस सात्विक भाविक। रामजी पाटलाचा लेक। बंधू तुझा सेवाभावी ॥२५॥ माता तू असे विदेही। आप्त स्वकियांची जाण नाही। सर्वत्र समभाव पाही। द्वैत दूर करुनि ॥२६॥ सम्पूर्ण विश्व तुझे घर। तू एके ठायी स्थिर। परी फिरुन येई चराचर। मनोवेगे माझी माता ॥२७॥ माता पिता बंधू सखा। परी असे तुला पारखा। प्रत्येक जण वाटे सारखा। महाशक्ती मातेला ॥२८॥ परी जे भजे ज्या भावे। फळ त्यांना तैसे पावे। भावभक्ती जया ठावे। कृपा करी तयावरी ॥२९॥ माता तव मंदिरी। आनंदराव असे पुजारी। करितसे तुझी चाकरी। गावातील मठात ॥३०॥ एकदा चोर आला। मंदिरात चोरी करण्याला। परी तेथेच झोपी गेला। पलंगाखाली मातेच्या ॥३१॥ आनंदराव पाही चोराला। कुलूप लावी दाराला। पकडून दिले त्याला। सर्वासमक्ष तूच माते ॥३२॥ जर झाली असती चोरी। आळ येता सेवकावरी। परी तूच रक्षा करी। चोराच्या चोरीपासूनि ॥३३॥ दानपेटी गेली चोरी।






तीही आणिली मंदिरी। भक्ताची रक्षा करी। वेळोवेळी धावूनिया ॥३४॥ सेवा सहकारीचे अध्यक्ष। होते आनंदराव समक्ष। बाविस हजाराचे भक्ष। आळ येई तयावरी ॥३५॥ मातेची विनवणी केली। म्हणे माता तूच वाली। मी अनाथ हाती झोळी। वाचवि संकटातूनि ॥३६॥ कचेरीत केस गेली। आई तूच वकिली केली। केस जिंकून दिली। आनंदराव भक्तेला ॥३७॥ आई तुझी लीला। आली भक्ते कुटूम्बाला। भजितसे चरणाला। भक्तिभाव ठेवूनि ॥३८॥ हातपाय लुले पांगळे। म्हणून खाटेला खिळले। परी तूच तया रक्षिले। दुर्धर व्याधितूनि ॥३९॥ हीच असे अंतिम अवस्था। म्हणून आर्जवि भागवता। परी तूच रक्षिले माता। अभय देवूनिया ॥४०॥ खापरीचे बाबासाहेब केने। भजती भगवती मने। सुख समृद्धीचे देणे। लाभे तव कृपेने ॥४१॥ शेताची रखवाली करी। बोरंगातून जाणे घरी। भीती वाटतसे अंतरी। धावा करी मातेचा ॥४२॥ मातेने दर्शन दिले। भीतीचे भूत पळाले। बोरांगणी उभे ठाकले। परब्रह्म रात्रीला ॥४३॥ शेती पिकवी मळा फुलला। रक्षितसे तव बाळाला। रामायणाच्या समाप्तीला। घरी तू जातसे ॥४४॥ करुनि पूजा अर्चा दान। गातसे अनसूया गाण। चरणाची ही आस जाण। भक्तिभावे भजनाची ॥४५॥ आर्वीचे नामदेवराव अमळकर। आईला भजी खरोखर। बालपणापासूनि वरचेवर। पारडसिंगा येतसे ॥४६॥ जाणिला आईचा महिमा। सदोदित भाकी करुणा। तूच माझी दयाघना। महासती मायावती ॥४७॥ नामदेवराव कॅन्सर ने त्रस्त। दुर्धर रोग करी फस्त। ईलाज करी अहोरात। औषध घेवूनि नानापरी ॥४८॥ वैद्यांनी ईलाज केला। परी रोग बरा न झाला। मृत्यू दिसे घडीला। हात टेकले सर्वांनी ॥४९॥ मग आले पारडसिंग्याला। महासतीच्या दर्शनाला। भार मातेवर टाकला। तार किंवा मार म्हणूनि ॥५०॥ विष्टा लावूनि अंगासी। सेविले महाप्रसादासी। महाशक्तीची औषधी। घेतसे वारंवार ॥५१॥ एकाएकी चमत्कार घडला।

विष्टेचा अनुभव आला। रोगमुक्त केले भक्ताला। कृपासिंधू मातेने ॥५२॥ डॉक्टर निधान करिती। अघटीत हे कैसे घडती। न दिसे लक्षण कॅन्सरप्रती। पूर्ण बरा होतसे ॥५३॥ अशी तुझी अद्‌भूत लीला। दाविली तू नामदेवरावला। जीवनदान देई मुलाला। आदीशक्ती आदीमाया ॥५४॥ द्विमासाचा दिनेश बाळ। समीप येई त्याचा काळ। औषधानेही न मिळे फळ। काय करावे कळेना ॥५५॥ चरणी आईच्या ठेविले। त्याला तू जीवनदान दिले। सार्थ करी नामाले। जीवनदायी म्हणूनि ॥५६॥ कापडात गुंडाळलं मुलाला। पाळणा आईने म्हटला। "मेले माणसच दिसते लेकाला"। स्वयं माता बोलतसे ॥५७॥ आईने आज्ञा केली। औषधी बंद झाली। दिनेशला छाया मिळाली। माता तव कृपेची ॥५८॥ असे कितीतरी चमत्कार। दूर करी अज्ञान तिमीर। विदेही अनसूया दिगंबर। आर्वी मुक्कामी जावूनि ॥५९॥ यवतमाळचे डॉ. बी. एस. हिरुडकर। भावभक्ती हाच आचार। करितसे सदैव येरझार। श्रीक्षेत्री येवूनिया ॥६०॥ वर्धेच्या बानाबाकोडेंनी। पाठविले माता तव चरणी। म्हणून मिळतसे पर्वणी। पादपूजा करण्याची ॥६१॥ गाडी होती जुनाट। हॅन्डल मारुनि करी सुरुवात। परी बिघाड झाला त्यात। श्रीक्षेत्री येतांना ॥६२॥ आई तू बसता गाडीत। प्रचिती आली त्वरीत। हॅन्डलविना गाडी क्षणात। सुरु तूचि करितसे ॥६३॥ कोंढाळी तळेगाव मार्गात। ट्रक आला वेगात। सापडले एका पूलात। ब्रेक न लागी गाडीचे ॥६४॥ मिटले लोचन त्याक्षणी। म्हणे वाचव तू भवानी। गेली माता तू धावूनि। रक्षावया लेकरा ॥६५॥ मरता मरता वाचला। आई बोले बाळाला। फुल मारुनि अमोलला। आशीर्वाद देतसे ॥६६॥ त्याच वेळी हेला मेला। डॉ. भोंगाडे सांगी त्याला। आले दोघे दर्शनाला। श्रद्धाभाव ठेवूनिया ॥६७॥ 'हेल्यावरुन गेलं ना'। सांगे तू दोघांना। देई जीवनदान त्यांना। माय माझी अनसूया ॥६८॥ डॉ. भोंगाडे म्हणती। कैसे माहीत भगवती।

हेल्याची ही गती। वर्तितसे मंदिरी ॥६९॥ गेली तू वास्तूपुजनी। यवतमाळ मुक्कामी। चिभीने चाटी धरणी। सुख शांती प्राप्तीसी ॥७०॥ नारळ ठेवि दवाखान्यात। तिथेच आहे ते स्थित। दूर्धर रोग होई दुरुस्त। माता तव कृपेने ॥७१॥ म्हणून येई माता दर्शनी। डॉ. हिरुडकर क्षणोक्षणी। सदैव गाती तव गाणी। दृढभाव धरुनिया ॥७२॥ याच ठायी गीता जाजूला। दृष्टांत तू दिला। दोन बाया जाई घराला। शंभर रुपये मागितसे ॥७३॥ पारडसिंगा जाण्यासाठी। पैसे नाहीत मम गाठी। बाया लागी गीतापाठी। आग्रह करी पैशाचा ॥७४॥ गीताने पैसे दिले। सर्व तिला चिडवू लागले। म्हणे कोण हे कुठले। गेले शंभर रुपये तुझे ॥७५॥ गीता पारडसिंगा येई। माताचरणी शिष नमवि। "शंभर रुपये आणले का बाई"। म्हणून तू विचारितसे ॥७६॥ मी तुझ्या घरी आली। शंभर रुपयाची मागणी केली। आठवण करुन दिली। सर्वसाक्षी मातेने ॥७७॥ मांढळे सोन्याचांदीचे व्यापारी। राहतसे याच नगरी। करितसे पारडसिंगा वारी। सेवा चाकरी करावया ॥७८॥ एकदा गेले नागपूरला। सोन्या चांदीच्या व्यापाराला। इतवारीत विकले चांदीला। तीस हजार रुपयात ॥७९॥ पैसे ठेविले पिशवीत। परत जाण्या बसले ऑटोत। गाडीत गेले घाईगर्दीत। यवतमाळ जाण्यासी ॥८०॥ त्याक्षणी आठवण झाली। रिक्षात बॅग राहली। म्हणून आले खाली। रिक्षा शोधावया ॥८१॥ माता तू रक्षण करी। पैसे गेले चोरी। कैसा जाईल घरी। धाव पाव माझे आई ॥८२॥ आई अनसूयेला आळवित। गेले सराफा ओळीत। पाहतसे ऑटोचालकास। परी न दिसे नयनी ॥८३॥ खिन्न होवूनि बसले। नामस्मरण सुरु केले। म्हणे आई पैसे गेले। कैसे हो[illegible] संसाराचे ॥८४॥ एवढ्यात चमत्कार घडला। ऑटोचालक तथ आला। म्हणे मी शोधतो तुम्हाला। पिशवी देण्यासी ॥८५॥ साहेब, तुम्ही गेले गाडीत। बग दिसल ऑटोत। तुम्हाला आलो पाहत। ईथे याल म्हणूनि ॥८६॥ [illegible] वाहकास बुद्धी दिली।

वापस करी पैशाची थैली। आई तूच असे वाली। कैवल्यधाम भक्ताचे ।।८७ ।। तूच पैसे मिळवून दिले। स्मृती देवूनि चालकाले। गोर गरिबांची रखवाले। माय माझी असे ।।८८ ।। किती गाऊ गुणगाण। मती खुंटते माझी जाण। भक्तांचे तू मोक्षधाम। जगत्जननी अनसूया ।।८९ ।। तेथून गेली माहूरला। रेणूकां माता दर्शनाला। तूच जाणे तुझी कला। गडावर जावूनिया ।।९० ।। माहूरवाशिनी रेणूका देवी। नमन माझे तव पायी। दिशा मज तू दाखवि। गुणगौरव करावया ।।९१ ।। हळदी कुंकवाचे होते ढीग। तू उचली मूठभर हळद। दुकानदार धरुनि हात। हळद काढून घेतसे ।।९२ ।। आई, न जाणे तुझी मात। पुजारी असे अज्ञात। म्हणून धरी तुझा हात। कर्मगती टळेना ।।९३ ।। जेथे तू हस्त लावी। दुप्पट दाम तया होई। परी न जाणे ही नवलाई। अज्ञानी जो असे ।।९४ ।। प्रेमस्वरुप तू असे। वात्सल्य तेथे वसे। समभाव सर्वत्र दिसे। पापी हो या पतीत ।।९५ ।। एक मासानंतर। आले तेथे प्रत्यंतर। दरोडा टाकी दरोडेखोर। रेणूका माता मंदिरी ।।९६ ।। सोन चांदी चोरुन नेती। दुकानदार तया अडविती। कर तोचि छाटती। शिक्षा मिळे तयाला ।।९७ ।। याच उजव्या कराने। मातेचा हस्त धरला त्याने। दिली शिक्षा दरोडेखोराने। कर्मगती भोगतसे ।।९८ ।। येवूनि माता तव मंदिरी। क्षमा मागी परोपरी। नाही जाणली तुझी थोरी। म्हणून अपराध घडतसे ।।९९ ।। आई तूच असे रेणूकामाता। कृपा करी पतिता। मी तव शरणागता। अज्ञानी बाळ तुझा ।।१०० ।। आईने आशीर्वाद दिला। दुःख ना शिवेल तुला। काळाचा हा बोलबाला। परतावूनि लावितसे ।।१०१ ।। आई अशी कृपावंत। होई जो शरणागत। पापी हो या पतीत। कृपापात्र होतसे ।।१०२ ।। माहूरच्या तू गडी फिरसी। देवीदेवता नयनी बघसी। वामनराव तुज पूशी। माँ तुझ घर दाखव ना ।।१०३ ।। जाणूनि सेवकाची भावना। दर्शवि अनसूया मंदिर जना। म्हणे हेच घर माझे जाणा। म्हणूनि ओळख देतसे ।।१०४ ।।




मंदिरी जावूनि केले पूजन। तूच अमुचे अनसूया धाम। पावन केले पारडसिंगा ग्राम। नमन माझे तवचरणी ।।१०५ ।। नरसिंहराव शिंदे महाराज। अति भाविक आध्यात्मिक। माहूर गडी गेले दर्शनास। दत्तदिगंबराच्या ।।१०६ ।। सरळ गेले दत्त मंदिरा। न घेती दर्शन ईतरा। तोच दृष्टांन्त दिला खरा। आई अनसूयेने ।।१०७ ।। नरसिंह महाराज क्षेत्री आले। मातेचे दर्शन घेतले। तनमन कृतार्थ केले। पारडसिंगा येवूनि ।।१०८ ।। तू तर सरळ वर गेला। परी मध्ये मला न भेटला। माता वदली महाराजाला। स्मरण करुनिया ।।१०९ ।। नरसिंहराव जाणे मनोमन। सतयुगाची अनसूया जाण। पावन केले माहूर धाम। जगन्माता अनसूयेने ।।११० ।। म्हणून पारडसिंगा येती। मातेची महती गाती। भजन पूजन ध्यान करिती। अर्पूनिया श्रद्धाभाव ।११९ ।। लहानुजी बाबाचे भक्त। उत्तमराव वनवे नागपूरात। जीवनात होते त्रस्त। म्हणून भजती बाबांना ।।११२ ।। लहानुजी बाबा सांगती। शरण जा अनसूया सती। तिच्याच कृपे मिळेल गती। सुखी संसाराची ।।११३ ।। सहा मुलीचा संसार। कसा करावा पार। टाकिला भार मातेवर। श्रीक्षेत्री येवूनिया ।।११४ ।। दृढश्रध्दा मातेचरणी। लहानुजीची आज्ञा मनी। अनुदिन पुजी भवानी। गुरु आज्ञा म्हणूनि ।।११५ ।। आई तू कृपा केली। समृद्धी घरा आली। मुलांची नावे सांगितली। लग्न लावूनि देतसे ।।११६ ।। सहा मुलीच्या लग्नाला। वर पाहण्या कुठे न गेला। परी मुलेच येई घराला। पसंत करी कन्येसी ।।११७ ।। लग्नाचा हा महाव्याप। दूर करी आपोआप। तूच सारिला भवताप। वेळोवेळी धावूनिया ।।११८ ।। मरणातून वाचविले त्याला। महिमा माते तुझा कळला। कार्यालयी कामाला। तूच गती देतसे ।।११९ ।। आई तू सर्वत्र असे। गुण तुझे गाऊ कसे। काया वाचा भजितसे। जय जय अनसूया ।।१२० ।। नागपूरचे एक सद्भक्त। मधुकरराव कोकाटे नामवत। भजती माते दिनरात। अढळ भाव धरुनि ।।१२१ ।। ग्रासले दुर्धर रोगाने। त्रस्त असे

स्वजीवणे। उपचार करी नानापरिने। परी न घडे आचार ।।१२२ ।। काय करावे कळेना। व्याधिची होय वेदना। मरणप्राय असे यातना। दु:ख सागरी लोळतसे ।।१२३ ।। दर्शनाचा योग आला। अनसूया भक्तवत्सला। कृपापरिमळ दरवळला। महाशक्ती मातेचा ।।१२४ ।। येवू लागले पारडसिंगा। भजण्या तुला गंगा। तनमनाने स्वअंगा। गुणगाऊ नी तुझेचि ।।१२५ ।। भगवती अनसूया माता। तूच माझी असे त्राता। दूर करी दु:ख विधाता। अभय देवूनिया ।।१२६ ।। तीर्थ उदीचा उपचार। करितसे भक्त मधुकर। सेवूनिया वारंवार। नाम घेई मातेचे ।।१२७ ।। औषध घेणे बंद केले। दृढश्रद्धेने चरण धरिले। भक्ती पुष्प तव वाहिले। भार टाकूनिया ।।१२८ ।। जीवनप्रवाह बदलला। तीर्थ उदीने गुण आला। भगवतीचा प्रसाद मिळाला। दूर होई रोगराई ।।१२९ ।। आई तव कृपेने। सुरु झाले हिंडणे फिरणे। दुर्धर रोगाचे रडगाणे। दूर करी तात्काळ ।।१३० ।। माते तू प्रेरणा दिली। मंदिराची उभारणी केली। विठ्ठल रुखमीणी। स्थापिली। नागपूरला स्वघरी ।।१३१ ।। तूच माय तूच तात। विठ्ठल रुखमीणी एकजात। तवस्वरुपाची एकज्योत। अखंड चेतवी दारी ।।१३२ ।। चातुर्मासी घेई व्रत। पुजापाठाचा अखंड स्त्रोत। तव प्रेरणेने भागवत। चालतसे भक्तांघरी ।।१३३ ।। चातुर्मासाची सांगता। करी अनसूया माता। जावूनि घरी तव पुता। कृपादान देतसे ।।१३४ ।। आई तू येता घरी। दिवाळी सण साजरा करी। महाप्रसाद देई लेकरी। स्वहस्ते भगवती ।।१३५ ।। करितसे अन्नदान। करुनि अनसूया चिंतन। सदैव धरी तव चरण। श्री क्षेत्री येवूनिया ।।१३६ ।। नाही घडले दर्शन। काळासमान भासे क्षण। तूच पूर्ण करी न्यून। सुखसंपत्ती देवूनि ।।१३७ ।। जाहले पूर्ण समाधान। न सोडवे तव चरण। जन्मोजन्मी हेच मागणं। कृपासिंधू अनसूया ।।१३८ ।। मधुकर रमा उभयता। भजती तव अनंता। तूच सांभाळी पुता। कृपादृष्टी ठेवूनिया ।।१३९ ।। ॲडव्होकेट कृष्णराव पांडे। नागपूरचे वकील बडे। परी असाध्य रोग पछाडे। उपचार करी बालपणी ।।१४० ।। झाले त्यांचे ऑपरेशन।





फासळ्या काढी पूर्ण। डावी भूजा होई विदीर्ण। उचलू न शके काही ।।१४१ ।। आई तू नागपूरला गेली। पांडे घरी गाडी आली। गाडीतून तू उतरली। बसली त्यांच्या कडेवर ।।१४२ ।। डाव्या कडेवर तुला घेवोनि। आणती तुज स्वसदनी। विधीवत पूजा अर्चा करुनि। भावभक्ती अर्पितसे ।।१४३ ।। कृष्णराव विचार करी। उचलता न ये तिळभरी। कैसे आणिले कडेवरी। आई अनसूयेस ।।१४४ ।। फुलासमान माता वाटली। काही न ईजा झाली। दु:खहरण करी माऊली। कडेवर बसूनिया ।।१४५ ।। डावी भुजा होई सुदृढ। कामे करी सर्व नेक। भगवतीस मारिता हाक। दु:ख दूर होतसे ।।१४६ ।। काटोलचे भगवानजी राऊत। आई अनसूया तव पुत। गाण तुझेचि सदैव गात। तापहारिनी म्हणौनी ।।१४७ ।। पाणी नव्हते विहिरीला। हाक मारी मातेला। तोच तू दृष्टान्त दिला। विहीर खोदण्यासी ।।१४८ ।। लागले भरपूर पाणी। चार एकर दिली भूमि। तव कृपेची वाखाननी। सुख लाभतसे दारी ।।१४९ ।। होते किराणा दुकान। बंद पडे काही कारण। दुजा करी कामधाम। म्हणौनि सांगितले ।।१५० ।। उपहारगृह सुरु केले। तव कृपेने माऊले। भरभराटी ते आले। तव आशीर्वाद म्हणूनि ।।१५१ ।। करी एकदा प्राशन। विषारी द्रव्य एंड्रिन। फेस भरवी वदन। हळहळती सर्वजन ।।१५२ ।। उपचार केला दवाखानी। परी आईची भक्तिवाणी। आळविती मनोमनी। आठवूनि तव माया ।।१५३ ।। मिळाले तया जीवदान। येतसे तव धाम। चरण भिजवी लोचन। तूच वाचवि म्हणौनि ।।१५४ ।। "माह्या रामाले कोण नेते"। उकंड्याची दशा पालटते। वदली माता तव बाळाते। आशीर्वाद देवूनि ।।१५५ ।। विचारी माता भगवानजीला। नाव काय बापाला। सांगतसे लहानूजी भला। सेवक त्याचा म्हणूनि ।।१५६ ।। परी माता तू वदली। पांडूरंग आहे म्हणाली। हेच नाव असे वडीली। जाण तू देतसे ।।१५७ ।। युवराज राऊतच्या मुलाला। तीन वर्षाच्या हरीष बाळाला। वाचविले तू

क्षणाला। धावत जावूनिया ॥१५८॥ मधुकरराव काळेच्या गाडीत। बसली होती अनसूया सत। जात होती नारायणपूरात। भक्तासवे मंदिरी ॥१५९॥ तोच हरीष आडवा आला। गाडीची ठोस लागली त्याला। दूर फेकले लेकराला। अश्रू ढाळी मातापिता ॥१६०॥ लागले असते बाळाला। अपंग असता तो झाला। कैसे घडे ही कला। माते तव समक्ष ॥१६१॥ क्षणात उचली त्याला। टाकी माता चरणाला। म्हणे तूच दे हवाला। जीवनदान देवूनि ॥१६२॥ नारळाची बूचि तू काढली। बाळांवरुन फिरविली। दूर ती फेकूनि दिली। 'बला टळली' म्हणतसे ॥१६३॥ नंतर नेले त्याच गाडीत। आई तव मंदिरात। पाहतसे अपुला पुत। कोठे लागले म्हणूनि ॥१६४॥ परी न काही झाले त्याला। ईजा न होई तनाला। सुरक्षित तो राहिला। तव कृपा म्हणूनिया ॥१६५॥ फेकूनि त्याला दूर। रेघ न पडे अंगावर। तवकृपेची ही धार। लाभतसे लेकरा ॥१६६॥ शरिरी जर्जर। देवीदास राऊत गंभीर। दवाखानी उपचार। करी दुर्धर व्याधिचा ॥१६७॥ लागते बहू दिन। न दुरुस्त होई तन। परी तव कृपे जाण। तंदुरुस्त होतसे ॥१६८॥ एक सप्ताहाचा अवधी। बरा करी दयानिधी। अल्पसमयी येई शुद्धी। तव कृपे भगवती ॥१६९॥ सर्वावर प्रीती भारी। भगवान राऊतच्या लेकरी। करितसे चरण चाकरी। लेक लेकी सुना सवे ॥१७०॥ गेली संत दर्शना। माता निंभी ग्रामा। जीवदान देई स्थाना। मृत रामी गाईला ॥१७१॥ पुढील अध्यायी श्रवण। करा संजीवन दान। आलो माते शरण। लोभ असाच असावा ॥१७२॥ इतिश्री परमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। दशमोऽध्याय सम्पूर्ण ॥१७३॥ श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती॥ शांती॥।

**॥ ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ॥**




## अध्याय ११

# विदेही अनसूया माता बाहेर गावी जावून भक्तांचा उद्धार करु लागली.



## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

जय जय अम्बे माता। तूच माझी त्राता। नाही कोणी परता। तुजविण भगवती ।।१ ।। तूच माता दु:खहारी। पाप ताप दूर करी। चरण सेवेची चाकरी। घडू दे सर्वदा ।।२ ।। तूच जीवनदायिनी। सर्वाच्या अंतर्यामी। म्हणून नाम संजीवनी। सार्थ तू करितसे ।।३ ।। मोर्शी तालुक्का निंभी गाव। संतकृपेचा होता ठाव। कथाकिर्तनी भक्ती भाव। धरितसे सदा सज्जन ।।४ ।। संताचा मेळावा भरला। भक्तिरस ओथंबला। माता गेली निंभीला। संत मेळाव्यासी ।।५ ।। केले अर्चन पूजन। भगवतीचे श्रद्धापूर्ण। मग निघे गावातून। पालखी मातेची ।।६ ।। माता पालखीत बसली। मुख्य मार्गाने निघाली। नरनारी उद्धरली। दर्शन देवूनिया ।।७ ।। तेथे होता एक पाटील। पालखी आली घराजवळ। तो शोकमग्न अविचल। उभा असे दारासी ।।८ ।। होत्या त्याच्या तीन गाई। सर्पदंश एकीस होई। मृत्यू अवचित येई। रामी गाईला ।।९ ।। काय करावा विचार। न्यावे हिला सत्वर। करावा हाचि आचार। म्हणून विचार करितसे ।।१० ।। तेधवा पालखी आली। अनसूया जगतवल्ली। पाटलाने धाव घेतली। माता चरणासी ।।११ ।। रामी गाय प्राण प्रिय। वाचवी अनसूया माय। धरितसे तव पाय। कृपा करी मजवरी ।।१२ ।। मातेने नजर रोखली। गाईवर स्थिर केली। पाणी आण म्हणाली। तृषा शमविण्यासी ।।१३ ।। शिंपले पाणी गाईवर। काही फेकी दूरवर। हस्त फिरवूनि पाठीवर। बसली येवूनि पालखीत ।।१४ ।। चमत्कार घडला तयेवेळी। हालचाल रामीची सुरु झाली। तात्काळ ती उठून बसली। हंबरडाही फोडतसे ।।१५ ।। ऐसा आईचा प्रताप। अभय देई मृतास। जीवंत करुनि तीस। अलिप्त होतसे ।।१६ ।। जीवीत केले रामीला। कळून आली लीला। तव नामाचा गजर केला।

गर्जना करुनिया ।।१७ ।। तू गेली भारसिंगीला । दृष्टांत तैसाचि घडला । केले तू जीवीत मृताला । अगाध लीला मातेची ।।१८ ।। नारसिंगीचा शेतकरी । बसूनि विचार करी । दुधाळू गाय मेली खरी । म्हणून अस्वस्थ होतसे ।।१९ ।। गाय जेव्हा मेली । शोककळा पसरली । तोच भवानी आली । मृत गायीजवळी ।।२० ।। मागितले त्याला पाणी । घेई अनसूया जननी । मग फेकी तेच पाणी । मृत गाईच्या अंगावर ।।२१ ।। पाण्याची बघा लीला । अमृत भेटे गाईला । झटकारले कानाला । उठून बसली त्वरीत ।।२२ ।। चाटू लागली ती पाय । पाहतसे अनसूया माय । हीच कृपेची असे ठेव । माता भगवतीच्या ।।२३ ।। ऐसी तू जीवनदायिनी । विश्वविजयी विश्वमोहिनी । आले जे तव चरणी । कृतार्थ होतसे ।।२४ ।। नागपूरचे गंभीरदास अडागळे । माते तव चरणी आले । तया तू मास्टर बनविले । जगदीश बॅन्ड पार्टीचे ।।२५ ।। होती स्थिती दयनीय । न लागे कुठे ठाव । न कळे करावे काय । चिंतातुर असती ।।२६ ।। संत बळीरामबाबा सांगती । भूलोकी एकच शक्ती । तिच तारेल या जगती । महाशक्ती अनसूया ।।२७ ।। दाखविला मार्ग बाबांनी । आले आईच्या चरणी । श्रीक्षेत्री पारडसिंगा ग्रामी । दृढभाव धरुनि ।।२८।। सन एकोणविसशे त्र्याहत्तर साली । राखी पौर्णिमा गुरुवारी । अभेद कवच मिळे लेकरी । आई अनसूयेचे ।।२९ ।। गंभीरदास आले श्रीक्षेत्रास । घेवूनि सोबत चैतरामास । निसर्गाच्या तांडव नृत्यात । जुन्या मठी आईच्या ।।३० ।। श्रद्धाभावे पूजा करुनि । आळवि माता भवानि । आलो आई तवचरणी । दूर न करी लेकरा ।।३१ ।। दोन्ही पद समोर करी माता । "चांगला पीळ" म्हणे पुता । आज्ञा शिरसावंद्य होता । पाय चेपू लागतसे ।।३२ ।। विविध रुपे दिसती । वेगळी येई अनुभूति । चरण सेवेची महती । गातसे भक्त तुझा ।।३३ ।। एकच ईच्छा मनी होती । बॅन्ड मास्टर कर भगवती । अंतर्ज्ञानी माता जाणती । काय हवे भक्ताला ।।३४ ।। "जा चांगली कमाई कर न आण" वदली । साक्षात





अनसूया जगत्वल्ली । कमाईची गुरुकिल्ली मिळाली । माता तव आशीर्वादे ।।३५ ।। गंभीरदास चैतराम बाहेर आले । तव ते भूकेने व्याकूळ झाले । परी नव्हते पैसे गाठिले । क्षुधा शांत करण्यासी ।।३६ ।। घेतला एक वडा विकत । अर्धा अर्धा करी दोघात । जल प्राषूनि होई शांत । निघून जाई नागपूरा ।।३७ ।। आली तव शब्दाची प्रचिती । जगदीश बॅन्ड पार्टीची होई निर्मिती । बॅन्ड मास्टर बनवी भगवती । अक्षय दान देवूनि ।।३८ ।। जाणे होते शिर्डी पंढरपूर । प्रथम आले तव चरणावर । परवानगी घेवूनि सत्वर । जायचे मनी होते ।।३९ ।। डोके ठेवताच चरणावरी । वदली माता लेकरी । "कशाला जात पंढरपूरी । देव आहे तुझ्या घरी" ।।४० ।। वाढला बॅन्ड पार्टीचा लौकीक । कमाई होई अमाप । परी ग्रहण लागे एकाएक । अठरा कलावंत निघूनिया ।।४१ ।। स्वतंत्र व्यवसाय केला । आपात कली शिरला । शेवटी तुझा धावा केला । श्री क्षेत्री येवूनिया ।।४२ ।। चला तू तया म्हणाली । नारायणपूर सवे गेली । एकटक बघू लागली । कृपादृष्टी ठेवूनि ।।४३ ।। "झेंडा ऊँचा रहे हमारा" । म्हणं गाणं सांगे लेकरा । कृपादृष्टीचा हा फेरा । फेर धरुनि येतसे ।।४४ ।। प्रचिती शब्दा आली । पुन्हा पार्टी उभी झाली । नावलौकिकाची परमावली । मिळतसे तवकृपे ।।४५ ।। बापू होईल भविष्यवाणी । करतसे माँ भवानी । न चाले म्हणून सांगे जननी । दिव्यदृष्टी ठेवूनिया ।।४६ ।। शब्द खरा ठरला । मुलगा घरा आला । परी तो अपंग जन्मला । सत्यता कळे वचनाची ।।४७ ।। केला औषधोपचार । अपंगत्व होई पार । तव कृपे दूर विकार । सहा मासात होतसे ।।४८ ।। एकोणविसशे चौऱ्यान्नवचा आजार । त्रस्त करी गंभीरदास फार । अंत्यकाळीचा हा फेर । आला तव भक्ताघरी ।।४९ ।। पाहता तुला दवाखानी । उठून बसले तत्क्षणी । गेला आजार दूर पळूनि । माता तव कृपेने ।।५० ।। 'आण खावाले' तू वदली । मुरमुरे खाऊ लागली । "काय ओढत बसला होता रे म्हणाली । माह्या डोमाहुषार आहे म्हणूनि" ।।५१ ।। डॉक्टर पाहण्या आले ।

'व्हन तिकडे' म्हणून दूर केले। गंभीरदास पूर्ववत झाले। मरणासन्न अवस्थेतूनी ॥५२॥ जातीपातीचे न बंधन। सर्वाभूति सारखेपण। भक्ताची भक्ति मनोमन। तीच फळा येतसे ॥५३॥ रंकाचे राव केले। आई तू गंभीरदासले। म्हणौनि सदैव चरणाले। धरुनि राहतसे ॥५४॥ मरणासन्न अवस्थेतूनि। दोन वेळा वाचवि जननी। आगष्ट छान्नवला आणिबाणी। येतसे भक्ताघरी ॥५५॥ मरणकाळ समीप आला। जाणिव होई लेकाला। आठवि तव नामाला। अंतसमयी भगवती ॥५६॥ अकरा एक छान्नव बुधवारला। पाच च्या सायंसमयाला। भक्त देह त्यागूनि गेला। जय जय अनसूया म्हणूनि ॥५७॥ तुझी कृपा त्यावरी। अंत्यसमयी बरोबरी। सद्गती मिळतसे लेकरी। तुझीच छाया म्हणूनि ॥५८॥ असा तुझा लाडका भक्त। करी अमर तया जगात। तव कृपेचे हे पत्र। पावन प्रवेश द्वारी ॥५९॥ संतोषराव गोडे भाविक। पत्नी सिंधूताई सात्विक। वर्धेचे खासदार एक। भजतसे मातेला ॥६०॥ गोडे परिवार निघाला। नागपूर नगरी जायला। पन्नास हजार सोबतीला। खरेदी कराया लग्नाची ॥६१॥ वर्धेवरुन तीस मैलाच्या आत। गाडी बंद पडली अकस्मात। नव्हता कारागीर तांत्रिक। काय करावे कळेना ॥६२॥ सहा तास उलटून गेले। प्रयत्न करुन सर्व थकले। सर्वांना भीतीने ग्रासले। धावा करी मातेचा ॥६३॥ सिंधूताईच्या सवे असती। मातेच्या बांगड्या सोबती। त्याच त्यांचे रक्षण करिती। दुर्धर प्रसंगातूनि ॥६४॥ आईच्या बांगड्या काढूनि। इंजिनला स्पर्श करुनि। माता अनसूयेला स्मरुनि। धावा करितसे ॥६५॥ चालकाने चाबी फिरवली। गाडी आपोआप सुरु झाली। महिमा मातेची कळली। गोडे कुटूम्बाला ॥६६॥ डॉ. लक्ष्मणराव हेलोंडे। उबाळीचे रहीवाशी बडे। मातेचे गाई पवाडे। अनुदिन भजूनिया ॥६७॥ "गुरुमाऊली जयकिसना"। हाचि मंत्र दिला वदण्या। सर्व संकट निवारण्या। समर्थ तूचि असे ॥६८॥ म्हणौनि करी मंत्रोच्चार। तरण्यासी भवसागर।



कृपाकटाक्षाची धार। पूर्ण करी मनोरथ ॥६९॥ रामनामाचा उच्चार केला। वाल्याचा वाल्मिकी झाला। तैसाच गुरुमंत्र दिला। सुखसाधना म्हणूनि ॥७०॥ याच गुरुमंत्राची प्रचिती। आली लक्ष्मणरावाती। रक्षिती येवूनि अवचिती। समाज कंटकापासूनि ॥७१॥ समाजकंटक देई त्रास। म्हणौनि आले दर्शनास। अभय दिले तू मुलास। मार्गदर्शन करुनिया ॥७२॥ दुर्घटनेचा होता त्रास। सी. आय. डी. चा आला समंस। टाकिला भार तवचरणास। काय करावे म्हणौनि ॥७३॥ जाऊ नको माता वदली। लक्ष्मणरावास आज्ञा केली। परी आपोआप झाली। बोळवणी समंसाची ॥७४॥ समंस आला तसा गेला। महिमा तुझा कळला। वेळोवेळी रक्षी बाळाला। अभय देवूनिया ॥७५॥ स्वप्नाची हीच प्रचिती। दुर्घटना होण्याआधी। घाबरु नको म्हणती। वरदस्त ठेवूनिया ॥७६॥ तूच न्यायलयी जाई। न्याय निवाडा पाही। न्याय मिळवून देई। न्यायाधीश बनूनि ॥७७॥ चंद्रभागेला आला पूर। पाणी वाहते चौफेर। पाणी मारते उसळ्या। चंद्रभागेच्या साखळ्या ॥७८॥ आईचे हेचि वचन। सार्थ करी नामाभिधान। रक्षितसे तनमन। कृपादृष्टी ठेवूनि ॥७९॥ एकदा आले दर्शनासी। पौर्णिमेच्या पावन पर्वासी। तोच भविष्य वर्तवि त्यासी। त्रिकालज्ञानी अनसूया ॥८०॥ "बाबू गणाच्या गावा गेला। पंचतत्वाच्या गाडीत राघो झोपला"। स्वमुखे वदे भक्तवत्सला। दिव्यदृष्टी ठेवूनि ॥८१॥ सावंगीचे ताजभक्त। श्री सुखदेव महाराज प्रख्यात। विलीन झाले पंचतत्वात। सायंकाळी त्या दिनी ॥८२॥ तू जाणिले अंतर्ज्ञानी। महाराज गेले स्वधामी। पंचतत्वाचा पिंजरा सोडूनि। स्वगणाच्या गावाशी ॥८३॥ लक्ष्मणराव करी त्यांची भक्ती। म्हणून तू दिली प्रचिती। भविष्य सांगूनिया अंती। भैय्याजी महाराजांचे ॥८४॥ तूच जाणी परीपूर्ण। भूत भविष्य वर्तमान। देतसे भक्ता जाण। वेळोवेळी धावूनिया ॥८५॥ आई तुला काय द्यावे। देता घेता तूच असावे। भावपुष्प फक्त अर्पावे। चरण पूजूनिया ॥८६॥ ऐशी तुझी आई

माया। अज्ञ जना ज्ञान द्याया। तुझी ही अतर्क्य किमया। तूच दावितसे ॥८७॥ पुंडलिक धानोरकरला। दृष्टान्त मातेने दिला। स्वमुखे वदे त्याला। "आभाळ आलं आनं लपलं" ॥८८॥ तैसीच आली प्रचिती। येता पारडसिंगा क्षेत्री। पुत्ररत्नाची होई प्राप्ती। म्हणौनि आनंदितसे ॥८९॥ जैसा आला तैसा गेला। मुलगा तो मरण पावला। शोकसागरी तो बुडाला। न टिके हर्ष क्षणभरी ॥९०॥ हेचि असे मातावचन। पूर्विच केले होते कथन। म्हणूनि येती शरण। चित्तशुद्ध ठेवूनिया ॥९१॥ "एकनाथाच्या घरी। देव भरते पाणी" वदली माता भवानी। भक्त महिमाँ जाणूनि ॥९२॥ असता माता तुझी साथ। कसा राही मी अनाथ। पूर्ण करी मनोरथ। लोटांगण तव चरणी ॥९३॥ 'ऐशी आई तुझी माया। तारतसे जनजीवा'। जो येई तव पाया। कृपा त्यावरी होतसे ॥९४॥ रामभाऊ झळके दयाळू। पत्नी रमा मायाळू। काटोल सदनी कृपाळू। भजितसे श्रद्धाभावे ॥९५॥ जगदम्बेने किमया केली। सुखशांती घरा आली। रक्षितसे संकट कांली। महामाया अनसूया ॥९६॥ कन्या संगीता पडे बिमार। रक्त पडे वारंवार। न चाले काही उपचार। काय करावे कळेना ॥९७॥ करुनी मातेचा धावा। धावत यावे देवाधिदेवा। दृष्टांन्त घडे तेधवा। माता अनसूयेचा ॥९८॥ बारा वाजता येते घरी। कुठे ना जाई बाहेरी। भूतबाधा न होई लेकरी। आई तू सांगितसे ॥९९॥ माता वरुड गाडीत बसली। काटोल स्थानी उतरली। स्वयंरिक्षात जावून बसली। रस्ता दावी स्वहस्ते ॥१००॥ म्हणे चाल या बाजूला। रिक्षा मुकाट्याने निघाला। बाराच्या समयाला। येतसे झळके घरी ॥१०१॥ होता मातेचे आगमन। आनंदिती सर्वजन। वेळ न चुके येण्याची जाण। कृपानिधी माऊलीची ॥१०२॥ दारातूनच आवाज दिला। काय रांधल थे आण मला। तैसीच गेली पाक गृहाला। पाहतसे सर्व ठायी ॥१०३॥ उचलूनि पाण्याची घागर। पालथी केली मुलीवर। उठून बसे संगीता सत्वर। आई





तव आशीर्वादे ॥१०४॥ भूतभानामती दिसे। शंकाकुशंका मनी वसे। परी तू दूर करी पिसे। झळके घरी जावूनि ॥१०५॥ महालक्ष्मीच्या दिनी। माता येई सदनी। रुप दिसतसे लोचनी। साक्षात महालक्ष्मीचे ॥१०६॥ रमाबाईची पोटदु:खी। उपचाराला न बाधी। दूर करी करुणानिधी। आचार करुनिया ॥१०७॥ निलेशला मेंदूचा ज्वर। पडतसे येवूनि चक्कर। डोकेदु:खीने झाला जर्जर। अंधारी येतसे ॥१०८॥ घेतले बहू औषध। न होई फायदा किंचीत। मग आले मंदिरात। माता भगवतीच्या ॥१०९॥ दिवसभर तेथे झोपविले। आईचे चरण पूजिले। "तूरीचे हिरवे झाड वाळत चालले"। म्हणून तू सांगतसे ॥११०॥ आई तू फडा घेतला। पायाजवळ आपटला। तोच तू पूर्ण जाळला। कृपाकटाक्ष टाकूनि ॥१११॥ कडीस घे तू म्हणाली। रोगराई दूर गेली। कृपेची तव सावली। मिळतसे लेकाला ॥११२॥ घेतले तुला कडेवर। बाळाचे दाबले शिर। तोच दूर गेला काळ। माता तव कृपेने ॥११३॥ तयेवेळी श्रद्धा बसली। औषधी फेकून दिली। म्हणतसे हीच वल्ली। जगी तारावया ॥११४॥ असा हा कृपाप्रसाद। मिळाला झळके कुटुंम्बास। म्हणूनि येती चरणास। श्रीक्षेत्री पारडसिंगा ॥११५॥ नागपूरचे विजय मुदलियार। भक्त तुझे खरोखर। भजती करुणा कर। दृढभाव धरुनिया ॥११६॥ होते अस्वस्थ वडील। समीप आला काळ। सर्व रडती खळखळ। परी तू रक्षितसे ॥११७॥ आली माता तू घरी। हळद कुंकू फेकी शरिरी। अक्षदा तू तया मारी। यमयातना सोडविण्या ॥११८॥ भगवंत येता दारी। यम गेला सत्वरी। तव नामाची शिदोरी। सेवि भक्त तुझा ॥११९॥ भाविक राधाबाई मेंढी। भजी माता भगवती। जीवन देई अरुण पुत्राती। संकटी धावूनिया ॥१२०॥ बर्डीचौकात अडविले त्याला। शस्त्र मारी तनाला। परी न घाव झाला। शरिरावरी त्याच्या ॥१२१॥ राधाबाईस दिला दृष्टान्त। दर्शन देई भगवंत। बसली पाय चेपीत। अभय कवच देण्यासी ॥१२२॥

तोच तू रक्षिले त्यासी। घाव न  होई तनाशी। अभय दिले मुलाशी। अक्षय कवच देवूनिया ।।१२३।। भाविक उत्तमराव सोमकुवर। आईचा सेवक खरोखर। पुत्रवत माया त्यावर। माता तू करितसे ।।१२४।। राही पारडसिंगा धामात। भजी भगवंत दिनरात। दुकान पूजेचे थाटात। चालतसे मंदिरी ।।१२५।। गरिबीने होता व्यस्त। दैन्य दु:ख करी त्रस्त। आई अनसूयेचे एक व्रत। नित्यनेमे करितसे ।।१२६।। माते, तुझ्या दर्शनास। दुरुन येई कळमेश्वरास। पूजन करण्या घेती कुसुमास। पैसे देवूनि उत्तमला ।।१२७।। कार्यक्रमाची नव्हती माहिती। कैसे घडे हे अवचिती। तव कृपेने ही गती। मिळतसे तव पुता ।।१२८।। कमी पुष्पांचे अधिक पैसे। न मागता मिळतसे। दक्षिणा म्हणूनि देतसे। हजारोजन तयेवेळी ।।१२९।। मग थाटले दुकान मंदिरी। पूजा सहित्याची चाकरी। तेव्हापासून झाली खरी। भरभराट दुकानाची ।।१३०।। तुझ्याच कृपेचे देणे। धनधान्य घरी येणे। सुख सौख्याचे उणे। न भासे भक्तालागी ।।१३१।। ऐशी तुझी ममता। भक्ता मिळे भक्तिपरता। झिजवी काया जनहिता। माय माझी अनसूया ।।१३२।। जाई तू दूर प्रांती। गाई माते तव गीती। तूच माता त्रिजगती। ठायी ठायी दिसतसे ।।१३३।। पुढील अध्यायी कथा। कल्लूर ग्रामाची गीता। भावभक्तिची सरीता। एकचित्त ऐकावे ।।१३४।। इतिश्री परमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। एकादशोऽध्याय सम्पूर्ण ।।१३५।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती।। शांती ।।।

**।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।**





## अध्याय १२

# कल्लूर कथा

कल्लूर जातांना
वाटेतच आई
एका शेतामध्ये
भक्तासाठी
गेल्या



## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

वक्रतुण्ड गजानना। करितो तव याचना। बुद्धी देई कवणा। गाथा अनसूया आईची ।।१ ।। तुच असे अनसूया। ब्रम्हांडाची छाया। अवधूत दत्ताजी माया। लोटांगण तव चरणी ।।२ ।। वंदन माझे अत्रिकुमरा। साईबाबा रमावरा। वाहू दे अखंड झरा। अनसूया नामाचा ।।३ ।। कृपा करी साईनाथा। कथितसे अनसूया गाथा। साईमाई एकरुपता। ऐकून घ्या श्रोते हो ।।४ ।। आदिलाबाद जिल्ही कल्लूर। भक्तिरसाचे माहेर। नांदतसे स्वयं रमावर। कल्लूर ग्रामात ।।५ ।। दत्तव्यंकट साई समाज। परपिडा परहितार्थ काज। साई मंदिरी चढवी साज। निष्काम सेवा भावाचा ।।६ ।। आता ऐका कथा। भक्तिची पावन गाथा। आईची मूळ गीता। दत्तावधान देतसे ।।७ ।। महाराज प्रियंनाथ गुप्त। भक्तिची कास अहोरात्र। गाई साईनाथ गात्र। पवित्रधामी कल्लूरी ।।८ ।। भाविक महाराज प्रभाकर। निरागस साई कुमर। निष्काम सेवेचा चाकर। भजतसे साईनाथा ।।९ ।। नंदादीपाची प्रतिष्ठापना। करणे होती कल्लूर ग्रामा। साई मंदिरी साईचरणा। कशी करावी कळेना ।।१० ।। प्रभाकर गेले शिरडीला। आळविले साईनाथाला। आज्ञा करी पामराला। दास अज्ञानी असे ।।११ ।। कुणाचे हस्ते करावी प्रतिष्ठापना। जावून विचारी साई चरणा। न कळे आम्हा महिमा। मार्ग दावा आम्हांसी ।।१२ ।। बाबांचे चरण वंदून। पूज्य शिवनेसन स्वामीचे घेई दर्शन। मी पामर तुमचा अजान। जाणते करा मज ।।१३ ।। पूज्य शिवनेसन स्वामी। महानतम अंतर्ज्ञानी। जाणी भक्ता मनोमनी। तेज पुंज तपस्वी ।।१४ ।। स्वामीजीने दृष्टी फिरविली। श्रीक्षेत्री पारडसिंगा रोखली। जगतामधे एक वल्ली। नाम असे अनसूया ।।१५ ।। हेचि दत्ताचे मूळपीठ। साईबाबांचाही मठ। नांदतसे एकवट। श्रीक्षेत्री

पारडसिंगा ।।१६।। आई अनसूयेचा अधिकार। ब्रह्मांडाची करी फेर। जगतजीवनी धरणीधर। महाशक्ती महामाया ।।१७।। स्वामीजी सांगे प्रभाकरला। जावे घेवूनि अनसूयेला। नंदादीपाच्या प्रतिष्ठापनेला। साईधामी कल्लूरी ।।१८।। आज्ञा प्रमाण मानूनि। आले पारडसिंगा धामी। महाशक्तिच्या दर्शनी। एकोणविसशे ब्यांशी साली ।।१९।। करी मातेची विनवणी। चालावे कल्लूर ग्रामी। नंदादीपाच्या प्रतिष्ठापनी। भगवती अनसूया ।।२०।। आईची पूजा अर्चा केली। श्रद्धासुमने अर्पियली। तव नामाची महती कळली। वंदन माझे महामाया ।।२१।। प्रभाकर रंगले भजनी। महाशक्तिच्या चरणी। आसवांची ओवाळणी। भक्तिभावे करितसे ।।२२।। भक्ताची करुणा ऐकूनि। आई हर्षतसे मनी। जाणे होते कल्लूर धामी। आन्ध्र प्रदेशात ।।२३।। माता तू होकार दिला। जाण्यास साई क्षेत्राला। तूच जाणे तुझी कला। सर्व समर्थ तूचि असे ।।२४।। हर्षूनि मनी अंतरी। माता गेली कल्लूरी। भक्ताची कराया चाकरी। नंदादीप तेवूनिया ।।२५।। आई तू येणार म्हणूनि। भक्त येई दशदिशातूनि। ओढ लागे तव दर्शनी। आशीष घ्यावया ।।२६।। लाखो भक्त गोळा झाले। दोन्ही तरफा उभे राहिले। दर्शनाच्या ओढिने आले। अनवाणी पायाने ।।२७।। साईनामाची नामावली। परमेष्ठी गावी आली। जीवनाची पूर्तता झाली। दर्शन घेता मातेचे ।।२८।। प्रभाकरने घेतले आईला। लाखो भक्तांचा बोलबाला। मातेचा जयजयकार केला। गर्जना करुनिया ।।२९।। जय जय बोला अनसूया। आदीशक्ती आदीमाया। भक्तासाठी झिजवी काया। माय माऊली माझी ।।३०।। सूर्याने जीवन दिले। कमलाचे फुलणे झाले। तैसे दर्शनी घडले। कृतार्थ होई तन मन ।।३१।। तेजपुंज कांती पाहूनि। लोक येती दूरवरुनि। चरणी माथा टेकवूनि। पुण्य घेई पदराला ।।३२।। भक्तांना दर्शन देवूनि। मंदिरी गेली भवानी। दत्तजयंतीच्या दिनी। प्रतिष्ठापना करावया ।।३३।। होमहवनादि केला। पाहतसे






रमावराला। अखंड धुनी समयाला। चेतवी महाशक्ती ।।३४।। जाळण्या पाप ताप। धुनीचा हा प्रताप। दूर करी भवताप। नष्ट करुनि यातची ।।३५।। पेटवूनि नंदादीपाची ज्योत। फुलविला भक्तीचा स्त्रोत। शांत होती सर्व गात्र। भजता पूजता भगवती ।।३६।। स्वहस्ते केली प्रतिष्ठापना। माई तोषवि सर्व जना। नंदादीपाचा महिमा। गातसे भक्त तुझे ।।३७।। भक्तीची ज्योत चेतविली। कल्लूर ग्रामी शक्ती आली। भजनी पूजनी रंगली। देहभाव हरपूनिया ।।३८।। नंदादीपाला प्रदक्षिणा। जो घाली तनमना। पूर्ण होतसे कामना। माता तव कृपेने ।।३९।। धुनीही असे पावन। नारळ करी जो अर्पण। होतसे दु:ख हरण। पाप ताप जाळूनि ।।४०।। परी असावी भाव भक्ती। दृढश्रद्धा दृढशक्ती। तसीच होई पुण्य प्राप्ती। उद्धार करी जीवाचा ।।४१।। महाप्रसादाची किमया। दाविली तू अद्‌भूत माया। लक्षावधी येई घ्याया। कृपाप्रसाद मातेचा ।।४२।। पंक्तिवरी पंक्ती उठती। अन्नाची न होय गणती। अन्नपूर्णा तू त्रिजगती। काय उणे असे भक्ता ।।४३।। अन्न जेवढे होते। तेवढेच पूरे सर्वाते। न शिजवावे लागे परते। परब्रह्म असता ठायी ।।४४।। तृप्त होवूनि सर्व लोक। भक्तिभावे भजे भाविक। तव चरणी श्रद्धा नेक। ठेवितसे दृढभावे ।।४५।। असे तुझे महिमान। कल्लूर करी पावन। दत्तजयंतीला गुणगाणं। तुझेचि करितसे ।।४६।। दत्तजयंतीला महोत्सव। आदिलाबाद निर्मल ठाव। न घडे तुझ्याशिवाय। जगत्‌जननी अनसूया ।।४७।। म्हणून दत्त जयंतीदिनी। जाई ब्यांशी सालापासूनि। तेव्हापासून भजती धामी। महाशक्ती मातेला ।।४८।। आता ऐका कवन। पालखीचे महिमान। मातेची आज्ञा प्रमाण। मानी तो भक्त खरा ।।४९।। एकोणविसशे पंचांशी सालाला। आज्ञा करी प्रभाकरला। पालखी आण पारडसिंग्याला। पैदलवारी करुनिया ।।५०।। पारडसिंगा ते कल्लूर। चारशे किलोमीटर अंतर। कैसे होईल पार। साशंक मनी असे ।।५१।। तीनदा दृष्टान्त झाला। पिच्छा तोचि

पुरविला। तूच जाणे तुझी लीला। महाशक्ती भगवंती ॥५२॥ न चाले काही विचार। कसा झालो लाचार। काय करावा आचार। म्हणून गेले शिरडीला ॥५३॥ परीक्षेची घडी आली। रक्षा करी जगत्वल्ली। तूच असे माझी माऊली। आधार देई तव बाळा ॥५४॥ विनवी शिवनेसन स्वामीसी। सांगूनि माता आज्ञेसी। न सूचे मज दीनासी। मार्ग मज दावा हो ॥५५॥ दृष्टी खिळवूनि शुन्यात। स्वामीजी बोले एकमत। पालखी काढूनि क्षणात। आज्ञा पाळावि मातेची ॥५६॥ साईबाबाचे घेवूनि दर्शन। मानूनि आज्ञा प्रमाण। आले अपुल्या कल्लूर ग्राम। सज्जता करी पालखीची ॥५७॥ एकोणविसशे ब्यांशी सालाला। घेवूनि एकशे ऐंशी लोक सोबतिला। पालखी निघाली श्रीक्षेत्राला। जयजयकार करुनि ॥५८॥ पालखी ठेवोनि समोर। पायी चाले बरोबर। मातेचा करुनि गजर। ब्रह्मानंदे टाळी वाजे ॥५९॥ आनंदिली लहानथोर। नाचती सर्व नारीनर। लागली भक्ती वाटेवर। रंगूनिया भजनात। ॥६०॥ पाऊस पडे समोरी। भावभक्ती घेई भरारी। शीण न वाटे शरिरी। तृषा क्षुधा न लागतसे ॥६१॥ सोबत घेतली गाडी। सामानासाठी बडी। बिना परवाना धाडी। पालखी समोरी ॥६२॥ गाडी आली आदिलाबादला। आरटीओ ने पकडले तिला। विचारपूस करता झाला। कर्तव्य म्हणूनिया ॥६३॥ गाडीचे नव्हते कागदपत्र। विनापरवाना यातायात। आता करेल हा त्रस्त। गाडी जप्त करुनिया ॥६४॥ गाडीवर होती प्रतिमा। अनसूया साई रामा। हातजोडी मनोमना। श्रद्धाभाव ठेवूनि ॥६५॥ तोच बदलली वृत्ती। भिन्न झाली कृती। नयनी बघे एकवटी। आई अनसूयेस ॥६६॥ तोच साहेब गेला दुकानी। देई भक्ता फराळ पाणी। खाऱ्या मीठ्याची पर्वनी। लाभे माता तवकृपे ॥६७॥ आला होता कशासाठी। ठेवून गेला काय पाठी। ऐशी तव नामाची महती। येतसे सर्व स्थळी ॥६८॥ अडथळा येता वाटेवर। धावून येई जगदीश्वर। दूर करी तो सत्वर। माय माझी अनसूया ॥६९॥






यवतमाळला पालखी आली। परी संपली गंगाजळी। भीक मागण्याची पाळी। येतसे भक्तांवरी ॥७०॥ सायंसमयी घरोघरी। काढू भिक्षेशी फेरी। ठरला विचार अंतरी। उदर भरणासी ॥७१॥ गाडी कां न आली। का कोठे सापडली। कुणी म्हणे अपघात कली। शिरला असे गाडीत ॥७२॥ गाडीत होते सामान। पैसा अडका धनधान्य। परी न धरी ठिकाण। काय करावे कळेना ॥७३॥ परी देवा तूच जाणे। भक्ताचे जीणे मरणे। न लागी काही दूषणे। रक्षा तूचि करितसे ॥७४॥ प्रसंगी कोठारे लुटली। दामाजीची रशीद भरली। महार बनूनि रक्षा केली। संत सज्जनांची ॥७५॥ अकस्मात गाडी आली। धनधान्यही मिळाली। पालखी पुढे निघाली। भगवत गाण करुनि ॥७६॥ लागले तेरा दिवस। पारडसिंगा येण्यास। न झाला काही त्रास। कृपा तुझी म्हणूनि ॥७७॥ पंढरीच्या वाटेवरी। विठ्ठल चाले बरोबरी। तैसीच माता करी वारी। भक्तासवे चालूनिया ॥७८॥ वरदहस्त होता शिरी। माता अनसूया बरोबरी। म्हणौनि झाली वारी। सुखरुप श्रीक्षेत्री ॥७९॥ न झाली कुणा ईजा। शरिरी न घडे पिडा। तेरा दिवसाचा पवाडा। पूर्ण करी भगवती ॥८०॥ आले सर्व मंदिरी। करण्या सेवाचाकरी। होवूनि सर्व भिकारी। आर्जवि दयाघना ॥८१॥ प्रभाकरला आज्ञा केली। सप्ताह कर माता वदली। कैसी करावी पूर्णावली। घडी ही परीक्षेची ॥८२॥ नव्हते पैसे गाठीला। विचारमग्न तो झाला। परी सप्ताह सुरु केला। टाकूनि भार मातेवरी ॥८३॥ दृढश्रद्धा ठेवूनि अंतरी। नामयज्ञ सुरु करी। तूच त्याचा पूर्ण करी। कृपादृष्टी ठेवूनी ॥८४॥ महाशिवरात्रीच्या पर्वाला। सप्ताह सुरु केला। श्रीक्षेत्री पारडसिंग्याला। अखंड जप करुनिया ॥८५॥ राहूनिया सात दिवस। साईनामाचा एक ध्यास। अखंड चाले नामप्रवास। ॐ साई श्री साई जयजय साई ॥८६॥ मंदिरी चाले अन्नदान। आणूनि कल्लूरवरुन। एकसेवेचे हेचि गाण। गातसे तव मंदिरी ॥८७॥ चित्त शुद्ध करी। गाऊनि नरनारी। माता

तत्व तारी। नाम जो भजतसे ।।८८।। दूरवरुन येती भक्त। नाम जप करण्या अहोरात। घडावे एक सेवा व्रत। अर्चना करी भक्तिभावे ।।८९।। सप्ताहाच्या समाप्तीला। महाशिवरात्री एकादशीला। आळवूनि शिवशंभूला। पालखी निघे गावात ।।९०।। पालखीत बसूनि महासती। त्रिजगताची अधिपती। चालली रस्त्यावरती। गजर करुनि नामाचा ।।९१।। भावभक्तिची तिजोरी। चाले पालखी बरोबरी। जो तो मुखी गर्जना करी। जय जय अनसूया ।।९२।। टाळ मृदूंग वाजती। भक्त गुलाल उधळती। नरनारी नाचती। देहभाव हरपूनि ।।९३।। रस्त्याने करी झगमगाट। प्रकाशाचा वाहे लोट। महाशक्ती देई भेट। पालखीत बसूनिया ।।९४।। सप्ताहाची समाप्ती करी। महाप्रसाद देवूनि मंदिरी। भावभक्तिने करी चाकरी। येवूनि दूरवरुनी ।।९५।। महाशक्तीचा कृपाप्रसाद। जो तो येई घेण्यास। कृतार्थ करी जीवास। प्रसाद सेवूनिया ।।९६।। असा हा आनंद सण। साजरा करी आंध्र जन। श्रीक्षेत्री पारडसिंगा येवून। महाशिवरात्री पर्वाला ।।९७।। एकोणविसशे सत्यांशी साली। कल्लूरला आई निघाली। परी ऐका नवली। अघटित अकल्पित ।।९८।। अशक्य ते शक्य करी। तर्क वितर्क न चाले पुरी। महिमा तव कळे खरी। कल्लूर वाटेवरी ।।९९।। नव्हते गाडीत डिझल। वाटेत लागले काटोल। जाऊ लागले सरळ। पेट्रोलपंपावरी ।।१००।। 'चालू द्या' माता वदलीं। वाहका खात्री न आली। वाटेतच उडेल खिल्ली। व्यर्थ न व्हावा त्रास ।।१०१।। चारशे किलोमीटर चा अंजाम। न व्हावे फजीत गाण। न होई त्याचे समाधान। डिझेल टाकी गाडीत ।।१०२।। फूल टँक कर म्हणाला। डिझेल तो टाकू लागला। टँक भरुनि क्षणाला। खाली सांडतसे ।।१०३।। डिझेल टाकी दोन लीटर। टाकी भरली पूरेपूर। न चाले अधिक जोर। तिसरा लीटर टाकण्या ।।१०४।। एवढी मोठी टाकी। दोन लीटरची होई दाटी। पुन्हा पुन्हा त्यात ओती। परी बाहेर पडतसे ।।१०५।। सकल जन आश्चर्य करी। डिझेल कैसे येई बाहेरी।






आता न करावी जोरी। एवढेच पुरे असे ।।१०६।। दोन लीटर डिझेलला। गाडी आली कल्लूरला। चारशे किलोमीटर अंतराला। पहा कैसे दिव्यत्व ।।१०७।। खर्ची न पडला थेंबही। सत्य होई शब्द माई। न कळे येता प्रत्ययही। लीला तू दावितसे ।।१०८।। डिझेलविना गाडी आली। अचम्बित सर्व झाली। महिमा तव कळून आली। कल्लूर ग्रामासी ।।१०९।। तूच चालवि गाडीला। निमित्त करी वाहकाला। कृपाकटाक्ष तव पडला। साधन पै न लागे ।।११०।। माते तव शब्द महिमा। अनुभव देई भक्त जना। जो अर्पि तनमना। फळ तया मिळतसे ।।१११।। अवहेलना केली जरी। दुर्देवाची येई फेरी। म्हणून पाळति वैखरी। आई अनसूयेची ।।११२।। तूच देई पूर्ण जाण। भूत भविष्य वर्तमान। सांगतसे खाणाखूण। निर्धोक करावयासी ।।११३।। करुणासागर करूणावता। तूच जाणे भक्तमता। पापी पतिताची सरीता। माय माझी अनसूया ।।११४।। भक्तांची पाहूनि भक्ती। धावत जाई यशोमती। कथितो आता गीती। महाशक्ती मातेची ।।११५।। हैद्राबादला आई गेली। पारडसिंगा यावया निघाली। अरण्यात घटना घडली। पांढरकवडा परिसरी ।।११६।। गाडी जंगलात आली। जाणिली भक्ताची किल्ली। प्रभाकरा आज्ञा केली। 'मिरची आण' म्हणौनि ।।११७।। झाले तव ते अचम्बीत। मिरची न मिळे अरण्यात। काय असे मातेच्या मनात। न कळे काळालाही ।।११८।। परी न करी अवज्ञा। प्रमाण असे माता आज्ञा। शोधूनि पाहावे अरण्या। मिरची मिळेल म्हणूनि ।।११९।। काय होते तुझ्या मनी। तूच असे अंतर्ज्ञानी। म्हणून करी मागणी। मिरचीची भक्ताला ।।१२०।। महाराज प्रभाकर निघाले। मिरचीचा शोध घ्यायले। दूरवर चालत गेले। परी न दिसे शेतभात ।।१२१।। एके ठायी दृष्टी गेली। लोचनी दिसे शेतमाऊली। तैसीच पावले चालत गेली। शेतमळ्यावरी ।।१२२।। पाहूनि हिरवा मळा। आनंद होई भक्ताला। विनवितसे मालकाला। मिरची

द्या म्हणौनि ।।१२३ ।। तेथे होते शेतमजूरं । काम करी बरोबर । ऐकूनि वाणी प्रभाकर । आश्चर्य करीतसे ।।१२४ ।। मिरची पाहिजे कशाला । कैसे शोधीले बागाला । का कष्टविले जीवाला । दूरवर येवूनिया ।।१२५ ।। तव तो सांगू लागला । आहे अनसूया माता सोबतीला । तिनेच सांगीतले मला । मिरची आण म्हणौनि ।।१२६ ।। ऐकूनि मातेचे नाव । विसरले देहभाव । तैशीच घेतली धाव । भगवती चरणासी ।।१२७ ।। मिरची टमाटे घेतले । भक्त सर्व धावले । अर्पण मातेशी केले । एकसेवा भावाने ।।१२८ ।। चरण धरी मातेचे । भक्त पांढरकवड्याचे । पाणावले लोचन त्यांचे । कृतार्थ होवूनिया ।।१२९ ।। पुन्हा पुन्हा घेई दर्शन । तरी न पावे समाधान । आसवांनी भरले नयन । तृषार्त जीवांचे ।।१३० ।। न कळे हा माता महिमा । म्हणून विचारी त्यांना । लाभ कैसा दर्शना । होई या अरण्यात ।।१३१ ।। का मागवि मिरची येथे । तुम्हीच का असावे तेथे । काय गुह्य असे कोठे । सांगा तुम्ही आम्हांसी ।।१३२ ।। सांगितले ते बरवे । श्रीक्षेत्री पारडसिंगा जावे । आईचे दर्शन घ्यावे । हीच आस मनात ।।१३३ ।। परी नव्हता पैसा अधला । कैसे जावे श्रीक्षेत्राला । गरिबीचा बाधा आला । दर्शन काही घडेना ।।१३४ ।। ईच्छा होती मनी । दर्शनी जावे भवानी । परी न झाली जुळणी । दैन्य दुःखापायी ।।१३५ ।। म्हणौनि हाचि मळा । लावी आईचा लळा । काम करतांना गळा । अनसूया गाण गाई ।।१३६ ।। तीच हाक ऐकूनि । धावत आली जननी । दर्शन दिले वनी । भावभक्ती पाहूनि ।।१३७ ।। आई तू जाणितले । शेतात आहे भक्त भोळे । दर्शनाची आस भले । लावूनि बसतसे ।।१३८ ।। म्हणून केला बहाना । मिरचीचा भक्त गणा । जाणूनि भक्ताची करूणा । दर्शन तू देई ।।१३९ ।। जैसे संत सावताच्या भेटी । मळ्यात जाई जगजेठी । तैसेच भक्तांच्या घ्याया गाठी । आई अनसूया जातसे ।।१४० ।। भक्ता दर्शन देवूनि । आस पूरवि भवानी । निमित्त मात्र घडवूनि । धावूनि तू जातसे ।।१४१ ।। ऐशी तुझी




अगाध लीला । प्रत्यय येई क्षणाक्षणाला । असमर्थ मी वदण्याला । बुद्धीदायी तू असे ।१४२ ।। दृष्टान्त दिला प्रभाकरला । काळ नेईल तव मुलीला । भविष्य वर्तविले पूर्विला । महाशक्ती मातेने ।।१४३ ।। काय करावे कळेना । जाणितसे तव महिमा । परीक्षेची घडी जाणा । न सोडी धीर तथा ।।१४४ ।। दत्तजयंतीच्या दिनी । गेली कन्या सोडूनि । खरी झाली भविष्यवाणी । त्रिकालज्ञानी मातेची ।।१४५ ।।न ढळी परी विश्वास । आई चरणी दृढध्यास । काळाचा महिमा खास । दैवगती टळे ना टळे ।।१४६ ।। दत्तजयंतीचे हे गाण । कल्लूर ग्राम करी पावन । साक्ष पटली मनोमन । कथन करूनिया ।।१४७ ।। वीज पडता मंदिरी । कैसे रक्षिले लेकरी । पुढील अध्यायी कथन करी । ऐकावे सृजनहो ।।१४८ ।। इतिश्री परमेष्ठी अनसूया गाथा । कवन करी अनसूया माता । निमित्त करूनि तव सुता । द्वादशोऽध्याय सम्पूर्ण ।।१४९ ।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु । शुभंभवतु । हरी ॐ शांती । शांती ।। शांती ।।।

**।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।**

### श्री गणेशायनमः श्री सरस्वतेंनमः श्री गुरुदेवायनमः

जय जय अनसूया आई । आदीमाया मुक्ताबाई । आलो मी तव पायी । विनभ्र होवूनिया ।।१ ।। श्रोते हो तुम्ही सुज्ञ । मी तर असे अनभिज्ञ । आरंभिला वाक्यज्ञ । माता तव कृपेने ।।२ ।। वीज पडल्याची प्रखर घटना । घडली पारडसिंगा धामा । आपण ऐकावे कवना । दृष्टान्त हा विजेचा ।।३ ।। काळ न बाधी माता । साही वीज आघाता । प्रचिती आली तव पुता । श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।४ ।। "मुक्ताबाई येते भेटीला" । वदली माता प्रात:समयाला । परी न जाणे लीला । आदीशक्ति देवीची ।।५ ।। आदीमाया आदीशक्ती । मुक्ताबाई भगवती । कैसी आली श्रीक्षेत्री । माता तव भेटीला ।।६ ।। केले तू अनुमान । परी न जाणे अज्ञ जन । प्रचिती येई तत्क्षण । वीज पडता मंदिरी ।।७ ।। ऐकून घ्या ही कथा । कैसी रक्षितसे भक्ता । भार वाहूनि माता । निर्भार करी लेकरा ।।८ ।। ६-१०-१९८३ ला । दुपारी चारच्या समयाला । वाऱ्याचा वेग वाढला । ढग जमती अंबरी ।।९ ।। गर्जति मेघ गडगडाट । वीज करी कडकडाट । अंधारुन आला आसमंत । तांडव करी निसर्ग ।।१० ।। तत्क्षणी वीज सळसळली । ध्वनी रवे भूमि थरथरली । प्रजा सर्व घाबरली । कडकडाट ऐकूनि ।।११ ।। लख्ख प्रकाश पडला अवनी । दिपून गेले सर्व नयनी । म्हणे कैसी ही अद्‌भूत करणी । काय होई न कळतसे ।।१२ ।। मंदिरा समीप वीज पडली । गावातील विद्यूत गेली । अंधाराची छटा पसरली । तयेवेळी गावात ।।१३ ।। वीजेचा तो प्रखर गोळा । मातेच्या मंदिरी आला । भक्त होते आश्रयाला । आई तुझ्या चरणासी ।।१४ ।। मंदिरातील तारा तुटल्या । विद्युत प्रवाह खंडीत झाला । भेगा पडल्या भिंतीला । भग्न होई मंदिर ।।१५ ।। पिंपळाच्या झाडावर । चिमण्या होत्या फांदीवर । मरुन पडल्या भूमिवर ।



# अध्याय १३

वीज पडल्यानंतर वीजेचा प्रखर
प्रघात मातेने आपल्या उरी साठवला तेव्हा
फोटो खाली पडून जीभ बाहेर आली.



मंदिरावर वीज पडली तेव्हा मातेने
दृष्टी अशी केली ६ आक्टोबर १९८३



विजेच्या प्रघाताने ।।१६ ।। पहा आईची लीला। कैसे वाचवि भक्ताला। इतिहास आहे साक्षिला। माता
अनसूयेचा ।।१७ ।। आई वीज झेली शिरी। प्रघात पचवि उरी। भक्ताचे रक्षण करी। जगदम्बा महाकाली ।।१८ ।।
तयेवेळी चमत्कार घडला। आईचा फोटो खाली पडला। वीजेचा गोळा मुखी घेतला। रक्षण कराया भक्तांचे ।।१९ ।।
भक्त प्रतिमा उचलूनि बघती। जिव्हा बाहेर निघाली होती। दुर्गादेवीचा अवतार पाहती। मातेच्या प्रतिमेत ।।२० ।।
प्रतिमेत फरक पडला। पुन्हा पुन्हा निरखी तिला। म्हणे चमत्कार कैसे घडला। रक्षावया लेकरा ।।२१ ।। प्रतिमा
बघूनि मंदिरी। साक्ष जी विजेची खरी। दर्शन घेती नरनारी। महाशक्ति मातेचे ।।२२ ।। गावाचे अरिष्ट टळले।
वीजेला जिव्हाग्री झेलले। जीवनदान भक्ता मिळाले। माता तव कृपेने ।।२३ ।। हीच केली भविष्यवाणी। आली
मुक्ताबाई दर्शनी। भक्त सत्यता जाणी। माता तव वचनाची ।।२४ ।। एक आंधळा आला दर्शना। करितसे पूजा
अर्चना। अंगारा लावी नयना। दृष्टीदान मिळतसे ।।२५ ।। धुनितला अंगारा। दूर करी अंध:कारा। पाहू लागला
नजारा। आंधळा पुरुष तो ।।२६ ।। तुझ्या कृपेने होई। दृष्टी प्राप्त अंधा:लाही। म्हणूनि आला पायी। कृपाकांक्षिनी
मातेच्या ।।२७ ।। नागपूरचे मधुकरराव काळे। आई तुझे भक्त भोळे। कांता पुष्पाताई लडिवाळे। भजितसे
भगवती ।।२८ ।। आई तू प्रथम दर्शनी। स्वयंप्रकाशाची धुनी। दाखविली नेत्रांजनी। मधुकररावांना ।।२९ ।।
पाहूनि तुझे रुप। श्रद्धा बसली आपोआप। महाशक्तीचे प्रारुप। जाणतसे क्षणोक्षणी ।।३० ।। गुरु महाराज
काकडेंनी। सांगितले त्याच्या कानी। म्हणे साक्षत दुर्गा भवानी। शरण जा मातेला ।।३१ ।। असता माता दर्शनी।
पाप ताप नसे अंगणी। भजता अनसूया भवानी। महादोष उद्धरती ।।३२ ।। डॉ. राजुच्या लग्नसमयी। वर्धा
मुक्कामी योग येई। परी तूच नाव घेई। उपवधू मुलीचे ।।३३ ।। "कमला न लाडू जमला"। म्हणतसे भक्तवत्सला।

तूच पाहून दिले मुलीला। त्रिकालज्ञानी तू असे ।।३४।। योगायोग जुळून आला। डॉ. राजूचा विवाह झाला। सुखसमृद्धी उभयताला। लाभतसे संसारी ।।३५।। मधुकररावाची व्यथा। दूर करी भगवता। पत्नी पुष्पाच्या आर्त हाका। धावूनि तू, येतसे ।।३६।। मधुकरराव त्रस्त झाले। पद त्यांचे सुजले। उपचार करुनि थकले। धावा करी मातेचा ।।३७।। पुष्पाताई येई मंदिरी। श्रीक्षेत्री पारडसिंगा नगरी। भावभक्तिची करी चाकरी। भांग करुनि मातेचा ।।३८।। भांगातील केस निघाले। माता आज्ञे ठेवूनि घेतले। भगवतीला प्रार्थिले। धागा दे म्हणूनिया ।।३९।। श्रीफळा होता दोरा। तोचि घेई स्वकरा। लेकीला देई सत्वरा। दु:ख दूर करण्यासी ।।४०।। केस धाग्याचा बनवि ताईत। घाली मधुकरा गळ्यात। भगवतीस भजे दिनरात। सूज कमी होण्यासी ।।४१।। ताईताचा गुण आला। सुजेला उतार पडला। तंदुरुस्त भक्त झाला। आई तुझ्या कृपेने ।।४२।। जेथे दृष्टी स्थिरावली। सुख समृद्धी तया लाभली। आई तू जगत्वल्ली। नमस्कार तव चरणी ।।४३।। तव कृपेचे पवाडे। उघडी ज्ञानाची कवाडे। गोड नाम मुखा आवडे। जय जय अनसूया ।।४४।। तूच माझी माता माऊली। तव कृपेची लाभे सावली। तूच माझी रखवाली। सर्वस्थळी सर्वकाळी ।।४५।। पुष्पाताई गेली पंढरपूरला। गुरुपौर्णिमेच्या पर्वाला। तेथून जाई त्र्यंबकेश्वरला। ज्योतिर्लिंग पूजावया ।।४६।। गायत्री मंत्राचा उच्चार। करितसे गायत्री मंदिर। परी कानी येई एक स्वर। जय जय अनसूया ।।४७।। नाम भिन्न एक रुप। तव शक्तीचा हा प्रताप। दिसे तुझेच प्रारुप। एकरुप होवूनि ।।४८।। हिरवे पातळ नेसून। हिरवा चूडा करी लेवून। गेली भगवती सजून। दर्शन द्याया भक्ताला ।।४९।। ज्या ज्या पूजी देवा। तेथे भासे अनसूया। विविध रुपाची माया। तूच दावी भगवती ।।५०।। बारा ज्यातिर्लिंग जेथे। तुझा वास असे तेथे। आदी अंती तूच माते। ॐ नम: शिवाय ।।५१।। दिले तू लेकीला दर्शन। जावूनि







पंढरपूरी धाम। फळा आले पुर्व पुण्य। जय जय विठ्ठल रखमाई ।।५२।। गुरुपौर्णिमेच्या पावन दिनी। माता झोपली आसनी। भक्त विचारी भवानी। का झोपली म्हणौनि ।।५३।। पंढरपूरला मी जातो। भक्तांना दर्शन देतो। ईच्छा त्यांची पुरवितो। पंढरपूरी जावूनि ।।५४।। "जय जय रामकृष्ण हरी। माता अनसूया पंढरी"। वदली माते तू मंदिरी। गाणं म्हणं म्हणूनिया ।।५५।। विठ्ठल रुखमाई। माझी अनसूया आई। गाई तू नवलाई। नारायणपूर वाटेवर ।।५६।। जो भजे ज्या भावे। ज्या स्थळी ज्या ठावे। कृपादृष्टी तया पावे। दूरप्रांती दूरदेशी ।।५७।। म्हणून पुष्पाताईला। लागला तुझा लळा। तव नामाचा जिव्हाळा। अहर्निश अखंडित ।।५८।। म्हणून घडली सेवा। अंत्यसमयी देवा। पूर्वसुकृती ठेवा। होता म्हणूनिया ।।५९।। ऐसी कृपा अपार। तुझी या काळे कुटूम्बावर। सदैव असे तत्पर। माता तव सेवेला ।।६०।। शोभाताई गोतमारे। राहती नागपूर नगरे। होई रोग दुर्धरे। यातना असह्य होई ।।६१।। पती यादवराव चिंतीत। पाहूनि पत्नीची तब्बेत। अनुदिन पडे बिछान्यात। उपचार न चाले काही ।।६२।। केले नानापरी उपचार। परी गुण न आला कणभर। रुपये खर्चिले भरपूर। तरी न होई ईलाज ।।६३।। येवू लागले आप्तेष्ट। घेण्या शेवटची भेट। शोभाचा होई शेवट। महाभयंकर व्याधिने ।।६४।। मधुकरराव काळे मार्ग दाखवि। म्हणे महाशक्तिच आता वाचवि। जावू या पारडसिंगा गावी। मातेच्या दर्शनाला ।।६५।। अंतिम उपाय म्हणून। करु माता पादपूजन। सर्वभार आईवर टाकून। निर्विघ्न होवू या ।।६६।। उचलून ठेविले गाडीत। आले ते श्रीक्षेत्रात। तैसेच उचलून नेले मंदिरात। मातेच्या चरणावरी ।।६७।। करुनि पूजन अर्चन। आळवि मातेला श्रद्धापूर्ण। म्हणे देई जीवनदान। शोभाताई विनवितसे ।।६८।। तूच माझी आयुष्यदाता। तूच अनाथांची माता। तूच असे भाग्यविधाता। परम्कृपाळू माऊली ।।६९।। भक्ती तिची फळा आली। मातेने कृपादृष्टी फिरविली।

लोचनी लेकीच्या स्थिरावली। एकटक पाहूनिया ।।७०।। आशीर्वाद दिला शोभाला। म्हणे घेवून जा घराला। 'टळेल बाईची बला'। बोले आई अनसूया ।।७१।। तीर्थ आणि उदी घेवून। निघाले सर्व भक्तगण। अविरत उपचार जाण। नामस्मरण करुनिया ।।७२।। तीर्थ उदीचा परिणाम झाला। शोभाताईचा रोग पळाला। मरणातून वाचवि मुलीला। माय माझी अनसूया ।।७३।। निरोगी जीवनाचे दान। माता करितसे प्रदान। सार्थ होतसे नाम। वरदायिनी म्हणूनिया ।।७४।। करुणा भाकती उभयता। वाचवि तू तव पुता। स्विकार करी दंडवता। भगवती अनसूया ।।७५।। भक्त कल्याणभाई परमार। तव नामाचा करी उच्चार। आचार विचार व्यवहार। जय जय अनसूया ।।७६।। गेली माता दुकानी। गांजाखेत मकानी। वरदहस्त ठेवूनि। आशीर्वाद देतसे ।।७७।। बडकस चौकी घ्यावे मकान। वाटतसे मनोमन। परी धन असे अपूर्ण। म्हणून चिंता करितसे ।।७८।। आले माता तव दारी। ईच्छा तूच पूर्ण करी। म्हणून आर्जवि मंदिरी। पादपूजा करुनिया ।।७९।। कृपादृष्टी तू फिरविली। मकानी स्थिर केली। आपोआप पूर्तता झाली। माता तव कृपेने ।।८०।। नसता पैसा जवळ। आले सर्व बळ। मकान मिळे तव बाळ। तुझी कृपा म्हणूनि ।।८१।। तूच लाविले दुकान। विकतसे पादत्राण। भरभराटीचा क्षण। तूच दावी भगवती ।।८२।। माते तू दिला दृष्टांन्त। वाघ येई स्वप्नात। भीती वाटे मनात। व्याघ्ररुप पाहूनि ।।८३।। आठवि तव स्वरुप। करुनि नामजप। दिसे तुझेच प्रारुप। वाघाच्या जबड्यात ।।८४।। भवानीचे हे रुप। दाखवि माता व्याघ्रस्वरुप। तीन दिवस प्रताप। तूच दावी भगवती ।।८५।। ऐसी आईची महिमा। सजीव करी तनमना। अर्पि श्रद्धा सुमना। परमार कुटूंम्बिय ।।८६।। वसंतराव घटाटेची कथा। जनजीवनाची व्यथा। रक्षी अनसूया माता। संकटी सोडवूनि ।।८७।। नागपूर कार्यालयी जाई। वसंतराव काम पाही। भजूनि अनसूया आई। व्यस्त असे





कार्यात ।।८८।। दिवसभर करुनि काम। निघाले जावया सदन। द्वारपाल थांबवी तत्क्षण। तपासणी करण्यासी ।।८९।। सर्वाची तपासणी झाली। वसंतरावाची पिशवी पाहिली। कारबाईट स्ट्रीप्स निघाली। आळ घेई चोरीचा ।।९०।। म्हणै हे कैसे घडले। कोणी हे दुष्कृत्य केले। शत्रूने मज फसविले। तूच रक्षी माता आता ।।९१।। नोकरीतून काढले घटाटेला। चौकशी होई समयाला। निर्दोष असून दोषी ठरला। आई लेक तुझा ।।९२।। घेवोनि साईचे दर्शन। आले पारडसिंगा धाम। पूजिले माता तव चरण। भार टाकूनिया ।।९३।। आई तू वाचवि आता। दोष नसे माझा याता। सर्वसाक्षी तूच असता। आळ कैसा येतसे ।।९४।। 'सही नाही करत' म्हणाले। परब्रह्म स्वमुखे वदले। "आभाळाले हात लावते"। म्हणौनि जाण देई ।।९५।। आकाशाचे व्यापकपण। कोण घाली अंथरुण। तुझी लीला तूच जाण। असमर्थ मी असे ।।९६।। माते तू दृष्टी फिरविली। भक्तावर नजर रोखली। चौकशी दिशा बदलविली। सार्थ कराया नामासी ।।९७।। निर्दोष सोडले घटाटेला। रुजू होण्या आदेश दिला। सुरु केले कामाला। कार्यालयी जावूनि ।।९८।। आदेश फिरविण्याची किमया। तूच केली महामाया। तवकृपेने मिळे छाया। संसारपूरी तराया ।।९९।। म्हणून लागले चरणी। अनसूया जगत्जीवनी। भजितसे क्षणोक्षणी। गुण तुझे गाऊनी ।।१००।। विजयबाबू पांडेवर। कृपा अनंत अपार। पावन करी घर। नागपूर नगरी ।।१०१।। दिले बहु दृष्टान्त। सांभाळी तूच पुत। म्हणूनि भजी दिनरात। आई अनसूयेला ।।१०२।। सणवार मंदिरी। येवूनि साजरा करी। तूच माता अंतरी। पांडे कुटुम्बियांच्या ।।१०३।। तुज वाचून क्षण। भासे काळासमान। म्हणून धरी चरण। शरण येवूनिया ।।१०४।। येता कोणती आपत्ती। सावध करी भगवती। ज्ञात करुनि मती। रक्षा तू करितसे ।।१०५।। किती वर्णावा महिमा। तूच सांभाळी जीवना। तूच असे कल्पद्रुमा। कृपासिंधू अनसूया ।।१०६।।

वर्धेच्या सरलाताई डायगव्हाणे। सदैव गाई तव गाणे। तव कृपेचे हे देणे। म्हणून यत्न होतसे ॥१०७॥ पती भाऊ रावजी सवे। भजती माता अनसूये। चरण पूजितसे भावे। श्रीक्षेत्री येवूनिया ॥१०८॥ एकदा गेल्या शेतात। राहली तेथे पोतं। घरी आली अवचित। न राही भान दागिण्याचे ॥१०९॥ तोच तू दिला दृष्टान्त। राखणं ठेवलं का शिवारात। म्हणून आला स्मरणात। दागिणा सुवर्णाचा ॥११०॥ तूच माता रखवाली। तव कृपे पोत मिळाली। न कोणी अन्य वाली। तुजविण भगवती ॥१११॥ म्हणून न चुके वारी। पौर्णिमा साजरी करी। येवूनि तव मंदिरी। भजन पूजन करितसे ॥११२॥ तव नामाचा एक ध्यास। अनुदिन हाच सायास। तुझाच माऊली असे वास। कृपा तुझी म्हणूनिया ॥११३॥ वर्धेच्या नलीनी देशकर। पाऊस सुरु मुसळधार। विजेचा कडकडाट फार। भीती तिला वाटतसे ॥११४॥ रक्षा करी माझी माता। वाट दाखवी तव पुता। भीती दूर करी भगवता। अभय देवूनिया ॥११५॥ तोच तू प्रगट झाली। हात धरून घरी नेली। भीती तू दूर केली। रस्ता दाखवूनि ॥११६॥ जो आळवि ज्या भावे। तैसे फल तो पावे। माता चरण ओवाळावे। एकचित्त होवूनिया ॥११७॥ दिला दृष्टान्त नलीनीला। पोचविले घराला। म्हणून आली चरणाला। एक सेवा करावया ॥११८॥ याच नगरी प्रा. बुथे। दर्शनी येती श्रीक्षेत्राते। टाकिती कन्या चरणाते। अनसूया मातेच्या ॥११९॥ माता मागी तीन मोती। परी आई तू प्रजापती। प्रसाद फेके महासती। सार्थ कराया वचनासी ॥१२०॥ तीन मुलं झाली बुथेला। तीन मोतीचा अर्थ कळला। भक्तिभावे आळवि मातेला। दृढश्रद्धा ठेवूनिया ॥१२१॥ विहिरीला नव्हते पाणी। खोदू लागले दीनवाणी। परी व्यर्थ होई खोदणी। न लागे पाणी आडा ॥१२२॥ केली मातेची विनवनी। म्हणे वाचव मज भवानी। लागू दे विहीरीत पाणी। हाक घेई भक्ताची ॥१२३॥ मातेने दिला दृष्टान्त। जावून बसली आडात। खोदू लागली विहिरीत।





हाती फावडे घेवूनि ॥१२४॥ पाणी लागले भरपूर। उठून बसले बुथे सर। सांगितले मग मजूर। खोदकाम करावया ॥१२५॥ मातेने जी जागा दर्शविली। तेथेच ते खोदू लागली। दृष्टान्ताची प्रचिती आली। अखंड झरा लागतसे ॥१२६॥ पाणी झाले विहिरीला। पिकवू लागले मोत्याला। समृद्धी आली घराला। माता तव कृपेने ॥१२७॥ आई तू धन्य आहे। धन संपदा मज लाहे। सर्वस्थळी भक्ता पाहे। अखंडित अबाधित ॥१२८॥ काय वर्णावा तुझा महिमा। जळी स्थळी काष्टी पाषाणा। तूच असे सर्वधामा। सर्वेश्वर अनसूया ॥१२९॥ येथील बबनराव खंगार। तव कृपेचे वर्धेला घर। भगिनी त्रस्त फार। म्हणून धाव घेतसे ॥१३०॥ डॉक्टरचा उपचार केला। परी गुण काही न आला। चामडी चिकटली हड्डीला। हाडाचा सापळा दिसे ॥१३१॥ कुणी म्हणे करणी केली। तांत्रिकाची मदत घेतली। परी ती दुरुस्त न झाली। कोणत्याही उपचाराने ॥१३२॥ मग आले पारडसिंग्यास। महाशक्तिच्या दर्शनास। अर्पण करुनि श्रीफळास। भार टाकी मातेवरी ॥१३३॥ मातेने नारळ फोडिले। दुःख तिचे दूर केले। तनी बदल दिसले। आई तुझ्या कृपेने ॥१३४॥ झाली पुर्ण पूर्ववत। शरीर झाले सशक्त। गाती तुझेच गीत। जयजयकार करुनिया ॥१३५॥ आईची अपार करुणा। लाभे मोतीराम चांदेकरांना। मौजा राहूनि येई ग्रामा। माता तव दर्शनासी ॥१३६॥ पत्नी विमल चांदेकर। डोकेदुःखीने बेजार। न लागे निधान बरोबर। उपचार करी नानापरी ॥१३७॥ आली तव दर्शनाला। गोटा मारी तू डोईला। उपचार करुनि दूर केला। रोग डोकेदुःखीचा ॥१३८॥ प्रेमळपणाचा हा मार। भाग्य असे जया थोर। तयासी मिळे सत्वर। पाप ताप हरण्यासी ॥१३९॥ जखम न झाली तिळभर। त्रास न होई क्षणभर। परी माता करी उपचार। मार देवूनिया ॥१४०॥ विमलला होता ट्युमर। शस्त्रक्रिया सांगे डॉक्टर। परी तोही झाला दूर। आशीर्वादे भगवती ॥१४१॥ वैद्य म्हणती व्याधी नाही। न दिसे लक्षण काही।

रोगमुक्ति तया होई। माता तव कृपेने ।।१४२ ।। खोकल्याचा झाला त्रास। मोतीराम होई अस्वस्थ। तापही राहे अंगात। काय झाले कळेना ।।१४३ ।। केले बहु उपचार। परी न घडला आचार। त्रस्त करी आजार। न सुचे ना काही ।।१४४ ।। टी. बी. दवाखानी गेले। क्षयाचे निधान केले। तेच औषध घेवू लागले। बरे व्हावे म्हणूनि ।।१४५ ।। परी गुण काही न आला। म्हणून भजे भगवतीला। जावून राही श्रीचरणाला। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।१४६ ।। वाचव आता तूच आई। सार्थ करी नाम माई। नाही तर मरेल तव पायी। भक्तवत्सला भगवती ।।१४७ ।। राहूनि काही दिवस। गुण येवू लागे खास। मातेला भजी रात्रंदिवस। श्रद्धासुमने अर्पूनि ।।१४८ ।। घेवूनि तीर्थ उदी। आले मौदा ग्रामाती। अखंड कर्पूर ज्योत तेवती। जप करी मातेचा ।।१४९ ।। आली खोकल्याची उबळ। ठसा पडला एकबळ। एक खडा पडी तयेवेळ। सुपारीच्या खांडासम ।।१५० ।। खोकला कमी झाला। रोगमुक्त लेक झाला। मातेचा महिमा कळला। वंदन करी तव चरणी ।।१५१ ।। डॉक्टर निधान करिती। क्षयाचे लक्षण न दिसती। कैसे घडले कुंठते मती। विचारमग्न होतसे ।।१५२ ।। आईची अपार लीला। न कळे कुण्या तज्ञाला। तीच तिची साक्षीला। जगदम्बा अनसूया ।।१५३ ।। डॉ. शैलेजा मेंढेची नोकरी। होती धामनगाव नगरी। हरदिन जाणे येणे करी। वर्धेवरुन धा मनगावाला ।।१५४ ।। एकेदिनी जाण्या निघाल्या। उषाताई केदार सोबतिला। गाडीत मध्यभागी बसल्या। भरधाव गाडी निघाली ।।१५५ ।। देवगावला गाडी आली। काळाची वक्रदृष्टी फिरली। ट्रकने धडक मारली। धडकी भरली हृदयात ।।१५६ ।। शैलजाने धावा केला। वाचव भगवती लेकराला। नाहीतर मुकली प्राणाला। कोण वाचवि तुजविण ।।१५७ ।। जावून पडली आसनाखाली। मिळाली तव कृपासावली। करुणा भाकी जगत्वल्ली। भक्ती गाण गाऊनि ।।१५८ ।। तीनदा गाडी पलटली। सर्वांची त्रेधा उडाली। तिन प्रवाशांना गती मिळाली। जीवन ज्योत मालवूनि ।।१५९ ।। कित्येकांचे पाय तुटले। काही जन आंधळे झाले।





काहीचे प्राण गेले। महाभयंकर अपघाती ।।१६० ।। परी तुझा वरदहस्त। जया लाभे असे मस्त। कळीकाळही न करे त्रस्त। गुणगाता माऊलीचे ।।१६१ ।। बनूनि तू संजीवनी। वाचवि माय भवानी। मिळतसे जीवन पर्वनी। तव कृपे भगवती ।।१६२ ।। गाडी सरळ केली। आसनाखालून काढे बली। परी न घडे काही मुली। आश्चर्य करी सर्वजन ।।१६३ ।। होवूनि एवढा अपघात। न घडे काही आघात। तूच रक्षिले तव पुत। कृपादृष्टी ठेवूनि ।।१६४ ।। गुण गाऊ आई कीती। तूच माझी यशोमती। तव कृपेनेच प्रगती। लाभे शैलेजा मेंढेला ।।१६५ ।। करितसे तव भजन। घालूनि लोटांगण। सफल करी जीवन। वरदहस्त ठेवूनिया ।।१६६ ।। तुझेच मिळाले संरक्षण। म्हणून जीवंत तन। तवकृपेचे हे दान। म्हणूनि जीवंत असे ।।१६७ ।। मध्यप्रांती तुझा लळा। अनसूया नामाचा जिव्हाळा। पूर्ण करी लडिवाळा। कृपादृष्टी ठेवूनि ।।१६८ ।। मांगोना पट्टन परिसर। नामे भारला करुणाकर। संजीवन मंत्राचा गजर। होतसे गावोगावी ।।१६९ ।। एकनिष्ठ एक सेवक। माते तव निस्सीम लेक। शेषराव पाटील नेक। राही मांगोना गावी ।।१७० ।। जेव्हा होती तू गावी। न ओळखी तुला माई। तेव्हा आले तव पायी। परमेष्टी जाणूनिया ।।१७१ ।। तेव्हापासून करी सेवा। वाजवूनि नामपावा। अनुदिन भजी देवा। श्रीक्षेत्री येवूनिया ।।१७२ ।। रामरोटीचे एकव्रत। घेवूनि सुखवि भक्त। जाणूनि भक्तिची मात। सेवाचाकरी करितसे ।।१७३ ।। एक नाम एक धाव। श्रीक्षेत्री अनसूया देव। नसे अन्यत्र भाव। या तुझ्या लेकाचा ।।१७४ ।। म्हणून करी नामस्मरण। अनसूया संजीवन। दूरवरी जावून। प्रचार प्रसार करितसे ।।१७५ ।। दूरदेशी दूरप्रांती। गाई नामाची महती। मंत्र जप एक करिती। "ॐ श्री जय जय अनसूया माता" ।।१७६ ।। देवूनि कागद पेन। करी नामाची साठवन। भाविक भक्ता करवून। पुण्य पदरी पडतसे ।।१७७ ।। वाघोडकर पाटील पट्टनचे। तव नाम गाई वाचे। वेडे लागे तव चरणाचे।

म्हणून येई श्रीक्षेत्री ।।१७८।। शेषराव पाटील मार्ग दावी। म्हणून ठाव चरणी घेई। भाव भक्ती फळा येई। तुझी कृपा म्हणूनि ।।१७९।। नामजप करी घरी। तू तया उद्धारी। सेवेची कास धरी। पादपूजा करुनि ।।१८०।। अरविंद देशमुख भाविक। भक्त तुझा सात्विक। तव चरणाचा ध्यास एक। तूच माता लावितसे ।।१८१।। येवूनि श्रीक्षेत्री। भावपुष्प अर्पिती। नाममहिमा गाती। अन्नदान करुनिया ।।१८२।। मध्यप्रांती हा परिवार। करी नामाचा व्यवहार। साथ करी नारीनर। नाम जप करुनि ।।१८३।। पालखीचे गुणगाण। करितसे भाविकजन। म्हणून येई तव धाम। मांगोन्यावरुनी ।।१८४।। घेवूनि पालखी खांद्यावरी। येतसे तव नगरी। पौर्णिमा पर्व साजरा करी। भावभक्ती अर्पूनि ।।१८५।। करितसे अन्नदान। दूरवरुनि येवून।। सेवेचे हे नि:स्पृह कण। अर्पितसे तव चरणी ।।१८६।। अन्न महात्म्य तुझे विदित। अन्नपूर्णा तू ज्ञात। घेतसे तेच व्रत। तृषाक्षुधा क्षमवुनि ।।१८७।। अनुभवाची आहे खाण। न होई त्याचे वर्णन। माते तव कृपा जाण। आहे या लेकरी ।।१८८।। शेषराव पाटलाने दाविला। मार्ग भक्तिचा भला। मध्यप्रांती बोलबाला। म्हणूनि तुझ्या नामाचा ।।१८९।। परी माते दैवलीला। न चुकली कुणाला। तव मायेचा खेळ भला। अज्ञजना काय ठावे ।।१९०।। पाटलाचा लाडका लेक। यशवंत एकनिष्ठ सेवक। घेतसे तव नाम एक। अनुदिन भजूनिया ।।१९१।। करितसे नामजप। सेवेचे नसे माप। तूच असे मायबाप। म्हणून तूज आळवि ।।१९२।। राहूनि तव धामी। अहर्निश पूजि भवानी। पूजाअर्चा पाठ करुनि। गीत तुझे गातसे ।।१९३।। तुला त्याचा भारी लळा। यशवंता लागे जिव्हाळा। जैसे धेनू वत्सला। लाड पूरवितसे ।।१९४।। आला माते तव धामी। दत्तपौर्णिमेच्या दिनी। खांद्यावर पालखी वाहूनि। मांगोना गावावरुनि ।।१९५।। वाटेत करी नामगजर। जवळ करी तव मंदिर। चालूनि सवे बरोबर। मार्ग तू दावितसे ।।१९६।। नामजपाची केली




समाप्ती। आळवूनि तुला भगवती। परी काय असे तव चित्ती। तुझे तूच जाणतसे ।।१९७।। एकाएकी आली आपत्ती। पडला यशवंत खालती। तरी पाटील अढळ चित्ती। न बोलवि वैद्य डॉक्टर ।।१९८।। असेल मातेच्या जे मना। तेच होई या क्षणा। भार टाकू तिच्या चरणा। सर्वसमर्थ जी असे ।।१९९।। परी तू जाणी यशवंत। जो असे भाग्यवंत। करण्या तया आयुष्यवंत। यशोगती देतसे ।।२००।। शेवटची उचकी लागली। यशवंता सद्‌गती मिळाली। माता तव चरणतली। प्राणज्योत विझतसे ।।२०१।। माते हे कैसे घडले। पिता शोकमग्न झाले। चरणी तव अर्पिले। तरी आपत्ती येतसे ।।२०२।। नेई तया गावाला। आवर नसे शोकाला। लाडका लेक गेला। म्हणून हळहळती जन ।।२०३।। तेथेही नामजप करी। आठवि तुलाच करुणाकरी। यशवंता बरोबरी। सदा माते तूच राही ।।२०४।। भक्ति माहात्म्य गाता। मरण आले अवचिता। अमर करी तया पुता। सद्‌गती देवूनि ।।२०५।। वाटले तुला माता। जवळ घ्यावे तव पुता। म्हणून बोलावि यशवंता। नश्वर देह त्यागूनि ।।२०६।। देह मातीचा गोळा। मातीमोल होई क्षणाला। पूर्ण करी तू ही लीला। संचिती जे असे ।।२०७।। असा हा यशवंत। शेषराव पाटलाचा पुत। अनसूया नाम गात। मोक्षपदी जातसे ।।२०८।। लाडका लेक जावूनि। दु:ख होई मनी। परी न सोडी चरणी। तुझे माता अनसूया ।।२०९।। अढळ भाव दृढ विश्वास। पात्र करी पूजनास। तव भक्तिचा निजध्यास। सदा सर्वदा असे ।।२१०।। भाविक नवीन भाई देसाई। नवसारी गुजरात ठायी। आले माते तव पायी। आज्ञे शिवनेसन स्वामीच्या ।।२११।। साईबाबाचे भक्त। परी स्वामी सांगे मात। महाशक्ती एक जगात। परमेष्टी अनसूया ।।२१२।। जावूनि पारडसिंगा धामी। शरण जा अनसूया जननी। करावी चाकरी चरणी। पुण्य पदरी पडे ।।२१३।। साईराम आले श्रीक्षेत्री। भजण्या माता भगवती। लागे तव नामाची प्रीती। अहर्निश

अखंडित ॥२१४॥ येवूनि मंदिरी। गुजरातवरून नगरी। तव नामाची एक तारी। वाजवि तव धामात ॥२१५॥ येती भक्त दूरवरुनि। अन्नछत्र नव्हते धामी। सुरु करितसे चरणी। माता तव कृपेने ॥२१६॥ रामरोटी सुरु झाली। भक्त जेवू लागली। तूच क्षुधा शमविली। परमेष्टी अनसूया ॥२१७॥ राहूनि तव मंदिरी। सेवा चाकरी करी। अन्नदानाची महती पूरी। गातसे भक्त तुझा ॥२१८॥ गुजरात प्रांती प्रचार। जावूनि घरोघर। करी साईराम दूरवर। नामस्मरण करुनि ॥२१९॥ म्हणून भजती तुला। नवसारी भागाला। लाविला तूच लळा। माता तव बाळांना ॥२२०॥ अन्नदानाचे महिमान। गाई नामजप करुन। सुखविती जनमन। माता तव प्रसादे ॥२२१॥ राजाभाऊ खराडे गाती। तव नामाची गीती। एक भाव धरुनि चित्ती। पूजापाठ करितसे ॥२२२॥ भावभक्तीचा परिमळ। तव चरणाची तळमळ। दु:खाची नसे झळ। तुज भजता भवानी ॥२२३॥ तूच लाविले सेवेला। बोलवूनि क्षेत्राला। म्हणून ध्यास लागला। माता तव नामाचा ॥२२४॥ दुर्धर व्याधितूनि। तूच वाचवि भवानी। अक्षय लेका देवूनि। कृपादान देतसे ॥२२५॥ राजाभाऊ होते त्रस्त। कॅन्सरने पिडीत। केला उपचार बहुत। परी न उपाय होतसे ॥२२६॥ होई आता यात अंत। वाटे माता तव पुत। सुख न वाटे जीवनात। रोगपीडा देतसे ॥२२७॥ ऐकूनि माते तव कीर्ती। आले पारडसिंगा क्षेत्री। जाणूनि तव महती। दृढभाव धरितसे ॥२२८॥ केला एक उपचार। बनूनि चरणाचा चाकर। पूजापाठ बरोबर। जवळ राहूनि करी ॥२२९॥ भावभक्ति फळा आली। कृपादृष्टी तुझी झाली। दूर करी आपात कली। वरदहस्त ठेवूनि ॥२३०॥ न घेता काही औषधी। दुरुस्त करी दयानिधी। क्षणाची न लागे अवधी। कृपा तुझी होता ॥२३१॥ म्हणून लागी सेवेला। माता भक्तवत्सला। पूर्वसंचती तो भला। म्हणून पाया येतसे ॥२३२॥ गाती माता महिमान। दूरवरी जावून। करितसे नामस्मरण। नाम जप





करुनिया ॥२३३॥ दुज्या भक्ती मार्ग दावी। माता तव पायी लावी। ज्ञानयज्ञ गावोगावी। जावूनि करितसे ॥२३४॥ पालखीचे गुणगाण। करी पालखी काढून। किन्हाया बोथली वरुन। ठाव घेई श्रीक्षेत्री ॥२३५॥ भाग्याची ही थोरी। म्हणून पालखी खांद्यावरी। नवरात्रीला आणी मंदिरी। तव कृपे भगवती ॥२३६॥ म्हणून गोड करी। लेकाची सेवाचाकरी। लोटांगण तव दारी। घाली सदासर्वदा ॥२३७॥ वर्धा जिल्ह्यात खरांगणा। एक मुसलमान भक्त जाणा। शेख गफूर नाम कवना। भजतसे माऊलीला ॥२३८॥ याच पालखी बरोबरी। येतसे नवरात्री मंदिरी। धर्म पंथाची दूरी। दूर सारुनिया ॥२३९॥ न तुला धर्माचे बंधन। सर्वधर्माचे मूळ अधिष्ठान। म्हणून भजती सर्व सज्ञन। धर्मभाव विसरुनि ॥२४०॥ एकदा घडला अपघात। छिंदवाडा–नागपूर मार्गात। होता गाडी चालवत। म्हणून आळ येतसे ॥२४१॥ विजेचे तुटले खंबे सात। होता अपघात रस्त्यात। शेख गफूर सापडे कैचीत। काय करावे कळेना ॥२४२॥ मालक म्हणे दोष याचा। तोच भोगेल त्याची शिक्षा। जशी ज्याची कर्मदशा। फळ तया मिळतसे ॥२४३॥ न्यायालयी केस चालली। परी नव्हता कुणी हवाली। समस्त कमाई गेली। दंडही न भरु शके ॥२४४॥ एकदा पालखी बरोबरी। अष्टमीला आला मंदिरी। नव्हती ईच्छा अंतरी। दर्शन घेण्या माऊलीचे ॥२४५॥ शेख गफूरला निरखूनि। वदली माता त्याक्षणी। "जरी साडी कायले आणत। पंचवीस रुपयात कागद फाटला" ॥२४६॥ बोलूनि ऐसे अमृत वचन। केले गफूरचे भविष्य कथन। परी न जाणे अज्ञ मन। कवन माऊलीचे ॥२४७॥ पैसे मागे वकील। नव्हते त्याच्याजवळ। म्हणून चुकवी ती वेळ। न्यायालयाची ॥२४८॥ न्यायालयात केस चालली। कुणी नव्हता तेथे हवाली। एकच असे रखवाली। माय माझी अनसूया ॥२४९॥ निरखूनि शेख गफूरला। न्यायाधिश तेथे बोलला। पंचवीस रुपये दंड केला। निकाल हाचि

देत से ।।२५०।। तयेवेळी तो आनंदला। आठवूनि भक्त वत्सला। पूर्वीच वर्तवि माता त्याला। पंचविस रुपयाची भविष्यवाणी ।।२५१।। आला प्रत्यय त्याला। पंचविस रुपये दंड भरला। नंतर आला श्रीक्षेत्राला। माऊलीच्या दर्शना ।।२५२।। भिजवी अश्रूनि चरण। रक्षूनि केले कल्याण। तूच दिले वरदान। राम रहिम बनूनि ।।२५३।। म्हणून येई श्रीक्षेत्री। भजण्या माँ भगवती। पालखी घेवूनि खांद्यावरती। भावभक्ति अर्पितसे ।।२५४।। नागपूरचे भाविक एक। किशोर वानखेडे सात्विक। लीन दीन सदा नेक। माऊलीच्या चरणासी ।।२५५।। लहानूजीची करी सेवा। पूजूनिया भावे देवा। करितसे सदा धावा। संत संगतीचा ।।२५६।। सत्संग लाभेजयाला। जीवनी तो उद्धरला। सुसंगती विचार फळला। फलद्रूप तो होई ।।२५७।। पाही माते तुझी प्रतिमा। लळा लाविला तू दीना। म्हणूनि आले तव चरणा। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।२५८।। अर्पूणिया भावभक्ति। अनुदिन पूजे भगवती। गातसे तव गीती। नामस्मरण करुनिया ।।२५९।। नामजप सर्वा तारी। सांगितसे परोपरी। जावूनि मंत्रजप करी। लेक तुझा भगवती ।।२६०।। म्हणून पुरवि मनिषा। तव भक्ताची आशा। देवूनि उचित दिशा। मार्ग तू दावितसे ।।२६१।। तूच रक्षी वेळोवेळी। तूच असे तया वाली। म्हणून गातसे नामावली। तुझीच माता अनसूया ।।२६२।। गुरुपौर्णिमा साजरी करी। पादपूजा करुनि दारी। तूच मातेतया तारी। संकटी धावूनिया ।।२६३।। देतसे तू सदैव जाण। भूत भविष्य वर्तमान। अंतर्ज्ञानी माता महान। ज्ञान दृष्टी देतसे ।।२६४।। "उजव्या हातानं चालू नये। डाव्या हातानं चालाव"। ठेवूनि भक्ताची जाणिव। माता तू वर्ततसे ।।२६५।। "कृष्णा कुलांग नाही ग घरी"। वद्‌तसे करुणाकरी। जाणूनि भविष्य अंतरी। तूच जाणिव देतसे ।।२६६।। दिनेश देशमुख भाच्याला। हार्ट अटॅक आला। त्यातच त्याचा अंत झाला। हृदयविकाराने ।।२६७।। तेच वर्तवि वानखडेला। देवूनि मृत्यूचा हवाला। दिनेश सोडून






गेला। म्हणून तू सांगतसे ।।२६८।। जेव्हा वार्ता कळली। शब्दाची सत्यता पटली। दिव्यज्ञानी माता माऊली। त्रिकालज्ञानी तू असे ।।२६९।। पालखी वाहूनि खांद्याला। नागपूर वरुन क्षेत्राला। येतसे महाशिवरात्रीला। भक्ती भाव ठेवूनि ।।२७०।। वाघ गुरुजी कारंज्याचे। मातेचे भक्त सच्चे। गातसे सदैव वाचे। नाम तुझे अनसूया ।।२७१।। कांता असे भाविक। दावी भक्तिची वाट। म्हणूनि बनती पाईक। माय माऊलीचे ।।२७२।। कृपा तुझी तयावर। घरी दारी लेकरावर। तव कृपेचे आगर। तूच सांभाळितसे ।।२७३।। डॉक्टर केले मुलांना। तूच माता करुणाघना। सुखसमृद्धीचा खजिना। तव कृपे लाभतसे ।।२७४।। म्हणून घंडली सेवा। चाकरी वाजवि पावा। येवूनि तव गावा। अनुदिन अहर्निश ।।२७५।। तूच करितसे पूर्तता। वेळ साधूनि भगवता। स्नान संध्येची महत्ता। गातसे भक्त तुझा ।।२७६।। करितसे नामस्मरण। देवूनि हेच शिक्षण। व्हाया सफल जीवन। नाम तारी अनसूया ।।२७७।। तुझी कृपा अपार। यातुझ्या लेकरावर। म्हणून भजी करुणाकर। मुलांबाळा सवे ।।२७८।। एकदा तात म्हणाले व्यंकटीबाळा। मी जातो पंढरपुरा। एकवेळ आपण वारी करा। पांडुरंग रायाची ।।२७९।। परीश्रद्धा असे निश्चल। अनसूया भक्त वत्सल। सकल तीर्थाचे फल। श्रीक्षेत्र पारडसिंगा ।।२८०।। म्हणून आले श्रीक्षेत्री। भजण्या अनसूया भगवती। पूजापाठ करुनि आरती। तात ईच्छा बोलतसे ।।२८१।। जावू का माते पंढरपूरी। आज्ञा करावी लेकरी। तूच माझी असे वैखरी। मार्ग दावी बाळाला ।।२८२।। हेचि ऐकूनि कवन। पाही माता एकलक्ष साधून। जाणूनि लेकराचे अज्ञान। ज्ञानदान करितसे ।।२८३।। लोक जाती पंढरपूरा। आपण जावू कौंडण्यपूरा।। म्हणून सांगे भक्तवत्सला। व्यंकटी बाळाला ।।२८४।। मानुनि आज्ञा प्रमाण। जाई कौंडण्यपूर धाम। परी आठवूनी श्रीचरण। तिर्थयात्रा करितसे ।।२८५।। दुसऱ्या वर्षी पुन्हा विचारी। जावू का कौंडण्यपूर नगरी। होई

अंतर्मुख सत्वरी। द्वैतभाव जाणूनि ।। २८६ ।। स्वमुखे देई प्रमाण। स्वहस्ते दर्शवूनि श्रीचरण। "हेच तं विठ्ठलाचं भुवन।" होय म्हणून सांगतसे ।।२८७ ।। पारडसिंगा हेचि पंढरपूर। जिथे असे रमावर। ठेवूनि कर कटेवर। भक्तोद्धार करीतसे। २८८ ।। कलियुगात काही होते। काही होत नाही। म्हणून सांगतसे माई। वैकुंठ भुवन दावूनि ।।२८९ ।। द्वैतभाव दूर करी। अद्वैताची कास धरी। तेव्हापासून वारी करी। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।२९० ।। आषाढी कार्तिक महाशिवरात्रीला। एकादशीच्या पावन पर्वाला। येई चालत श्रीक्षेत्राला। पालखी घेवूनिया ।।२९१ ।। वर्षातून तीन वारी। एका दिवसाची फेरी। असंख्य भक्त बरोबरी। कारंजावरुन येत असे ।।२९२ ।। एकादशीचे हे पुण्य। लाभतसे भक्तगण। कारंजा ग्राम पावन। होई जयामुळे ।।२९३ ।। रामरोटीचे एकव्रत। घेई हेचि भक्त। येवूनि श्रीक्षेत्रात। अन्नदान करितसे ।।२९४ ।। स्वहस्ते करुनि पाकसिद्धी। तृप्त करी भक्त भगवती। पौर्णिमेची पुण्य गीती। तव कृपे गातसे ।।२९५ ।। लक्ष्मी पूजनाच्या दिनी। पत्नी सुनंदासवे आले दर्शनी। श्रीरंगी कमळा म्हणे जननी। ओळख देवूनिया ।।२९६ ।। ॐ चे साक्षात दर्शन। देई कपाळी करुणाघन। तीन वेळा हेचि प्रमाण। देतसे भगवती ।।२९७ ।। करवूनि ओंकार दर्शन। धन्य केले जीवन। म्हणून आळविती संत सज्जन। प्रणव रुपिनी म्हणूनि ।।२९८ ।। असे हे लीलामृत। ज्याला मिळे तो पुण्यवंत। म्हणून माझे दंडवत। कृपावंत भक्तांना ।।२९९ ।। याच गावी एक भक्त। नंदकिशोर वलगावकर सेवेत। अहर्निष पूजी भगवंत। नामस्मरण करुनिया ।।३०० ।। बाळ प्रतिकचा आजार। पडे येवूनि चक्कर। मातापिता करी विचार। प्रकृती पाहुनि लेकाची ।।३०१ ।। केले बहु उपचार। औषधी देवुनि बरोबर। परी न हटे आजार। काय करावे कळेना ।।३०२ ।। वाघ गुरुजी सांगे नंदकिशोरला। शरण जावे अनसूया मातेला। दूर लोटील विकाराला। सर्व समर्थ जी असे ।।३०३ ।। जावूनि पारडसिंग्याला।



तीर्थ अंगारा आणिला। दिला तो प्रताप बाळाला। वाघ गुरुजींनी ।।३०४ ।। तीर्थ अंगाऱ्याचा प्रसाद। संजीवनी बुटीचा आस्वाद। मुलगा होई तंदुरुस्त। सेवता तीर्थ अंगारा ।।३०५ ।। म्हणून करी नाम स्मरण। क्षेत्री करुनि अन्नदान। अर्पूनिया श्रद्धा सुमन। उभयता भजतसे ।।३०६ ।। शर्माजी निस्सीम भक्त। राहूनि कारंजा गावात। गातसे संजीवन मंत्र। "ॐ श्री जय जय अनसूया माता" ।।३०७ ।। सुस्वर मधुर आवाजात। नाम जप करी अखंडीत। सर्वप्रथम करी सुरुवात। शर्माजी व सहकारी ।।३०८ ।। तेव्हापासून झाली सुरुवात। नाम जपाला ईतरत्र। सर्वदूर होई प्रख्यात। संजीवनी मंत्र हा ।।३०९ ।। माते तुला आवड भारी। तूच तया गोड करी। तूच पुरवि तया वैखरी। सुस्वर देवूनिया ।।३१० ।। नाममंत्र जो गाई। दुःख दूर त्याचे होई। तूच सर्वा प्रचिती देई। दर्शन देवूनिया ।।३११ ।। म्हणून माते तव सेवेला। स्थायिक होवूनि कारंज्याला। सुख समृद्धी घराला। तव कृपे लाभतसे ।।३१२ ।। काटेलचा एक भक्त। रामराव भाकरे नामवत। गाई नाम सदोदित। गुण तुझे गाऊनि ।।३१३ ।। कृपा या लेकरावरी। तूच माते सदा करी। म्हणूनि आळवी परोपरी। नामजप करुनिया ।।३१४ ।। यांची असे दोन मुले। अखील निखील जुळे। परी अखील ना बोले। म्हणून चिंता करितसे ।।३१५ ।। आले मातेच्या दर्शना। श्रीक्षेत्री पारडसिंगा धामा। करितसे पूजा अर्चना। कांता आरती सवे ।।३१६ ।। जाणूनि लेकराचा भाव। ही तर कृपेची ठेव। म्हणूनि देतसे ठाव। आपुल्या चरणाजवळी ।।३१७ ।। जवळ घेवूनि अखीलला। गोंजारी भक्त वत्सला। टो टो म्हणाली त्याला। कृपादृष्टी ठेवूनिया ।।३१८ ।। माता आज्ञा होता क्षणी। अखील बोलला तत्क्षणी। झाली वैखरी बोलकी जनी। अखील बाळाची ।।३१९ ।। तूच दिली वाचा माते। रक्षीले मम बाळाते। काय हवे यापरते। माऊली अनसूया ।।३२० ।। तेव्हापासून बोलू लागला। गुणमातेचे गाऊ लागला। नाम जपाचा बोल

बाला। करितसे सर्वत्र ॥३२१॥ एका भयंकर अपघाती। माता भक्त सोबती। वाचवी तूच भगवती। अभय देवूनिया ॥३२२॥ पालखी सोबत बोथली वरुनि। येता पारडसिंगा धामी। काळ आला त्या क्षणी। महाकाली जवळ ॥३२३॥ गाडी पडली खोल खाईत। झाली ती पूर्ण उध्वस्त। न वाची कुणी आत। म्हणून सर्व बोलतसे ॥३२४॥ नवरात्रीच्या अष्टमीला। अपघात हा घडला। परी रक्षी भक्त वत्सला। एकलक्ष साधुनिया ॥३२५॥ सुखरुप आले बाहेर। काच उघडताबरोबर। खरोच न पडे शरीरावर। तव कृपे भगवती ॥३२६॥ दिली होती तू कल्पना। रामरोटीत करता अर्चना। परी न जाणे अज्ञ मना। दृष्टांत दीपाचा ॥३२७॥ करीत असता आरती। विझवी दीप अज्ञात व्यक्ती। परी न होई त्याची पूर्ती। मालविण्या दीपासी ॥३२८॥ होता हा आभास। परी न माने मानस। अपघात होता क्षणास। स्मरण होतसे ॥३२९॥ तूच वाचविले माता। अभय देवूनि भक्ता। बाहेर काढी न होता। ईजा तनाला ॥३३०॥ ऐसी तुझी कृपा अपार। या भाकरे कुटूंबावर। तूच करी सुखी संसार। कृपादान देवूनिया ॥३३१॥ असा परमेष्टी परिवार। करी नाम व्यवहार। भजितसे जगदीश्वर। अढळ भाव धरुनि ॥३३२॥ तूच माता ठायी ठायी। किती गाऊ नवलाई। दिव्य दृष्टी सर्व पाही। संकटी रक्षावया ॥३३३॥ वाढला भक्त समुदाय। येवू लागले अनुभव। श्रीक्षेत्री घेई धाव। माता तव दर्शना ॥३३४॥ भक्तांचा कल्पतरु। रक्षितसे लेकरु। पुढील अध्यायी स्मरु। माया ममतेची ॥३३५॥ इतिश्री परमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। त्रयोदशोऽध्याय सम्पूर्ण ॥३३६॥ श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती॥ शांती ॥।

**।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।**





ताटातील अन्न भक्तांना देतांना माताजी

# अध्याय १४

## माताजीची भक्तोद्धारार्थ कृती



हार तोडतांना



बदाम फोडतांना



हार दिव्याजवळ नेऊन जाळतांना



भक्तांनी अर्पण केलेले नारळ फोडतांना

# श्री गणेशायनमः श्री सरस्वतैंनमः श्री गुरुदेवायनमः

जय जय देवी भवानी। अनसूया जगत्जननी। आलो मी तव चरणी। ठाव दे मजशी ।।१ ।। तूच कर्ता करविता। तूच असे बुद्धीदाता। पूर्ण करितसे कथा। तूच माता अनसूया ।।२ ।। काय माझी थोरी। मी एक कुविचारी। परी असे आधारी। तुझाचि माऊली ।।३ ।। परीस स्पर्शे लोहाला। सुवर्ण करी क्षणालां। तैसाच संग लाभला। सत्संग घडावया ।।४ ।। देई बुद्धी अनंता। पूर्ण करी ही गीता। मी तव शरणागता। आशीष मज देई ।।५ ।। शिवनीचे विठ्ठल कोहळे। तव नामे वेडे झाले। किर्तनी रंगू लागले। भवगत गाण करुनि ।।६ ।। माता तव दर्शनाला। चालत येई भक्त भला। शिवनीवरुन श्रीक्षेत्राला। परी क्षिण न येतसे ।।७ ।। एकदा महादेवी जातांना। तव नामाचा उच्चार वदना। करी भगवतीची गर्जना। शिवशंभू आळवूनि ।।८ ।। तूच उमा तूच पार्वती। तूच शंकर अधिपती। तुझ्याच नामाची कीर्ती। गाजतसे त्रिलोकी ।।९ ।। तूच बसली कैलासशिखरी। बनूनि शिवशंकर गौरी। करितसे भक्ताची चाकरी। भक्तवत्सला भगवती ।।१० ।। करुनि आईचा गजर। वाट चाली पामर। परी रस्ता भुलला पोर। काय करावे कळेना ।।११ ।। तेवढ्यात चमत्कार घडला। शेतातून आवाज आला। आदीवाशी पेहराव दिसला। न उलगडे कोडे हे ।।१२ ।। एक बाई चालत आली। हाथ धरुन ती वदली। विंचू चावला मज भोली। उतरवी तू क्षणात ।।१३ ।। विठ्ठल अचम्बित झाला। न जाणे मंत्र भला। कुठून आली ही बला। कैसी परीक्षा घेतसे ।।१४ ।। काय करावे या क्षणी। आळविली माँ भवानी। तूच असे शक्तीदायिनी। रस्ता मज दाखवि ।।१५ ।। घेवूनि अनसूया नाम। कापूर जाळी तत्क्षण। उतरविला तिच्या अंगावरुन। गजर करुनि मातेचा ।।१६ ।। विंचू क्षणात उतरला।

बाई म्हणाली गेली बला। तू जाय अपुल्या कामाला। म्हणौनि दूर होतसे ।।१७।। काही दूर गेल्यावरी। न दिसे छायापरी। अंतर्धान पावली सत्वरी। गुह्य मागे ठेवूनिया ।।१८।। करुनि महादेवाची वारी। विठ्ठल येई माता दारी। श्रीक्षेत्री पारडसिंगा नगरी। दर्शन घेण्या मातेचे ।।१९।। शिर ठेविता चरणावर। वदली भगवती सत्वर। विंचू उतरविला बरोबर। मर्म जाणी भक्ताचे ।।२०।। विठ्ठलच्या ध्यानी आले। बाईच्या रुपी ब्रह्म भेटले। जगदम्बेचे दर्शन घडले। महादेवाच्या वाटेवरी ।।२१।। होतो जरी चुकलो वाट। तूच दाविला भक्तिघाट। अरण्य होते घनदाट। तरी वाट मिळतसे ।।२२।। विंचवाचा बहाना केला। भक्तिमार्ग सोपा झाला। दर्शन देवूनि पामराला। निर्जन वनात ।।२३।। "झोळी टांग भीक मांग" म्हणाली। म्हणौनि घेई कीर्तन झोळी। परमार्थाची वाट चालली। माता तव आज्ञेने ।।२४।। असे माता महिमान। सर्व स्थळी तूच जाण। जळी स्थळी काष्ठी पाषाण। मूळ पीठ सर्वाचे ।।२५।। देवीदेवता तव ठायी। तव नामाची गीती गाई। भजती अनसूया माई। लोटांगण घालूनिया ।।२६।। पारडसिंग्याचे एक भक्त। चिंतामनराव खंडाईत। भजती माता समस्त। गुण गाण करुनिया ।।२७।। एकदा पडले आजारी। त्रस्त होई अती विकारी। दुरुस्त न होई सत्वरी। म्हणून चिंता करितसे ।।२८।। हीच शेवटची अवस्था। मरणकाळ अत्यावस्था। शोक होई समस्ता। न वाचेल म्हणूनिया ।।२९।। तरी न्यावे नागपूरला। दवाखानी उपचाराला। होई रडारड क्षणाला। अत्यावस्था बघूनिया ।।३०।। त्याचवेळी माता आली। स्वयं गाडीत जावून बसली। अभय देवूनि वदली। 'लवकर येतं' म्हणूनि ।।३१।। चिंतामनरावांना आला विश्वास। दुरुस्त होतो हमखास। न होई आता मला त्रास। माय माझी असतांना ।।३२।। माता तव कृपेची धार। त्वरित झाला उपचार। आले घरी लवकर। दुरुस्त होवूनिया ।।३३।। मरणासन्न अवस्थेतूनि। वाचवि अनसूया जननी। तोच आठवि






तव वचनी। त्रिकालदर्शी भगवती ।।३४।। रामबहादूर भंडारी। नेपाळहून आला नगरी। करण्या गावी चाकरी। गावशिव राखूनिया ।।३५।। गस्तवाले गस्तलावा। वस्तीवाले हुषार व्हा। डाका पडेल गावा। म्हणून तू सावध करी ।।३६।। आई सांगे नेपालीला। जागे केले मुलाला। भीती वाटे मनाला। परी अभय तू देतसे ।।३७।। साथी विनंती करी। आई मम रक्षा करी। कोठे होईल चोरी। वाचवि तू यातूनि ।।३८।। म्हणून चक्कर मारले। गाव पालथे घातले। परी चोर न दिसले। पुन्हा पुन्हा बघूनिया ।।३९।। रात्रीचे दोन वाजले। मग मंदिरी आले। चौकशी करु लागले। तेथील भक्तांची ।।४०।। केली त्यांची विचारणी। रजिस्टर पाही तपासूनि। कोपऱ्यात होता एक बसूनि। न करता हालचाल ।।४१।। न सांगे गाव ठिकाणा। कसा आलो काही कळेना। एके ठायीचा हा बहाना। न कळे मजला ।।४२।। चोरी करण्या मी आलो। परी येथेच येवून बसलो। एके जागी रुतून बसलो। न उचली पाय माझा ।।४३।। येथे मी आलो कसा। कसी सूचली अवदशा। मीच होई येथे पिसा। कळेना मज काही ।।४४।। पकडून दिले चोराला। बसवून ठेवले त्याला। चोरीचा अनर्थ टळला। आई तुझ्या कृपेने ।।४५।। तुझ्या वचनाची किमया। खरी केली महामाया। भक्ताचे रक्षण कराया। धावुनि जातसे ।।४६।। म्हणून आला तव चरणी। तूच असे ध्यानी मनी। चाकरी करी अनुदिनी। माता तव चरणासी ।।४७।। याच क्षेत्री एक भक्त। नाम श्रीधर खंडाईत। रक्षी माता तया पुत। संकटी धावूनिया ।।४८।। हरीभाउच्या दुकानी। श्रीधर होता कामी। संकट आले तत्क्षणी। त्यातून तूच रक्षिले ।।४९।। एकाएकी पाऊस आला। म्हणून तो ओला झाला। विद्युत प्रवाह बाधला। पूर्ण शरिरासी ।।५०।। एक तार होता तुटला। त्यात तो पाण्याने भिजला। म्हणून शॉट लागला त्याला। बेशुद्ध पडी क्षणात ।।५१।। तोच तू जाणिले मंदिरी। संकट आले भक्तावरी। निवारण त्याचे तू करी। दूरदृष्टी ठेऊनिया ।।५२।।

दृष्टांत माते तू दिला। तात दामोधर खंडाईतला। बापू मरणाच्या दारात गेला। म्हणूनि सांगतसे ॥५३॥ तोच पिता धावत आले। दृष्य बघूनि घाबरले। बेशुद्ध मुला पाहिले। काय करावे कळेना ॥५४॥ आई तुच जाणिव दिली। विद्युत पुर्ण बंद केली। तव किमया तू केली। वाचविण्या मुलासी ॥५५॥ ओला होता म्हणौनि। विद्युत बाधी तत्क्षणी। मुकला असता जीवनी। रामराम म्हणूनिया ॥५६॥ जैसे रक्षी प्रल्हादासी। धावत येउनि ऋषीकेशी। तैसेच तू भक्तांसी। संकटी तारितसे ॥५७॥ तूच पाठविले ताताला। विद्यूत बंद करण्याला। वाचविले तू श्रीधरला। अभय देउनिया ॥५८॥ नसते जर आले कोणी। संपलीअसती जीवनकहाणी। परी तू असता भवानी। घडेलचि हे कैसे ॥५९॥ म्हणून गाई तव गाण। करी पूजन अर्चन। धरी सदैव चरण। भावभक्ती ठेवूनि ॥६०॥ रथसप्तमी पर्वाला। आई तू गेली आष्टीला। मध्येच थांबी जुनापानीला। सिंधुताई डोंगरे घरी ॥६१॥ पोटाचा जडला विकार। नानापरी केले उपचार। दूर करी तू आजार। नारळ फोडूनिया ॥६२॥ जाता जाता सर्व पाही। भक्तांची हाक घेई। रोगराई दूर नेई। माय माझी अनसूया ॥६३॥ भाउराव डोंगरे सधन। जुनापानीचे सज्जन। मंदिरी येउनि दर्शन। घेतसे भगवती ॥६४॥ पाणी नव्हते विहिरीला। आर्जवि तव चरणाला। घे पाणी वदली त्याला। परी ना कळे अर्थ काही ॥६५॥ गंगेला आला महापूर। चंद्रभागेचा बुडाला कळस। आई म्हणाली भाउरावास। पाणी फेकून अंगावरी ॥६६॥ तवकृपे खोदी विहीर। पाणी लागे भरपूर। झरा न दिसे दूरवर। परी जल येतसे ॥६७॥ ऐसा तुझा कृपाप्रसाद। मिळाला भाउरावास। म्हणौनि भजे रात्रंदिवस। महाशक्ती अनसूया ॥६८॥ गोंडी वाढोण्याचे भक्त। पार्वती ठाकरे नामवत। झाल्या होत्या त्रस्त। खाणेपिणे बंद असे ॥६९॥ वारंवार बसे दातखिळी। खाण्याशी बाधा आली। अशक्तता वाढली। रक्तही आटतसे ॥७०॥ म्हणून केले तिला भरती। सावनेर दवाखाण्याती। परी





न उपचार चालती। औषधोपचार करुनिया ॥७१॥ तोच तू दृष्टांत दिला। रघुनाथ पाटील ठाकरेला। काय देशील तू मला। म्हणौनि विचारितसे ॥७२॥ पाचशे रुपये केले कबूल। अर्पण कराया श्रद्धा फुल। न जाणे कोणी तव बल। का मागावे तुज लागे ॥७३॥ तूच साक्षात महालक्ष्मी। का मागी भक्तालागूनि। माता तुझे तूज जाणी। दीन लीन मी असे ॥७४॥ श्रद्धा ठेविती अंतरी। पार्वतीबाई झाली बरीं। रोग मुक्त होई तत्परी। भगवती कृपेने ॥७५॥ म्हणूनि आले मंदिरी। पाचशे रुपये अर्पण करी। शब्द तव पूर्ण करी। नतमस्तक होउनि ॥७६॥ तूच जाणी अंतरी। म्हणून केली चाकरी। काय मागी कवणापरी। अंतर्ज्ञानी माता माझी ॥७७॥ रेणूका मातेच्या मंदिरी। नवस करी एक नारी। घंटा बांधेल तव मंदिरी। जरी टळेल विघ्न ॥७८॥ ऐकला तिचा धावा। हरले विघ्न तेधवा। विसरली नवस फेडाया। रत होई संसारी ॥७९॥ नंतर आली मंदिरी। मस्तक ठेवी चरणावरी। रेणूका दिसे सत्वरी। आई तुझ्या रुपात ॥८०॥ दिली नवसाची आठवण। कसे झाले विस्मरण। हरले का तुझे विघ्न। का न आठवे तुज ॥८१॥ खिन्न वाटे तिला। कसे विसरली नवसाला। क्षमा करी मुलीला। अजान अज्ञान मी ॥८२॥ आई तूच रेणूका देवी। मज पतिता दर्शन देई। करिते आता घाई। नवस फेडण्याची ॥८३॥ म्हणून आली मंदिरी। घंटा बांधी सत्वरी। गजर करी नरनारी। आई तव नामाचा ॥८४॥ वानखडे गरीब त्रस्त। आले आश्रया मंदिरात। सोडूनि घरदार आप्त। सेवा करी मातेची ॥८५॥ निष्काम अविरत सेवा। उपासी पोटी भजे देवा। मिळेल त्यावर जगवी काया। गुणगाऊनि मातेचे ॥८६॥ परीक्षेत तो पूर्ण उतरला। तव कृपेस पात्र झाला। आता तो मालगुजार बनला। जगदम्बा कृपेने ॥८७॥ आई तू गाडीत बसली। स्वत: त्याच्या गावी गेली। गावच्या सीमेवर दिसली। घेई तुला कडेवर ॥८८॥ पूजा अर्चा तव केली। खणा नारळाने ओटी भरली। म्हणे असू दे

अशीच सावली। आळवितसे परोपरी ।।८९।। रावाचा क्षणात रंक होई। रंकाचा राव होई। भावभक्तिची ही ग्वाही। जो भजी ज्या भावे ।।९०।। कृपा करी ज्यावरी। नंदनवन तेथे करी। म्हणूनि आलो तव दारी। पदरी घे पामराला ।।९१।। आंजीचे पांडूरंग रेवतकर। सेवक तुझे खरोखर। हॉटेल किराणा बरोबर। चालवितसे तव कृपे ।।९२।। जावूनि तया घरी। मनोरथ पूर्ण करी। आर्जवूनि परोपरी। भार टाकी तुजवरी ।।९३।। तीन लाखाचा झाला लाभ। उदया येई तव भाग। आई कृपेचा हा विभाग। संपत्ती दारी लोळतसे ।।९४।। तुझी छाया मिळाली। लक्ष्मी दारी आली। भजती जगतवल्ली। दृढश्रद्धा ठेवूनिया ।।९५।। काटोलचे अन्ना मुंदाफळे। ममता तया तुझी मिळे। कौटुम्बिक संकट पळे। माता तव कृपेने ।।९६।। मुलबाळं होती घरी। परी त्रास असे अंतरी। कांत कांता विभक्त परी। सौख्य नसे कुटूम्बात ।।९७।। व्रत वैकल्य सर्व केले। परी समाधान ना झाले। कुटुम्ब दुरावत गेले। अठरा वर्षापासूनि ।।९८।। मग आले तुला शरण। त्रिपूरी पौर्णिमेचा दिन। दर्शनी झाले समाधान। सुखवि तव बाळाला ।।९९।। हर एक पौर्णिमा येई। नारळ अर्पण तवपायी। पारायण तुझ्या ठायी। करितसे अखंडित ।।१००।। तव कृपा दृष्टी फिरली। प्रेमज्योत मनी जागविली। सुखसमृद्धी घरा आली। मुंदाफळे कुटूम्बाच्या ।।१०१।। तव लीलेने एक झाले। भेदभाव सर्व मिटले। सुखशांतीचे आगर बनले। महाशक्ती कृपेने ।।१०२।। प्रेमपान्हा तू देई। तव बाळा तू सुखवी। अंध:कार दूर नेई। प्रकाशज्योत तेवूनिया ।।१०३।। दिलीप चांडकच्या दवाखानी। गेलीमाते भारसिंगी ग्रामी। फिरु नको रानोवनी। म्हणूनि सांगतसे ।।१०४।। म्हणून काटोल मुक्कामी। सुरु करी औषधपाणी। दवाखाना तेथे थाटूनि। संपन्नता मिळतसे ।।१०५।। भोपालचे के. एस. खेडले। आई तुझे भक्त भोळे। दैन्य दु:ख दूर केले। समृद्धी देवूनिया ।।१०६।। बहिनीचा पागलपणा। दूर करी करुणाघना। नोकरी लावूनि दीना।






सहारा तू देतसे ।।१०७।। प्रशान्त मालेकरच्या अंगी। शैतान संचरी दुर्भागी। पौर्णिमेची आस लागी। महाशक्ती दर्शनाची ।।१०८।। धरुन आणलं प्रशान्तला। वर्धेवरुन श्रीक्षेत्राला। टाकिले तव चरणाला। दृढश्रद्धा ठेवोनि ।।१०९।। अमृतदृष्टीचा परिणाम। दुरुस्त होई तत्क्षण। केली त्याची व्याधिहरण। एकटक पाहूनिया ।।११०।। मानिकराव तायवाडे भाविक भला। राही खापरी ग्रामाला। कमलविमलला विकार जडला। परी न होई दुरुस्त ।।१११।। उपचार करण्या पैसे नाही। गरिबीने अवकळा येई। मरणपंथे मुली जाई। रामराम म्हणूनिया ।।११२।। सखूबाई म्हणे मालकास। बंडी मागावि केने पाटलास। जाऊ मातेच्या दर्शनास। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।११३।। बंडीत बसून निघाले। घेवूनि कमला विमलाले। जीवना नदी समीप आले। तोच दृष्टान्त देतसे ।।११४।। सावता आळवि विठ्ठलाला। परी न जाई पंढरपूरला। रमावरच येई भेटीला। सावताच्या मळ्यात ।।११५।। तैसेच माते तू केले। नाम तव सार्थ केले। दीनदु:खीतांचे रखवाले। म्हणौनि तुज म्हणती ।।११६।। ऐकूनि भक्ताची आर्त हाक। धावत येई क्षणात। होती सर्व अचम्बित। समोर पाहूनि आईला ।।११७।। जीवनातिरी उतरले। मातेचे दर्शन घेतले। म्हणे, तूच आता रखवाले। वाचवि या लेकीला ।।११८।। आहे रांडायची बदमाशी। वचन हेच म्हणविशी। काही न घडे लेकीसी। जा अपुल्या घराला ।।११९।। जीवनदायी जीवना नदीत। टाकून रोग पात्रात। केल्या कन्या रोगमुक्त। तूच माता भगवती ।।१२०।। विमलला मुलगा नव्हता। म्हणून आळवि माता। प्रदान करी पुता। भर अहेर करेल म्हणे ।।१२१।। घेऊनि मातेचे दर्शन। ज्ञानेश्वर आर्जवि मनोमन। केली ईच्छा पूर्ण। बाळ तये देवूनि ।।१२२।। गेली तू नामकरणाला। खापरी गावी सदनाला। जवळ घेऊनी बाळाला। नाव तू देतसे ।।१२३।। पादपूजा करुनि। अहेर करी भवानी।

ईच्छापूर्तिची पर्वनी । भक्ता घरी येत्तसे ।।१२४ ।। राव रंक असो कोणी । ईच्छा पुरवि नारायणी । जाऊनि तया सदनी । न पाळी भेदाभेद ।।१२५ ।। नाही तुज असूया । म्हणून म्हणती अनसूया । गोरगरिबाची माया । तूज ठायी भगवती ।।१२६ ।। डिंडरगावचे मधुकरराव नागमोते । भावे पूजि भवानी माते । तूच रक्षी तया पुते । वेळोवेळी धावूनि ।।१२७ ।। बहर आला संत्राझाडाला । सुखसमृद्धी येई घराला । परी अज्ञ असे या वार्तेला । दुजे येऊनि सांगती ।।१२८ ।। आईचा हा कृपाप्रसाद । आला बहर संत्र्यास । रक्षिले माते भक्तास । कृपादृष्टी ठेवूनिया ।।१२९ ।। एकदा सुकली सर्व झाडे । दुष्टबुद्धीची ही पाडे । कैसा कोप मम भागे । म्हणून आळवि मातेला ।।१३० ।। अंगाऱ्याचे करुनि पाणी । फेकी वृक्षतनावरुनि । तोच पूर्ववत होई पर्णी । कृपाछत्रे तुझ्याचिया ।।१३१ ।। शत्रू आले माराया । परी आठवि तुझी माया । तूच मित्र बनवि तया । दुष्ट बुद्धी न धरी ।।१३२ ।। वडशाच्या सिंधूताई उईकेला । दुर्धर रोग जडला । परी तूच वाचवि तिला । वरदहस्त ठेवूनि ।।१३३ ।। वाचविले तू यादव बागडेला । भिष्णूरच्या तव मुलाला । पळवूनि भूत भानामतीला । दर्शन देवूनि सत्वर ।।१३४ ।। शेंदूरजना माहूरचे भक्त । अंबादास पिकलमुंडे ज्ञात । कोराडी देवीला भजत । गुण गाऊनी मातेचे ।।१३५ ।। महालक्ष्मी देवी भागे । अनसूया दर्शन लाभे । मार्ग दावी भूभागे । महाशक्ती महामाया ।।१३६ ।। जीवनात होती भ्रमंती । चित्त न राहे एकाप्रती । परी तूच देई सुस्थिती । संकटी धावूनिया ।।१३७ ।। तूच दाखवि मार्ग । सत् असताचा सर्ग । कुठे असावे गर्ग । म्हणूनि सांगतसे ।।१३८ ।। पौर्णिमेच्या पर्वाला । आले माता दर्शनाला । एक लीटर पेट्रोल गाडीला । घेवूनि निघतसे ।।१३९ ।। पुढे टाकू पेट्रोल गाडीत । म्हणून आले कळमेश्वरात । परी पेट्रोल पंप बंद असत । म्हणून तैसेचि निघाले ।।१४० ।। न मिळे कुठे पेट्रोल पंप । परी गाडी चाले आपोआप । दूर होती महापाप । सद्‌गुरु कृपेने ।।१४१ ।। पारडसिंगा धामी आले ।






माते तव भजू लागले । दर्शन करुनि निघाले । समाधान पावूनिया ।।१४२ ।। न टाकले कुठेच पेट्रोल । तरी आले घराजवळ । टाकी पाही तयेवेळ । एक लीटर तैसेचि ।।१४३ ।। न खर्च झाला एक बूंद । तेवढेच पेट्रोल डबाबंद । गाडी चालवि मतीमंद । परी खर्च न होतसे ।।१४४ ।। आई आले तुझ्या मना । तूच चालवि जीवना । म्हणून येई तव चरणा । अंबादास भक्त तुझा ।।१४५ ।। सुरेन्द्र पाटील घोराडचे । सांगितले ऑपरेशन नाकाचे । सर्दी पडसा सतत जाचे । त्रस्त करी जीवाला ।।१४६ ।। आले माता तव मंदिरी । शिष ठेविले चरणावरी । वरखडी तू नाकापरी । शस्त्रक्रिया करितसे ।।१४७ ।। आईचे मारणे रागावणे । अमृतदृष्टीचे हे देणे । कृपेचे हेचि जिणे । उद्धार करी भक्तांचा ।।१४८ ।। पाणी वाहणे बंद झाले । ॲलर्जीचे संकट टळले । शस्तक्रिया न करता गेले । अरिष्ट भक्ताचे ।।१४९ ।। तुझाच असे सर्वठाव । अर्पण करी जो भक्तिभाव । दूर करण्या त्याचा काव । समर्थ तूचि असे ।।१५० ।। डिग्रसचे बाळासाहेब खडतकर । भावभक्तीचे हे घर । वर्गणीचा येतसे फेर । माता तव सप्ताहाला ।।१५१ ।। कमेटीचे सदस्य आले । गहू मागण्या उत्सवाले । परी त्यांनी न दिले । धान्य नव्हते म्हणूनि ।।१५२ ।। नंतर गेले दर्शनी । मंदिरी अनसूया जननी । तोच तू वदे वचनी । 'थे गहू घे बरं' ।।१५३ ।। त्याक्षणी येई ध्यानी । गहू न दिले म्हणूनि । तेच सांगतसे भवानी । दिव्यदृष्टी ठेवूनिया ।।१५४ ।। मग येतसे घरी । गहू अर्पण करी । सप्ताह साजरा करी । श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।१५५ ।। बघा आईचा महिमा । कमी न होई एक दाना । कोठी भरुनि सदना । गहू दिसतसे ।।१५६ ।। पाच पोते देवूनही । कोठी खाली न होई । तव कृपेची नवलाई । पाहतसे लोचनी ।।१५७ ।। ऐसी माता कृपासिंधू । पार करी भवबिंदू । म्हणून तुज आधी वंदू । महालक्ष्मी अनसूया ।।१५८ ।। आलो मी तव दारी । दूर नको लोटू लेकरी । तूच वसे मम अंतरी । ठाव देई चरणावरी ।।१५९ ।।

तूच शारदा सरस्वती। अनसूया भगवती। कैसी देई प्रचिती। पुंढील अध्यायी ऐकावे ॥१६०॥ इतिश्री परमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करूनि तव सुता। चतुर्दशोऽध्याय सम्पूर्ण ॥१६१॥ श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती॥ शांती॥।

## ॥ ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ॥





# अध्याय १५



स्नान केल्यानंतर आईची मुद्रा



जांभळीच्या वृक्षा खाली
माताजी आंघोळ करतांना

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतेनमः श्री गुरुदेवायनमः

ॐ नमो भगवती। तुच माता आदी अंती। चारही वेद गाती। महिमा माऊलीचा ।।१ ।। गिताख्याचे दोहन। आहे सर्व पुराण। परी देतसे ज्ञान। तूच माता अनसूया ।।२ ।। तूच गीता भागवत। सर्व कला तुला ज्ञात। तूच असे सर्व व्याप्त। सर्वेश्वर ईश्वरा ।।३ ।। आई तू सरस्वती। तूच सर्वा बुद्धीदाती। आली याची प्रचिती। डॉ. अभिमन्यू आखरेला ।।४ ।। पांढुर्ण्याचे डॉ. आखरे। श्रद्धा त्यांची पुरे। वाजवि ज्ञानाची नुपुरे। नामस्मरण करुनिया ।।५ ।। पी.एच.डी. करणे होते। म्हणून लिहिले लेखाते। प्रबंध दाखवि माते। आशीर्वाद घेण्यासी ।।६ ।। रात्रभर ठेवि प्रबंधासी। भगवतीच्या चरणासी। एकटक पाही त्यासी। कृपादृष्टी ठेवूनिया ।।७ ।। घेवूनि ते लिखान। विद्यापिठी सादर पुर्ण। निकालाची ओढ जाण। वाट त्याची पाहती ।।८ ।। प्रबंध पास झाला। अभिमन्यू डॉक्टर बनला। प्रमाणपत्र अर्पि तुला। श्रीक्षेत्री येवूनिया ।।९ ।। आई तुझे हे कृपापत्र। पी. एच. डी. चे प्रमाणपत्र। स्विकारी हे सेवाव्रत। अज्ञानी बाळाचे ।।१० ।। निरखूनि प्रमाणपत्र। ज्योतीवर धरी त्वरित। जाळिले ते समस्त। राखरांगोळी होतसे ।।११ ।। तव ते घाबरले। म्हणे आई कैसे केले। महत्वाचे लेख जळाले। काय करु मी आता ।।१२ ।। परी होती श्रद्धा अचल। माता वाढवि मनोबल। तैसेच करी घर जवळ। पांढुर्ण्यासी जावूनि ।।१३ ।। तोच चमत्कार घडला। कागद दारात सापडला। उचलूनि पाही त्याला। निकालाचा दिसतसे ।।१४ ।। तव ते अचम्बित झाले। अघटित हे कैसे घडले। समक्ष जे मी पाहिले। विपरीत हे असे ।।१५ ।। माते, तू जो कागद जाळला। तोच दारात येवून पडला। निकाल पाहूनि आनंदिला। पी.एच.डी. मिळतसे ।।१६ ।। तूच केले लिखान। पी. एच. डी. निधान।

विद्यापीठी संधान। आई, तूच बांधितसे ।।१७।। जाळूनि तो कागद। दूर केले आपात। आणून दिला घरात। निकाल लावूनिया ।।१८।। तवकृपेने मिळे। सुखसमृद्धी बाळे। शिक्षण क्षेत्री सर्व चाळे। तूच पुर्ण करितसे ।।१९।। माता तू आज्ञा करी। डॉ. आखरेला घरी। एक्कावन नारळ अर्पण करी। मंदिरी येवूनिया ।।२०।। "वासाची साबन आण मला। अंग धुण्या चिमाईला"। सांगितले तू त्याला। आज्ञा त्यासी करुनि ।।२१।। मानूनि तव शब्द प्रमाण। एक्कावन नारळ करी अर्पण। श्रद्धाभाव पूर्ण ठेवून। आई तव चरणावरी ।।२२।। तोच तू घेई नारळ। फोडी एकेक तात्काळ। रात्रभर निघे बोल। चिमाई म्हणूनिया ।।२३।। फोडूनि सर्व श्रीफळ। कृपा केली तयावर। रात्रभर करी उपचार। दु:ख त्याचे हरण्यासी ।।२४।। त्रासवि तू स्वत:ला। भक्ताचे दु:ख दूर करायला। भावभक्ती येई फळाला। जो भजे ज्या भावे ।।२५।। रयतेच्या सुख समाधानी। राम हिंडे रानोवनी। तैसीच तू करणी। जनहिता करितसे ।।२६।। भक्तीचा हाच आधार। भार टाका मातेवर। पूर्ण करी ती उपचार। कष्टवूनि देहासी ।।२७।। फ्रेंच पती पत्नी दर्शना येती। सौ. सिंग असे सोबती। पूज्य शिवनेसन स्वामी पाठविती। माता तव दर्शना ।।२८।। भारतीय संस्कृतीचा अभ्यास। फ्रेंच जोडप्याचा निजध्यास। सत्य संस्कृतिचा मानस। घेवून येई श्रीक्षेत्री ।।२९।। जाणे होते उमरीला। म्हणून विचारी तुला। वंदूनि तव चरणाला। परवानगी मागितसे ।।३०।। माता तू इंग्रजीत वदली। 'यु गो टू उमरी' म्हणाली। व्हेन म्हणता उत्तरली। 'ऑन वेनज्डे मॉर्निंग' ।।३१।। भाषेचा न आला अडथळा। समजली त्यांच्या बोलीला। उत्तर दिले त्यांच्याच भाषेला। सर्वज्ञ तू असे ।।३२।। सर्व भाषांचे ज्ञान। मातेच्या अंगी जाण। वंदन करी पुराण। गुण गाऊ निया ।।३३।। एक महिन्याच्या वास्तव्यात। तू बोले सवे इंग्रजीत। फ्रेंच जोडपे होई आनंदित। लीला पाहूनि मातेची ।।३४।। म्हणे साक्षात अवतार। प्रत्यय आला





खरोखर। म्हणून भजती नारीनर। जगदम्बा मातेला ।।३५।। विदेशातून भक्त येती। माता चरणी लीन होती। स्वामी सत्यानंद सरस्वती। येतसे स्पेनवरुनि ।।३६।। दक्षिण भारताचे शिवक्षेत्र। तिरुवन्नमलई पवित्र। सेवाव्रत घेई अहोरात्र। श्रीक्षेत्री राहूनिया ।।३७।। मातेची प्रतिमा पाहिली। तव दृष्टी स्थिर झाली। दर्शनाची ओढ लागली। म्हणून आले पारडसिंगा ।।३८।। स्वामीजी कीर्ती गाती। नाही कुठे अशी शक्ती। महामाया मायावती। जगत्‌वंद्य जी असे ।।३९।। "सिंग ए साँग" माता म्हणाली। इंग्रजीत सवे बोलली। सर्वभाषा ज्ञात माऊली। त्रिकालज्ञानी तू असे ।।४०।। अंतरीच्या जाणे खुणा। न पुरे शब्दबाणा। न बोलता जाणे मना। विश्वजननी अनसूया ।।४१।। स्वामी चिदम्बरानन्द आले। आई तुझ्या दर्शनाले। परी शंका करु लागले। भाषा कळेना मातेची ।।४२।। त्यांच्या सवे बोलू लागली। भाषेची शंका दूर झाली। त्यांच्याच भाषेत बोलली। सर्वज्ञ अनसूया ।।४३।। सर्वभाषा तुला ज्ञात। तूच असे आदी अंत। सर्वांवरी करी मात। कृपादृष्टी ठेवूनिया ।।४४।। हरी हरानन्द सरस्वतीजी। येती तव दर्शनासी। परी तृप्त न होई मानसी। दर्शनी भगवती ।।४५।। दावूनि विविध रुप। अनेक रुपातील स्वरुप। जाणती तव प्रारुप। काशीक्षेत्री स्वामीजी ।।४६।। आई तुझा महिमा। येतसे संत सज्जना। भजती दोष हरण्या। दयासिंधू अनसूया ।।४७।। म्हणून ते क्षेत्री येती। भजण्या माँ भगवती। तूच असे त्रिजगती। सुखसागर महामाया ।।४८।। मुंबईच्या उषा बोहरा। भजती साई रमावरा। आले तव दरबारा। पती रमेश बोहरा सवे ।।४९।। लक्ष्मी पूजनाचा दिन। रमेशला होई दर्शन। लुगड चोळी बांगड्या घालून। एक बाई दिसतसे ।।५०।। कोण असेल ही बाई। न ओळखी तुला माई। म्हणून गेले गुरुपायी। शिवनेसन स्वामीकडे ।।५१।। सांगतसे दृष्टांत महिमा। बाई कोण सांगा अज्ञाना। हसतसे स्वामीजी मना। खेळ सारा आईचा ।।५२।। पाहूनि आईची प्रतिमा।

म्हणे हिच तर येई दर्शना । काय हिचा ठाव ठिकाणा । सांगा स्वामीजी आम्हांसी ।।५३ ।। ही आहे महाशक्ति । नाम अनसूया भगवती । दर्शनी तुज बोलविती । श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।५४ ।। म्हणून आले तव दर्शनी । परी तू नव्हती धामी । गेली होती वर्धा मुक्कामी । उद्धरण्या नरनारी ।।५५ ।। येताक्षणी आई वदल्या । मारवाडी आले म्हणाल्या । त्याच भाषेत बोलल्या । भगवती अनसूया ।।५६ ।। भावानं बहिनीला नेलं नाही । बुरुजावरुन गाडी गेली नाही । सांगतसे अनसूया माई । भक्ताकडे पाहूनिया ।।५७ ।। 'पंढरपूरच्या अंगणात तुळशी लावली । देव घालते पाणी' । देव झाला सोनार । देव झाला कंदोई ।।५८ ।। जो बनवितो मिठाई । मारवाडी म्हणती कंदोई । मातेने दिली ग्वाही । मारवाडी भाषेत ।।५९ ।। नाही येत अडथळा । भाषेचा माते तुला । सर्वज्ञात तुला कला । भक्तवत्सला अनसूया ।।६० ।। केले तू समाधान । त्यांच्याच भाषेत बोलून । म्हणून गातसे गाण । मंदिरी येवूनिया ।।६१ ।। करी स्वामीजी मार्गदर्शन । धरण्या मातेचे श्री चरण । म्हणून आईचे असे कवन । 'जोखड्यांनी पाखरु मागं लावल' ।।६२ ।। दिले मुंबईला दर्शन । उषा रमेशला मनोमन । गोपालच्या कडेवर बसून । येतसे घराला ।।६३ ।। आई तू आशीर्वाद दिला । म्हणून आली चरणाला । मुंबई वरुन श्रीक्षेत्राला । तुझीच कृपा म्हणौनि ।।६४ ।। साई माई अद्वैत । सांगतसे कृपावंत । स्वामीजी सदैव गात । अद्वैत महिमा तुझाचि ।।६५ ।। एकदा सिनेमा दिग्दर्शक आले । रामानंदसिंग मुंबईवाले । सिनेमा काढतो म्हणाले । आई तुजवरती ।।६६ ।। पाहूनि भक्ताचा भाव । देतसे तू ठाव । परी जेथे अहंभाव । जाण तू ठेवितसे ।।६७ ।। तूच ओळखी त्याला । नाही हा भक्त भला । जाणिव देई दासाला । सिनेमा निघत नाही म्हणूनि ।।६८ ।। सावध माता तूच करी । येई धावूनि सत्वरी । भूत भविष्य कथन करी । दूरदृष्टी ठेवूनिया ।।६९ ।। उल्हास नगरचे रहिवासी । रमा ठाकरे नामे तिसी । आली तव दर्शनासी । श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।७० ।।





मंदबुद्धी अविचार । पागलपणा विकार । पागलखाण्याचा उपचार । करितसे वेळोवेळी ।।७१ ।। आई तुझ्या चरणी आली । पूजा अर्चा तव केली । व्याधी तू दूर केली । नारळ फोडूनि डोईवर ।।७२ ।। ईजा न होई तिळभर । न लागे काही मार । पागलपणा गेला सत्वर । आशीर्वादे भगवती ।।७३ ।। नरसामातेचा गड झाला । मंदीनी मातेचा बालेकिल्ला । रेहकी गावाचा बोलबाला । भजती भक्त मातेला ।।७४ ।। ऑटोरिक्षाला अपघात झाला । डॉ. बाळ भजी मातेला । वाचविले तू मुलाला । थोर महिमा तुझाचि ।।७५ ।। महासतीच्या दर्शनाला । जावून यावे पारडसिंग्याला । मंदीनी मातेने आग्रह केला । म्हणून येती श्रीक्षेत्री ।।७६ ।। मंदीनी माता गेली मंदिरी । दर्शन घेवून येई बाहरी । परी ओढ लागतसे अंतरी । दृष्टादृष्ट होण्याची ।।७७ ।। तैसिच ती निघाली । गाडी नादुरुस्त झाली । न पुढे जावू शकली । विचारमग्न होतसे ।।७८ ।। आई तुला दया आली । गाडीत तू जावून बसली । मंदीनी सवे बोलली । दृष्टादृष्ट करुनिया ।।७९ ।। भक्ताचे जाणूनि हीत । धावत गेली त्वरीत । पूर्ण करी मनोरथ । मंदीनी मातेचे ।।८० ।। गाडी आपोआप सुरु झाली । नागपूर मार्गे निघाली । दर्शनाची पूर्तता झाली । लाज राखी भक्ताची ।।८१ ।। भक्ताचा हा अधिकार । जाणतसे माता थोर । नरसामातेच्या गडावर । भजतसे अनसूया ।।८२ ।। संताचे महिमान । संतच जाणे परीपूर्ण । काय करावे गुणगाण । महाशक्ति मातेचे ।।८३ ।। गुणवंत बाबाचे भक्त । भुवनसिंग रघुवंशी ज्ञात । गुरुवाणी मुखोद्‌गत । गातसे बरई मुक्कामी ।।८४ ।। व्याधी जडली अतोनात । उपचार करी दिनरात । परी न होई ती दुरुस्त । अपचार घडतसे ।।८५ ।। गुणवंत बाबा बोलती । एकच आहे महासती । जावे पारडसिंगा क्षेत्री । अनसूया दर्शना ।।८६ ।। माते तू दृष्टांत दिला । तीन साड्या मागी त्याला । सांगी खडावू करण्याला । भगवती तूच त्यासी ।।८७ ।। एक आणी पारडसिंगा । भजू लागला सर्वांगा । चरणपूजा करी गंगा ।

भजूनि भगवती ॥८८॥ रोगराई दूर झाली। गुरुवाणी सत्य ठरली। भुवनसिंगाला साक्ष पटली। सर्वधर्मसमभावाची ॥८९॥ शिख हिन्दू मुस्लीम ईसाई। सर्व येती तव पायी। भजतसे तुला माई। जयजयकार करुनिया ॥९०॥ कळमेश्वरचे विठ्ठलराव ठाकरे। आई तुझे भक्त खरे। जवळी राहण्याची ईच्छा धरे। सेवा करण्या अनुदिन ॥९१॥ व्याधिने झाले त्रस्त। उपचार करी दिनरात। न सापडे उपाय त्वरीत। शरण येती मातेला ॥९२॥ पोटाचा विकार दूर केला। सुखशांती आली घराला। महाशक्तिचा उपचार कळला। आचार घडताचि ॥९३॥ आई तू दृष्टांत दिला। झाकून घेतले भक्ताला। दुलयात दुलया गुंडाळल्या। संकेत समाधीचा जाणतसे ॥९४॥ विनवी जंगलूजी खंडाईतला। जागा द्या समाधी घेण्याला। पूर्ण करी मनोरथाला। न जावे वाटे येथून ॥९५॥ घेतली भाड्याने खोली। राहू लागले आईजवळी। दूर न होई कदाकाळी। पादपूजा करितसे ॥९६॥ करुनि तव लिखान। गाई तुझे गुणगाण। नामे होई पावन। भजूनिया दिगंबरा ॥९७॥ सदैव राहो माता चरणी। समाधीची कल्पना मनी। भजण्या अनसूया जननी। चिरमुद्रा लावूनि ॥९८॥ स्वहस्ते जागा केली। भगवतीची आज्ञा घेतली। जावून बसले समधिस्थळी। जप करी मातेचा ॥९९॥ टाकली वरुन माती। बंद केले विठ्ठलरावाती। श्वास कोंडूनि आती। प्राणज्योत मालवली ॥१००॥ श्रद्धा होती तव धामी। राहावे सदैव चरणी। समाधीची ईच्छा मनी। म्हणूनिया येतसे ॥१०१॥ म्हणून घेतली समाधी। दूर केल्या सर्व व्याधी। भजी जो माता आधी। सफल होई मनोरथ ॥१०२॥ सोळा आठ एकोननव्वदला। पूर्ण करी मनोरथाला। समाधी घेई क्षणाला। मंदिर परिसरात ॥१०३॥ आई तुझे भक्त असे। देहदानाची पर्वा नसे। परी तव चरणाचे लालसे। लागतसे सर्वकाळी ॥१०४॥ आपल्या जाऊरवाडा गावी। पुरनसिंग कुमेरीया राही। सदाभाव भगवती पायी। एकचित





ठेवूनिया ॥१०५॥ नव्हती त्यास संतती। हेचि जाचे सदा चित्ती। व्हावी मज पुत्रप्राप्ती। म्हणून भजी मातेला ॥१०६॥ अर्पूनि श्रद्धा सुमन। पूजितसे श्रीचरण। द्यावे माता ध्यान। ईच्छा पूरवि लेकाची ॥१०७॥ कृपादृष्टी तव झाली। छाया आईची लाभली। मुलगी त्याला झाली। माता तव कृपेने ॥१०८॥ तैसाच धनलाभ झाला। सुखशांती येई घराला। न्यावे मातेसी सदनाला। एकसेवा करावया ॥१०९॥ भक्त करी दान। तव कृपेचे पान। म्हणून येई धाम। एक सेवा कराया ॥११०॥ सात ग्रॅम सुवर्ण। मातेस करी अर्पण। भावभक्ति ठेवून। गरसोळी वाहितसे ॥१११॥ भर अहेर केला। सजविले मातेला। गुणगाई क्षणाला। भगवत् गाण करुनि ॥११२॥ नाही सुवर्णाचे भान। सोने मृत्तिका समान। तरी राखी मान। भाव भक्ति पाहूनि ॥११३॥ तू तर महालक्ष्मी। सुवर्ण का शोभे तनी। परी भक्ताची आळवनी। म्हणूनि स्विकारीतसे ॥११४॥ कृतार्थ तो झाला। सदैव असे चरणाला। सुख समृद्धी घराला। लाभतसे तवकृपे ॥११५॥ ईश्वर मलमकरची कांता। मीना तिचे नाव ज्ञाता। लग्नानंतर होई गता। मासिक पाळी बंद होई ॥११६॥ सर्व करी तिरस्कार। न होणार हिला पोर। कोण्याबाईची दुष्ट नजर। लागली मीनाशी ॥११७॥ तोच आई गेली घरी। मारु लागली लेकरी। आशीर्वादाची फेरी। घालितसे माऊली ॥११८॥ मार देवूनि तिला। नियमीत करी ऋतुचक्राला। चौथ्या दिनी प्रत्यय आला। भगवती कृपेचा ॥११९॥ किशोर पुत्र रत्न मिळाले। भाग्य तिचे फळा आले। अपत्य पदरी पडले। सद्‌गुरु कृपेने ॥१२०॥ गेली माता तव घरी। 'काय रांधल थे आण' सत्वरी। मागूनि करितसे चाकरी। देव भक्ताघरी ॥१२१॥ सेवूनि काही प्रसाद। फेकी द्यावया भक्तास। मीना सेवि त्यास। श्रद्धा युक्त मनाने ॥१२२॥ प्रसाद तोचि फळा आला। सुख समृद्धी घराला। आले तेही चरणाला। लोटांगण घालितसे ॥१२३॥ मुंबईचे व्ही.बी. सुळे। आई तुझे भक्त भोळे। भक्तीचे फुलवि मळे। सद्‌गुरु कृपेने ॥१२४॥ सद्‌गुरुचा शोध करी।

हिमालय ते कन्याकुमारी। परी गुरु न भेटे लेकरी। म्हणून चिंता करितसे ।।१२५।। ओंकारेश्वरचे प्रेमानंद स्वामी। कुटी त्यांची नर्मदा धामी। आले पारडसिंगा ग्रामी। जन्मोत्सव पर्वाला ।।१२६ ।। नंतर गेले महाबळेश्वरला। अण्णा जोशीच्या शांती सदनाला। भजी भगवती मातेला। महाबळेश्वर मुक्कामी ।।१२७ ।। प्रेमानंदस्वामी ध्यान करी। दृष्य बघितले अंतरी। अपघाती ठार चारी। येता महाबळेश्वरला ।।१२८ ।। परी एक सांगे त्यांना। न मरती भक्त जाणा। अनसूया असे पूजना। समर्थ जी तारावया ।।१२९ ।। सुळे पतीपत्नी कन्या। घेवूनि भाचा व श्वाना। येतसे शांती सदना। महाबळेश्वरला ।।१३० ।। पूणे सातारा महामार्गावर। दोन व्हीडीओकोच समोर। मागे होती फियाट कार। सुळे कुटूम्बियाची ।।१३१ ।। गेली कोच समोरी। सुळे मागे बरोबरी। वेगाने आली एस.टी. समोरी। धडक देई गाडीला ।।१३२ ।। अपघात हा भयंकर। काचा फुटे दूरवर। गाडीचा झाला चक्काचूर। कळेना कुणा काही ।।१३३ ।। करुणा भाकी मातेची। धडक लागताच कोचची। धावली माऊली दिनाची। अभय देण्या लेकरा ।।१३४ ।। झाकून घेतले सर्वाला। अपघाती रक्षिले कुटूम्बाला। म्हणून लागी चरणाला। तुझिया भगवती ।।१३५ ।। गेले मग महाबळेश्वरला। अण्णाच्या शांती सदनला। किस्सा त्यांनी सांगितला। महामार्गी अपघाताचा ।।१३६ ।। ते सांगे आईची लीला। जो भजी सदैव मातेला। प्रेमानंद स्वामीला। झाला दृष्टांत हाचि भाऊ ।।१३७ ।। ओळख करुन दिली। हीच असे जगत्वल्ली। म्हणून भजनी रंगली। महाबळेश्वर धामी ।।१३८ ।। सुळे गेले चिंतामन गडावरी। वैशाख मासी भर दुपारी। तृषा त्यांना त्रस्त करी। कासाविस होतसे ।।१३९ ।। न होते तेथे पाणी। गड उतरणे न जमे तनी। काय करावे कळेना मनी। तृषा कैसी शमवावी ।।१४० ।। तेवढ्यात आली एक बाई। पाणीदेवू का तुला भाई। म्हणून विचारी लवलाही। गडावर जावूनिया ।।१४१ ।। लोटाभर पाणी






पिऊनी। तृषा शांत होई क्षणी। जाई बाई मग निघूनि। पाणी देवूनि सुळेला ।।१४२ ।। अशी आई तुझी करुणा। गेली गडी पाणी पाजण्या। आळविता तुला दयाघना। धावूनि तू जातसे ।।१४३ ।। तळेगावाला ज्ञानयज्ञ। सुळे करी भक्तिपूर्ण। पुष्पाताई वैद्य करी पठन। गीता ज्ञान सांगूनि ।।१४४ ।। माता तव नामस्मरण। अठ्ठेचाळीस सप्ताह करुन। सदन करी पावन। वास्तव्य करुनिया ।।१४५ ।। भाविक येती सप्ताहाला। तळेगाव दाभाडेला। गाती आईची लीला। व्ही. बी. सुळे सदनी ।।१४६ ।। म्हणून एकच ध्यास। तव नामाची आस। तव कृपेने सास। घेतसे तव बाळ ।।१४७ ।। दौलतराव देवतेंनी बांधले। नवीन घर श्रीक्षेत्राले। पाण्याने त्रस्त झाले। न सापडे थेंबभरी ।।१४८ ।। म्हणून आळवि मातेला। पाणी दे विहिरीला। तूच आई भक्तवत्सला। आस पुरवि बाळाची ।।१४९ ।। तोच तू गेली रस्त्याने। फूल फेकी कृपाघने। पाणीच पाणी तव कवने। म्हणूनि सांगतसे ।।१५० ।। तू फेकले एक फूल। तोडूनि एक कळ। जावून पडले विहिरीजवळ। नव पाकळ्याही ।।१५१ ।। नव हातावर पाणी लागले। नव कळ्याचे महत्व कळले। तव कृपे जल मिळाले। कालेश्वर देवते घरी ।।१५२ ।। बैतूलची मिनाक्षी खंडेलवाल। आली तव चरणाजवळ। अभय दिले तू तव बाळ। मंदिरी ठेवूनिया ।।१५३ ।। भर दुपारी रविवारी। निघून गेली तू पोरी। पाव्हणे येणार म्हणून घरी। घ्याया स्टेशनवर जाई ।।१५४ ।। डोक्याने होती कमजोर। अतिथीने जवळ केले घर। परी न आली पोर। म्हणून मातापिता चिंतीती ।।१५५ ।। शोधाशोध सर्वत्र केली। परी न लेक सापडली। मातापिता हताष झाली। काय करावे कळेना ।।१५६ ।। माता, तू ओढ लावि दरबारी। आली पारडसिंगा नगरी। राहू लागली तव मंदिरी। एकभाव धरुनिया ।।१५७ ।। बैतुलचा येई ईसम। ओळखी तिला जाण। म्हणून करितसे फोन। बैतूल मुक्कामी ।।१५८ ।। आले मातापिता धावत। लेक पाहूनि होई हर्षित। म्हणी

आई तूच रक्षी पुत। जवळी ठेवूनिया ।।१५९।। न जाण्याची होई मती। ठेविले तू तव क्षेत्री। तूच दिली प्रचिती। दिव्यदृष्टी ठेवूनिया ।।१६०।। गेली आई तू दूर्ग जिल्ही। चंदनसिंग कश्यपची भक्ति फळली। भिलाई कारखान्यात नोकरी गेली। म्हणूनिया प्रार्थितसे ।।१६१।। भाकता तुझी करुणा। नोकरी मिळाली पुन्हा। गेली सिखोटा भाटा ग्रामा। उद्धरण्या नरनारी ।।१६२।। बैतूल जिल्हा गाव बुंडाळा। गंगाधर साहू भक्त भला। कृपाप्रसाद तया दिला। व्याधी दूर करुनिया ।।१६३।। होती एकच बिमारी। बेहोष होई वरचेवरी। बरा न होई उपचारी। अस्वस्थ करी सर्वांते ।।१६४।। मग आणिले तव दारी। बेहोष स्थितीत मंदिरी। आळवि माता मनोहरी। दृढश्रद्धा ठेवूनिया ।।१६५।। टाकले तीर्थ मुखात। होता जरी बेहोषित। प्राशन करी क्षणात। नाम तुझे घेवूनि ।।१६६।। तीर्थ प्रसादाने केला। गंगाधरचा आजार भला। म्हणून धरी चरणाला। भावपुष्प अर्पूनिया ।।१६७।। तीर्थाची बावनकशी। दूर करी बेहोषि। पूर्णअसे आयुषि। तंदुरुस्त राहूनिया ।।१६८।। दिगंबर तिवारी वडशाचे। पतीपत्नी भक्त सच्चे। पवाडे गाई भगवतीचे। भवसागरी तरण्यासी ।।१६९।। दु:ख होते उभयताला। अपत्य नव्हते घराला। म्हणून येई चरणाला। पुत्र सुख मिळण्यासी ।।१७०।। पुष्पाताई काळे उपदेश करी। वाचवि माता पोथी पूरी। तिच दु:ख दूर करी। वाचता वर्तता गाथा ।।१७१।। म्हणून केले पारायण। ठेवून अपत्याची जाण। होण्या मनोरथ पूर्ण। आळवि भगवतीला ।।१७२।। मराठीचे नव्हते ज्ञान। परी झाले ते सज्ञान। अकराव्या अध्यायी पूर्ण। मराठी वाचतसे ।।१७३।। तूच दिली आई जाण। हिंदी वा मराठी कवन। म्हणून करी पठन। आई तुझ्या कृपेने ।।१७४।। तोच महिना राहीला। कृपाप्रसाद मिळाला। योग्यवेळी फळा आला। कन्यारत्न होवूनिया ।।१७५।। मुलगी झाली तिवारीला। ओटी भरली मातेला। मंगळसुत्रादि अहेर केला। अभय मिळण्यामुलीसी ।।१७६।। ऐसी आई तुझी



लीला। जो मागे ते देई त्याला। भेदाभेद येथे कसला। विश्वव्यापी तू असे ।।१७७।। सुखसंपदा संपत्ती। मिळतसे सर्वाप्रती। भक्तिभाव जे ठेविती। आई तव चरणासी ।।१७८।। तूच जाणी भक्त खरा। पुरवि त्याच्या मुखी चारा। अभक्त न घेई आसरा। नसे ज्याच्या संचिती ।।१७९।। कुशाग्र दृष्टी ठेवूनिया। पाहतसे महामाया। खरा भक्त तोचि पाया। नतमस्तक होतसे ।।१८०।। श्रद्धा नसता अंतरी। आला जरी जो मंदिरी। उठून जा म्हणे सत्वरी। ओळखूनि भावभक्ति ।।१८१।। म्हणून ठेवा पूर्ण श्रद्धा। अनसूया भगवता। पूर्ण करी मनोरथा। संपत्ती संतती देवूनि ।।१८२।। राजनीचे दिनेश खवशी। लहानूजीचे भक्त असती। परी बाबा परवानगी देती। आई तुझ्या दर्शनाची ।।१८३।। माता लहानुजी एक दिसे। संतच जाणी संताचे पिसे। म्हणूनि दर्शनी येतसे। भवसागर तराया ।।१८४।। कावेरी ठाकरेची कथा। दूर करी भवव्यथा। व्याधिने ग्रासले तिला। धावा करी मातेचा ।।१८५।। ओकारीवर ओकारी। व्याधिची शिरजोरी। अशक्तपणा आणी घेरी। काय करावे कळेना ।।१८६।। उपचार बहु केले। परी निधान ना झाले। मग धरिले चरणाले। माता अनसूयेच्या ।।१८७।। घेतला अंगारा मातेचा। उपचार करी साचा। गजर करी नामाचा। तीर्थप्रसाद सेवूनिया ।।१८८।। एकाएकी फरक पडला। दूर करी व्याधिला। थांबली उलटी क्षणाला। तंदुरुस्त ती होई ।।१८९।। न लागे औषध पाणी। असता माझी जगत्जीवनी। तिच सर्वांची कृपाकांक्षिणी। माय माझी अनसूया ।।१९०।। संजय भेलकर याच क्षेत्री। भजे अनसूया भगवती। कृपेची ठेव संचिती। पुण्य पदरी पडतसे ।।१९१।। विकार करी जर्जर। छातीचे दुखणे फार। ढग झाके अंबर। अतित्रास होतसे ।।१९२।। तत्क्षणी आली माता। नयनी बघे संजय पुता। "काही नाही व्हय आभाळ व्हय" वदता। कृपादान देतसे ।।१९३।। न्यायालयी केस मधूनि। सुखरुप वाचवि भवानी। निकाल लावी तूच ज्ञानी। आशीर्वाद

देवूनि ॥१९४॥ केली तव आळवणी। मंदिरात चरणी बसूनि। जा फेकते थे काय व्हय म्हणूनि। आज्ञा तू करितसे ॥१९५॥ संकटी तूच सोडविले। जीवनदान तया दिले। म्हणून तव चरणी लागले। कृपापात्र म्हणूनि ॥१९६॥ बहिनीचे लग्न होवूनि। पाच मास असे सदनी। त्रास होई जीवनी। म्हणून माहेरी राहतसे ॥१९७॥ केली मातेची विनवणी। शांती लाभू दे अंगणी। नांदाया जाणे आहे मनी। अभय तू देतसे ॥१९८॥ आठव्या दिनी प्रचिती आली। परिस्थिती सुधारली। उभयता तडजोड झाली। तुझीच कृपा म्हणौनि ॥१९९॥ मिळाले संसार सुख। तव कृपेची मेख। रमली सासरी लेक। आशीर्वादे भगवती ॥२००॥ अशी ही कृपा सावली। संजय बाळा लाभली। भावभक्ति अर्पण केली। माता तव चरणी ॥२०१॥ ऐसी तू कृपासागर। वाढला भक्त परिवार। जाई तू दूरवर। भक्तोद्धार करावया ॥२०२॥ गेली तू हैद्राबादला। तव नामाचा बोलबाला। पुढील अध्यायी लीला। ऐका आन्ध्र प्रान्ताची ॥२०३॥ इति श्री परमेष्ठी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। पंचदशोऽध्याय सम्पूर्ण ॥२०४॥ श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ। शांती॥ शांती। शांती॥

**॥ ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ॥**





## अध्याय १६

**श्री क्षेत्र गाणगापूर येथे**



भिमा-अमरजा संगमी
औदुंबरा मध्ये दत्त पौर्णिमेला
माऊलीला प्रत्यक्ष नृसिंह सरस्वतीने
(कारंजा लाड) मानव वेषात येवून
दर्शन दिले व हा अनसूया-दत्त
भेटीचा सोहळा हैराबादच्या
पूज्य सरस्वती अम्मा व सोबत
असलेल्या सर्व भक्तांनी
डोळे भरुन अनुभवला



## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैंनमः श्री गुरुदेवायनमः

जय जय अनसूया माता। वंदन माझे भक्तां मृता। तूच असे कृपासरीता। या अजान बालकाची ॥१॥ ॐ नमो भगवती। गेली तू आंन्ध्र प्रांति। फुलविण्या भावभक्ति। हैद्राबाद धामी ॥२॥ श्रवण करावी गीती। माता अनसूयेची महती। दूरवर गेली कीर्ती। कृपासिंधू माऊलीची ॥३॥ सरस्वती अम्मा भाविक। साईबाबाची प्रार्थीक। जाणतसे भक्तिची मेख। भक्तिपुष्प अर्पुनिया ॥४॥ मानिती सर्व भक्तगण। साईनाम समिती जन। हैद्राबादी असे विराजमान। भजती रमावरा ॥५॥ सदस्य जाती दूरवर। करी साई जप देशभर। बाबांचा हा चमत्कार। लोटांगण तव चरणी ॥६॥ मलयगिरी ठिकाणी। हैद्राबाद मुक्कामी। साई मंदिराची उभारणी। करितसे भक्तजन ॥७॥ शिवनेसन स्वामीची कृपा। अखंड साईनाम जपा। अहर्निश करावे तपा। सिद्धहस्त साईनाथा ॥८॥ भूमिपूजन कसे करावे। कुणाला तेथे न्यावे। स्वामीजी मार्ग दावावे। कार्यारंभ होण्यासी ॥९॥ शिवनेसन स्वामी सांगती। अनसूया एक जगती। येईल कामाला गती। भगवती कृपेने ॥१०॥ सरस्वती अम्माने जाणिले। मातेला मनी भजले। श्रद्धाभावे आळविले। परमेष्ठी माऊ लीला ॥११॥ राजमूर्ति मलेश। येती पारडसिंग्यास। विनवी आई अनसूयेस। कृपा करी दीनावरी ॥१२॥ हैद्राबादची वारी करा। सुख समृद्धी येई घरा। भूमिपूजनी रमावरा। यावे माँ भगवती ॥१३॥ आई तू जाणी आईच्या होते मनी। जावे हैद्राबाद धामी। निमित्त राजूस करुनि। साध्य करी काजा ॥१४॥ आई तू जाणी भक्ता। कोण थकवि गात्रा। कोण पुण्यवान महत्ता। भाग्यवान कोण असे ॥१५॥ भक्त विभक्त अभक्त। सर्व तुझेचि पुत। दर्शनाची ओढ त्यात। तूच तया लावितसे ॥१६॥ ऐसाच एक भक्त। तुझाच तो लाडका लेक। कृपा तुझी

त्यावर नेक। सदा सर्वदा असे ।।१७।। गोपाल रोंघे त्याचे नाव। पारडसिंगा असे गाव। तव चरणी सदा ठाव। मिळतसे तयाला ।।१८।। हैद्राबाद वारी ठरली। गाडी न्यावया आली। जाण्यासी तू निघाली। सवे घेवूनि भक्ताला ।।१९।। बसले सदस्य गाडीत। पारडसिंगा श्रीक्षेत्रात। गिणती करी आत। नयनी बघुनिया ।।२०।। बसली होती काही मुले। जाण्या हैद्राबादले। परी त्यांना उतरविले। जागा नव्हती म्हणूनि ।।२१।। पाहूनि सर्व गाडीत। बसले होते यथास्थित। लागली गाडी रस्त्यात। हैद्राबाद वाटेवरी ।।२२।। न कळे तव लिला। सर्वेश्वर सकला। जाई भक्तवत्सला। भक्तिभाव जाणुनि ।।२३।। काही दूर गेल्यावरी। गोपाल दिसला बरोबरी। कैसा आला हा येथवरी। आला अपुल्यासवे ।।२४।। पाहिले त्यांनी सर्वांना। उतरविले मुलांना। दिसले जे लोचना। थांबविले श्रीक्षेत्री ।।२५।। परी गोपाल न दिसला। म्हणौनि सवे आला। जरी दिसता नयनाला। तो ही उतरता तेथेचि ।।२६।। हीच आईची करुणा। जाणूनि घ्या सर्वज्ञा। लपवि मायेच्या पांघरुना। गोपाळ बाळासी ।।२७।। नेणे होते आईला। हैद्राबाद गाणगापूरला। भक्तिमळा फुलविला। दूर प्रांती नेवूनि ।।२८।। वदती सर्व पदाधिकारी। आई, तुजवर कृपा करी। म्हणून आला येथवरी। भगवती कृपेने ।।२९।। पुर्वपुण्याई त्याची थोर। पावन केले जावूनि घर। म्हणून मानिले तू पोर। भक्तिसार सांगतसे ।।३०।। न जाणे भक्ति मात। जग रहाटीचा तात। पडला होता गळ्यात। परी तूच मार्ग दावी ।।३१।। लाविले तू कामाला। भक्तिच्या मोक्षपंथाला। म्हणून आला चरणाला। दृढभाव धरुनि ।।३२।। गाणगापूरी तू गेली। दत्तकृपा तेथे झाली। प्रत्यक्ष पाही भाग्यशाली। असती जे समक्ष ।।३३।। आई तव भेटीसी। दत्त आले क्षेत्रासी। औदूंबराच्या छायेसी। दर्शन सोहळा होतसे ।।३४।। होता तुझ्या सेवेला। गोपाल बाळ सोबतिला। प्रत्यक्ष पाही नयनाला। अद्‌भूत लीला मातेची ।।३५।। दिला तू दृष्टांत। सेवाकरी नितान्त। न घडे कधी दुरान्त। माता तुझिया विना ।।३६।। उन वारा पावसात। सेवा करी







दिनरात। तव कृपेचा तो पात्र। म्हणूनि पूजितसे ।।३७।। घट स्थापनेच्या दिनी। दर्शन देई जगत् जननी। व्याघ्रावर स्वार होवूनि। दूर्गा भवानी तया दिसे ।।३८।। म्हणून जाई गावोगावी। नाम महिमा तुझा गाई। संजीवन मंत्र देई। "ॐ श्री जय जय अनसूया माता" ।।३९।। जडजीवा ताराया। एक नाम अनसूया। नामस्मरण कराया। प्रवृत्त करितसे ।।४०।। मंदिरी पूजन-अर्चन। करी नित्यनेमानं। पावन करी सदन। नामजप करुनि ।।४१।। तराया भवसागरी। नामाची एक तारी। अखंड वाजवि दारी। जय जय अनसूया ।।४२।। म्हणून करा नामस्मरण। जेणे होतसे कल्याण। नर देहाचे सफल गांण। ॐ नमो भगवती ।।४३।। म्हणून सांगी जनाला। शरण जा मातेला। ऐसा तुझा लेक भला। सदाचारी सद्‌गुणी ।।४४।। सालस सात्विक भाविक। शामराव रोघेंचा हा पुत। भजितसे दिनरात। आई अनसूयेला ।।४५।। म्हणून गोपालच्या कडेवर। अंतिम श्वास घेई करुणाकर। सेवेचे हे फळ अपार। मिळतसे तव लेकरा ।।४६।। म्हणून सोबत गोपालला। घेई हैद्राबाद जाण्याला। बसून राही चरणाला। पादपूजा करितसे ।।४७।। हैद्राबादचा परिसर। आई निरखी वारंवार। राजाची ही वखार। पूर्वकाली गाजतसे ।।४८।। माते तव दर्शनाला। जनसागर दाटला। वंदूनिया चरणाला। पावन होतसे ।।४९।। मंदिरी माता गेली। होम-हवनादि पूजा केली। भक्ताची परमावली। भक्ति महात्म्य सांगतसे ।।५०।। मंदिराचे केले भूमिपूजन। स्वहस्ते नारळ फोडून। होमात हवी टाकून। महाशक्ति मातेने ।।५१।। राजकारणी समाजकारणी। नटनटी धर्मचारिनी। सर्व पूजति अग्रणी। भगवती अनसूया ।।५२।। सुमधूर स्वर बोले। साईनाम अखंड चाले। आईच्या भजनी रंगले। दृढभाव धरुनिया ।।५३।। चौदा एकराचा परिसर। व्यापिला रमावर। टेकड्यांचा बहर। लाभतसे मंदिरी ।।५४।। महाप्रसाद घेई माता। काला वाटे स्वहस्ता। भक्त गाई अनसूया गीता। जयजयकार करुनिया ।।५५।। पंक्तिवरी

पंक्ति उठती। अन्नाची नसे गणती। अन्नपूर्णेची महती। गातसे सर्वत्र ।।५६ ।। एकवेळ स्वयंपाक केला। तोच दिवसभर पुरला। अशी ही आईची लीला। दिसतसे हैद्राबादी ।।५७ ।। मंत्री रामारेड्डीने केली विनवणी। प्रार्थितसे दीनवाणी। द्यावे दर्शन भवानी। पामराच्या कुटीत ।।५८ ।। भक्ताची हाक ऐकूनि। गेली रामारेड्डी सदनी। भक्तिभावे पुजा करुनि। आळविती मातेला ।।५९ ।। देवूनि तया आशीर्वाद। मंत्री घेई कृपाप्रसाद। न जडो काही प्रमाद। म्हणूनि विनवितसे ।।६० ।। उच्च विद्या विभूषित। विजयालक्ष्मी कांता कांत। परी असे सात्विक। आचार विचारी सदा ।।६१ ।। रामकृष्णा विजयालक्ष्मी। भजती माता पती पत्नी। राहतसे सवे मुक्कामी। हैद्राबाद नगरीत ।।६२ ।। श्रीक्षेत्री पारडसिंगा येती। भक्तिभावे तुज भजीती। तूच करी मम प्रगती। म्हणूनि विनवितसे ।।६३ ।। उभयतांच्या दोन मुली। नलीनी कनोजा बाली। शिकण्या अमेरिकेत गेली। सवे माता पित्यांच्या ।।६४ ।। विजयालक्ष्मी कांता कांत। नोकरी करी अमेरिकेत। सृष्टी सतीला भजत। सेवा करी मनोभावे ।।६५ ।। नलीनी व कनोजाला। अमेरिकेत अपघात झाला। परी वाचविले मुलीला। जगदम्बा मातेने ।।६६ ।। अपघात जेव्हा झाला। तेव्हा होती पारडसिंग्याला। भजत होती महासतीला। दरबारी राहूनिया ।।६७ ।। पुष्प नारळ अर्पिले। महाशक्तिचे पूजन केले। माते तू अनार दिले। दूरदृष्टी ठेवूनिया ।।६८ ।। म्हणे संकट आले होते। तव ते गेले नामाते। भक्तांच्या भक्ती परते। जीवदान लाभतसे ।।६९ ।। अनार जेव्हा दिले। अपत्य गाडीखाली आले। दिव्यदृष्टी तूच रक्षिले। दूर तया करुनिया ।।७० ।। असूनि एके ठायी। त्रिखंडाची जाण ठेवि। धावत तू तेथे जाई। भक्ताच्या रक्षणाला ।।७१ ।। तूच आहे महाशक्ती। ब्रह्मांडाची अधिपती। तूज जवळी नसे गणती। प्रजापती तू असे ।।७२ ।। आईच्या चरणी भाव। उभयता ठेवि सदैव। जवळ न येई दुर्दैव। माता अनसूया कृपेने ।।७३ ।। मूर्ती सांगे महिमान। करी धुनीचे गुणगाण। धुनी असे





संजीवन। संजीवनी मातेची ।।७४ ।। हैद्राबादला तू गेली। स्वहस्ते धुनी पेटविली। दत्त साई संस्था सजली। आई तुझ्या कृपेने ।।७५ ।। तीन गुरुवारी जो येई। नारळ अर्पण करी पायी। धुनीचे महिमान गाई। दुर्धर व्याधी हरुनि ।।७६ ।। कॅन्सर रोगाने पिडीत। धुनीला वंदी सदोदित। रोगमुक्त झाला त्वरीत। ऐसा महिमा धुनीचा ।।७७ ।। मलयगीरी मंदिर बांधकामास। हात लावी तू हमखास। तुझ्याच कृपेने रास। पडतसे मंदिरी ।।७८ ।। पैसा जेव्हा कमी पडला। बांधकामी अडथळा आला। तोच आळवि माते तुला। दर्शनी यावे म्हणूनि ।।७९ ।। जेंव्हा जेंव्हा तू गेली। हैद्राबाद मुक्कामी राहली। कामाची पूर्तता झाली। साईमंदिराच्या ।।८० ।। तेथील नागराज भाविक। संगम नामे मुलगा एक। रोगाने असे पिडीत। अस्वस्थ सदा असे ।।८१ ।। डॉक्टरचा उपचार केला। परी आचार न घडला। लागला माता भजनाला। पूर्ण होण्या मनोरथ ।।८२ ।। सरस्वती अम्माने सांगितले। तव चरणी मुला ठेवले। तू त्याला कुरवाळले। बापू बापू म्हणूनिया ।।८३ ।। शरिराचे व्रण झाकले। चामडेही पूर्ववत आले। सुदृढ सशक्त केले। संगम बाळास ।।८४ ।। आज्ञा करी नागराजाला। बसावे गुरु चरित्र पारायणाला। जावे पारडसिंगा क्षेत्राला। गुरुनाथा भजण्यासी ।।८५ ।। अध्यायाच्या समाप्तिला। अर्पण करी श्रीफळा। पारायण करी सुफला। स्वहस्ते अनसूया ।।८६ ।। नव अध्यायाचे पारायण केले। नव नारळ तू फेकीले। समर्थ आहे तूच माऊले। धन्य होई जीवन ।।८७ ।। आन्ध्र प्रान्तिय राजधानी। हैद्राबादची ही कहाणी। भक्ताच्या भक्तिधामी। पूर्ण करी जावूनिया ।।८८ ।। भाषेची न येई आडकाठी। तेलगू असो या मराठी। सर्व भाषांची अधिपती। माय माझी अनसूया ।।८९ ।। साईनाथांचे भक्त। भजती अनसूया सत। जाणितसे अद्वैत। एकरुप साईमाई ।।९० ।। हैद्राबादची करुनि वारी। गेली गाणगापूर नगरी। अवधूत दत्ताच्या दारी। दर्शन द्यावया ।।९१ ।। केले होते आयोजन। नाम

जपाचे प्रयोजन। तेचि जाण्याचे कारण। गाणगापूर श्रीक्षेत्री ।।९२ ।। दत्त अनसूया भेट। घडली होती जेथं। ऐका तेचि वृत्त। एकलक्ष साधूनिया ।।९३ ।। सरस्वती माँ व साईभक्त। घेवून येई मातेला तेथं। साईनामाचा अखंड स्त्रोत। सुरु करी श्रीक्षेत्री ।।९४ ।। गाणगापूरीचे वर्णन। संक्षिप्त करी विवरण। ऐका तुम्ही सज्जन। अवधान देवूनिया ।।९५ ।। गाणगापूरीच्या पुण्यभूमिवर। कल्पतरु असे औदुंबर। भीमा अमरजा संगमावर। ऋषी मुनी वास करी ।।९६ ।। वेदही सांगे महती। अश्वत्थाची गाती गीती। आवडे तोचि गुरुती। म्हणौनि येई स्थळी ।।९७ ।। हिरण्यकश्यप वधाला। नृसिंह अवतार झाला। तेणे वडवाग्नि पेटला। उग्रताही वाढली ।।९८ ।। घेवूनि आली महालक्ष्मी। औदुंबराचे फळ नामी। शांत झाला अग्नी। शमवूनि उग्रता ।।९९ ।। म्हणौनि देई वर। नरसिंह कृपावर। कल्पवृक्ष सदा हार। सदा सफल होतसे ।।१०० ।। ऐसे वृक्षाचे महिमान। कल्पतरु औदूम्बर जाण। त्रिमुर्तीचे हेचि ठिकाण। भिमा अमरजा संगमी ।।१०१ ।। संगमात जे न्हाती। पातक त्यांचे हरती। म्हणून भक्त येती। पाप ताप हराया ।।१०२ ।। मनुष्य देह धरुनिया। आले त्रिमुर्ती गुरुराया। चौसष्ट योगिनी पाया। पूजा करी मध्यान्ही ।।१०३ ।। संगमी वाट मिळे। देवकन्या येती बळे। भजीती लडिवाळे। त्रिमुर्ती गुरुनाथाला ।।१०४ ।। ऐसे नृसिंह सरस्वती। राहिले याच क्षेत्री। तपश्चर्या अहोराती। करी औदुंबरातळी ।।१०५ ।। जावूनि गाणगापूर धामी। मागी भिक्षा कैवल्यदानी। मनुष्य देह धरुनि। दुःख हारी भक्तांचे ।।१०६ ।। म्हणून येती रंकराव। भिक्षा मागी पाच ठाव। दत्त पौर्णिमेची धाव। करितसे त्यासाठी ।।१०७ ।। गाणगापूरची पावन कथा। देवदेवी गाती चित्ता। महान असे ही गाथा। पूण्यभूमि ठाव जी ।।१०८ ।। जाणूनि हेचि महिमान। कथन केले पावन स्थान। गाथेचे हेचि सुत्र जाण। भगवती मातेच्या ।।१०९ ।। गाणगापूर राहूनि। गेली माता संगमी। भिमा अमरजा धामी।





औदुंबरातळी ।।११० ।। याच औदुंबरातळी। तपश्चर्या करी जगत्वल्ली। जाणिले तू स्वबली। माहात्म्य या भूमिचे ।।१११ ।। कथितो आता वृत्तांत। दत्त भेटीचा साद्यन्त। कृपा करी भगवन्त। प्रकट होवूनिया ।।११२ ।। जैशी माता तेथे गेली। औदुंबरातळी बसली। स्मरुनिया म्हणाली। दिगंबरा दिगंबरा ।।११३ ।। मग पाहिले तू वर। औदुंबराचा शेजार। न्याहाळी सर्व सुरवर। दिव्यदृष्टी ठेवूनिया ।।११४ ।। तोच प्रकट झाले क्षेत्री। श्रीनृसिंह सरस्वती। आर्तता जाणूनि चित्ती। दर्शन लाभ होतसे ।।११५ ।। मानव देह धरुनि। शुभ्र वल्कला नेसूनि। डोई जटा ठेवूनि। तेजपुंज तपस्वी ।।११६ ।। पाहती सर्व भाविक। कोठून आला हा लेक। नव्हता येथे एक। आश्चर्य करितसे ।।११७ ।। काय माते थोरवी। किती गाऊ नवलाई। ऋषीमुनी सदा गाई। गीत माऊलीचे ।।११८ ।। जैसा आला तव ठायी। एकटक बघे माई। दर्शनाची आस लई। दूर करी तू आता ।।११९ ।। भक्त त्याला दूर करी। त्रास न होई परी। न जाणे कर्तबगारी। अज्ञपणे बोलतसे ।।१२० ।। परी न तो मानी। भेटतसे माता भवानी। बहू दिसाची आस मनी। पूर्ण करितसे ।।१२१ ।। भक्त विचारी त्याला। कोण तू कुठला। तेव्हा ऋषी सर्वा वदला। कारंजा लाडचा म्हणूनि ।।१२२ ।। नृसिंह सरस्वती। झाले याच क्षेत्री। परी न जाणे महती। अज्ञानी भक्त तुझे ।।१२३ ।। परी माते तू जाणिले। तपस्वी कोण भले। मानव देही प्रकटले। ॐ नमो गुरुनाथा ।।१२४ ।। दर्शन देवूनि मातेला। पूर्ण करी लीला। पूजा अर्चा समयाला। करितसे भक्तगण ।।१२५ ।। करुनि मातेची आरती। प्रसाद देई भगवती। लोचन तया पाणावती। तृप्त न होई कदापि ।।१२६ ।। चला आता माता वदली। दर्शनी तृप्त झाली। सरस्वती अम्माने जाणिली। महिमा भगवतीची ।।१२७ ।। निघून जाई तो तपस्वी। उलट दिशे भगवती। संगमाकडे जाता पाहती। अदृश्य होई संगमात ।।१२८ ।। आला जिथूनि भेटीला। तेथेच अदृश्य झाला। कुणा न कळे कला। ज्याची तो जाणतसे ।।१२९ ।। भक्त पाहती तपस्विला। परी न दिसे

नयनाला। कैसा चमत्कार घडला। अचम्बिती सर्वजन ॥१३०॥ दत्त अनसूया भेट। न्याहाळती देवलोक। आनंदिला इहलोक। रम्यसोहळा पाहूनि ॥१३१॥ हेचि नृसिंह सरस्वती। प्रकटले गाणगापूर क्षेत्री। दर्शन देण्या भगवती। सन्यासी बनूनिया ॥१३२॥ म्हणून गेली हैद्राबादला। तेथूनि गाणगापूरला। निमित्त करुनि भक्ताला। कार्य तू करितसे ॥१३३॥ दत्तदिगंबर दैवत अपुले। अनसूयेच्या ठायी प्रगटले। सतयुगी जे कार्य केले। तेचि या समयाला ॥१३४॥ सतयुगाची अनसूया। अवधूत दत्ताची माया। जनजीवन उद्धाराया। अवतार तू घेतसे ॥१३५॥ म्हणून तू ओळख देई। माहूर क्षेत्री जेव्हा जाई। मीच असे याच ठायी। अनसूया मंदिरी ॥१३६॥ तुझी महान किर्ती। न जाणे अल्पमती। बुद्धी देई मम पतिती। त्रिमुर्ती गुरुराया ॥१३७॥ देवांगण गाती गीती। ऋषीमुनी तप करिती। तव नामाची महती। सदासर्वदा गातसे ॥१३८॥ गंगा यमुना भागीरथी। भिमा अमरजा पुण्यवती। तुच असशी त्रिजगती। पाप ताप धूतसे ॥१३९॥ आले जे तुला शरण। देई त्यास अभयदान। कोटी कोटी मम प्रणाम। माता तव चरणासी ॥१४०॥ हैद्राबाद वाटेवर। निर्मल आहे शहर। तेथून एका खेड्यावर। माता तू जातसे ॥१४१॥ एका सरपंचाच्या घरी। मुक्काम माते तू करी। परी उग्र रूप धरी। न ठाव कुणा काही ॥१४२॥ निद्रा न रात्रभर। न चाले उपचार। बसून होते सर्वदूर। माता तव ठायी ॥१४३॥ मनोहर सोनटक्के काटोलचे। गायन करी नामाचे। सोबत राहूनि सेवेचे। श्रद्धासुमन अर्पितसे ॥१४४॥ जेथे जेथे तू जाई। तव नामाची गीती गाई। आला अनुभव याच ठायी। कृपापात्र तया करी ॥१४५॥ पहाटे चारच्या समयाला। जवळ जाई भक्तवत्सला। उठवि तू मनोहरला। "म्हणं गाणं" वदूनिया ॥१४६॥ होते सोबत सदस्य काही। परमहंस मंडळाचे ठायी। माता अनसूया गीत गाई। आन्ध्रप्रान्ती जावूनि ॥१४७॥ तूच माते आज्ञा केली। गाणं म्हणा तू वदली। तत्क्षणी





पेटी काढली। गीत तुझे गातसे ॥१४८॥ पहाटेच्या मंगलसमयी। सोनटक्के तुज आळवि। तोच तू आशीष देई। दिव्यदृष्टी रोखूनिया ॥१४९॥ येता काटोल मुक्कामी। दिशा देई जननी। कृपाछत्र होते म्हणूनि। योगदान मिळतसे ॥१५०॥ म्हणून निघाली ध्वनीफित। तव नामाचे मधूर गीत। अनसूया गीतगंगा प्रख्यात। म्हणूनि होतसे ॥१५१॥ तूच पूरविला मनोहरआवाज। कॅसेटला दिला तू साज। तुझेचि असे हे काज। माऊ ली अनसूया ॥१५२॥ काय वर्णू मी गीती। देवगाई जिची महती। मी तर असे अल्पमती। बुद्धीदाती तूचि असे ॥१५३॥ तूच दाखवि वाट। भक्तीचा बिकट घाट। पार करी मज अनाथ। सन्मार्ग दावूनिया ॥१५४॥ असता माझी माऊ ली। उणे न भासे त्रिकाली। तव कृपेची लाभे सावली। म्हणूनि गीती गातसे ॥१५५॥ आहे ही पावन कथा। दूर करी भव व्यथा। गाथा वाचता वर्तता। सुखशांती मिळतसे ॥१५६॥ असे गाणगापूर कवन। नृसिंह सरस्वतीचे महिमान। कथिले तव आशीर्वचन। गुरुनिधान त्रिमुर्ती ॥१५७॥ साईरुपात दिले दर्शन। भक्ता दिल्लीला जावून। पाप ताप हारी दयाघन। दिल्ली नैनीताल जावूनिया ॥१५८॥ हा यात्रेचा वृत्तांत। पुढील अध्यायी विदीत। जो असे कृपापात्र। तोच श्रवण करितसे ॥१५९॥ इतिश्री परमेष्ठी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। षोडशोऽध्याय सम्पूर्ण ॥१६०॥ श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ। शांती ॥ शांती। शांती ॥

**॥ ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ॥**

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

वंदन माझे माऊली। सद्‌गुरु कृपासावली। बोलू दे अखंड बोली। जय जय अनसूया ।।१ ।। सदा विनम्र भाव।
नाही कशाची हाव। तव चरणाची धाव। असू दे भगवती ।।२ ।। भारतदेश महान। ऋषीमुनीचे ठिकाण। जगताचेही
निधान। भरताच्या भारती ।।३ ।। या देशात अनेक शहरे। पुण्यवंतांची माहेर घरे। देवादिकांची नगरे। वसतसे
पुण्यभूमि ।।४ ।। इंद्रप्रस्थ असे जेथे। दिल्ली वसे तेथे। त्याठायी गेली माते। पाप ताप हराया ।।५ ।। जाताच माते
त्या ठायी। पांडवांची कथा गाई। काय वर्णावि नवलाई। अवर्णनिय जी असे ।।६ ।। अखील ब्रम्हांडाची शक्ति।
राव रंकाची भक्ति। राजधानीची युक्ती। करितसे स्वअंगे ।।७ ।। दिल्लीवारीचा इतिहास। कथितो आता हमखास।
आईची लीला खास। दिल्लीवासी पाहतसे ।।८ ।। नाही बोलत स्वमुखे। नाही लिहीत स्वहस्ते। नाही सुचत
स्वतर्के। बुद्धीदाती अनसूया ।।९ ।। कथन करण्या दिल्लीवारी। शक्ति दे दु:खहारी। दहा दिवसाची क्रमवारी।
सांगतसे जनामाजी ।।१० ।। दिल्लीवासी मधुसुदन। नैनीतालचे यादव जन। दोघांची भक्ति मनोमन। साई चरणी
असे ।।११ ।। व्यवसायाने करी नोकरी। कामात असे तरतरी। वसतसे साई अंतरी। मधुसुदनाच्या अंतरंगी ।।१२ ।।
भक्तिभावाने लीन। कांताकांत अभिन्न। पुत्र पौत्री करे स्मरण। संत महंतांचे ।।१३ ।। मधुसुदन गेले शिरडीला।
भजती साईनाथाला। अखंड नाम जप करण्याला। याचना करितसे ।।१४ ।। पूज्य शिवनेसन स्वामी। बाबांची
अधिकारवाणी। साईभक्त मानती अग्रणी। वंदन माझे तयाला ।।१५ ।। राहतसे शिरडी मुक्कामी। साईबाबांच्या
सदैव चरणी। भावभक्तिची लाभे पर्वणी। वंदिती सर्व भक्तगण ।।१६ ।। परमपूज्य स्वामीची सेवा। घडू दे स्वहस्ते



## अध्याय १७





दिल्लीला (लोधी रोड)
साईमंदिरात
साईरुपात
मातेने सर्व साई भक्तांना दर्शन दिले
दि. २४-१०-९१



नैनीताल येथील भक्तांना दर्शन देतांना माताजी

देवा । करुनि चरण सेवा । दास अनाथ असे ।।१७ ।। मधुसुदन भेटे स्वामीजीला । भक्ती भावे लीन झाला । आलो अपुल्या दर्शनाला । एकसेवा घडू द्यावी ।।१८ ।। घेवूनि स्वामीचे दर्शन । कृतार्थ करी तनमन । काय करावे सांगा आपण । कार्य सिद्धी होण्यासी ।।१९ ।। अखंड साईजप करावा । दिल्ली दरबारी घोष व्हावा । पामराचा हेका पुरवावा । म्हणून आलो चरणासी ।।२० ।। भक्ताची ऐकूनि वाणी । स्वामीजी हर्षि मनोमनी । पूर्ण होई जे चिंतनी । समर्थ साईकृपेने ।।२१ ।। स्वामीजींनी दृष्टी फिरविली । बसल्या जागी फिरुन स्थिर केली । वसूंधरेत एक वल्ली । राहतसे ग्रामात ।।२२ ।। आदीशक्ति आदीमाया । समस्त ब्रम्हांडाची छाया । अवधूत दत्ताची माया । अनसूया नाम असे ।।२३ ।। समर्थ वाणी सार्थ करणी । महाशक्ति विदेही राहणी । भक्तवत्सला वरदायिनी । नमो नम: अनसूया ।।२४ ।। वंदन माझे मातेला । तव कृपेची ही लीला । ठाव द्यावा मतिमंदाला । करुणा तुझी भाकतसे ।।२५ ।। पारडसिंगा शक्तिपीठ । अनसूयेचा असे मठ । हेचि दत्ताचे मूळ पीठ । स्वामीजी सांगतसे ।।२६ ।। भगवतीचे दर्शन घेवूनि । बसल्या जागी करी विनवणी । दिल्ली दरबारी यावे जावूनि । भक्तिमळा फुलविण्या ।।२७ ।। स्वामीजी सांगे मधुसुदनला । अखंड साई नाम जपाला । आणावे महाशक्ति अनसूयेला । पारडसिंगा जावूनिया ।।२८ ।। कार्यक्रमाची रुपरेषा । तूच दाखवि जगदिशा । कोठे कोणती दिशा । म्हणूनि शंकितसे ।।२९ ।। शिष्याची स्थिती जाणूनि । स्वामीजी निरखी अंतर्मनी । करण्या कार्याची आखणी । दिल्ली दरबारी ।।३० ।। वसंत विहारी शंकर मठ । नवी दिल्ली येथे स्थित । अखंड जप करावा तेथं । स्वामीजी सांगतसे ।।३१ ।। येथूनि पारडसिंगा जावे । महासतीचे दर्शन घ्यावे । ज्योतीने ज्योत पाजळावे । अनसूया दरबारी ।।३२ ।। गुरुची आज्ञा घेवूनि । आले पारडसिंगा ग्रामी । मधुसुदन व विजयेंद्र स्वामी । दृढभाव धरुनि ।।३३ ।। विनवितसे माता भवानी । दिल्ली यावे आम्हा दर्शनी ।

पामराची आर्त वाणी। ऐकावी भगवती ॥३४॥ जाणूनि बाबाचा महिमा। होकार देई तेथे जाण्या। नामजपाची पूर्तता करण्या। दिल्ली वारी करितसे ॥३५॥ २३-१०-९१ बुधवार ला। यात्रेचा शुभारंभ झाला। ३०-१०-९१ बुधवारला। केली समाप्ती सप्ताहाची ॥३६॥ कोजागिरी पौर्णिमेचा प्रसाद। देई माता सर्व भक्तास। निघाली दिल्ली यात्रेस। विमानातं बसूनि ॥३७॥ ऐका ऐका श्रोते जन। विमानाचे खरे मर्म। काय केले मातेने कर्म। कळेना अज्ञ जना ॥३८॥ आई तू असे महान। यंत्रावर सत्ता जान। निसर्ग ही तव आधिन। ब्रम्हांडनायिका तू असे ॥३९॥ विमानात बसता क्षणी। केली तू भविष्यवाणी। सांकेतिक शब्दाची बोलणी। बगला बिघडला म्हणूनि ॥४०॥ सेवकांनी शब्द ऐकले। परी मर्म कुणा न कळले। दिल्ली वाटे विमान चालले। निर्धोक वाटे सर्वांना ॥४१॥ आई तू जवळ असता। न भीती वाटे भक्ता। सुखसमृद्धी संपन्नता। मिळतसे तुझ्यामुळे ॥४२॥ विमान न जाई मुक्कामी। तू जाणले अंतर्ज्ञानी। परी न कळली तुझी वाणी। महाशक्ति महामाया ॥४३॥ नागपूर दिल्ली वाटेवर। रायपूर वसे शहर। विमान गेले तेथवर। पुढे न जाई तेथूनि ॥४४॥ करुनि सर्व हालचाली। वैमानिकाने शिकस्त केली। तांत्रिक बिघाडाचा कली। शिरला विमानी ॥४५॥ यंत्र तंत्र सर्व गेले। इंजिनाचे तेरा वाजले। सर्व प्रवासी थक्क झाले। धावा करी मातेचा ॥४६॥ आई तू अपुल्या आसनी। वैमानिका बसली मनोमनी। मंत्र दिला त्याच्या कानी। रक्षाया प्रवासी ॥४७॥ प्रसंगावधान राखून। विमानाला गिरकी देवून। परतविले विमान अर्ध्यातून। आईच्या आशीर्वादे ॥४८॥ करुनि आईचा धावा। आकांत करी मनोभावा। घडू दे एक सेवा। धाव पाव माझे आई ॥४९॥ ऐकूनि भक्तांची दीनवाणी। लक्ष लाविले तू विमानी। सुखरुप आले मुक्कामी। नागपूर विमानतळी ॥५०॥ सर्व अचम्बित झाले। विमान कैसे वापस आले। प्रवासी सुखरुप पाहिले।






म्हणौनि सर्व आनंदिती ॥५१॥ वैमानिकाला सुचेना काही। कैसी घडली ही नवलाई। दैवी शक्तीचा प्रत्यय येई। जीवनदान आम्हा मिळे ॥५२॥ आई तू नसती विमानी। संपली होती जीवन कहाणी। मृत्युचा सडा अवनी। पडला असता क्षणांत ॥५३॥ सर्व प्रवासी उतरले। आईच्या भजनी रंगले। तूच अमुचे रक्षण केले। भगवती अनसूया ॥५४॥ विमानाची पाहणी केली। बिघाडाची दुरुस्ती झाली। पुन्हा यात्रा सुरु झाली। अनसूया मातेची ॥५५॥ दिल्लीला विमान आले। सर्व भक्त गोळा झाले। जय जयकार करु लागले। महाशक्ति मातेचा ॥५६॥ यांत्रिक बिघाडाची कल्पना। आली जेव्हा भक्त गणा। आईच्या शब्दाची सुचना। वारंवार करितसे ॥५७॥ नाही जाणला शब्दमहिमा। सावध केले होते सर्वांना। काय कळेल अज्ञ जना। भविष्यवाणी मातेची ॥५८॥ ब्रेक कमजोर झाले। इंजिन पूर्ण बिघडले। तरी तू वापस आणले। सर्व शक्तिमान तू ॥५९॥ विज्ञानाचे अज्ञानपण। करितसे तू परीपूर्ण। यंत्र तंत्र तव अधिन। सुत्रधार तू असे ॥६०॥ आता ऐका दिल्लीची वार्ता। देशाची चाले जिथे सत्ता। आईने सांगितला कित्ता। कौरव पांडवांचा ॥६१॥ खानमंत्री नियामगोंडा। शांत सुशील अंगा। निर्मल असे समान गंगा। पूजा करी मातेची ॥६२॥ अनेक ठायी अनेक राही। श्रद्धासुमने घेवूनि येई। पूजितसे अनसूया आई। दृढभाव धरुनि ॥६३॥ साईनामाचा अखंड जप। दूर करी पाप ताप। म्हणूनि भजतसे मायबाप। भक्तिभाव ठेवूनिया ॥६४॥ गण गण गणात बोले। तव आज्ञे ब्रम्हांड डोले। नामजपाला सुरु केले। स्वमुखे वदूनिया ॥६५॥ दिल्ली शहरी वार्ता गेली। शंकर मठी अनसूया वल्ली। विदेही शक्ति इथे आली। चला चला दर्शनाला ॥६६॥ दूरदूरचे भक्त येती। लोटांगण चरणी घालती। किंमती वस्त्र परिधान करिती। पूजूनिया मातेला ॥६७॥ सोन्या-चांदीचे दागिने। घेवूनि येई तवकृपेने। राव रंक सर्व परिने। भजती अनसूयेला ॥६८॥

रात्रंदिन दर्शन चाले। तरी भक्त असे भुकेले। वारंवार भजी भले। जय जय अनसूया ।।६९ ।। काडे गुप्ता चंदर बाल। विकास विजय आनंदानी। वंदना मंजू चिटणीस स्थानी। भजतसे मातेला ।।७० ।। मधुसुदन सवे सर्व जन। भजी मातेला रात्रंदिन। करी आईचे गुणगाण। सार्थक व्हाया जन्माचे ।।७१ ।। तूच असे आदीअंती। जाणतसे कल्पांती। महाशक्ति महासती। मूळमाया म्हणूनिया ।।७२ ।। आता चला साईदरबारी। वृत्तांत तव कथन करी। हर्षति सर्व नरनारी। पाहूनि लीला मातेची ।।७३ ।। वृत्तांताचे सत्य कथन। पाहिले असे डोळाभरुन। माता तव कृपा जाण। लोचन पाणावतसे ।।७४ ।। चोविस तारखेला गुरुवारी। गेली तू साईदरबारी। लोधी रोडवरील मंदिरी। राजधानी दिल्लीला ।।७५ ।। आई विचारी मधुसुदनला। देव दिसते का बापू तुला। पाहून घे या क्षणाला। जन्म सफल होतसे ।।७६ ।। तव कृपे तो धन्य झाला। समक्ष पाहूनि देवाला। आई तुझी ही लीला। देवादिक बघती ।।७७ ।। सर्व साक्षी सर्व रक्षी। भक्ति मुक्ति तव कुक्षी। म्हणून येती तव कक्षी। देवांगण राहावया ।।७८ ।। साई मंदिरी दाटी झाली। भक्तांची गर्दी उसळली। दर्शनासी रीघ लागली। आई अनसूयेच्या ।।७९ ।। एकाएकी माता उठली। साई शेजारी जावून बसली। न्याहाळी साई माऊली। महिमा अनसूयेची ।।८० ।। विस्तव आण माता म्हणाली। नारळ कापूर जाळू लागली। उदबत्यांची बत्ती झाली। साईनाथा शेजारी ।।८१ ।। धूर पसरला चोहीकडे। सांगता वाचा अडखडे। बुद्धी देई अभागे। माय माझी अनसूया ।।८२ ।। मातेने पुष्प घेतले। साईचरणी फेकले। एकटक नेत्र केले। रमावर पाहतसे ।।८३ ।। साई प्रतिमा डगमगली। हालचाल होवू लागली। मातेने दृष्टी रोधली। एकलक्ष साधूनिया ।।८४ ।। तत्क्षणी मातेचे रुप बदलले। साईबाबा प्रकट झाले। साक्षात दर्शन दिले। साईनाथा स्वरुपी ।।८५ ।। तेजपुंज तपस्विनी। भासतसे तू अवनी। प्रकटली साक्षात भवानी। स्वस्वरुपी






साईनाथा ।।८६ ।। तुझे पुर्विचे रुप। बदलविले आपोआप। साईबाबाचे स्वरुप। दाखवि साई भक्ता ।।८७ ।। भक्तांनी आक्रोश केला। पाहूनि तुझ्या रुपाला। साई प्रगटले दर्शनाला। धावा धावा सर्व जन ।।८८ ।। रमावराचे रुप पाहून। धन्य होई जनजीवन। महाशक्तिचे नामस्मरण। करितसे मंदिरी ।।८९ ।। साईबाबा प्रगट झाले। मंदिरी आसनी बसले। सर्व भक्त धावू लागले। चरण धराया मातेचे ।।९० ।। देवूनि सर्वा दर्शन। लीला दाविली परिपूर्ण। साई माई अभिन्न। नमस्कार तया माझा ।।९१ ।। पुजारी करी आरती। परी शब्द अडखळती। बुद्धी देई अल्पमती। म्हणूनि विनवितसे ।।९२ ।। आई तुझे भक्तगण। करी प्रार्थना मनोमन। शंकर मठात राहून। वाट तुझी पाहतसे ।।९३ ।। दुपारचे तीन वाजले। महाप्रसादाचे ताट आले। वाट तुझी पाहू लागले। प्रसाद घेण्यासी ।।९४ ।। आई येणार नाही जोवरी। जेवणार नाही तोवरी। करु आईची चाकरी। कृपाप्रसाद सेवूनि ।।९५ ।। ऐकूनि भक्तांची करुणा। धावत येई दयाघना। समर्थ वाणी समर्थ बाणा। सार्थ तू करितसे ।।९६ ।। साई मंदिरातून निघाली। वाहकाशेजारी बसली। म्हणे चाल शंकर महाली। वेळ आता लावू नको ।।९७ ।। वाहकाला कळेना काही। जाणे होते दुसऱ्या राही। आई मात्र मार्ग दावी। शंकर मठाचा ।।९८ ।। माता, तू गेली शंकर मठात। ऐकूनि लेकांची आर्त हाक। पूर्ण करी मनोरथ। महाप्रसाद सेवूनिया ।।९९ ।। भक्तमंडळी आनंदिली। स्वानंदे रंगली। अंतर्ज्ञाने जाणे किल्ली। गुजगुह्य भक्तांचे ।।१०० ।। करुणावचने धावत गेली। प्रसाद तया देवूनि वदली। झाले आता चला पावली। आज्ञा तू करितसे ।।१०१ ।। चंदरबाल मंगल। रमा पॅलेस प्रशस्त महाल। लाजपत नगरी सबल। भजतसे प्रभुराया ।।१०२ ।। धनिक तसेच भाविक। भक्ति करावी सात्विक। परमेष्टीची कृपा नेक। अंतरंगी जाणतसे ।।१०३ ।। आई तू यावे घरी। ईच्छा माझी खरोखरी। कबूल करावी चाकरी। अज्ञानी बालकाची ।।१०४ ।।

चंदरबालची करुणा। भगवती ऐकी मना। भक्तांची आराधना। तोषवि माय माऊली ।।१०५।। आईच्या अद्‌भूत लीला। दिसल्या सर्व जनाला। लाजपत नगरी बोलबाला। माता तव नामाचा ।।१०६।। सजविले मातेसाठी आसन। भरजरी वस्त्रादी लेनं। अलंकारांची आभूषणं। अर्पितसे तव चरणी ।।१०७।। आई पलंगावर बसली। भक्तांची गर्दी जाहली। भजनी पूजनि रंगली। रमा पॅलेस महाली ।।१०८।। दीपाचा दाविला चमत्कार। कथन करी पामर। तुझाच असे अधिकार। काय वर्णू मी महिमा ।।१०९।। दीप होता शेजारी। भजनाची रंगत न्यारी। तूच माता गायन करी। स्वमुखे वदूनिया ।।११०।। गायनाचा स्वर चढे। भक्तिचे गाती पोवाडे। तसतसा दीप चढे। लक्ष-अभा पडतसे ।।१११।। प्रकाशमय ज्योत दिसे। परी दीपात तेल नसे। तेलविना जळतसे। पाहती सर्व नारीनर ।।११२।। साईबाबाचा दीप महिमा। ज्ञात सर्व भक्तगणा। भक्तांची मनोकामना। पूर्ण करी अनसूया ।।११३।। आई तू जगत्वल्ली। साक्ष सर्वा पटली। नावाची सार्थकता केली। दृष्टांत देवूनिया ।।११४।। लिहीत होतो किमया। कृपेने आईची लीलया। पलंगाशेजारी बसूनिया। अज्ञानी दास तुझा ।।११५।। दिल्ली वारीचे दृष्टांत। लिहितसे साद्यंत। तव कृपेचा वृतांत। सांगण्या जनामाजी ।।११६।। कागद पेन घेवूनी लिही। अंतरंगी तुला पाही। तू दाखविली नवलाई। ऐका श्रोते जनहो ।।११७।। आईने प्रसाद फेकला। पामर कृतार्थ झाला। कागदावरी तो सांडला। काय करावे कळेना ।।११८।। लोट्यातील सर्व पाणी। फेकले तू त्या पर्णी। कागद भिजला पूर्णांगानि। अक्षर ही मिटतसे ।।११९।। पुन्हा पुन्हा कागद पाही। एकही अक्षर ओळखता न येई। काय केले माझी आई। दुःखाश्रु गाळतसे ।।१२०।। आई तुझी आज्ञा नसता। ब्रम्हही न वदे कल्पांता। शारदेची अवकृपा होता। अक्षरांकुर न फुटी ।।१२१।। नाही तुझी परवानगी। मी तर दुःखी अभागी। केली तू लिहीण्या बंदी। अक्षर महिमा



दावूनि ।।१२२।। त्रिकालाची तू जननी। ऐकली दीनवाणी। अक्षरसंख्या पानोपानी। तूच उमटवितसे ।।१२३।। सायं समयी कागद पाही। अक्षर जैसे तैसेच राही। महिमा तुझा कळून येई। सजीव तया करुनी ।।१२४।। मृत अक्षर जिवीत केले। काय उणे या पामराले। सरस्वतीचे गाण गाईले। भजूनिया भगवती ।।१२५।। मृताला जिवंत करी। सामर्थ्य तुझे खरोखरी। संजीवनी मंत्र उद्धारी। अभागी जीवजीवा ।।१२६।। अक्षर महीमा तुझा कळला। परवानगी मिळे पामराला। जीवनगाथा सांगण्याला। महाशक्ति मातेची ।।१२७।। मतिमंद अल्पज्ञान। कैसे करावे हिंदीत कथन। दिल्ली यात्रेचे कवण। म्हणून आलो तव चरणी ।।१२८।। तूच माझी सरस्वती। तूच असे गणपती। लिहीण्याची ही शक्ति। तूच आई देतसे ।।१२९।। म्हणून तव कृपेची पात्रता। दिल्ली नैनिताल की यात्रा। या पुस्तकाची तुच कर्ता। निमीत्तमात्र मी असे ।।१३०।। तव कृपेने लिखान। पूजा अर्चा भजन। तुझेच गुणगाण। श्रीक्षेत्री राहूनिया ।।१३१।। घडू दे चरणाची सेवा। मागणे हेची देवाधिदेवा। दूर करी मोहमाया। लोभ असू दे तुझाचि ।।१३२।। काय वर्णू गुणगाण। अनुभवाची असे खाण। वाचा जाई खुंदून। वदता आई अनसूया ।।१३३।। आई तू केली कृपा। म्हणूनच मी आज उभा। तुझ्याच प्रकाशाची प्रभा। पडतसे दासावरी ।।१३४।। प्रत्येक दिवशी वारी। करितसे करुणाकरी। जावूनि भक्ताघरी। पूर्ण दिल्ली शहरात ।।१३५।। एस.एन.गुप्ता भाग्यशाली। आईची लाभे सावली। ग्रीन पार्कला शोभा आली। अनसूया मातेमुळे ।।१३६।। आई करुणा करी। भेट देई गुप्ता घरी। दैन्य दुःख निवारी। भाविक भक्तांचे ।।१३७।। अंजली पांडे भाविक। पती तयाचे सात्विक। दृष्टांत दिला नेक। पती पत्नी उभयता ।।१३८।। बाल स्वरुपात तू गेली। भूकंपाची कल्पना दिली। श्रद्धा भक्ती फळा आली। माय माऊलीची ।।१३९।। वाचवि तू भूकंपातूनि। भक्ताला दर्शन देवूनि। सावध तया करुनि। सार्थ करी

वचन ।।१४०।। पांडे साई मंदिराचे पुजारी। नजबगंज रोसनपुरी। करितसे बाबाची चाकरी। दर्शन लाभ होतसे ।।१४१।। शिवनेसन स्वामीने सांगितले। म्हणौनी दर्शन घडले। जीवनाचे सार्थक झाले। माँ भगवती कृपेने ।।१४२।। श्रद्धाळू वंदना भल्ला। थारा दे अनाथाला। भजतसे माँ अनसूयेस। घरी यावे म्हणौनी ।।१४३।। जाणूनि मनोकामना। भेट दिली तू वंदना। पूजा अर्चा आराधना। मनोभावे करितसे ।।१४४।। शंकर पार्वती गोट्या खेले। स्वमुखे माता बोले। जगताचे रखवाले। शिवशक्ती अभिनत्वे ।।१४५।। तूच आदी तूच अंती। तूच शिव तूच शक्ति। तूच पुरुष तूच प्रकृती। एकमेवाद्वितीय ।।१४६।। बाबा येते विमानातूनि। केली तू भविष्यवाणी। वंदना सांगे कानोकानी। वार्ता भगवतीची ।।१४७।। आई तुझी ही वाणी। न कळे कुणा अज्ञानी। बाबा येईल कैसे भुवनी। विचार ते करितसे ।।१४८।। साईबाबाची प्रतिमा। हैद्राबादी ठेवि विमाना। शंकरय्या सरस्वती अम्मा। घेवून येई दिल्लीला ।।१४९।। शंकर मठी सायंकाली। साई प्रतिमा स्थापिली। विमानाने मठी आणली। हैद्राबाद वरुनिया ।।१५०।। हिच केली भविष्यवाणी। वंदना जाणे या क्षणी। आई तू जगत्जननी। त्रिकालदर्शी तू असे ।।१५१।। फरीदाबादला तू गेली। मोतीलाल गुप्ताच्या महाली। भक्तांची तू रखवाली। जावूनि करितसे ।।१५२।। विकास मेहता नेक। भक्ति त्याची सात्विक। सरोजनी नगर स्थित। भजतसे मातेला ।।१५३।। घेई तो कडेवर तुला। वरखडले तू मुखाला। दु:खाचा लवलेश न त्याला। होतसे तये वेळी ।।१५४।। क्लेश संपले सुख आले। दु:खाचे दिवस पालटले। विकासचे भले झाले। माता तव कृपेने ।।१५५।। दर्शनाची ओढ मनात। आला तो पारडसिंग्यात। मानूनि आज्ञा शिरसावंद्य। शिवनेसन स्वामीची ।।१५६।। आई तू दर्शन दिले। कॉटो कॉटो त्याला म्हटले। वैन्य दु:ख दूर केले। समर्थ शब्दाचिया ।।१५७।। आई तव विष्ठेचा महिमा। आला असे भक्तजना।



मलमुत्र विष्ठादि जाणा। अमृतासमान ।।१५८।। विकासने विष्ठा घेतली। सदनी आणून ठेविली। कृपा कटाक्षाची साऊली। अहोरात्र घरावरी ।।१५९।। कठीण काळ निघून गेला। सुखसमृद्धिचा बोलबाला। विष्ठेचा अनुभव आला। अनसूया आईच्या ।।१६०।। सुगंधीत अत्तरा समान। दरवळे सुगंध मनोमन। विष्ठेचे हे महिमान। जाणतसे सर्वत्र ।।१६१।। टिंकू शेठीला देवूनि दर्शन। दु:ख हारिले सम्पूर्ण। भजतसे तनमन। गुण तुझे गाऊनि ।।१६२।। सरोजनी नगरचा महिमा। तोषवी सर्व भक्त जना। करितसे तुझी कामना। माय माझी अनसूया ।।१६३।। मुंबईची झरीना तारापूरवाला। आली तुझ्या दर्शनाला। दिल्लीतील शंकर मठाला। शिवनेसन स्वामी कृपे ।।१६४।। साईनाथाची इंग्रजी पोथी। लिहिली आपुल्या हस्ती। रमावराची कृपादृष्टी। झरिना वर असे ।।१६५।। घेवूनि दर्शन भवानी। कृतार्थ होई मनी। साक्षात परब्रम्ह स्वामीनी। म्हणून सांगतसे ।।१६६।। वस्त्र कंगण आरसा देवूनि। भजी अनसूया जननी। ठाव दे तुझ्या चरणी। म्हणौनी विनवितसे ।।१६७।। हैद्राबादचे साई भजन मंडळ। गाई साई नाम प्रबळ। स्वामीच्या आज्ञेचे फळ। मिळतसे माता चरणी ।।१६८।। साई नाम जपाची समाप्ती। शंकर मठी होत होती। विष्णु सहस्त्र नामाची ज्योती। चालविली दरबारी ।।१६९।। या नामाची आवडी। वाढवी भजनाची गोडी। अय्यर व साथी लाडी। गातसे भक्तिभावे ।।१७०।। आई भजनी नाचू लागली। विष्णूसहस्त्र नाम म्हणू लागली। नामजपाची समाप्ती केली। शंकर मठी दिल्लीत ।।१७१।। दिसू लागली द्वारकामाई। एक होई साई-माई। बसूनि एके ठायी। दर्शन देई भाविका ।।१७२।। दिल्ली वृत्तांत कथन केला। आई तव कृपेची लीला। साईनाथाचा प्रत्यय आला। माता तव स्वरुपी ।।१७३।। आता जावू नैनितालला। गाऊ मातेची लिला। कृपा करी भक्तवत्सला। नैनिताल मुक्कामी ।।१७४।। गौरीशंकर हिमालय। भारतभूचे आलय। हरीहराचे मलय।

ऋषीमुनी तप करी ।।१७५ ।। निसर्गाचा खजिना । नैनिताल जाणा । वरुणाचा करुणा । सदैव लाभतसे ।।१७६ ।। आले आईच्या मना । जावे नैनिताल धामा । सुत्र हलवि मनोरमा । एके ठायी बैसूनि ।।१७७ ।। डॉ. सत्येंद्र यादव । विजयेन्द्र स्वामीसव । साईचरणी भाव । ठेवूनी भजतसे ।।१७८ ।। बनविले तू दूत । तव लीला तुला ज्ञात । जावून यावे कैलासात । शिवपार्वती भेटाया ।।१७९ ।। यादव गेले शिरडिला । विचारी स्वामीजीला । मार्ग दावा भला । नामजपाचा ।।१८० ।। अखील ब्रम्हांडाची नंदिनी । पारडसिंगा निवासीनी । म्हणती अनसूया भवानी । विदेही माऊलिशी ।।१८१ ।। आईच्या शक्ति प्रतापे । ब्रम्हांडाची उघडी कवाडे । कळीकाळाचेही कडे । दूर करी अनसूया ।।१८२ ।। आईचे दर्शन घ्यावे । आई जपी नैनिताल न्यावे । दैन्य दुःखही हरावे । शरण जावूनिया ।।१८३ ।। तेथून ज्योलीकोट जावे । भूमीपूजन हस्ते करावे । साई मंदिर मग उभारावे । आज्ञा करी स्वामीजी ।।१८४ ।। आले पारडसिंगा ग्रामी । आज्ञा स्वामीजीची घेवूनि । मातेचे दर्शन करुनी । विनवी यावे घरी ।।१८५ ।। आईने दिला होकार । नैनितालला जावू सत्वर । भेट घेवू हरिहर । यादवाच्या मुक्कामी ।।१८६ ।। सत्येंद्र यादव आनंदिले । परब्रम्ह घरी ठाकले । काय उणे या पामराले । हर्ष होई उभयता ।।१८७ ।। २६/१०/१९९१ ला । माता गेली नैनितालला । यादवाच्या घराला । दूर दृष्टी ठेवूनि ।।१८८ ।। दिल्लीवरुन दहा तास । लागती तेथे जाण्यास । दऱ्याखोऱ्यांचा सहवास । लाभतसे जातांना ।।१८९ ।। घेवूनि ऋषीमुनींचे दर्शन । करितसे माता भजन । कैलास पर्वताची शान । वाढवि जगदम्बा ।।१९० ।। अडीच हजार मीटर उंचीवर । सागर सपाटीच्या वर । वसले नैनिताल शहर । भासतसे मनोहर ।।१९१ ।। भस्मासूर नाचून राहिला । जंगलात देव बसविला । माँ अनसूया बोले यादवाला । जाताच तया घरी ।।१९२ ।। यादव होती चिंतीत । ऐकूनि आईचा विलाप । जाणिले तू आपोआप । गुजगुह्य यात्रेचे ।।१९३ ।।






अखंड साईजप चाले । आईस अर्पीती भावफुले । भक्तिने आळविती मुले । गुणगाऊनि तुझेचि ।।१९४ ।। स्नानाचे तीर्थ घेती । पतीपत्नी आल्हादिती । महिमा तिर्था जाणती । म्हणून सेवि श्रद्धाभावे ।।१९५ ।। माते, तू होम चेतविला । कापूर स्वहस्ते जाळिला । पायाखालि तो दाबला । टाकून देई धुनीत ।।१९६ ।। स्वहस्ते माता करी हवन । तृप्त करी अग्नीनारायण । पुष्प नारळ अन्न अर्पून । चेतविला होमकुंड ।।१९७ ।। अनिल यादव सांगती कथा । आईची महिमा गाथा । वाचविले मज अनाथा । संजीवनी माय माझी ।।१९८ ।। मी आणि साथीदार । गेलो बरेली बाजार । आणावे साहित्य लवकर । पूजापाठ करण्यासी ।।१९९ ।। घेवूनि सर्व सामान । निघालो सरकारी गाडीतून । करुनि आईचे पुण्यस्मरण । नैनिताल येतसे ।।२०० ।। हलदानी स्टेशन जवळ । अकस्मात आला काळ । ट्रकांची झाली वर्दळ । ठोस दिली गाडीला ।।२०१ ।। अपघात हा महाभयंकर । गाडीचा होई चकनाचुर । जखमी प्रवासी पूरेपूर । काय करावे कळेना ।।२०२ ।। आईचा धावा केला । वाचव तव लेकराला । आलो होतो तव पूजेला । कृपा सिंधू माझी आई ।।२०३ ।। आली माता धावूनि । घेतले अलगद उचलूनि । वाचविली संकटातूनी । सांगतसे अनिल यादवास ।।२०४ ।। सतीन यादव संजीव सांगे । गेलो जोशी हरीष संगे । गाडी घेवूनि लगबगे । पूजा साहित्य आणावया ।।२०५ ।। जीप्सी ट्रकचा अपघात झाला । तव तुझा धावा केला । संकटी रक्षी मुलाला । तूच माता अनसूया ।।२०६ ।। मारोती जिप्सी पूरी दबली । तव लिला तू दाखविली । मुले तुझी वाचविली । याही अपघातातूनि ।।२०७ ।। चंद्रशेखर रमेशचंद्र जोशी । भजती भक्त मातेशी । आपुल्या नैनिताल निवासी । भक्तिभाव अपूर्नीया ।।२०८ ।। तेथून गेली ज्योलीकोट ला । यादवाच्या निवासाला । भूमिपूजन करण्याला । साई मंदिराच्या ।।२०९ ।। देव कुठे बसवावा लागते । विचारी तू भक्ताते । जाणिले तू संचिते । दयानिधी अनसूया

।।२१०।। देवाची करण्या स्थापना। तू चालली स्वधामा। ज्योलिकोट अरण्या। प्रतिष्ठापना करावया ।।२११।। माता तू जाणिले अंतर्ज्ञानी। देव बसवावा लागते अरण्यी। म्हणून आली तू मुक्कामी। सत्येन्द्र यादवाच्या।।२१२।। ज्योलीकोटला जाता क्षणी। विष्ठा केली तू त्या स्थानी। केली स्थापना तव क्षणी। साई मंदिराची।।२१३।। विष्ठेचे हे महिमान। करी माता भूमिपूजन। व्हाया भक्ता साई दर्शन। प्रतिष्ठापना तू करी।।२१४।। उदबत्तीने नारळ जाळिले। हवी हवनात टाकले। स्वहस्ते होम चेतविले। तूच माता भगवती।।२१५।। झाले काम चला आता। स्वमुखे वदूनि भक्ता। नैनितालच्या वारीची सांगता। करितसे माता अनसूया।।२१६।। यादव उभयता आनंदिले। जीवन तया धन्य झाले। देवाचे सानिध्य लाभले। काय उणे मग असे।।२१७।। जाणिले मुळ स्वरुप। परमेष्ठी परब्रम्ह रुप। आदि अंती एक रुप। महाशक्ति अनसूया।।२१८।। नागपूर येण्या तू निघाली। दिल्ली विमानतळी आलि। चमत्काराची परमावली। दाविली तू स्थळी।।२१९।। वामनराव येवले सांगती। अनुभव असा न आला कधी। परीक्षा घेई दयानिधी। विमानतळी दिल्लीच्या।।२२०।। विष्ठा करुनि भरविले। भस्म अंगासी लाविले। विराट रुप दाविले। माँ दुर्गा भवानीचे।।२२१।। पाहूनि तुझे उग्र रुप। कर्मचारी होती भयतीत। न जाणे आईची मात। अश्रद्धेय अज्ञानी।।२२२।। म्हणे घेवून जा मातेला। त्रास होईल प्रवाशाला। काय करावे कळेना कुणाला। हतबल होती सर्वजन।।२२३।। आईचे पहा महिमान। बंद करी सर्वांचे वदन। चूपचाप धरी आसन। कुलुप लावी मुखाला।।२२४।। मधुसुदन सांगे महिमान। माता अनसूयेचे गुणगाण। ऐकती सर्व प्रवासी जन। भजूनि भक्तिभावे।।२२५।। विष्ठा विमानात टाकली। नजर सर्वांची रोखली। म्हणे कैसी ही वल्ली। खेळ कळेना काही।।२२६।। तोंडाला कुलुप लागले। कुणी काहीच ना बोले। नागपूरला विमान आले। दयासिंधू मातेचे।।२२७।।







विष्ठा असे अमृता समान। काय जाणे अज्ञ जण। तेच असे सुखधाम। जाणून घ्या भाविक हो।।२२८।। अशांतांना शांती देई। तृषार्तांना पाणी देई। भूकेलेल्यांना अन्न देई। माय माझी अनसूया।।२२९।। दिल्ली नैनिताल वारीची सांगता। झाली नागपूर येता। भाविकांची करी पूर्तता। कृपानिधी करुणावती।।२३०।। दिल्ली नैनिताल यात्रा। तुझ्याच कृपेची मात्रा। लिहीले पुस्तक तव पत्रा। या अज्ञानी दासाने।।२३१।। त्यावरुनी हे कथन। केले तुझे गुणगाण। तुझेची आशिर्वचन। पूर्तता करीतसे।।२३२।। ऐका पुढील अध्यायी। नागपूर नगराची नवलाई। भक्तिचा मेरुमणी ठायी। फणिंद्रपुर परगणे।।२३३।। इतिश्री परमेष्ठी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। सप्तदशोऽध्याय संम्पूर्ण।।२३४।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती।। शांती।।।

**।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।**

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतेंनमः श्री गुरुदेवायनमः

आई तुं संजीवनी। तुच असे मोक्षदायिनी। जगताची जगत्जननी। माय माझी अनसूया ॥१॥ दाविले अनेक चमत्कार। दु:ख हारीले सत्वर। भजती सर्व सानथोर। दु:ख हारिनी म्हणूनी ॥२॥ नागपूर नगरिची गीता। भावभक्तिची सरिता। पूर्ण करी तूच माता। ज्ञान दान करुनी ॥३॥ मरीयम् नगरी नागपूरला। आई तू दाविली लिला। न कळे या पामराला। संजीवन नाम तुझे ॥४॥ त्र्यंबकराव बक्सरे भाविक। काया वाचा सात्विक। भक्ति करतसे नेक। तुझा लेक म्हणूनि ॥५॥ कन्या श्रद्धा मिळे रत्न। आईचे करे स्मरण। दोन वर्षाचे आयुर्मान। त्या श्रद्धा बाळाचे ॥६॥ ६ जून १९९२ ला। उलटा फेरा दैवाचा पडला। काळ एकाएकी दारी आला। घेवून गेला श्रद्धेला ॥७॥ लेकीला ठेवूनि दारी। आई गेली नळावरी। नव्हते पाहाया दारी। बाळ खेळी अंगणात ॥८॥ तेथे होते एक टाके। पाणी भरुन त्यात होते। श्रद्धा गेली तेथे। खेळता-खेळता ॥९॥ तोच तिचा तोल गेला। टाक्यात देह पडला। खालवर होवू लागला। जीवाच्या आकांताने ॥१०॥ नाकातोंडात पाणी गेले। निष्प्राण शरिर झाले। निचेष्ट होवून पडले। त्या पाण्याच्या नांदीत ॥११॥ घेवूनि गुंड डोईवर। माता आलि सत्वर। टाकू लागली नांदीत धार। तोच टाहो फोडितसे ॥१२॥ गुंड दिला फेकूनि। श्रद्धेला काढी पाण्यातूनी। पाहतसे बाळ दिनवाणी। अश्रू दाटले लोचनी ॥१३॥ प्राणज्योत मालवली। श्रद्धा सर्वा सोडून गेली। माता पिता रडू लागली। आक्रोश करुनिया ॥१४॥ आई तू मरीयम नगरी होती। श्रद्धाभावे सर्व भजती। पूजा पाठ तव करिती। वंदन करुनि नारीनर ॥१५॥ त्र्यंबकरावास वार्ता कळली। मरीयम नगरी आई आली। तरी का आपत्ती आली। माय माझी





## अध्याय १८



नागपुरला टेकडीवरील गणेश मंदिरात माताजी



आण, काय रांधल थे। म्हणुन घास घेतांना माताजी



तुच दुर्गा तुच पार्वती। लक्ष्मी रेणुका माहासती॥
माहकाली तुज म्हणती। तुच असे आदी माता॥

असतांना ।।१६ ।। घेवून येई श्रद्धा बाळ । ठेवी मातेच्या चरणा जवळ । तव समक्ष कैसा आला काळ । कोण तारी तुज विण ।।१७ ।। सर्वजन पाहती लीला । तू न्याहाळी मृत बाळाला । पाहूनि लोकांचा गलबला । दया करी भगवती ।।१८ ।। आईने दृष्टी वर केली । अंत:दृष्टी स्थिर झाली । पांघरुन देवूनी वदनावरी । खेळ तू करितसे ।।१९ ।। क्षणातच माता उठली । नारळ फोडू लागली । दिव्य दृष्टी मृतावर रोधली । श्रीफळ फोडतांना ।।२० ।। प्रसाद फेकून पाणी फेरले । श्रद्धा बाळावर ते सोडले । झाले काम् आपले । म्हणे चला आता ।।२१ ।। पाणी पडता अंगावर । हालू लागे मृत शरीर । तीर्थाचा हा उपचार । संजीवन दान देई ।।२२ ।। उठ उठ श्रद्धा बाळ । दूर गेला तुझा काळ । श्रद्धा रडे खळखळ । हर्षति मातापिता ।।२३ ।। धन्य अनसूया माय माझी । जीवंत करी मृत मुलीशी । काय वर्णू कीर्ती तुझी । खुंटते वाचा माझी ।।२४ ।। त्र्यंबकराव रडू लागला । वारंवार धरी चरणाला । काय उणे या दासाला । अमृतदृष्टी असता ।।२५ ।। गोरोबाच्या मृत मुलाला । जीवदान दिले कुमाराला । सार्थ केले तू नावाला । विठाई माऊलि माझी ।।२६ ।। देवादिकांचे वर्णन । करिती आख्यान पुराण । थोर त्याहूनि महिमान । तुझे माता अनसूया ।।२७ ।। तिगावचे व्यंकटी पाटील । आईस भजे सर्व काल । भक्तिपुष्प चरणाजवळ । अर्पितसे सर्वदा ।।२८ ।। भोदू भोयरची मुलगी मुन्नी । त्रस्त होई यम यातनांनी । गेली सर्वा सोडूनि । शोक करी मातापिता ।।२९ ।। व्यंकटी पाटील सांगे त्याला । शरण जा माँ अनसूयेला । तिच परतविल यमाला । मोक्षदायिनी जी असे ।।३० ।। लोक सर्व जमा झाले । अंत्ययात्रेची तयारी चाले । परी भोदू भजी मातेले । वाचवि तूच माऊली ।।३१ ।। लावूनिया अगरबत्ती । आळवि भावभक्ति । करुनी आर्त आरती । विनवितसे परोपरी ।।३२ ।। तूच आमुचि रखवाली । तुजविण कोण वाली । तोच तू धावत गेली । तिगांव मारुड मुक्कामी ।।३३ ।। मुन्नी रडू लागली । आई पाणी दे म्हणाली । हातपाय

हलवू लागली। उठून बसे त्वरीत ॥३४॥ जीवंत पाहूनी मुन्नीला। हर्ष होतसे सर्वाला। जीवदान दिले मुलिला। संजीवनी नाम तुझे ॥३५॥ संजीवन सामर्थ्य तुझे। भक्ताची लाज राखे। धावत येई वेगे। जडजीव तारावया ॥३६॥ मुन्निस देवून जीवनदान। सार्थ करी तव नाम। चरणी आलो शरण। शरणागत होवूनि ॥३७॥ असा हा संजीवन मंत्र। कथन केला सर्वत्र। तव कृपेचे हे पत्र। दावितसे जनामाजी ॥३८॥ माझा काय अधिकार। तव कृपेची ही धार। घेवूनी मिरवी दूरवर। पाईक तुझा असें ॥३९॥ बाबा चंद्रशेखर वऱ्हाडपांडे। भावभक्तिचे देती धडे। गाती संतांची पवाडे। कमलासुत म्हणूनिया ॥४०॥ काया वाचा मने। गाती अभंग भजने। भक्ति रसाचि अंथरुणे। घालिती घरी दारी ॥४१॥ मातेचा चरित्र ग्रंथ। रचितसे कमलासुत। काढूनि ध्वनिफित। जय जयकार करी आईचा ॥४२॥ राहूनि नागपूर नगरी। प्रचार करी दूरवरी। रेशीमबाग गजानन मंदिरी। जयघोष करी नामाचा ॥४३॥ कथितो त्यांचा दृष्टांत। ऐका तुम्ही तंतोतंत। माता करी ज्ञात। महिमा शेषनागाचा ॥४४॥ ऐकूनि मातेची किर्ती। दर्शना श्रीक्षेत्री येती। मुलाला घेवून सोबती। ऑटो रिक्षात बसूनि ॥४५॥ होवूनि शुचिर्भुत। जाई जुन्या मठात। पूजा अर्चना करीत। आळविती मातेला ॥४६॥ भक्ताची भक्ति जाणे माता। ओळखिले कमलसुता। जा तु मरशील वदे पुता। भविष्य जाणूनिया ॥४७॥ आई तू कसा आशीष दिला। अमरपट्टा कोण घेवूनी आला। परी वाचव मज पामराला। क्षमा करी अपराध ॥४८॥ अरे तु नाही तो मरेल। जगदम्बेचे निघे बोल। न होतसे त्रिकाल फोल। अनुभव भक्ता येतसे ॥४९॥ वारंवार घेई दर्शन। परी न होई ईच्छा पूर्ण। दर्शनी मनी समाधान। पावूनि निघतसे ॥५०॥ परवानगी मातेची घेवूनी। रिक्षा लागला मार्गानी। फेटरी समोर प्रचिती जाणी। माता तव वचनाची ॥५१॥ झाला होता गडद अंधार। पावसाची येई सरीवर सर। एवढ्यात दिसला शेषधर। रस्त्याच्या






मधोमधी ॥५२॥ होता उतार रस्त्याला। आटोरिक्शा करी कडेला। ऑटोचालक घाबरला। कर दोन्हि हालतसे ॥५३॥ नियंत्रण रहित रिक्षा। उभा करी उतारी कक्षा। भय करी दुर्दशा। धावा करी मातेचा ॥५४॥ ऐकूनि गजेंदाचा धावा। धावत जाई केशवा। ब्रिद रक्षियले नावा। पतितपावन म्हणूनि ॥५५॥ तैसेच आई तू यावे। तुजवाचून कोण पावे। संकटातून रक्षावे। या तुझ्या लेकराला ॥५६॥ एवढ्यात भरधाव ट्रक आला। त्याने चिरडले नागाला। चाकाने चेंगरुन पूढे गेला। नागपूर मार्गाने ॥५७॥ ट्रकने मारले सापाला। अभय दिले कमला सुताला। तो मरेल शब्दाचा अर्थ कळला। सापाच्या मृत्युने ॥५८॥ ऑटो चालक येवून पाहती। साप मेला रस्त्यावरती। काढूनि रिक्षा वरती। निर्धोक जाई नागपूरला ॥५९॥ अशी ही आईची लिला। दावी वऱ्हाडपांडे बाबाला। म्हणौनी भजती भजनाला। गीत तिचे गाऊनि ॥६०॥ करुनि मातेची चरित्र रचना। भक्ति सुधा पाजी जना। महिमा गांई जगत्‌जीवना। लेक तुझा कमलासुत ॥६१॥ सौ. मालती पुंडलिकराव बारई। भजितसे अनसूया माई। दृढभाव धरुनि पायी। गुण गाई उभयता ॥६२॥ मालती ताई झाली अस्वस्थ। तनी त्रास अतोनात। गर्भाशयी ट्युमर त्रस्त। करितसे सर्वांगाला ॥६३॥ गेली गजानन मंदिरात। रेशीमबागी जे स्थित वऱ्हाडपांडे बाबांना विदित। व्यथा आपुलि करीतसे ॥६४॥ महाराजांनी उपदेशिले। मंत्र जप करण्या सांगितले। रक्षी भगवती भक्ताले। सर्वसमर्थ तूच असे ॥६५॥ म्हणून केले नामस्मरण। गाऊनी अनसूया गाण। जीवन मरणाचा हा क्षण। आसेष्ट तिष्ठतसे ॥६६॥ एक किलोचा ट्युमर। डॉक्टर काढी बाहेर। परी वेदना न तसूभर। होतसे अंगाला ॥६७॥ वऱ्हाडपांडे बाबांनी मंदिरात। जप केला भक्ता समवेत। होण्या मालतीताई दुरुस्त। आळविती भगवती ॥६८॥ तव नाम करी सशक्त। लेक झाली तंदुरुस्त। अनसूया नामाचा संकेत। अनुभवा

येतसे ॥६९॥ तप्त अशा उन्हाळ्यात। आजारी पडली निलीमा पुत। ताप वाढला अंगात। असह्य वेदना होतसे ॥७०॥ केले बहू उपचार। होई उलटी वारंवार। कन्या झाली जर्जर। बेहोषि येतसे ॥७१॥ सासूबाई गेल्या काटोलला। तेथूनि श्रीक्षेत्राला। भगवतीच्या दर्शनाला। एकसेवा करावया ॥७२॥ निलीमा होती दवाखानी। श्वास न राही तनी। सासूबाई आळवी भवानी। तत्क्षणी मंदिरात ॥७३॥ फिरविले चक्र मातेने। स्थिर केली लोचने। श्वास भरी तनमने। दिव्यदृष्टी ठेवूनिया ॥७४॥ राजीव बाळ बालपणी। थंडगार होई अंगणी। नव्हते घरी कोणी। चेतनाहिन होई ॥७५॥ आजीने केला उपचार। लावी अगरबत्ती माते समोर। म्हणे रक्षी तूच करुणाकर। या अजाण बाळासी ॥७६॥ तोच तया येई चेतना। उष्णता भरी तूच तना। वाचविले तू जीवना। अक्षयदान देवूनि ॥७७॥ संजयची पोट दुःखी। उपचार करी नानाविधी। परी दूर न होई व्याधी। त्रस्त तया करितसे ॥७८॥ डॉक्टरने उपचार केला। परी गुण न आला। शेवटी आला चरणाला। आई अनसूयेच्या ॥७९॥ बेंबी भोवताली सूज। शस्त्रक्रिया करणे भाग। सांगती उपाय वैद्य। तपासनी करुनिया ॥८०॥ परी होती श्रद्धा अचल। पूजितसे पदकमल। पारायण करी निश्चल। माता चरित्र ग्रंथाचे ॥८१॥ पारायणाच्या समाप्तीला। सूजेत उतार पडला। तूच माता दिला हवाला। दुःखहारिनी म्हणूनिया ॥८२॥ मालतीताई आलि दर्शना। संजयला टाकी चरणा। उठूनि आपुल्या आसना। हार तू जाळितसे ॥८३॥ फेकूनि तांदूळ वटीतले। न्याहाळी संजय बाळाले। म्हणे जा काम झाले। म्हणून अभय देतसे ॥८४॥ शस्त्रक्रियेची पर्वनी। पूर्ण करी भवानी। कृपादृष्टी कृपाकांक्षिनी। तारितसे तव लेकरा ॥८५॥ म्हणून जाई तू सदना। पावन करी घर योजना। नंदनवन फुलवि जीवना। बारई कुटुम्बात ॥८६॥ सौ. मोरे मावशीला। तुच माता दृष्टांत दिला। आंबट चुका लावी करण्याला। लाड पुरवाया लेकीचे ॥८७॥ अंबाडीची भाजी दिसली। शब्दाची प्रचिती आली। तूच जाणी







सर्व काली। सर्वस्थळी काय असे ॥८८॥ तोच तू घरी गेली। "आण काय रांधलं थे" वदली। नैवेद्याची पर्वनी लाभली। मोरे मावशीला ॥८९॥ तत्क्षणी तू गेली बाहेर। शोधी तुला सर्वदूर। परी तू जाणे तुझा खेळ। करुणासिंधू अनसूया ॥९०॥ आल्या मावशी बाहेर। दिसे त्यांना करुणाकर। फेकी तीन दिशेने सत्वर। तीन दगड एकाक्षणी ॥९१॥ तोच तू विष्टा केली। तीन दिशेला फेकी बली। कार्याची ही पूर्णावली। करितसे भगवती ॥९२॥ मोरे ताईने केली जमा। अमृतासमान दिव्य जाणा। दुर करी दुःख दैना। अमृतपान करुनिया ॥९३॥ आई तुझा आशीर्वाद। लाभला अल्काताई आमलेस। दूर करुनि दूर्धर व्याधिस। रोगमुक्त करितसे ॥९४॥ अन्ननलिकेत स्टोन झाला। म्हणूनि दाखवी डॉक्टरला। शस्त्रक्रिया सांगी करण्याला। दहा दिवसानंतर ॥९५॥ आई तू गेली कोकाटे घरी। अल्काताई चरण धरी। म्हणे वाचवा माते लेकरी। कृपा प्रसाद देवूनिया ॥९६॥ ऐकूनि लेकीचि भक्तीवाणी। द्रवतसे कैवल्यधामी। टाकीले अंगावर पाणी। दिव्यदृष्टी राखुनिया ॥९७॥ तनी अमृत सिंचूनि। भक्ता मिळे संजिवनी। उपचार करे भवानी। आचार करुनिया ॥९८॥ शस्त्रक्रिया तीन दिवसावरी। डॉक्टर तपासणी करी। करावी लागतसे तयारी। शस्त्रक्रिया करण्यासी ॥९९॥ डॉक्टर निधान करिती। एकाएकी स्तंभित होती। स्टोन न दिसे अन्ननलिकेति। कैसा घडला चमत्कार ॥१००॥ न करणे लागे ऑपरेशन। तंदुरुस्त होई परिपूर्ण। अन्ननलिकेत नसे स्टोन। पाहता मती खुंटते ॥१०१॥ म्हणे हे कैसे घडले। मीच तर निधान केले। काही न करता दूर झाले। अरिष्ट अल्काताईचे ॥१०२॥ ऐसे आईचे महिमान। दूर होई व्याधी महान। न करता औषधपान। कृपादृष्टी तरतसे ॥१०३॥ म्हणून नेले आईला। नागपूर सदनाला। उत्सव साजरा केला। भावभक्ति ठेवूनिया ॥१०४॥ श्रद्धा जडली मातेवर। न होई दूर क्षणभर। भक्तिभावे जोडूनी कर। उभयता पार्थितसे ॥१०५॥

भाविक शकुंतला बाई काळे। अर्पण करी भाव फुले। परी दैव कुणा न चुकले। शरिर भोग भोगीतसे ॥१०६॥ जे असेल संचिती। ते न चुके कल्पांती। आली त्याची प्रचिती। म्हणून येई तव दारी ॥१०७॥ कॅन्सरची दुर्धर व्याधी। त्रस्त करी जीवना लागी। उपचार तया बाधी। मृत्यु समीप दिसतसे ॥१०८॥ औषधोपचार बराच केला। परी न रोग हरला। शेवटी आली चरणाला। माउली अनसूयेच्या ॥१०९॥ जाऊनी कोकाटे घरी। शिर ठेवी चरणावरी। आई तू वाचव लेकरी। शरणागत मी असे ॥११०॥ नजरेन केला खेळ। फोडिले एक श्रीफळ। दुर पळविला काळ। भक्ताला रक्षावया ॥१११॥ शकुंतला बाईची व्याधी। दूर करी दयानिधी। रोगराई न बाधी। आशिर्वादे भगवती ॥११२॥ म्हणून श्रीक्षेत्री आली। तूच माता शक्ती दिली। ओटी भरुन पूजा केली। दृढभाव धरुनिया ॥११३॥ ऐसाच असू दे हस्त। हीच माझी आर्त हाक। भावभक्तिची पेटवून वात। जीवनज्योत तेवतसे ॥११४॥ येथील प्राचिताई ढोले। आळवि सद्‌गुरु गजाननाले। आली माता तव चरणाले। अभिन्नत्व जाणूनि ॥११५॥ गजाननाच्या पोथीच पारायण। गुरुवारी करी नित्य नेमान। माता तू देई प्रत्यक्ष दर्शन। गजाननाच्या प्रतिमेत ॥११६॥ गजानन अनसूया एकरुप। भिन्न भासे तव स्वरुप। एक दुसऱ्याचे प्रारुप। येवून बसे जवळी ॥११७॥ माता वदली प्राचिताईस। "गजानन व्हय म्हणते। आई व्हय म्हणते। गंगा व्हय म्हणते" म्हणूनिया ॥११८॥ माता तू केली भविष्यवाणी। पांढरा बगळा येई अंगणी। दुसऱ्या वर्षी ट्रॅक्स सदनी। येतसे तव कृपे ॥११९॥ पोथीच्या पारायणी। चेक येई घेवूनी। ठेवावा कुठे सदनी। प्रतिमे समीप की देवघरात ॥१२०॥ देवघरात चेक ठेवला। तत्क्षणी प्रतिमेचा हार गळला। दृष्टांत माते तू दिला। दोन्ही ठायी मीच म्हणूनि ॥१२१॥ महेन्द्र शाळेत दाखल करी। प्रवेश देवूनि सत्वरी। दर्शनी येवूनि विचारी। दाखला झाला का म्हणूनि ॥१२२॥





म्हणूनी येई चरणाला। न चुकवि पौर्णिमेला। गुरुपदेश फळा आला। तुझी कृपा म्हणूनि ॥१२३॥ दीपक बाळकृष्ण कुकसेला। किडनी स्टोनचा विकार जडला। सांगी शस्त्रक्रिया करायला। निधान करुनि रोगाचे ॥१२४॥ अपार श्रद्धा मातेवर। म्हणून येई माता मंदिर। बनूनि आईचा चाकर। पाद पूजा करितसे ॥१२५॥ आई तू सांग मला। शस्त्रक्रिया करणे कशाला। असता तू सबला। काय उणे मज असे ॥१२६॥ माता निरखि दीपकला। कृपादृष्टी लाभे त्याला। ओरखडले बाळाला। मार देवूनि कृपेचा ॥१२७॥ आई तुझे ओरखडणे। हीच शस्त्रक्रिया करणे। देई भक्ता नवजीणे। मारुनि तयाला ॥१२८॥ कीडनी स्टोन कोठे गेला। न कळे काही डॉक्टरला। औषध विना गुण आला। माता तव कृपेने ॥१२९॥ आईने आदेश दिला। नोकरी मिळे त्याला। फुलविला जीवन मळा। सुखसमृद्धि देवूनि ॥१३०॥ भाविक वैशाली सराफ। भजी माता दिनरात। तूच दूर करी कात। वेळोवेळी धावूनिया ॥१३१॥ कूकर भ्रष्ट झाला। अंगावर तो उडाला। पदार्थ सर्वांगाला। उष्ण ते भाजतसे ॥१३२॥ सर्व चिंतीत होती। कैसी आली आपत्ती। परी रक्षी भगवती। शितलला देवूनि ॥१३३॥ कोमट जली आंघोळ व्हावी। तैसे वाटले लवलाही। माता देतसे ग्वाही। गडांतर टळंल म्हणूनि ॥१३४॥ एका अपघातातूनि। तूच वाचवि भवानी। अलगत दूर करी जननी। हात धरुनिया ॥१३५॥ निमा पुराणिक घरी। गेली माता सत्वरी। पाणी नव्हते विहीरी। तयेवेळी गावात ॥१३६॥ उपहासाने म्हणती बाया। सत येते ना आता गावा। पाणीच पाणी जाई वाया। येता अनसूया गावात ॥१३७॥ माते तू पाय टाकता गावात। धो धो वाहे विहीरीत। सर्व पाहती आत। आश्चर्य करुनिया ॥१३८॥ मुले माणसे सांगती। पाणी लागले आडाति। किमया करी महासती। सतसंग देवूनिया ॥१३९॥ नागपूरचे महापौर भले। नामे बबनराव येवले। मुंबईला ते गेले। पक्षश्रेष्ठींच्या भेटीला ॥१४०॥

भेटली तेथे म्हातारी। होईल काम सत्वरी। रांगच लागेल घरी दारी। म्हणूनि वर्ततसे ।।१४१।। म्हातारीच्या स्वरुपात। माता जाई मुंबईत। भेट देई तव पुत। काम होण्या तयाचे ।।१४२।। शब्द तेचि खरे ठरले। उमेदवार नियुक्त झाले। म्हणून आले चरणाले। कैवल्यदानी मातेच्या ।।१४३।। येथील विठ्ठलराव लोहे। वाहकाचे काम पाहे। जोडपे एक जखमी होवे। गांधी चौकात अपघाती ।।१४४।। न्यायालयी केस गेली। आळवि तुज माऊली। तूच त्यांची रक्षा केली। निर्दोष सोडूनिया ।।१४५।। भक्त मधुकरराव सायरे। मधुमेहाने त्रस्त पुरे। उपचार बहु करे। परी न गुण येतसे ।।१४६।। आर्जविले भवानिला। दुरुस्त करी भक्ताला। आलो तव चरणाला। दयानिधी म्हणूनी ।।१४७।। भरती केले दवाखानी। न चाले अन्नपाणी। तिर्थ अंगारा देई वदनी। आई अनसूयेचा ।।१४८।। त्याचाच गुण आला। लेक तंदुरुस्त झाला। विद्यापीठी कामावर गेला। महाशक्ति कृपेने ।।१४९।। न चाले काही औषधी। तिर्थ प्रसादाची उदी। बरा करी कृपानिधी। जर्जर व्याधितूनि ।।१५०।। तोचि उपचार घडला। म्हणून आले सेवेला। भजी अनसूया मातेला। सायरे पती पत्नी ।।१५१।। विनायकराव तिवारींची माता। पडली स्नान गृहाता। हाड मोडली तिता। नाना उपचार करितसे ।।१५२।। परी तू बसविले। जागच्या जागी हाडाले। तंदुरुस्त तिला केले। कृपादृष्टी ठेवूनि ।।१५३।। जे न होई दवाखानी। पूर्ण करी माता भवानी। म्हणूनी आले चरणी। भावभक्ति अर्पूनीया ।।१५४।। माधवराव बर्वेची कांता। आली दर्शना माता। परी तू सांगी तिता। घरी जा म्हणौनिया ।।१५५।। काय असेल घरी। न कळे तव लेकरी। का करी आज्ञा पोरी। तुझे तूच जाणतसे ।।१५६।। मानूनि आज्ञा प्रमाण। जवळ करी भवन। दृष्य पाहूनि नयन। अचम्बित होतसे ।।१५७।। होता अपघात झाला। पती माधवराव बर्वेला। म्हणून पाठविले तिला। सेवा करण्यासी ।।१५८।। माता तू जाणी मठात। काय घडले नागपूरात। म्हणूनि पाठवि क्षणात। भेटावया पतिला ।।१५९।। कृपाप्रसाद त्याना तारा। अपघाती बरा करी। वाणी करितसे खरी। माय माझी अनसूया ।।१६०।। प्रसादाचे महिमान। गातसे भक्त गाण। प्रचिती घेई संत सज्जन। महाशक्ति मातेच्या ।।१६१।। प्रदक्षिणा घाली वटाला। आयुष्य लाभे पतिला। स्त्री जन्म सफल झाला। व्रतवैकल्ये करुनि ।।१६२।। सतित्वाची ही कहाणी। यमाला लावी परतोनी। सत्यवाना अभय मागूनि। अमर होई त्रिजगी ।।१६३।। तैसेच तुझे रुप। सती सावित्रीचे स्वरुप। सर्व होती एकरुप। भगवती चरणासी ।।१६४।। विद्याधर देवतळे। घेवूनि येई मुलेबाळे। १६/६/१९९२ वट पौर्णिमेले। श्री क्षेत्री पारडसिंगा ।।१६५।। मातेला बसविले गाडीत। जाई नारायणपूर मंदिरात। समोर करी प्रसाद ताट। आई अनसूयेच्या ।।१६६।। प्रसाद सेवन करी माता। फेकून देई आपुल्या पुता। कृपा प्रसाद जमविता। आनंद वाटे विद्याधरा ।।१६७।। भजुनि माता माऊ लिला। प्रसाद तोचि गोळा केला। सोबत नेई नागपूरला। रामदासपेठी स्वगृही ।।१६८।। नाही राहली आठवण। प्रसाद खाण्याची जाण। उघडूनि पाही तत्क्षण। वास तया येतसे ।।१६९।। ईच्छा न होई खाण्याला। वास लागला प्रसादाला। क्षमा करी बालकाला। अज्ञानी अनाथ मी ।।१७०।। त्यांच्याच घरी आवारात। विहीर असे आत। शुद्ध पाणी होते त्यात। वापर सर्व करितसे ।।१७१।। टाकला प्रसाद विहीरीत। निश्चित राहले घरात। प्रचिती येई क्षणात। किमया माऊलिची ।।१७२।। आडावर पाणी काढण्या गेले। भाडेकरु चकित झाले। हिरवे पिवळे पाणी दिसले। आरसपाणी असे जे ।।१७३।। काल नव्हते असे पाणी। हा रंग भरला कुणी। न कळे कुणाची करणी। न भरी पाणी एक ।।१७४।। विहिरीत सर्व डोकावती। वास जलाचा येई वरती। सौ. देवतळे ज्ञात होती। किमया प्रसादाची ।।१७५।। प्रसादाची केली अवहेलना। तिच प्रचिती आली जाणा। अद्भूत असे माता

महिमा। क्षमा करी अपराध ।।१७६ ।। त्वरीत येई माता मंदिरी। पारडसिंगा गुरुवारी। पारायण पूजा अर्चा करी। क्षमायाचना करुनि ।।१७७।। आई, बाळाची चूक झाली। परी तू असे जगतवल्ली। तुच माझी माऊ लि। महाशक्ति अनसूया ।।१७८ ।। माते तू क्षणी पारखले। तत्क्षणी पाणी शुद्ध झाले। पुन्हा फेकी प्रसादाले। कृपादृष्टी ठेवूनिया ।।१७९ ।। घेवूनि मातेचे दर्शन। जवळी करी सदन। विहिरीत पाही डोकावून। आरसपाणी दिसतसे ।।१८० ।। वापरु लागले सर्व पाणी। कळून आली प्रसाद करणी। भजतसे अनसूया भवानी। दिव्यता पाहूनिया ।।१८१ ।। ऐसा हा प्रसाद महिमा। कथन केला तव स्मरणा। पूर्ण करी तव कवणा। कृपा दृष्टी ठेवूनिया ।।१८२ ।। आई तुझी लीला। दाविली दत्तात्रय अपराजिताला। जावूनि भांडे प्लॉटला। दर्शन तू देतसे ।।१८३ ।। उदय मुलाचा आजार। बरा करी दत्त दिगंबर। लावी धूपबत्ती कापूर। गुरुचरित्र पारायणी ।।१८४ ।। या पारायणी दिनी। अवचित गेली तू सदनी। भक्ताच्या गाडीवर बसूनि। भाव भक्तिच्या ओढीने ।।१८५ ।। पारायणी आली माता। जवळ घेई तू पुता। तीन बाळाचे वदन भरविता। श्रीपाद वल्लभ म्हणतसे ।।१८६ ।। पाहिले नव्हते आई तुला। परी भजतसे गुरुमाऊ लिला। दत्तदिगंबराची लीला। दावितसे माऊ लि ।।१८७ ।। गुरुवाणी करण्या खरी। करीतसे भक्ताची चाकरी। "काय रांधलं थे आण" उचारी। सार्थ कराया वचन ।।१८८ ।। न सूचे कुणाला काही। कैसी करावी सेवा माई। बाळ तुझा अज्ञानी पाही। ज्ञानदृष्टी मागितसे ।।१८९ ।। बाळाला घेई जवळ। तोडतसे फळफळावळ। पलंगाखाली टाकी बाळ। रडतसे तयेवेळी ।।१९० ।। झाडांना स्पर्श करुनि। फुले काही तोडूनि। कार्य पूर्ण करुनि। निघून जाई भगवती ।।१९१ ।। अपराजित होई चकित। मुलगा उठला त्वरीत। धावी खेळी एकजात। कृपे माता माऊलिच्या ।।१९२ ।। जावूनि भक्ताघरी। दु:ख त्याचे हारी। प्रचिती





दिली खरी। रक्षूनिया बाळासी ।।१९३ ।। माऊलीवर दृढ श्रद्धा। श्रीपाद वल्लभ भजी सदा। धावत जाई माता वरदा। दत्ताच्या हाकेला ।।१९४ ।। श्रीपाद वल्लभ तुला म्हणावे। नृसिंह सरस्वती तू पावे। दत्त दिगंबर रुप बरवे। तूच माता ठायी-ठायी ।।१९५ ।। म्हणून आले तुला शरण। गाती सदा तुझे गाण। कृपा करी जाऊनी भवन। भाव पुष्प अर्पितसे ।।१९६ ।। शरद देशमुखला। मनोविकार जडला। तिर्थानेच उपचार केला। नित्य सेवूनिया ।।१९७ ।। भाविक राजेंद्र ठाकरे। कृपा दृष्टी तया मिळे। घरी जावूनि शमविले। पाणी अंगावर फेकूनी ।।१९८ ।। दाह झाला शांत। घरी येता भगवंत। म्हणून पूजि दिनरात। श्रद्धाभाव अर्पूनि ।।१९९ ।। वाचविले तू अपघातातूनि। न पडू दिले खाईत तनी। गाडीची मोड-तोड क्षणी। होतसे पडल्यावरी ।।२०० ।। परी तू दिले अभयदान। देवूनि लेकरा जीवदान। दुर करी सर्व विघ्न। सुखरुप ठेवूनिया ।।२०१ ।। एकदा मंदिरी चोर आला। दानपेटी घेवून पळाला। पैसे काढून टाकी तिला। तळ्यातील विहीरीत ।।२०२ ।। विहिरीतील गाळ काढूनि। साफ करी कूप तनी। निघाली पेटी त्यातूनि। दोन वर्षानंतर ।।२०३ ।। पेटीत होते पाणी। पाहातसे ती उघडूनी। दिपले नयन क्षणी। दृष्टांत बघताचि ।।२०४ ।। होतं पावती पुस्तक। त्या दान पेटीत। दोन वर्ष पाण्यात। पडून ते रहातसे ।।२०५ ।। परी न मिटले अक्षर। न होई जर्जर। तुझीच ही धरोहर। अक्षय नामाची ।।२०६ ।। एका दिवाळी सनी। लक्ष्मी पूजनाच्या दिनी। होती तू नारायणपूर धामी। लेकरासवे आपूल्या ।।२०७ ।। पंचपक्वाने आणूनि। नैवेद्य देई जननी। पुरण पोळी तव धामी। घेवूनि येतसे ।।२०८ ।। भक्त आर्जवि तुला। सेवन करी नैवेद्याला। महालक्ष्मी पुजनाला। पात्र करावे आम्हासी ।।२०९ ।। माता वदली त्या क्षणी। चूण भाकर कोण आणी। न वाटे गोड मिष्टान्नी। चुन भाकरी विना ।।२१० ।। माता आज दिवाळी। घरोघरी पुरणपोळी। कोण आणी

चूनभाकरी। सणाच्या या दिनी ॥२११॥ तेथे होता एक भक्त। गरिबीने होता त्रस्त। येई समोरी एक जात। शिदोरी घेवूनिया ॥२१२॥ होती त्यात चूनभाकर। जाणतसे करुणाकर। म्हणून मागितसे सत्वर। भाव त्याचा जाणूनि ॥२१३॥ पंचपक्वान्न असता धामी। भिती वाटे माझ्या मनी। अर्पावि कैसी जननी। गरीबाची भाजी भाकर ॥२१४॥ परी माते तू जांणी। भक्ताचा भाव अंतर्मनी। तेच मागतसे जननी। कृष्ण विदुरापरी ॥२१५॥ राव रंक समादरी। आहे तुझ्या दरबारी। भेदाभेद न करी। म्हणून म्हणतीं अनसूया ॥२१६॥ दिला हाची दृष्टांत। चूनभाकरीचा साद्यन्त। कृपा करी भगवंत। कृपादृष्टी ठेवूनि ॥२१७॥ ऐसा माता परिवार। नागपूर शहरी सर्व दूर। भजी भगवती घरोघर। एक नाम घेवूनि ॥२१८॥ गेली तू प्रत्येक घरी। उद्धारण्या नर नारी। म्हणून करी तव चाकरी। श्रीक्षेत्री येवूनिया ॥२१९॥ पुढील अध्यायी हीच कथा। नागपूरची पावन गाथा। भावभक्तिची अखंड सरीता। एकचित्ते ऐकावी ॥२२०॥ इतिश्री परमेष्ठी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमित्त करुनि तव सुता। अष्टादशोऽध्याय संम्पूर्ण ॥२२१॥ श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती॥ शांती॥।

**॥ श्री परमेष्ठी अनसूया माता की जय ॥**

**॥ ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ॥**





## अध्याय १९



माताजीचे पावन पूजनिय चरण



'व्हन तिकडे' म्हणतांना माताजीची मुद्रा

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

नमो माऊली कृपाघना। दिली करी नामविणा। अखंड वाजू दे तना। जय जय अनसूया ॥१ ॥ आहे मी पूर्ण रिता। तूच करितसे पूर्तता। सदैव वाहू दे सरिता। माता तव नामाची ॥२ ॥ अशीच घडू दे सेवा। हेका पूरवि तू देवा। तव चरणाचा धावा। सदा राहो भगवती ॥३ ॥ तुझा भक्तपरिवार। व्यापिले नागपूर शहर। ऐका त्यांचा कथासार। आशिर्वादे माऊली ॥४ ॥ दिलीप पनकुले नगरसेवक। सात्विक परी भाविक। लीन दीन असे नेक। तव चरणी महामाया ॥५ ॥ ध्यानी मनी स्वप्नी माता। वसतसे सुषमा कांता। न कळे काही या परता। गुण गाई तुझेची ॥६ ॥ घटाटे घरीं माता होती। उभयता दर्शन घेती। रात्रभर जागर करीती। नामस्मरण करुनिया ॥७ ॥ माता तव विदेही पण। न कळे स्वरुपाची जाण। ज्ञानी करावी अज्ञ मन। बाळ तुझा आर्जवि ॥८ ॥ दृष्टांत तव झाला। महालक्ष्मी दिसे नयनाला। तत्क्षणी जाई दर्शनाला। घटाटेच्या घरी ॥९ ॥ दर्शनी होई पूर्तता। साशंक मनाची पूर्णता। विदेही स्वरुपाची अस्मिता। परब्रम्ह जाणितसे ॥१० ॥ ईच्छा झाली अनावर। पावन करावे घर। कृपा करी लेकरावर। चालत येवूनि घराला ॥११ ॥ पूर्ण केली तू आस। जाऊनि त्या सदनास। तव कृपेचा असे वास। घरी पनकुलेच्या ॥१२ ॥ पूजापाठ तव करिती। नानापरी आळविती। म्हणतसे तूच अधिपती। दुजा नसे ठाव मज ॥१३ ॥ पुत्र संग्रामची प्रकृती। सदैव येई आपत्ती। दिवसेंदिवस खालावती। स्थिती बाळाची ॥१४ ॥ अशक्त पणा वाढला। रक्त ना राही तनाला। ताप वाढतच चालला। चिंता करी मातापिता ॥१५ ॥ डॉक्टर निधान करिती। हृदय रोग सांगती। शस्त्रक्रिया करण्या लाविती। संग्राम बाळाची ॥१६ ॥ कोमल हृदय बालवय। शस्त्रक्रिया

वाटे भय। आळविती अनसूया माय। पारडसिंगा येवूनिया ॥१७॥ माता तू रक्षी बाळाला। अभय दे संग्रामला। भजिती सृष्टी सतीला। दृढभाव धरुनि ॥१८॥ आईची आंघोळ करी। येवूनि तव मंदिरी। तेच तिर्थ नेई करी। बाळाला द्यावया ॥१९॥ अनुदिन तीर्थ उदी घेई। कृपा प्रसाद बाळ सेवी। चौथ्या दिनी प्रत्यय येई। तीर्थ प्रसादाचा ॥२०॥ ताप एकदम वाढला। तव ते दावी डॉक्टराला। क्ष किरणाचा उपचार केला। आचार घडण्यासी ॥२१॥ हृदयरोग ज्याने सांगितला। तोच तपासी बाळाला। परी तो अचम्बित झाला। निधान करुनिया ॥२२॥ न करता काही उपचार। हृदयरोग होई फरार। पुन्हा-पुन्हा पाही डॉक्टर। परी न दिसे लक्षण ॥२३॥ खर्च करुनि लक्षावधी। आयुष्यभर असते दु:खी। परी कृपा करी दयानिधी। जीवनदान देवूनी ॥२४॥ मातापित्याची भक्ति। सुखवि महासती। संग्राम बाळाची प्रीती। भगवती चरणासी ॥२५॥ माता पिता बंधू सखा। गाई अनसूया गाथा। सांगतसे तिचिच कथा। भक्तिभावे पनकुले ॥२६॥ करिती ते उत्सव। महाशक्तिचा महोत्सव। असे माता तव ठाव। तव लेकराच्या सदनी ॥२७॥ ऐकली होती तुझी लीला। हाती धरी तू ज्वाला। तेच कृत्य करी घराला। हात टाकूनि कढईत ॥२८॥ न्याहाळूनि पूर्ण अन्न। चाखितसे स्वयं ब्रम्ह। मग करी अन्नदान। दिलीप सुषमा सवे ॥२९॥ फेकते थे काय व्हय्। विचारी तू भक्ता भावे। परी गुह्य तूच पाहे। अज्ञ जना काय कळे ॥३०॥ जपूनिया तुझा मणी। ध्यान करिती ऋषीमुनी। फेकून देई त्यांच्या वदनी। तृप्त करी तयांना ॥३१॥ आई तुझी महिमा न्यारी। रंकाचा तु राव करी। करी जो तुझी चाकरी। नंदनवन तया लाभे ॥३२॥ खऱ्या खोट्याची जाण देई। महाशक्ति अनसूया आई। तव वचने सावध होई। न होता काही अपाय ॥३३॥ गेली हनुमान मंदिरी। माता तू उपदेश करी। अनेक जन्म धारण करी। मानव जन्म मिळण्यासी ॥३४॥ मानव





जन्माची थोरवी गाईली। उपदेशाने दृष्टी आली। जनसेवेची महती कळली। बोधामृते भगवती ॥३५॥ भक्तिचे असे महिमान। मानव जात पुण्यवान। सार्थ करी जीवन। भावभक्ति करुनिया ॥३६॥ अंतर्ज्ञानी तू असे। भक्ता जाण देतसे। मनी ओळखतसे। सर्व साक्षी माऊलि ॥३७॥ माता तुच बुद्धी देई। काय करावे कोणे समयी। सूचवि मम माझी आई। दृष्टांत देवूनिया ॥३८॥ पशुपक्षांवरही प्रेम। आई करी महान। घ्या प्रचिती जाणून। जगदम्बा मातेची ॥३९॥ पेटत्या शेकोटी जवळ। बसे तुझा दिलीप बाळ। फुलपाखरु घाली भोंवळ। धुणीच्या भोवतांली ॥४०॥ पाखरु आगीनं होरपळलं। दूर जाऊन खाली पडलं। प्रेमानं गोंजारलं। आई अनसूयेने ॥४१॥ दीन दु:खीतांची आई। पशुपक्षांचीही माई। भुत दया तव ठायी। म्हणूनी रक्षीतसे सर्वांते ॥४२॥ कृपा कांक्षीणी नाम तव। भजती रंक राव। मिळतसे कृपा ठेव। अनसूया मातेची ॥४३॥ म्हणून विनवी मातेला। धनसंपदा नको मला। असू दे चरण पूजेला। जन्मोजन्मी दास तुझा ॥४४॥ तूच असे अनाथांची नाथ। दीन दु:खीतांची तूच तात। राव रंकाची एकच गत। दरबारी तुझ्या असे ॥४५॥ सुदाम्याचे पोहे तू खाई। प्रसन्न असे अनसूया मायी। सर्व कुटूंब भजे आई। काम धंदा सोडूनिया ॥४६॥ श्रद्धा वसू दे अंतरी। विनवी आई परोपरी। न घडू दे कधी दुरी। वात्सल्यसिंधू अनसूया ॥४७॥ वसंतराव पापडे यांच ठायी। गजानन नगर ला राही। दुर्धर व्याधी ग्रासी देही। असह्य यातना होतसे ॥४८॥ आमदार किशोर काशीकरचे। जावई वसंतराव साचे। अधिकारी महानगर पालिकेचे। सेवाभावी लिन असे ॥४९॥ दोन वर्षा पासून आजारी। कार्यालयी जाने बंद करी। उपचार केले नाना परी। परी खिळले बिछानी ॥५०॥ रक्ताचे पाणी होई। अंत्यावस्था समीप येई। शरिरी रक्त न राही। मृत्यू दिसे समोरी ॥५१॥ काशीकर विचार करी। कैसी होईल व्याधी बरी। पूर्ण देशात उपचार करी। परी गुण न येतसे ॥५२॥

ईलाज न होई हमखास। रक्त आटी दिवसें-दिवस। येऊनी पनकुले सदनास। व्यथा आपली सांगती ।।५३ ।।
पनकुले सांगती त्यास। महाशक्ती करी वास। श्रीक्षेत्री पारडसिंग्यास। कल्पतरु भक्तांलागी ।।५४ ।। श्रद्धा जर
ठायी बसेल। क्षणात तुमची पीडा टळेल। कृपा कटाक्षे माता तारेल। वसंतराव पापडेंना ।।५५ ।। विचार करी
वसंतराव। न मिळे कुठेच ठाव। चला धरु अनसूया पाय। दृढ भाव ठेवूनी ।।५६ ।। नेई तू भगवतीला। कृपा प्रसादे
स्वघराला। भजीतसे आदिशक्ती ला। पुजापाठ करुनिया ।।५७ ।। सेवितसे तिर्थ प्रसाद। अंगारा लावी अंगास।
पुजू लागले मातेस। अहर्निश सेवाभावे ।।५८ ।। अंगाऱ्याचा गुण आला। तिर्थाचा महिमा कळला। रोग दुरुस्त
होवू लागला। आशिर्वादे भगवती ।।५९ ।। हळू-हळू काळ गेला। रुधिर भंरले शरिराला। पूर्णत: स्वस्थ झाला।
जगदंबा कृपेने ।।६० ।। म्हणून आले तव चरणी। काशीकर जावया घेवूनी। भजतसे सदा तनी मणी। गीत तुझे
गाऊनी ।।६१ ।। आई तुझा एक भक्त। भास्कर सदन नामवत। प्रताप नगरी नागपूरात। सह कुटूंब रहातसे ।।६२ ।।
हृदय रोगाची व्याधी त्यासी। हार्ट अटॅक येई दोन वेळासी। संजीवनी देवूनी तयासी। तुच माता वाचवी ।।६३ ।।
तीसरा हार्ट अटॅक आला। दवाखानी नेले त्याला। औषधोपचार केला। उपाय करी नाना परी ।।६४ ।। डॉक्टर
म्हणती उपाय संपले। दैवच वाचवी भास्करले। मरणाच्या समीप आले। भार टाकावा देवावरी ।।६५ ।। आई होती
पनकुले घरी। विनवनी करी परोपरी। माते तुच आता तारी। अभय देवूनी लेकाला ।।६६ ।। रडू लागले खळखळ।
भगवती प्रतीमे जवळ। दवाखानी भजे बाळ। फोटो ठेऊनी जवळी ।।६७ ।। तिर्थ प्रसाद सेवन केला। अंगारा
लावी हृदयाला। दृष्टादृष्टीचा खेळ केला। तुच माता अनसूया ।।६८ ।। आई तु असे समर्थ। पूर्ण करी मनोरथ। देई
तु सदैव साथ। पिडा हारी दासाची ।।६९ ।। टाकला मातेवर भार। मार अथवा तुच तार। मी तर असे पामर। दु:ख





हारीणी अनसूया ।।७० ।। माते तु कृपा केली। भास्करची व्याधी हरली। दवाखाण्यातून सुटी झाली। आठ
दिवसानंतर ।।७१ ।। तिसरा अटॅक येवूनी। आई वाचवी मरणातुनी। माता तु जगत जीवनी। अनसूया नाम
तुझे ।।७२ ।। हृदय शस्त्रक्रिये साठी। दोन लाख ठेवी गाठी। परी उपचार करी दयानिधी। न लागता पैसा
अडका ।।७३ ।। न लागे धन संपत्ती। तिर्थ प्रसादाची महती। दुर्धर व्याधी दूर होती। माता तव कृपेने ।।७४ ।।
घेवूनी माता दर्शन। भिजवी अपुले लोचन। म्हणे दिले नवजीवन। तुच माता अनसूया ।।७५ ।। चारमोरे कुटुंबावर।
अनंत असे तव उपकार। दुर करी कन्या आजार। नागपूर मुक्कामी ।।७६ ।। फेस वदनी निघू लागला। दांत
खिळी बसे मुलिला। रात्री दोन च्या समयाला। अस्वस्थ असे लेक ।।७७ ।। यम यातना होत होती। पनकुले घरी
आई होती। बोलता बोलता स्तब्ध राहती। माय माऊली अनसूया ।।७८ ।। माता वदे हाक मारते। धावत येई
चारमोरे पुते। धरुनी आईचे चरणाते। वाचव म्हणे मुलिला ।।७९ ।। धुवूनी आईचे चरण। तेच तीर्थ करी प्राशन।
घटाटे भरवी वदन। तीर्थ टाकूनि तोंडात ।।८० ।। तत्क्षणी माता झोपली। कृपादृष्टी फिरविली। अर्ध्या तासात
पुन्हा उठली। व्याधी दूर करुनिया ।।८१ ।। पंधरा मिनिटाचा वेळ। दुर करी तीचा काळ। मग येई माते जवळ।
भाव भक्ति अर्पूनी ।।८२ ।। पांच पौर्णिमेचे व्रत। करी चारमोरे भक्त। येवूनी श्री क्षेत्रात। भजतसे भगवती ।।८३ ।।
एकाएकी चालती झाली। फुकटाची औषधी मिळाली। भावभक्ति मनी फुलली। आशिर्वादे मातेच्या ।।८४ ।। न
लागे धन संपत्ती। भजण्या अनसूया सती। दृढश्रद्धा भावभक्ति। सोडवि यमपाशातूनी ।।८५ ।। आई तू वाचवि
जगदाळेला। अनिल विजया उभयताला। ऑटो रिक्षा उलटला। परी न ईजा कुणास ।।८६ ।। पांच मे च्या
जन्मदिनी। करितसे भक्त वर्गणी। माता आली तव सदनी। मीठ आण म्हणतसे ।।८७ ।। परि न राहली आठवण।

मीठ देण्याची जाण। विसरुन जाई महिमान। प्रत्यंतर येतसे ।।८८ ।। आईचा शब्द न पाळला। दृष्टांत तव घडला। परी रक्षी मुला बाळाला। या अपघातातूनिया ।।८९ ।। मग आणिले मीठपुडे। देतसे भक्तांकडे। दानाचे मिळाले धडे। माता तव कृपेने ।।९० ।। भाविक शारदाबाई हाडगे। अरुणरावाच्या पत्नी भागे। माँ अनसूया ओढ लागे। अनुदिन सेवका ।।९१ ।। तीनशे दोन कलमाखाली। खून खटल्यात अटक झाली। परी निर्दोष मी माऊली। सांगतसे जनाला ।।९२ ।। दोष नसता माझा काही। कैसी शिक्षा भोगू माई। बाळा तव तूच वाचवि। या खून खटल्या तूनि ।।९३ ।। निकालाच्या दिनी। माता गेली न्याय दानी। पांढर पातळ घालूनी। रक्षावया बाळासी ।।९४ ।। रोखले तुला तेथे। कैसी आली बाई येथे। निकाल ऐकावा म्हणते। म्हणून येणे केले ।।९५ ।। न्यायालयी चमत्कार घडला। वकील गैरहजर राहला। अरुण निर्दोष सुटला। भगवती कृपेने ।।९६ ।। म्हणून दिला आरसा भेट। भव्य-दिव्य असे थाट। भजतसे माता एकवट। उभयता पती पत्नी ।।९७ ।। घर काढले विकाया। परी न येई कोणी घ्याया। भजतसे माता अनसूया। कृपा करी दीनावरी ।।९८ ।। न्यायालयी तू वाचाविले। त्याच सप्ताही घर विकले। माता तव कृपेने घडले। संपन्नता लाभतसे ।।९९ ।। तव चरणाचा लागे लळा। तुजविण मी पांगळा। तुझाच हा गोतावळा। तूच लक्ष पूरवितसे ।।१०० ।। नागपूरचे सुधीर वानखेडे। गाती नावाचे पोवाडे। दिले तू तया धडे। भावभक्ति फुलण्यासी ।।१०१ ।। आई देवकाबाईचा कॅन्सर। तूच माता करी दूर। तीर्थ उदीचा उपचार। रोगमुक्त करीतसे ।।१०२ ।। पत्नी अरुणा वानखेडेला। शस्त्रक्रियेत ट्युमर निघाला। न होई अपत्य कदापि हिला। म्हणून डॉक्टर सांगितसे ।।१०३ ।। तेव्हा आलि तव चरणा। माते वाचव तव अज्ञाना। दुर करी हा बहाना। सुख शांती देवूनिया ।।१०४ ।। नांदायला गेले आई वदली। कुत्र्यावानी जगुन राहिली। शब्दाची सत्यता







पटली। म्हणून विश्वास बसंतसे ।।१०५ ।। लागे ओढ दर्शनी। येतसे माता तव धामी। बाळा जोऽजोऽरे म्हणे जननी। श्रीरंगा आला बाई श्रीरंगा आला ।।१०६ ।। कानी गोटा तू मारला। गर्भवती होई समयाला। बेशुद्ध होई त्या क्षणाला। येतसे मंदिरा बाहेरी ।।१०७ ।। आक्रोश माते तु केला। झणझणी वाटे तनाला। परी ईजा न होई कानाला। कृपा दृष्टी म्हणूनी ।।१०८ ।। तोच मार कामी आला। पुत्र प्राप्ती झाली तिला। श्रीकृष्ण जन्माष्टमीला। श्रीरंग येई घरी ।।१०९ ।। दुध नव्हते स्तनी। कैसी करावी पोषणी। म्हणून आली चरणी। बाळासी घेवूनीया ।।११० ।। होते पाय वाकडे। घाली मातेस सांकडे। दर्शनी होई नेटके। कृपादृष्टी तव होता ।।१११ ।। बाळावर टाकला तू पदर। श्रीरंग म्हणे जगदिश्वर। न करता काही उपचार। तंदुरुस्त होतसे ।।११२ ।। डॉक्टर अचंभित होती। कैसी होई पुत्र प्राप्ती। ही तर आईची यशोमती। म्हणून अरुणा गातसे ।।११३ ।। तोच लागला लळा। तव नामाचा जिव्हाळा। करितसे लडीवाळा। श्रीक्षेत्री येवूनीया ।।११४ ।। ॲडव्होकेट चंद्रकांत जगदळे। व्यवसायी वकील बडे। तव भजनी झाले वेडे। गुण तुझेची गातसे ।।११५ ।। गजानन बाबाचे दर्शन। देतसे तू मनोमन। शेगांवीचा राणा जाण। पारडसिंगा येवूनिया ।।११६ ।। सुखसंपत्ती सर्व दारी। परी अपत्याची वाण खरी। भजतसे तव परोपरी। पुत्र व्हावा म्हणूनिया ।।११७ ।। पौर्णिमेला करती वारी। येवूनी तव दारी। न होई कधी दूरी। तव चरणा पासूनी ।।११८ ।। एके पौर्णिमा दिनी। आली जगदळे पती पत्नी। गेली तु नारायणपूर धामी। सवे घेवूनी उभयता ।।११९ ।। तेथे तु विष्ठा केली। महा सुखाची पर्वणी लाभली। दिव्य दृष्टी तया रोखली। अभय देवूनी बाळाला ।।१२० ।। तव विष्ठेचे महिमान। दु:ख करी हरण। तुझेचेनी आर्शिवचन। कृपा प्रसाद मिळतसे ।।१२१ ।। म्हणून न चुके वारी। येण्या श्रीक्षेत्री मंदिरी। करीती सेवा चाकरी। नाम स्मरण करुनिया ।।१२२ ।। आई तुझा

जिव्हाळा। लागे सुनंदा नासरेला। यावे माता घराला। म्हणून अर्चना करीतसे ।।१२३ ।। घरा समोरुन तू गेली। हताश बालिका झाली। कधी येईल माय माऊली। एकटक बघतसे ।।१२४ ।। एकच आस होती मनी। दर्शनी यावे भवानी। येवूनी मम सदनी। पावन ते करावे ।।१२५ ।। सुनंदा ताई आली मठात। पारडसिंगा श्रीक्षेत्रात। माता तू उठूनी त्वरीत। बाहेर जातसे ।।१२६ ।। केला तीने नमस्कार। तोच माता वदली पोरं। घरी चाल म्हणे करूणाकर। कृपा दृष्टी ठेवूनीया ।।१२७ ।। सजविले घरदार। आनंदीले नारी-नर। एकच केला गजर। बघता तुज भगवती ।।१२८ ।। करुनी पुजा अर्चन। आळवी माता मनोमन। पावन करी सदन। रथसप्तमीला येवूनी ।।१२९ ।। आंघोळ घालुनी सुवासिनी। पैठणी आण वदे जननी। स्विकार करी अहेर भवानी। पुढे आणेल पैठणी ।।१३० ।। बहिणीचे न होई लग्न। म्हणून विनवी क्षणोक्षण। तोच आले जुळुन। तव कृपे भगवती ।।१३१ ।। भाविक रमेशला। लावून दिले नोकरीला। तव कृपेचा बोलबाला। करीतसे तव भक्त ।।१३२ ।। महालक्ष्मीच्या रुपात। दर्शन देइ नरेन्द्र नगरात। पंढरीमय होई क्षणात। पदस्पर्शे तुझीया ।।१३३ ।। माता तु जाता सोडुनी। पुत्र समीर पाही दिनवानी। न दिसे आता नयनी। अनसूया माऊली ।।१३४ ।। तोच तु दिले दर्शन। मुर्ती रुपात सचेतन। पावला पुत्र समाधान। दर्शन घेवूनिया ।।१३५ ।। उभयता भजे भगवती। एकश्रद्धा ठेवूनी चित्ती। तुच असे आम्हा तृप्ती। दर्शन लाभ घडतसे ।।१३६ ।। म्हणून करी अर्पण। साज श्रृंगार पूर्ण। रजत मुकुट धारण। शिरी तू करीतसे ।।१३७ ।। मिरवणूक आलि वाड्या समोर। उभे होते रामराव तुपकर। फेकला आंबा अंगावर। आई अनसूये ने ।।१३८ ।। अस्थमा त्रस्त करी। न होई उपचार घरी। श्रद्धा भावे आंबा उदरी। टाकतसे भक्त तुझा ।।१३९ ।। तोच अस्थमा दूर गेला। आंब्याचा प्रसाद फळला। कृपा दृष्टीचा हा बोलबाला। गातसे भक्त तुझा ।।१४० ।। सौ. आरतीताई






अनिल देशमुख येती। श्रीक्षेत्री माता भगवती। परोपरी तव आळवती। सर्व स्थळी सर्व काळी ।।१४१ ।। एकदा आल्या दर्शनी। दुपारला तव धामी। परी विश्रांतीची वेळ जननी। म्हणून दार बंद असे ।।१४२ ।। घेवू दोन वाजता दर्शन। विचार करी मनोमन। परी माता येई तत्क्षण। आर्तता जाणूनिया ।।१४३ ।। कडा करुनी पार। येवू लागे माता सत्वर। दर्शन देण्या करुणाकर। सौ. आरतीताईसी ।।१४४ ।। बसली माता येवूनी गाडीत। गेले नारायणपूर मंदिरात। काजू किसमीस देई भगवतीस। श्रद्धा भाव ठेवूनी ।।१४५ ।। फराळाचा डबा होता खाली। म्हणून न दिला जगतवल्ली। माता पुन्हा-पुन्हा मागू लागली। आणखी काय आणलं म्हणूनी ।।१४६ ।। आई तु अंतर्ज्ञानी। जाणतसे मनोमनी। काय आणी कोण धामी। तेच तु मागीतसे ।।१४७ ।। काढला डबा वर। दिला मातेला फराळ। सेवन करी कृपा सागर। एकटक पाहूनिया ।।१४८ ।। मुलगी होती घरी। चंद्र-सुर्य तू विचारी। मुलगा पाहूनी बरोबरी। आठवण तु करीतसे ।।१४९ ।। असा आई तुझा महिमा। दावितसे क्षणोक्षणा। म्हणून येई तव चरणा। श्रद्धा भाव ठेवूनी ।।१५० ।। शरद मार्कंडेयचे घर। दोन खोल्यांचा विस्तार। मातेची कृपा पामरावर। विकून दिले घराला ।।१५१ ।। दोन खोल्यांच्या घरात। बारा खोल्या होती प्राप्त। घेणारा चित्ती मनात। कसा फसलो कळेना ।।१५२ ।। माह्या बापूचा बंगला झाला। आई म्हणे लेकराला। झोपडी विकून बंगला दिला। कृपा करी दीनानाथा ।।१५३ ।। अनिल मार्कंडेयची कन्या। दिपाली असे तनया। नागपूरला राहूनिया। भजतसे भगवती ।।१५४ ।. मुलिचे करावे लग्न। परी येतसे त्यात विघ्न। पैश्यांच्या काळजीत सदा मग्न। चिंता क्रांत होतसे ।।१५५ ।। शेगांविचा योगी राणा। कुल दैवत त्यांचे जाणा। तोच असे त्यांच्या भजना। घरी दारी सर्वत्र ।।१५६ ।। लहान मलिच्या रुपात। अंबा देवीच्या स्वरुपात। देई दर्शन अनसूया सत। संकटी

धावूनीया ।।१५७ ।। तोच लग्न जुळून आले । धन संपदा सर्व मिळाले । सुख समृद्धी लाभे घराले । माता तव कृपेने ।।१५८ ।। किरण गावंडे घरी । प्रेतात्मे नाच करी । भुत बाधा होई लेकरी । काय करावे कळेना ।।१५९ ।। भक्ताची पाहूनी दुर्दशा । जाई तू त्यांच्या कक्षा । दीप मागीतसे लक्षा । पूर्ण करावयासी ।।१६० ।। हार जाळूनी नारळ फोडीले । एकटक न्याहाळिले । तांदूळ फेकूनी संकट गेले । सुभाषराव गावंडेचे ।।१६१ ।। सुंदर बनविले घर । माता कृपेचा आगर । सुख-समृद्धी बरोबर । तव कृपे लाभतसे ।।१६२ ।। आई तव महिमा कळला । सौ. रंजनाताई थोटे ला । बदलीचा आदेश मिळाला । पती राजाभाऊ च्या ।।१६३ ।। राजाभाऊ होते अहेरीला । आणले तू नागपूरला । दृष्टांत देवूनी रंजनाला । नागपूर येते म्हणूनी ।।१६४ ।। पौर्णिमेचे घेई व्रत । येंतसे तव मंदिरात । दुर्गादेवीच्या स्वरुपात । दर्शन तू देतसे ।।१६५ ।। म्हणोनी तुझेची चिंतन । करितसे माता भजन । रात्रंदिन एक ध्यान । जय-जय अनसूया ।।१६६ ।। अखिल त्रिफळेची कथा । दुर करी भव व्यथा । प्रसाद अंगावर फेकता । सुख समृद्धी येतसे ।।१६७ ।। केला विकार दुर । फुल फेकुनि अंगावर । म्हणून आला चरणावर । दृढ भाव धरुनी ।।१६८ ।। परिवहन अधिकारी नेते । भावे भजी भवानी माते । येवूनी सदैव श्रीक्षेत्राते । श्रद्धा सुमन अर्पीती ।।१६९ ।। नव्हते तया मुलं बाळं । हीच ईच्छा प्रबळ । करीतसे जवळ । चरण माऊलीचे ।।१७० ।। भजुनी मनोभावे देवा । करीती अहर्निश सेवा । पुत्रप्राप्ती साठी धावा । करीतसे माऊलिचा ।।१७१ ।। पाहूनी भक्ताची भक्ती । इच्छा पुरवी भगवती । कन्येची होई प्राप्ती । आनंदिली उभयता ।।१७२ ।। तरी करी मनीषा । कुल दीपकाची आशा । शरण जाई जगदिशा । सदैव येवूनी दारी ।।१७३ ।। आले माते तुझ्या मना । काय उने असे दिना । तुच पुरवी कामना । जो भजे ज्या भावे ।।१७४ ।। केली तु इच्छा पूर्ण । देवूनी तया पुत्र रत्न । फुलविले नंदनवन । नेतेचे





सदनी ।।१७५ ।। म्हणून सदा धरी कास । तव चरणाची आस । येवूनी श्रीक्षेत्रास । भाव पुष्प अर्पीतसे ।।१७६ ।। असे कितीतरी भक्त । आहे नागपूर शहरात । भजी माता दिन रात । अढळ भाव धरुनी । महेश बँडचे संचालक । नामे मुलचंद गायकवाड । वदे वाचा नाम एक । जय जय अनसूया ।।१७७ ।। दिला माते तु आशिर्वाद । ठेवूनी शिरी दोन्ही पद । म्हणून होई भरभराट । तव कृपे भगवती ।।१७८ ।। तुच माते दिली शक्ती । महेश बँडची फले भक्ती । म्हणून वाढतसे व्याप्ती । तुझ्याच मुळे माऊली ।।१७९ ।। मुलचंद व सहकारी । एकदा गेले मंदिरी । बोले माता सत्वरी । आले माहे बँडवाले ।।१८० ।। मागीतला धागा तेथे । माता म्हणाली मोठा म्हणून भेते । माय माऊली असता तेथे । भिती कशाची तुला ।।१८१ ।। म्हणून महेश बँड सदा सेवेत । मंदिरी वा नागपूरात । भाव भक्तिने समर्पीत । माऊलीच्या श्रीचरणी ।।१८२ ।। तैसाच एक निस्सीम भक्त । लहानु नामवत । मंगल दिप बँड प्रख्यात । होई तुजमुळे भगवती ।।१८३ ।। वाजवीती भक्ती पावा । आळवूनी अनसूया देवा । करीतसे एक सेवा । माय माऊलीची ।।१८४ ।। माता आली कोकाटे सदनी । वार्ता गेली कानोकानी । म्हणून जावे दर्शना भवानी । दसरा रोडवर ।।१८५ ।। होती एक मनी आस । होईल माऊलीचे दर्शन खास । म्हणून करी जवळ निवास । श्रद्धा पुष्प अर्पावया ।।१८६ ।। करुनी चातुर्मासाची समाप्ती । निघूनी गेली पारडसिंगा क्षेत्री । न होता दर्शन भगवती । लहानु खिन्न होतसे ।।१८७ ।। परी होती श्रद्धा अचल । म्हणून बसले पलंगा जवळ । याच ठायी भक्त वत्सल । आसनस्थ असे ।।१८८ ।। आसनाचे करुनी पुजन । आली भवानी मनोमन । देवूनी माते दर्शन । ईच्छा पुरवी लेकाची ।।१८९ ।। जाणूनी लेकराची भक्ती । पलंगावर प्रकटली भगवती । दर्शनाची करुणी पुर्ती । अंतर्धान पावतसे ।।१९० ।। निर्गुणात हे दर्शन । घेई भक्त मनोमन । सुखावले लोचन । लहानु बाळाचे ।।१९१ ।। विचारी तु भक्तांना । जे आले होते

दर्शना। लहान्या नाही आला कां? । म्हणुनी पुसतसे ॥१९२॥ ऐसी तुझी अपार प्रीती। लाभली या बाळा प्रती। गातसे तव कीर्ती। गुणगाण करुनिया ॥१९३॥ येवूनी तव मंदिरी। उत्सव साजरा करी। एकनाम वसे अंतरी। जय जय अनसूया ॥१९४॥ तुझाच आहे वरदहस्त। म्हणून लाभ होई धंद्यात। सुख समृद्धी घरा दारात। तव कृपे भगवती ॥१९५॥ तुझ्याच नामाचे गित। गाई सदैव तव पुत। म्हणून होई प्रख्यात। मंगल दीप बँड सर्वत्र ॥१९६॥ गेली तु सर्वां घरी। पावन करी नगरी। तव महिमा असे न्यारी। नागपूरकर भक्तांची ॥१९७॥ काही भक्तांचे कथन। केले कृपे कारण। तुच करीतसे पूर्ण। वाक्यज्ञ तव पुताचा ॥१९८॥ भक्तांचा तुला लळा। परी देह आता थकला। काय असे तुझी कला। सर्वज्ञ तुची असे ॥१९९॥ न जाई आता बाहेरी। सदैव राही मंदिरी। येतसे भक्त दारी। सेवा भाव धरुनी ॥२००॥ न करी अवयव साथ। पडून राही बिछान्यात। तरी उठुनी करी तृप्त। तु तुझ्या लेकराला ॥२०१॥ गेली तु देह सोडूनी। पुढील अध्यायी असे श्रवणी। समाधीस्थ होई जननी। श्री क्षेत्री पारडसिंगा ॥२०२॥ इतिश्री परमेष्ठी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमीत्त करुनी तव सुता। एकोनविशोंऽध्याय संपूर्ण ॥२०३॥ श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती॥ शांती॥।

**॥ श्री परमेष्ठी अनसूया माता की जय ॥**

**॥ हरी ॐ शांती । शांती ॥ शांती ॥।**

**॥ ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ॥**





# अध्याय २०



येथे आईने देह सोडला पौ. शु. द्वितीया १०-१-१९९७
रोज शुक्रवार स. ९.४७ वा.

# अध्याय २०

## शारीरीक व्याधिने व्यथीत माताजी







## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः

जयदेवी महादेवी। कृपासिंधू वरदायी। नमन माझे तव पायी। माऊली अनसूया ।।१।। तूच आहे ठायी ठायी। व्यापून दिशा दाही। तव नामाची नवलाई। गाऊ दे सर्वकाळ ।।२।। मी कोण कुठला। न जाणे शब्दकला। परी तू पूजनाला। पात्र करितसे ।।३।। होती पूर्वपुण्याई। जवळ करी माई। ठाव दिला पायी। तूच मायमाऊली ।।४।। तूच करी लेखन। तव गाथेचे कवन। तुझी ईच्छा म्हणून। पूर्ण तू करितसे ।।५।। असाच ठेवी वरद् हस्त। गाण्या गाथा समस्त। पूर्ण करी भागवत। तूच माता अनसूया ।।६।। आई तुझा सेवक। शेषराव होते [illegible]क। सच्चा सात्विक नेक। पारडसिंगा राहतसे ।।७।। कापड दुकान थाटले। तव नामाने व्यापले। तूच करितसे भले। सत्संग देवूनिया ।।८।। करितसे सेवा चाकरी। माता तव जुन्यामंदिरी। तव नामाची शिदोरी। सेवन करी सर्वदा ।।९।। अर्चन भजन पूजन। जुन्या मठी नित्यनेमान। अर्पूनि श्रद्धासुमन। करितसे उभयता ।।१०।। होते त्रस्त आजाराने। डोके दु:खीचे रडगाणे। शस्त्रक्रिया लागे करणे। दुर व्हाया विकार ।।११।। वैद्याचे उपाय केले। परी अपाय घडले। दु:खणे न थांबले। दुर्धर व्याधिचे ।।१२।। शेवटी येई शरणा। माता अनसूया चरणा। म्हणे वाचव मम दीना। कृपा करुनिया ।।१३।। राजाभाऊने मार्ग दाविला। फळा झाडण्या करी दिला। स्तोत्र पारायणाचा हवाला। देवूनि सांगतसे ।।१४।। घेवूनि झाडू हाती। नाम अनसूया चित्ती। सेवा करी अविरती। जुन्या मठी श्रीक्षेत्री ।।१५।। गाडगेबाबांची किमया। झाडू दावी लीलया। भावभक्तिची गया। सन्मार्ग दावितसे ।।१६।। करी रोज पारायण। स्तोत्राचे नित्यनेमान। भगवतीचे टाकूनि पान। तीर्थप्रसाद घेतसे ।।१७।। कृपाप्रसाद फळा आला। विकार दूर

पळाला। न करता शस्त्रक्रियेला। तंदुरुस्त होतसे ।।१८।। साप निघाला दुकानी। भीती वाटतसे मनी। का पाही परीक्षा भवानी। म्हणून विनवितसे ।।१९।। "भला भेते लेकाचा। त्याच काम दुसरं हाय। म्हणून त्याले ठेवला"। स्वमुखे माता वदतसे ।।२०।। मातेचे हे वचन। रक्षा करितसे दुकान। अभय लेका देवून। सांभाळी सर्वदा ।।२१।। एकदा लागली आग दुकानी। संकटाची ही निशाणी। आणितसे गोपालच्या ज्ञानी। दुकानवाले हुषार व्हा म्हणूनि ।।२२।। जन पाहती आगीला। दुकानाचा सर्वनाश झाला। भस्म करी सर्व मालाला। न वाचे काहीही ।।२३।। हळहळती सर्वजन। गरिबाचे झाले नुकसान। परी तव आशीर्वचन। अभेद कवच लाभतसे ।।२४।। हिरव लुगडं होतं दुकानी। मातेच्या पूजास्थानी। जळलं तेच त्या क्षणी। धगधगत्या आगीत ।।२५।। विघ्न झेली तूं लुगड्यावर। दुकान वाचवि कृपासागर। रक्षितसे तया लेकरं। घरदार सांभाळूनिया ।।२६।। म्हणून न सोडी चरणाला। भजूनिया तव नामाला। तूच असे एकसेवेला। होले पती पत्नीच्या ।।२७।। राजू मलमकर श्रीक्षेत्री। भजतसे तुला भगवती। दृढभाव ठेवूनि चित्ती। नामस्मरण करितसे ।।२८।। जावूनि गावोगावी। संजीवन नाम घेई। तुज वाचून नसे काही। वाचता वर्तताही ।।२९।। नामस्मरणाचे महत्व। गाई तुझा भक्त। तुच सांभाळी तव पुत। संकटी धावूनिया ।।३०।। सुख सौख्य संपदा। मिळतसे तव भागा। तूच रक्षी सर्वदा। अभयदान देवूनि ।।३१।। आई तुझा लेक। वासुदेव बावने सच्चा नेक। गोड करी त्याचा स्वयंपाक। म्हणूनि सेवेशी लागला ।।३२।। तुझाच असे लळा। तुला लेकाचा जिव्हाळा। अनुदिन येई सेवेला। मांगरुळी पेठवरुनि ।।३३।। साधी सात्विक राहणी। परी अचल श्रद्धा तनी। म्हणून पूजतसे भवानी। एकसेवा करुनिया ।।३४।। अक्षय तृतियेच्या दिनी। यशवंत बाबास नमूनि। आला माते तव धामी। शिदोरी घेवूनिया ।।३५।। अमावस्येच्या रात्रिला। एकटाच निघाला श्रीक्षेत्राला। एक वाजता कली शिरला। ढगा गावाजवळी ।।३६।। भीतीने केले काहूर। सायकल करी





थरथर। झडपा मारी अंगावर। मोठं पाखरु येवूनिया ।।३७।। दिसायला लागले भूत। घाबरला वासुदेव मनात। ओलीचिंब होई कात। तरी पुढे चालतसे ।।३८।। करुनि तव नामस्मरण। पुढे चाली क्षणोक्षण। तूच माते सवे चालुन। सुखरुप ठेवितसे ।।३९।। तूच आणिले मंदिरी। भीती तूच दूर करी। रक्षूनि तव लेकरी। अभयदान देतसे ।।४०।। शिर ठेविता चरणावर। विचारी बाळा सत्वर। काय आणलं बापू दे लवकर। अर्पण करी शिदोरी ।।४१।। तेव्हा पासून भीती गेली। रक्षितसे जगत्वल्ली। अभयदान देई बाळी। तूच माता भगवती ।।४२।। ८-१-९७ बुधवारला। आंघोळ न करी भक्तवत्सला। विनवी वासुदेव मातेला। परी न ऐकतसे ।।४३।। एकाएकी डोके दु:खी। जडली कैसी व्याधी। तैशीच येई बेशुद्धी। वासुदेव लेकाला ।।४४।। चेतना नव्हती काही। डॉक्टर सलाईन लावी। परी तो म्हणतसे घाई। दर्शन घेवू द्या म्हणौनि ।।४५।। आई लांब दूर जाणार। दर्शन देवाचे घ्या लवकर। सांगितसे तो वारंवार। दृष्टांत देवूनिया ।।४६।। घट मांडला खाली। ज्योत तेव्हा विझली। चक्कर पुन्हा आली। बेशुद्ध पडतसे ।।४७।। "आईकुठे मरत असते का। जा एक पापड घेवून ये"। देई दृष्टांत तूच माते। थोपटूनि बाळाला ।।४८।। असा हा निस्सीम भक्त। गाई तुझेचि गीत। सेवा चाकरी मंदिरात। तवकृपे करितसे ।।४९।। ठेवून घेतले तू त्याला। अपुल्या पादपूजेला। म्हणून करी बोलबाला। तुझाच माता भगवती ।।५०।। नरसाळ्याचे रामकृष्ण काळे। भजती तुला भक्त वत्सले। रक्षी तूच तया बाळे। कृपाप्रसाद देवूनि ।।५१।। संसाराची विपरीती। दूर करी भगवती। ठेवूनि कृपादृष्टी। संकटी रक्षितसे ।।५२।। तुझ्याच कृपेने होई। संतान उभयता पाही। भविष्य तूच वर्तवि। बापू होते म्हणूनिया ।।५३।। तव कृपेची ही ग्वाही। सुकृत अंगणी येई। म्हणून आले तव पायी। दृढभाव धरुनि ।।५४।। एकदा आले तव मंदिरी। लाडू मागे तू लेकरी। परी होते ते घरी। आणून तया देतसे ।।५५।।

तूच जाणिले माता। काय असे ठाव भक्ता। मार्गी तू त्यापरता। भावभक्ति जाणूनि ।।५६ ।। म्हणून तव कृपासावली। काळे कुटुम्बा लाभली। तूच तया वाली। सदासर्वदा असे ।।५७ ।। पांढरकवड्याची रामटेके बाई। आली माते तव ठायी। तूच तया ठेवून घेई। सेवा करण्या अनुदिन ।।५८ ।। जा म्हणती तिला। परी न सोडी चरणाला। तूच देई हवाला। "एका पायावर राहा" म्हणूनि ।।५९ ।। पुन्हा न वदे कोणी। जा तू मंदिरातूनि। पुन्हा लागली चरणी। सेवा चाकरी कराया ।।६० ।। अर्पूनि भावभक्ति। पाठ करी भगवती। राहूनि श्रीक्षेत्री। पादपूजा करितसे ।।६१ ।। काटोलचे भाऊरावजी पर्बत। देवीचे असे भक्त। न भजे कुणा अन्यत्र। एकरुप एकठायी ।।६२ ।। पत्नी आणि प्रतिमा। अनसूया करूणाघना। तिरस्कारी अज्ञाना। न पाही न पूजी माता ।।६३ ।। परी तू देई दर्शन। साक्षात दुर्गा लक्ष्मी जाण। तेच रुप मनात ठेवून। आळविती परोपरी ।।६४ ।। अहंकार दूर केला। द्वैतभाव मिटविला। आई तुझा भक्त भला। आला तव चरणासी ।।६५ ।। विठ्ठलराव बारई याच ठायी। भाविक भक्त तुझा माई। क्षण न वाया जाई। नाम तुझे घेतसे ।।६६ ।। राघोच्या दुधासाठी जीव व्याकुळला। वदली तू तया लेकाला। म्हणून धंद्यात लखलाभ झाला। माता तव कृपेने ।।६७ ।। तुळजापूरचे नारळ। नारायणपूरला करी जवळ। फोडी तू माता सबळ। दिव्यदृष्टी ठेवूनिया ।।६८ ।। आठ महिन्याच्या रोषनला। माते तू गोटा मारला। परी न होई ईजा त्याला। तुझीच कृपा म्हणौनि ।।६९ ।। प्रेमळपणाचा मार। देई करुणाकर। दूर होई विकार। न बाधी सर्वथा ।।७० ।। ममतेचे हे रागावणे। सुखवि बाळा जीणे। म्हणून अर्पि श्रद्धा सुमने। माता तव चरणासी ।।७१ ।। कुटूम्बात लाविला लळा। तूच माता भक्तवत्सला। म्हणून पूजितसे तुला। भाव पुष्प अर्पूनि ।।७२ ।। रेणूका मातेच्या चरणासी। प्याऊ लावी माहूर गडासी। पाणी पाजी तृषार्तासी। सेवाभाव धरुनिया ।।७३ ।। तूच रेणूका आई।





माहूरगडी तूच राही। म्हणून येई तव पायी। एकभाव ठेवूनि ।।७४ ।। तूच माते कृपा करी। आणि चिंतामन गडावरी। करण्या भाविकांची चाकरी। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।७५ ।। दिली तूच प्रेरणा। गडावर कार्य करण्या। चिंतामन स्वामींच्या चरणा। दिव्यदृष्टी ठेवूनिया ।।७६ ।। काय करावे कुणाकडूनि। कैसा लावावा कोण चरणी। बोलावि तू तया धामी। कृपादृष्टी ठेवूनि ।।७७ ।। ऐसा तुझा भक्त भलां। तूच लाविले सेवेला। म्हणून भजितसे भजनाला। जय जय अनसूया ।।७८ ।। राजकुमार जायस्वाल काटोलवासी। दिनरात भजी मानसी। माँ भगवती चरणासी। भावभक्ति ठेवूनिया ।।७९ ।। पिता भैय्याजी भजितसे। तुकडोजी गुरुदेवा पूजितसे। राष्ट्रसंताचा वास असे। जायस्वाल सदनी ।।८० ।। पूर्वजांचा सदाचार। संत संगाचा आधार। म्हणून पावन करी घर। माता तू जावूनि ।।८१ ।। वडीलाची भावभक्ती। आली राजकुमार प्रती। गुरुदेवांची सेवास्विकृती। म्हणूनि करितसे ।।८२ ।। मनी धरुनि ही वृत्ती। कल्पवृक्षाची केली कृती। पूर्ण करी तू भगवती। आशीर्वाद देवूनि ।।८३ ।। म्हणून लागला तुझा लळा। तव नामाचा जिव्हाळा। तूच फुलवि भक्ती मळा। घरी दारी सर्वत्र ।।८४ ।। जीवनातील विसंगती। दूर करी भगवती। तव कृपे मिळे बढती। उद्योग धंद्यात ।।८५ ।। कुटूम्बात सुख शांती। प्रदान करी महासती। म्हणून गातसे गीती। माता तव नामाची ।।८६ ।। म्हणून येतसे मंदिरी। करण्या सेवा चाकरी। वृक्ष लावी तव दारी। भावपुष्प अर्पितसे ।।८७ ।। देतसे सदा प्रेरणा। कल्पवृक्ष तव धामा। वृक्ष लावी तव चरणा। छाया सदा मिळतसे ।।८८ ।। दृष्टी ही तूच दिली। म्हणून भजे माऊली। सर्वदा तव सावली। मिळतसे तव लेकरा ।।८९ ।। तूच माता ध्यानी मनी। कर्ता करविता भवानी। म्हणून आले तव चरणी। जायस्वाल उभयता ।।९० ।। होती तू पाकगृहात। सेवेला चंदू भक्ते सेवक। वदली पाहूनि तव पुत। सर्पगेंडर पाह्यले का ।।९१ ।। चंदू म्हणाला पाहले

आई। मला भीती वाटत नाही। प्रत्यय वचनाचा न येई। अज्ञपणे बोलतसे ।।९२ ।। गेला तो स्वगृहाला। दार उघडता पाही सापाला। भीतीने थरकाप उडाला। गुणगाई मातेचे ।।९३ ।। तव तो आला मंदिरी। पूजा अर्चा तव करी। तोच तू म्हणे लेकरी। पाहिले रे सर्प गेंडर ।।९४ ।। तूच करुन देई जाण। सदैव असावे सावधान। म्हणून येई शरण। भगवती अनसूया ।।९५ ।। माता मंदिराचा पाया। खोदी त्याजूनि काया। पक्का पाषाण भया। काम न करी कुदळी फावडे ।।९६ ।। म्हणौनि बार भरले। सुरुंग त्यात पेरले। पाषाण खोदू लागले। मंदिर बांधण्या श्रीक्षेत्री ।।९७ ।। एके. दिनी बार भरला। बारुद टाकूनि पक्का केला। जनसमुदाय दूर गेला। पाषाणाच्या भीतीने ।।९८ ।। काही भक्त दूर झाले। काही तव चरणासी आले। दाटीदाटीने मंदिरी थांबले। न लागावा पाषाण म्हणूनि ।।९९ ।। तेवढ्यात एक धडाका जाहला। बारुद फुटूनि आवाज आला। पाषाणाचा सडा पडला। दूरवरी जावूनिया ।।१०० ।। टीन छपराला भोक पाडूनि। दगड पडला तव स्थानी। तू तेथेच होती आसनी। लेकरा सवे तुझ्या ।।१०१ ।। ज्या ठायी नव्हते कोणी। पाषाण पडला त्या ठिकाणी। वाचवि तू भक्ता जीवनी। दिशा दगडाची बदलवूनि ।।१०२ ।। मंदिरातच दगड पडला। परी न लागे कुणाला। कळून आली तव लीला। होते जे चरणी तुझ्या ।।१०३ ।। पडला असता डोक्यावर। कपाळमोक्ष होई लवकर। जबर होता त्याचा प्रहार। परी तूच रक्षी माता ।।१०४ ।। टीन छपराचे पाहूनि भोक। आश्चर्य करिती जनलोक। छेदून आला अचानक। परी न ईजा होतसे ।।१०५ ।। पाहूनि मुलांचे साकडे। ओढतसे तू अपुल्याकडे। लेकराचे न होई वाकडे। असता माय माझी ।।१०६ ।। विहिरीचे करी खोदकाम। मिळून काही भक्तगण। बार उडविती क्षणोक्षण। पाणी व्हावे म्हणूनि ।।१०७ ।। होते एक कासव। विहिरीत त्याचा ठाव। बार भरला एक ठाव। दगडासवे वर येई ।।१०८ ।।







बाराने उडविले त्याला। दगडाबरोबर बाहेर पडला। परी न काही अपाय झाला। तव कृपे भगवती ।।१०९ ।। आहे ते आज विहिरीत। माता तव मंदिरात। नाम स्मरण तुझे करीत। ठाव येई तवचरणी ।।११० ।। ऐसी अपार करुणा। मिळतसे भक्तजना। तूच पुरवि मनोकामना। कृपासिंधू भगवती ।।१११ ।। परी प्रकृतीचा करी बहाना। दयासिंधू कृपाघना। धरी तू एक ठिकाणा। मंदिरी राहूनिया ।।११२ ।। न जाई आता बाहेरी। पडून राही बिस्तरी। तुझी लीला तूच खरी। जाणतसे भगवती ।।११३ ।। १८-८-९६ च्या पौर्णिमेपासूनि। १६-९-९६ गणेशचतुर्थी दिनी। त्रस्त करी स्वजीवनी। शरीर भोग भोगूनिया ।।११४ ।। वर्ज्य केले अन्नपाणी। आसवे वाही लोचनी। खुंटली भक्ता बोलणी। दीनवाणी पाहतसे ।।११५ ।। दूरवरुन भक्त येती दर्शना। विविध पदार्थ अर्पिती चरणा। म्हणे आई थोडे जेवाना। कृपा करी लेकरावरी ।।११६ ।। न जाणे कुणी तुझी वेदना। तूच जाणी तुझी महिमा। पाहूनि अश्रू भक्ता नयना। दु:खी तू होतसे ।।११७ ।। कुणी म्हणे अमरनाथ यात्रेकरुचे दु:ख। कुणी म्हणे किल्लारीचा भूकंप। भक्तांवर आले संकट। म्हणून तू दु:खी होतसे ।।११८ ।। “देशाचे कसे होईल। खऱ्याची ओळख नांही येथं”। तू वदली माते मंदिरात। भक्तांकडे पाहूनि ।।११९ ।। विश्वाची तू चिंता वाही। बसूनि एके ठायी। तया दु:खी दु:खीत होई। आनंदे आनंदित ।।१२० ।। म्हणून म्हणती विश्वंभर। तूच माता जगदीश्वर। तूच वाही सर्व भार। शिरी घेवूनिया ।।१२१ ।। व्हावी सुधारणा प्रकृतीत। उपचार करती त्वरीत। गुंगीचे इंजेक्शन समस्त। देई बळजबरीने ।।१२२ ।। “काऊ नं धरलं रे मले”। काय ढोसतं रे मले। ढोसू नका रे म्हणाली। माता आक्रोश करुनि ।।१२३ ।। सलाईन लावायचे होते। गुंगी आली असेल माते। म्हणून डॉक्टर धरी कराते। उपचार करण्यासी ।।१२४ ।। व्हनं तिकडे तू बोले। हात झटकून दूर केले। डॉक्टर हतबल झाले। परिणाम न होई

औषधाचा ।।१२५ ।। गुंगी देवूनि आजारी। डॉक्टर शस्त्रक्रिया करी। परी येथे घडे विपरी। अचम्बित ते होई ।।१२६ ।। न करु शकले तुला बेशुद्ध। इंजेक्शन झाले बद्ध। म्हणून झाले सर्व स्तब्ध। नमन करुनिया ।।१२७ ।। आली माते तव प्रचिती। म्हणतसे ही महाशक्ती। उपचाराविना घरी जाती। दिव्यत्व जाणूनिया ।।१२८ ।। औषध न लागे माते तना। भावभक्ति अर्पावि चरणा। सांगती ते भक्तगणा। महिमा जाणूनिया ।।१२९ ।। म्हणून केला दुसरा उपचार। माते तव नामाचा गजर। महामृत्यूंजय जपाचा आचार। करितसे भक्त तुझे ।।१३० ।। अखंड कर्पूर ज्योत। लावितसे तुझे भक्त। सुधारणा व्हावी त्वरीत। म्हणून प्रयत्न करितसे ।।१३१ ।। यावेळी खोटी वार्ता पसरली। आई सर्वा सोडून गेली। देशविदेशातून जनता आली। माता तव दर्शनासी ।।१३२ ।। १४-९-९६ शनिवार दिनी। महापूर भक्ता धामी। आतूरता बघता जननी। दर्शन घेण्या मातेचे ।।१३३ ।। बंदी होती तव दर्शना। त्रास होवू नये तना। बळजबरी करी तुला बघण्या। कशी असेल आई माझी ।।१३४ ।। प्रसंग होता बिकट। कोण सांभाळी तव भक्त। तूच असे समर्थ। महाशक्ति महामाया ।।१३५ ।। सेवक करी विनंती। सांभाळ तव भक्त । उठ तू त्यांच्यासाठी। घास घे वदनी ।।१३६ ।। विरघळला करुणासागर। पाहूनि श्रद्धा अपार। उठून बसली बिछान्यावर। वदे "कायचे कायचे नवस केले गा" ।।१३७ ।। घेवूनि पपईची फोड। चाखे वदनी गोड। भक्ताचे पुरवि लाड। दर्शन तया देवूनि ।।१३८ ।। पाहूनि मातेचे श्रीमुख। दूरदर्शन संचात। नाचू लागला आसमंत। जय जय अनसूया म्हणूनि ।।१३९ ।। नाही गेली आई अपुली। मंदिरात आहे बसली। दर्शनी सर्व सुखावली। लेकरं तुझे भगवती ।।१४० ।। चरण स्पर्शाची ईच्छा धरुन। बसले भक्त ठाण मांडून। श्रीकृष्ण जन्माष्टमीचा दिन। साजरा करावा म्हणूनि ।।१४१ ।। ऐकूनि भक्ताची करुणा। आली बाहेर तत्क्षणा। कृष्णमुद्रा करुनि जना। दर्शन





देई श्रीहरी ।।१४२ ।। गणेश चतुर्थी नंतर। घडला थोडा उपचार। गेले भक्त दूरवर। सुखरुप पाहूनिया ।।१४३ ।। शरीर पिडा तू भोगली। मात तू त्यावर केली। पुन्हा तव क्रिया सुरु झाली। अहर्निश अखंडित ।।१४४ ।। भक्त येती दर्शना। उद्धारी जनजीवना। भोगूनि यमयातना। भक्तोध्दार करितसे ।।१४५ ।। परी काय होते तव मनी। तूच जाणी तव करणी। चार मासाची पर्वणी। मिळतसे तव लेकरा ।।१४६ ।। २५-१२-९६ पासूनि। पुन्हा केले वर्ज्य अन्नपाणी। शरीर व्याधी तव तनी। भोग तू भोगितसे ।।१४७ ।। काळाचा हा बोलबाला। न सोडिले देवाला। म्हणून भोगितसे भोगाला। देह नश्वर म्हणूनि ।।१४८ ।। सर्व शक्ती तव ठायी। तरी त्रासवि तू आई। न सोडी कुणालाही। म्हणूनि दावितसे ।।१४९ ।। परी ऐकी भक्ताची गाऱ्हाणी। साथ न करी अवयव जननी। व्यथीत होई तू नयनी। शक्ती न उरे अंगात ।।१५० ।। न फोडणे होई नारळ। न जाणे होई दीपा जवळ। न बोलणे होई सबळ। काया वाचा खुंटली ।।१५१ ।। मास न राही अंगावर। हाडेच दिसे तनभर। झाले शरीर जर्जर। माता माऊलीचे ।।१५२ ।। तरी भक्त येता दारी। हार घेई तू करी। एकटक पाहूनि उद्धारी। तू तुझ्या लेकरां ।।१५३ ।। सूर्योदय नुतन वर्षाचा। १९९७ सालचा। खुंटवितसे वाचा। धक्का देवूनिया ।।१५४ ।। काळे बारई आमलें बाई। सेवा करण्या राही पायी। विविध पदार्थ देवूनि माई। सेवाचाकरी करितसे ।।१५५ ।। तुझी कृपा या लेकीवर। म्हणून आल्या तव मंदिर। करितसे सेवेचा स्विकार। माऊली अनसूया ।।१५६ ।। विविध पेय करुनि। देई डाळिंब अंगूर फलाहार काही। काळजी माते तुझी वाही। न व्हावा त्रास म्हणूनि ।।१५७ ।। घडली सेवा अंत्य समयी। शेवटपर्यंत न जाई। गोड करुनि तूच घेई। भावभक्ति लेकींची ।।१५८ ।। याचसमयी सुरु केले। देवी भागवत पारायणाले। भावपुष्प अर्पियले। माता तव चरणासी ।।१५९ ।। काटोलवरुन पारायणी। येई भक्त अंगणी।

भाऊरावजींच्या मार्गदर्शनी। पूजापाठ करितसे ।।१६०।। विठ्ठल बारई युवराज रांऊत। राजू जायस्वाल अरुण पर्वत। टावरी गोविंदा ढोले करी साथ। माता तव पारायणी ।।१६१।। अनिता भस्मे येई। भावपुष्प अर्पि पायी। तुला भजतसे माई। गुणतुझे गाऊनि ।।१६२।। तव नामाचा व्यवहार। करी लेक घरोघर। तूच सांभाळी पोरं। कृपादृष्टी ठेवूनि ।।१६३।। म्हणून आली पारायणी। ठेवूनि भाव चरणी। साथ करी भक्त अंगणी। देवी भागवत पारायणी ।।१६४।। ऐकणे होते माते तुला। म्हणून लाविले कामाला। निमित्त करुनि भक्ताला। तूच तुझे ऐकतसे ।।१६५।। ९-१-९७ गुरुवार दिनी। गायत्री मंत्राचा जप करुनि। पूर्णाहूति केली पारायणी। भाऊराव पर्वतांनी ।।१६६।। भक्त हेचि करी होमहवन। कर्पूर ज्योत लावी धाम। व्हावा माते थोडा आराम। म्हणून प्रयत्न करितसे ।।१६७।। भक्त विचारी आई जेवाना। माता म्हणे राहू देना। पांघरुण असूनि पांघरुन देना। म्हणून सांगे दीनवाणी ।।१६८।। स्वस्थ पडून राही माता। न रागावी अपुल्या पुता। व्हनं तिकडे न वदी आता। माय माझी अनसूया ।।१६९।। ९-१-९७ ची आंघोळ। स्वहस्ते केली सबळ। शेवटचा हाचि पर्वकाळ। अज्ञ जनाकाय ठावे ।।१७०।। दिवसभर पाही लेकरांकडे। अश्रू भिजवी नयनी कडे। पाहतसे एकटके। दिव्यदृष्टी रोखूनिया ।।१७१।। सायंकाळी झोपली आसनावर। गोपाल, विनोद चरणाजवळ। पडून राही रात्रभर। नामजप करुनिया ।।१७२।। १०-१-९७ शुक्रवारला। पहाटे पद पलंगाखाली आला। उचलून ठेवले चरणाला। पांघरुन देवूनि गोपालने ।।१७३।। पहाटे चार वाजता तू वदली। कडीस घे गोपालला म्हणाली। परी थंडीचा असे कली। म्हणून न घेई कडीस ।।१७४।। एवढ्यात न म्हटले कडीस घे। आजच वदली तू स्वमुखे। काय जाणे अज्ञ मते। समर्थ तूचि असे ।।१७५।। गोपालने दिनचर्या आटोपली। पाच वाजता आरती केली। सकाळी सात वाजता पुन्हा






वदली। कडीस घे म्हणूनि ।।१७६।। घेतले गोपालने कडीस। होते भक्त सोबत। पाकगृहाकडे न्यावयास। निघाले तुला घेवूनि ।।१७७।। खोडेंनी टाकले आसन। आईची ठेवूनि जाण। येता मंदिराखाली तत्क्षण। घाबरले लेक तुझे ।।१७८।। एकाएकी डोळे पांढरे झाले। शरीर लुळे पांगळे केले। भक्त आक्रोश करीत ओरडले। आई कशा करते म्हणूनि ।।१७९।। वदन फाटले माते। लोचन झाले मोठे। तू गेली म्हणूनि रडते। झाली लेकरं तुझी ।।१८०।। पाकगृहात आणी तुला। शेकोटीचा शेजार दिला। भक्त होते चरणाला। माता तव ठायी ।।१८१।। उघडले तू लोचन। पानावले सर्व नयन। कृपा कटाक्ष टाकी क्षण। ममतेने पाहूनिया ।।१८२।। पाय चेपू लागले काही। राहू देणं म्हणाल्या आई। तूच जाणी तुझी नवलाई। भगवती अनसूया ।।१८३।। गावात वार्ता पसरली। आई सर्वा सोडून गेली। म्हणून सर्व मंदिरी आली। माऊलीच्या दर्शना ।।१८४।। ९.३० वाजता कडीस घे म्हणाली। गोपालने कडेवर घेतली। पाकगृहाबाहेर तू आली। काळ आला त्याक्षणी ।।१८५।। वदन तू फाकविले। नयन मोठे केले। पांढरे फट्ट ते झाले। पाही तू नारायणा ।।१८६।। जांभळीच्या वृक्षातून। आले तत्क्षणी सहस्त्र किरण। रवि तेजाने फाकी नयन। प्रकाश झोत बघताक्षणी ।।१८७।। लक्ष दीपांची आभा। तव नयनी पडे प्रभा। डोळे फाकूनि बघी अभा। तूच माता भगवती ।।१८८।। साठवि किरण लोचनी। अनसूया जगत्‌जीवनी। आले जे त्या वृक्षातूनि। एकरुप तया होई ।।१८९।। नारायणाचे घेवूनि दर्शन। शरीर झाले निष्प्राण। घाबरले सर्व भक्तगण। अत्यावस्था पाहूनि ।।१९०।। आणिले मग स्वयंपाकगृहात। टाकितसे मुखी तीर्थ। रडू लागले सर्व भक्त। चरणाजवळी बसूनिया ।।१९१।। अखेरचा ठोका झाला। सकाळी ९.४५ च्या सुमाराला। सोडून गेली भक्तवत्सला। माय माझी अनसूया ।।१९२।। पौष शुद्ध द्वितीया शुक्रवारी। १०-१-९७ च्या प्रभात प्रहरी। श्रीक्षेत्री पारडसिंगा मंदिरी।

गेली स्वयंपाकगृहात ।।१९३ ।। तुझ्याकृपेचे पान। मिळतसे भक्ता जाण। म्हणून करी अन्नदान। स्वहस्ते फेकूनिया ।।१९४ ।। त्याच अन्नछत्रात। मालविली प्राणज्योत। अन्न महात्म्य तुझे विदीत। म्हणूनिया भगवती ।।१९५ ।। गोप्रालच्या बसूनि कडेवर। अंतिम श्वास घेई करुणाकर। सेवेचा तया अधिकार। म्हणून प्राप्त होतसे ।।१९६ ।। वैद्यकिय पथक आले। परब्रम्ह सोडूनि गेले। म्हणून सर्वा कळविले। आई तू गेली म्हणूनि ।।१९७ ।। वाऱ्यासवे वार्ता पसरली। माता ब्रम्हलीन झाली। दशदिशा पोरकी झाली। आई तू जाता क्षणी ।।१९८ ।। मिळेल त्या साधनाने। कुणी अनवानी पायाने। धावत येई तवं दर्शने। देश विदेशातूनि ।।१९९ ।। नयनी गंगा यमुना वाही। सोडून गेली माझी माई। रडत रडत पायी येई। आई आई म्हणूनिया ।।२०० ।। भक्तांचा अथांग सागर। व्यापिला सर्व परीसर। अश्रूंचा आला महापूर। माता तव मंदिरी ।।२०१ ।। तुझी कृपा आठवूनि। रडत रडत येई भुवनी। का गेलीस माते सोडूनि। पोरके करुनिया ।।२०२ ।। रडण्याचा एकच कहर। ऐकू येई दूरवर। न ऐकू येई आता स्वर। म्हणं गाण म्हणूनिया ।।२०३ ।। "कडीस घे" कोण म्हणेल। "काय काय जेवला" कोण पुसेल। "फेकते थे काय व्हय" कोण विचारेल। कोण म्हणेल "बसून जाण" ।।२०४ ।। "व्हनं तिकडे" न म्हणी आता। न रागवि माझी माता। कोण सांभाळी तव पुता। या दुःखसागरी ।।२०५ ।। "आण काय रांधलं थे" म्हणूनि। कोण फिरेल आता भुवनी। मार कट कट म्हणूनि। कोण आता विचारी ।।२०६ ।। एकेक गोष्ट आठवूनि। ममतेचा स्पर्श स्मरुनि। आक्रोश करी दीनवाणी। लेकरं तुझी भगवती ।।२०७ ।। १०-१-९७ पासून गर्दी फार। १२-१-९७ पर्यंत भार। तीन दिवसाचा सोपस्कार। पार तू पाडितसे ।।२०८ ।। तुझे लक्ष सर्वांवरी। सर्वांच्या ईच्छा पूर्ण करी। बसूनि सर्वा अंतरी। तूच तया रक्षितसे ।।२०९ ।। अन्नछत्र तू चालवूनि। सार्थ करी अन्नपूर्णा नामी। अन्नधामात देह सोडूनि। पूर्णावली करितसे ।।२१० ।। याही वेळी केले तू अन्नदान। पुढे करुनि काही





संघटन। विनामूल्य देई भोजन। दूरवरुनि येवूनि ।।२११ ।। विनामूल्य चहा नाश्ता। ने आण करी भक्ता। स्वयंफूर्तिने पूर्तता। करी चाकरी करुनिया ।।२१२ ।। न झाला कुणा त्रास। न घडे कुणा उपवास। सार्थ करी तू तव नामास। अन्नपूर्णा म्हणूनि ।।२१३ ।। तूच होती सर्वदूर। सर्वावर तुझी नजर। तोषवि तवं लेकरं। प्रेरक बनूनिया ।।२१४ ।। आई तुझे लाडके श्वान। सदैव राखी तव चरण। भरवि तू तया वदन। बापू बापू म्हणूनिया ।।२१५ ।। खरजूल्या डोमा नागो म्हणूनि। हाक मारी तू भवानी। लोळतसे तव चरणी। कृपापात्र म्हणूनिया ।।२१६ ।। वदली तू कुत्र्याला। शेपटी धरुनि हलवि त्याला। माह्या बापूच सार जग। कौतूक पाहील म्हणूनि ।।२१७ ।। परी आज ते श्वान। होते एकांती पडून। अश्रूने भिजले लोचन। आई तुझ्या बापूचे ।।२१८ ।। माता तू गेली म्हणूनि। शोक करी कुत्रे धामी। दूरवर एकांतात बसूनि। रडती ठायी ठायी ।।२१९ ।। सदैव करी धडपड। खाण्यासाठी लडिवाड। आज त्यांचा असेपाड। मंदिराबाहेर एकांती ।।२२० ।। या तीन दिवसात। एकही कुत्रा न आला मंदिरात। न व्हावा तुला त्रास आत। म्हणून पडून राहतसे ।।२२१ ।। न हाकलावे लागले आता। गर्दी मंदिरात असता। त्रास न होई कुणा भक्ता। तुझ्या बापू पासूनिया ।।२२२ ।। अश्रूला न आवर। शोक करी अनावर। तुझा बापू असे थोरं। जगदम्बा अनसूया ।।२२३ ।। तुझी अवस्था पाहूनि। निसर्ग आला धावूनि। अंधारल्या दशदिशा अवनी। ढग जमती अंबरी ।।२२४ ।। पावसाची पुष्पांजली। वाहतसे निसर्गावली। जाणूनि जगत्वल्ली। पर्जण्यपुष्प अर्पितसे ।।२२५ ।। परी तुला सर्व चिंता। भक्ताची भक्ति सरीता। निसर्ग थोपवी माता। दैना जाणूनि भक्ताची ।।२२६ ।। न होते कुठे छत। न सामावे अमाप भक्त। सापडले असते पाण्यात। ओलेचिंब ते होती ।।२२७ ।। कुठे घेतला असता आश्रय। कुठे लपविती जीव। परी तू सांभाळी तुझा भाव। अभय देवूनिया ।।२२८ ।। म्हणून सांगितले निसर्गास।

शोक तया आवरण्यास। अभय दिले लेकरास। निसर्ग थोपवूनिया ।।२२९ ।। होते सर्वत्र पाणी। सभोवताल मंदिरा लागूनि। परी नं येई भक्तांगणी। तुझी कृपा म्हणूनि ।।२३० ।। १२-१-९७ ला गेले। भक्त गावी परतले। निसर्गराजा बरसले। धो धो करुनिया ।।२३१ ।। थोपविलेले अश्रू। लागले आता बरसू। चरणा करुनि स्पर्शू। पादपूजा करितसे ।।२३२ ।। आला असता आधी पाणी। भक्तांची दैना जाणी। परी जाणतसे अंतर्मनी। अंतर्ज्ञानी अनसूया ।।२३३ ।। १२-१-९७ ला सकाळी। पनकुलेनी गाडी सजविली। यात्रा तुझी निघाली। पारडसिंगा गावातूनि ।।२३४ ।। स्वत: हाकी रथ। पनकुले तुझा लेक। सजविले जगन्नाथ। भावभक्ति अर्पूनि ।।२३५ ।। आसवे वाहती नयनी। यात्रा चाले गावातूनि। दुतर्फा उभे राहूनि। पुष्प वर्षाव करी जन ।।२३६ ।। जगदीश, महेश, मंगलदीप। येई नागपूरचे बॅन्ड आपोआप। अपार प्रीती करूणा अमाप। आई तुझी त्यावरी ।।२३७ ।। भजनीमंडळ साथ करी। गर्जती नर नारी। चालती रथाबरोबरी। सेवाभाव धरुनि ।।२३८ ।। शेवटची प्रदक्षिणा मारण्या। निघाली तू तव धामा। श्रीक्षेत्री पारडसिंगा ग्रामा। लाखो भक्त सोबतीला ।।२३९ ।। बहात्तर वर्षाचा इतिहास। ठाव माते गावास। शेवटचा हा सायास। तूच आई करितसे ।।२४० ।। शोक करिती सर्वभक्त। अश्रू ढाळति एकजात। गंगा यमूना गावात। वाहू लागे त्याक्षणी ।।२४१ ।। ८.३० वाजता आली। गावातून फिरुन जगत्वल्ली। समाधिची तयारी केली। माता तव भक्तांनी ।।२४२ ।। केले तव मंगलस्नान। करुनि पूजा पाठ अर्चन। समाधी स्थळी नेई जाण। शोकमग्न होवूनिया ।।२४३ ।। १२-१-९७ रविवारला। समाधिस्त झाली भक्तवत्सला। सकाळी दहाच्या समयाला। लोपला देह मातेचा ।।२४४ ।। श्री कमलसुतांनी केला। समाधी विधी पार पाडला। लाखो भक्तांनी गजर केला। जय जय अनसूया म्हणूनि ।।२४५ ।। पूर्वेकडे मुख करुनि। नारायणा





न्याहाळूनि। समाधिस्त होई जननी। श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।२४६ ।। असा हा समाधी सोहळा। माता मंदिरा पार पडला। १२-१-९७ रविवारला। सकाळी दहा वाजता ।।२४७ ।। घेवूनि मातेचे दर्शन। गेले भक्त निघून। माया तुझी आठवून। शोकमग्न होतसे ।।२४८ ।। शंका करिती मनी। दिसेल कां आता जननी। परी तू जाई दर्शनी। दृढश्रद्धा जया ठायी ।।२४९ ।। आई देहाने गेली। कणांकणात सामावली। भक्तोद्धार गुरुकिल्ली। फिरवी अखंडीत ।।२५० ।। निर्गुण रुपात दर्शन। देई माता कृपाघन। अनुभव घेई भाविक जन। माता माऊलीचा ।।२५१ ।। ऐका कैवल्यपाद महिमा। कळसाध्यायी असे श्रवणा। तृप्त करी जनजीवना। माय माझी अनसूया ।।२५२ ।। इतिश्री परमेष्टी अनसूया गाथा। कवन करी अनसूया माता। निमेत्त करुनि तव सुता। विशोऽध्याय सम्पूर्ण ।।२५३ ।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु। शुभंभवतु। हरी ॐ शांती। शांती ।। शांती ।।।

**।। ॐ नमो भगवती अनसूया माता की जय ।।**

## श्री गणेशायनमः श्री सरस्वतैनमः श्री गुरुदेवायनमः



जय जय कैवल्यदाणी। करुणामूर्ति जगत्जननी। नमन माझे तव चरणी। लीन दीन होवूनिया ।।१ ।। तूच माता सुखसागर। कृपेचा तूच आगर। भक्तांचा कल्पतरु वर। तूच माता अनसूया ।।२ ।। तूच असे ठायी ठायी। तूज वाचून काही नाही। दिशा तूच मज दावी। सचेत करुनिया ।।३ ।। म्हणून धरिला सत्संग। तव कृपेचे हे अंग। फिटतसे जन्मा पांग। तव कृपे भगवती ।।४ ।। न सूचे मला अक्षर। जाण देई तूच सत्वर। ज़िव्हाग्री होवूनि स्वार। तूच माता बोलवि ।।५ ।। आणिले माते येथवरी। ऐसीच कृपा पुढे करी। जेणें होई गाथा पूरी। तुझी माता अनसूया ।।६ ।। मी दास तुझा अज्ञानी। पुजापाठ न जाणे मनी। कसे भजावे तुला जननी। न ठावे पामराला ।।७ ।। भक्तिवाचून मी भिकारी। आलो माते तव दारी। दिली तूच एकतारी। अनसूया नामाची ।।८ ।। क्षमा करुनि अपराध। घेई माते पदरात। विनवितसे तव सुत। शरणागत होवूनिया ।।९ ।। समाधिस्त झाल्यावरीं। दर्शना येई नरनारी। माते तव मंदिरी। प्रचिती तू देतसे ।।१० ।। १३-१-९७ ला। अग्नी स्वयं प्रज्वलीत केला। सर्वांगाचा दाह झाला। पाहती सर्व भक्तगण ।।११ ।। पनकुलेनी तव मूर्ति आणली। समाधिस्थळी ठेवली। एकाएकी पेट घेतली। पंचधातूच्या मूर्तिने ।।१२ ।। कामावर होते मजूर। भूरी नावाची पोर। दिसतसे सर्व धूर। म्हणून पाही मंदिरी ।।१३ ।। ज्वाला मूर्तितून निघाली। जिव्हा तू बाहेर काढली। भूरी पोर घाबरली। दिव्यरुप पाहूनि ।।१४ ।। ताताला हाक दिली। म्हणे धावा मूर्ति पेटली। क्षणात सर्व गोळा झाली। भक्त तुझे जगदम्बा ।।१५ ।। धूर निघे समाधितूनी। जळले वस्त्र त्या स्थानी। सुगंध पसरे सुग्रास भोजनी। दूरवरी मंदिरात ।।१६ ।। न जाणे ही लीला।



# अध्याय २१



नविन मंदिरात मूर्तीची स्थापना दि. ५ मे १९९८



मातेचे नविन भव्य मंदिर

(समाधी मंदिर)

काय झाले मूर्तिला। म्हणून हात लावी तिला। उष्ण चटका बसततसे ।।१७ ।। तेथेच होती तुझी प्रतिमा। डावी बाजू जळे पूर्णा। पाणीच पाणी टाकी स्थाना। परी न ती विझतसे ।।१८ ।। म्हणून उचली तेथून मूर्ति। पनकुले नेई अन्नछत्री। जेथे देह त्यागी भगवती। त्याच ठायी ठेवितसे ।।१९ ।। मुर्तिचीही प्रथमावली। करितसे जगत्वल्ली। दिव्यता दावी समाधिस्थळी। स्वयं अग्नी पेटवूनि ।।२० ।। असा हा मूर्तिमहिमा। आला पावन धामा। जागृत काया जाणा। आदीशक्ती आदीमाया ।।२१ ।। मूर्तिकारासी दिला अनुभव। बाहेर निघे जिव्हा भव। शस्त्र न करी उपाय। फेकून तया देतसे ।।२२ ।। हातपाय हलवूनि। जीवंतपणा तु आणी। म्हणून आला तो चरणी। श्री क्षेत्री येवूनिया ।।२३ ।। जयपूरवरुन आणिली मूर्ति। भव्य दिव्य असे कीर्ती। ५ मे १९९८ शनिवार तिथी। स्थापिली माते जन्मदिनी ।।२४ ।। मूर्ति स्थापनेचा विधी। श्रीकमलासुत करी पूर्ति। लाखो भक्त दर्शन घेती। तव मंदिरी येवूनि ।।२५ ।। दूर करी अज्ञमता। सोडूनि सर्व भव व्यथा। स्थित होवूनि एकपरता। दु:ख निवारी भक्ताचे ।।२६ ।। समाधी स्थळाचे महत्व। जाणतसे सर्व भक्त। म्हणूनि पूजि दिनरात। श्रीक्षेत्री येवूनिया ।।२७ ।। आई तव प्रतिमा। स्थापन करणे होती धामा। म्हणून येती भक्त चरणा। सेवा करावया ।।२८ ।। नागपूरकर मंडळी सोबती। घेवून येती पैसे संगती। तव चरणी अर्पण करिती। मूर्ति आणावया ।।२९ ।। सुषमाताई पंनकुले येता दारी। चंदू सेवका विचारी। संत्रे आहेत का मंदिरी। प्रसाद म्हणून सेवाया ।।३० ।। चंदू म्हणाला सुषमाताईला। संत्री नाहीत या घडीला। तृप्ती न मिळे मनाला। संत्री खाण्याविना ।।३१ ।। परी माता होती जाणती। जाणी लेकीची मती। कैसी राही अतृप्ती। असता माय माझी ।।३२ ।। तोच एक ईसम आला। चंदूला आवाज दिला। म्हणे संत्र्याचा भारा आणला। मातेला अर्पावया ।।३३ ।। भारा भरुनि संत्रे। अर्पण करी चरणाते। तेच देई सुषमा पुते। कृपाप्रसाद

आईचा ।।३४ ।। पानावले लोचन । जाणिले माते मनोमन । ईच्छा पुरवि कैवल्यधाम । संत्री लेकरा देवूनी ।।३५ ।। जो मागे जये वेळी । मिळे तया तये वेळी । प्रत्येय हा वेळोवेळी । येतसे तव धामी ।।३६ ।। सुषमा ताई झाली तृप्त । सेवूनी संत्रा प्रसाद । ईच्छा पूरवी तू क्षणात । दयासिंधू अनसूया ।।३७ ।। ९-७-९८ गुरुवार ला । गुरुपौर्णिमेच्या पर्वाला । जलाने दिवा जाळला । अद्‌भूत लीला मातेची ।।३८ ।। आला एक मंदिरी भक्त । ठेवी समाधिस्थळी तीर्थ । खुशाल टाकी तेच दिपात । तेल समजूनी ।।३९ ।। पाण्यात पेटली ज्योत । तव नामाचा प्रताप । दिवा जळे सारी रात । पुण्य प्रतापे मातेच्या ।।४० ।। सकाळी आला तो ईसम । घेण्या तीर्थ शिशी धाम । पाहतसे समाधी स्थान । परी न दिसे तयाला ।।४१ ।। तोच विचारी खुशालला । शिशी तीर्थाची दे मला । खुशाल म्हणे दिले देवाला । जळतसे सारी रात ।।४२ ।। तेव्हा त्याच्या लक्षात आले । आपण दीपात पाणी टाकले । सामर्थ्य तुझे कळून आले । माता तुझ्या भक्तांना ।।४३ ।। पाहातसे त्याक्षणी । होते दिपात पाणी । टाकी तीर्थ ते वदनी । देवूनि त्या ईसमाला ।।४४ ।। प्राषण करी सर्व भक्त । न्याहाळूनि दिव्य ज्योत । तुझी लीला पाही समस्त । गुरुपौर्णिमा पर्वाला ।।४५ ।। साईबाबाची कर्मणी । सार्थ करी अनसूया जननी । चेतवूनि दिपात पाणी । तेल तया तू करी ।।४६ ।। काय अशक्य माते तुला । ज्ञात असे सर्व कला । म्हणून तुझा बोलबाला । अखंड अबाधित ।।४७ ।। पर्ण हिन वृक्षलता । तव कृपेने परिपूर्णता । तूच देई सजीवता । प्राण त्यात ओतूनि ।।४८ ।। पिंपळगावचे खुशाल सोंनागते । भावे भजे भवानी माते । राहूनि अनुदिन चरणाते । सेवाचाकरी करितसे ।।४९ ।। लाविला तूच लळा । कृपाळू दीनदयाळा । स्विकारी चाकरीला । माता तव मंदिरी ।।५० ।। नव्हते मुलबाळ । दुःख हेचि प्रबळ । होतसे आबाळ । अपत्यविना ।।५१ ।। म्हणून आर्जवि मातेला । आई तू सहारा दिला । तूच दे मज हवाला । कृपाप्रसाद देवूनि ।।५२ ।। खुशालची दृढभक्ती । सुखवि अनसूया सती । कृपा करी दीनावरती । बारा वर्षानंतर ।।५३ ।। पत्नी






रेखाला घेवूनि । जाई नागपूर दवाखानी । आठवूनि अनसूया जननी । जयजयकार करितसे ।।५४ ।। न होई काही त्रास । बाळंतपण बिन सायास । तोच रव येई कर्णास । आई आई म्हणौनि ।।५५ ।। डॉक्टर धावत आले । आवाज ऐकून चकीत झाले । जन्मताच स्वर फुटले । नवजात अर्भकाला ।।५६ ।। कैसे घडे विपरीत । बोलवा पिता त्वरीत । खुशाल आला धावत । लीला बघण्या मातेची ।।५७ ।। आईची ही धरोहर । म्हणून आवाज देई सत्वर । जन्मताच निलीमा पोर । आई म्हणूनिया ।।५८ ।। नागपूरचे भाविक भक्त । शिवकुमार चौधरी नामवत । तव चरणी जीवन अर्पित । पादपूजा करितसे ।।५९ ।। तात रामाजी चौधरी । करी नामाची चाकरी । श्रद्धा अपार घरी दारी । माता तव चरणासी ।।६० ।। हार्ट अटॅक तया येई । वाचवि दोन वेळा आई । तूच तया जीवनदान देई । अटॅक दूर करुनि ।।६१ । अपघाती वाचवि मुला । प्रकाश विजय चौधरीला । म्हणून कुटुम्बात लागे लळा । आई अनसूयेचा ।।६२ ।। खोट्या आरोपातून मुक्तता । करी प्रकाशची माता । साक्ष उलटवी पत्ता । दर्शनी येता तुझ्या ।।६३ ।। म्हणून धरली कास । तव चरणाची आस । सदैव येई दर्शनास । शिवकुमार चौधरी ।।६४ ।। वानखडे चौधरी कल्याणभाई । विचार करी बसून ठायी । नागपूरवरुन पालखी काढावी । श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।६५ ।। महाशिवरात्री पर्वाला । न्यावी पालखी श्रीक्षेत्राला । कोठून काढावी न कळे तयाला । म्हणून येई माता तव चरणी ।।६६ ।। वानखडे ठेवि नारळ पायी । नावे घेवूनि काही । म्हणे माते तू स्थळ दर्शवि । सुरुवात करण्यासी ।।६७ ।। यावे वाटे धामाला । कृपाकरी भक्तवत्सला । परवानगी देई दासाला । पालखी काढण्यासी ।।६८ ।। चौधरीच्या नारळाला । माते तू स्पर्श केला । म्हणून काढी पालखीला । चौधरी सदनातूनि ।।६९ ।।

"राजेसरीन हूकूम केला गां ।

सावत्या घरी सुनेनं नेल गां।
कोणाची भाकर ही पाहून देल्लेली।
कोणाच्या मागं धावत जाते"। (अनसूया माता)

स्वमुखे बोली तू वचन। भक्ताचे जाणूनि मन। गाई पालखीचे महिमान। तूच माता भगवती। ७०।। झाली पालखीला सुरुवात। ११-२-९६ सालात। चौधरीच्या सदनात। पावनता जया मिळे।।७१।। पालखी काढी घरुनि। शिदोरी नामाची घेवूनि। येई माता तव सदनी। श्रीक्षेत्री पारडसिंगा।।७२।। वानखडे कल्याणभाई। गोतमारे धुमाळ बाई। नरनारी साथ देई। पालखी खांद्यावर घेवूनि।।७३।। भाविक भक्त साथ करी। राहती जे नागपूर नगरी। चालूनि पालखी बरोबरी। गजर करी नामाचा।।७४।। नागपूर पारडसिंगा मार्गावर। तव नामाचा जय जयकार। महाशिवरात्रीच्या पर्वावर। करितसे भक्त तुझे।।७५।। गावोगावी स्वागत होई। पुष्पगुलाल उधळत येई। तोरणे पताका लावी। सेवाभाव धरुनि।।७६।। तूच माते पूर्ण करी। तव लेकराची वारी। व्यवस्था तूच करी। पुढे पुढे चालूनिया।।७७।। न होई काही त्रास। पूर्ण करी तू सायास। जो अर्पि भाव भक्तिस। साथ तू तया करी।।७८।। कुत्र्या कावळ्याच्या रुपात। दर्शन देई मेटपांजऱ्यात। सुखविती तव पुत। माता तव दर्शने।।७९।। कागा पाजी पाणी। माता तव रुप जाणोनि। तूच आणि पालखी धामी। भक्तासवे चालूनिया।।८०।। १४-१-९८ संक्रांतला। चौधरी निघाले दर्शनाला। आळवित आई अनसूयेला। रस्ता पार करितसे।।८१।। परी काय होते लिखित। न जाणे अल्पमत। सापडला अपघातात। शिवकुमार लेक तुझा।।८२।। मकर संक्रांतच्या दिनी। निघाले स्कूटर घेवूनि। मोटार सायकल तत्क्षणी। धडक देई चौधरीला।।८३।। पोलिस लाईन टाकळी समोर।





अपघात हा महाभयंकर। दोन्ही गाड्या चक्काचूर। पहाया गर्दी लोटतसे।।८४।। रक्त सांडले धरणीवर। अचेत पडला शिवकुमार। परी वदे वाचा एक स्वर। जय जय अनसूया।।८५।। न होते कुणी संगती। तुजविन माता भगवती। बेशुद्ध होवूनि मार्गाति। पडला असे लेक तुझा।।८६।। मेंदू पडला बाहेर। माथा झाला चूरचूर। टकोरी होई दूर। रक्त न खंडितसे।।८७।। न लावी हात कोणी। मरतो हा या क्षणी। द्यावी लागेल पोलिस बयानि। म्हणून नेई दवाखानी।।८८।। आले अपघाती पोलिस। थक्क होती पाहूनि लास। परी होती थोडी आस। म्हणून नेई दवाखानी।।८९।। खिशातील डायरी पाहूनि। निरोप देई चौधरी सदनी। कांता चित्राताई जाई धावूनि। सवे घेवूनी बंधू पिता।।९०।। पाहूनि पतीची अवस्था। शोक करी पत्नी चित्रा। म्हणे माता रक्षी माथा। सौभाग्य देवूनिया।।९१।। माते तव दर्शनि। येता घडे कहाणी। न लागो तव दूषणी। म्हणून रक्षी मम पती।।९२।। न घेई कुणी केस। म्हणे वाचेल दोन तास। का करावा सायास। मरणासन्न जो असे।।९३।। डॉ. गौतम दर्डा उपचार करी। हवाला ठेवूनि देवावरी। न येई केस आजवरी। यासम दवाखानी।।९४।। वाचेल जरी यातूनि। न पाही कधी लोचनी। अंधत्व येई जीवनी। म्हणून तया सांगितसे।।९५।। प्रयत्नांची करु शिकस्त। परी वाचवि एक भगवंत। तोच रक्षी हा घट। सर्व समर्थ जो असे।।९६।। टाकूनि देवावर भार। डॉ. दर्डा करी उपचार। भजी माता तव लेकरं। नाम जप करुनिया।।९७।। या समयी तूच माता। रक्षी तू शिवपुता। परोपरी आर्जवि दाता। त्राता तूच म्हणूनि।।९८।। येवू लागली शुद्ध। तव नामाचे औषध। होते जे सर्व बद्ध। हर्षति यासमयी।।९९।। तू दिले जीवनदान। होई लेकाचा पुनर्जन्म। तव कृपेचे हे पान। चौधरी कुटुम्बाला।।१००।। नागपूरचे दिलीप कारोकर। पत्नी सुनंदाताई बरोबर। करितसे नाम व्यवहार। आई अनसूयेचा।।१०१।। निजध्यास उभयता। कृपा तुझी त्या परता। संकटी रक्षी तूच माता। वेळोवेळी धावूनिया।।१०२।। होता त्रास लोचनी। गळतसे सदैव नेत्रांजनी।

म्हणून आली तव चरणी। सुनंदाताई श्रीक्षेत्री ।।१०३ ।। जाणूनि तिचा विकार। डोळे पुसी करुणाकर। कृपाहस्ते करी दूर। आजार लेकीचा ।।१०४ ।। तूच माझी माय माऊली। सांभाळी तू तव बाली। कृपादृष्टीची परमावली। तूच करी भगवती ।।१०५ ।। तव स्पर्शे पावन। पादूका करी सदन। गातसे महिमान। गुण तुझे गावूनि ।।१०६ ।। आणिले काही फुले। थोडे पादूकावर वाहिले। दोन दिवस तेथेच राहिले। परी न ते कोमजती ।।१०७ ।। बाकी सुमने सुकली। सतेज पादुकावर राहली। महत्ता चरणी कळली। पादपूजा करुनिया ।।१०८ ।। समाधिस्त झाल्यावरी। अनुभव येई लेकरी। ईच्छा तू पूर्ण करी। दर्शनि येवूनिया ।।१०९ ।। देह सोडी करुणाघना। न मिळे तीर्थ प्राशना। होती मनात भावना। स्नानतीर्थ घेण्याची ।।११० ।। तोच तू दिला दृष्टांत। पादुकातून निघे तिर्थ। प्राशन करी तव पुत। कृत्यकृत्य होवूनिया ।।१११ ।। होत्या पादूका घरी। तीर्थ येई त्यातून वरी। धार लागली सत्वरी। लोट वाहतसे ।।११२ ।। सुगंधीत वास त्याला। तीर्थ देई लेकीला। जावूनि तिच्या घराला। ईच्छापूर्ती करितसे ।।११३ ।। दिली माते तू जाणिव। इथेच मी आहे सदैव। परी मनी हवा दृढभाव। तया लाभ होतसे ।।११४ ।। चरण पूजेचे महिमान। पादूकाचे तीर्थ स्नान। देई माता तूच करुन। संजीवन सामर्थ्य ।।११५ ।। असा हा तीर्थ महिमा। आला कारोकर धामा। म्हणून भजती चरणा। दृढभाव धरुनिया ।।११६ ।। न चुके पौर्णिमावारी। भजती येवूनि मंदिरी। तूच माता सदैव तारी। कृपादान देवूनि ।।११७ ।। काटोल निवासी श्री चरणसिंग ठाकूर। श्रद्धा अपार मातेवर। विनवितसे वारंवार। शक्ती देई सदा ।।११८ ।। भक्तांची करण्या चाकरी। आले माता तव दारी। कामातच रामकृष्ण हरी। प्राहतसे सर्वदा ।।११९ ।। कर्तव्यपूर्ती हीच भक्ती। पूजा पाठ सेवावृत्ती। भक्तांना सुखवि कृती। सेवाधर्म पाळूनि ।।१२० ।। तेरा सदस्यांची समिती। नेमिली कार्याप्रती। माता संस्थानची प्रगती। यथाशक्ती







करितसे ।।१२१ ।। परी तू जाणिले मनोमनी। कोण सांभाळी तव धामी। म्हणौनि अध्यक्ष बनवूनि। भार टाकी तयावरी ।।१२२ ।। न करता काही प्रयास। नसता मनी आस। अध्यक्ष बनले विनसायास। माता तव संस्थानचे ।।१२३ ।। आली त्याची प्रचिती। झाली धामाची प्रगती। का केली तू ही कृती। ज्ञात होई सर्वांना ।।१२४ ।। पाया ते कळस। पूर्ण करी सायास। करुनि सर्व आरास। सजवि धाम तुझे ।।१२५ ।। रात्रंदिन एकच ध्यास। मंदिराचा करण्या विकास। तूच पूरवी मानस। तव चरणसिंग बाळाचा ।।१२६ ।। मंदिराचे काम करण्या। फिरी दूरवर धन आणण्या। भोगूनि असह्य यातना। येरझार करितसे ।।१२७ ।। तरी तू करी पूर्णावली। दूर सारी संकट कली। दृष्टांत हाचि तव बाळी। येतसे कार्य करता ।।१२८ ।। सहज होई धन उपलब्ध। जो तो होई वचनबद्ध। तूच करी सर्व सिद्ध। दूरवर जावूनिया ।।१२९ ।। न येई कोणती आपदा। दूर करी तू सर्वदा। शक्ती देई सदा। तूच माता भगवती ।।१३० ।। म्हणून करी कार्य सदा। तव चरणी ठेवूनि श्रद्धा। दूर करी तू आपदा। वेळोवेळी धावूनि ।।१३१ ।। जात असता नागपूरला। मध्येच अपघात घडला। परी तू वाचवि मुलाला। धावूनि अपघात स्थळी ।।१३२ ।। नसता तुझा आधार। झाले असते जर्जर। पंगू बनते शरीर। या अपघाती ।।१३३ ।। परी तू वाचवि भवानी। थोडा अपाय घडला तनी। कृपादृष्टी तया रोखूनि। वाचवि तव बाळाला ।।१३४ ।। म्हणून लागला तुझा लळा। तव धामाचा जिव्हाळा। पूर्ण करी तू लडीवाळा। आशीर्वाद देवूनि ।।१३५ ।। अशी ही संजीवन काया। दूर करी भवभया। जो येई तव पाया। उद्धार करी तयाचा ।।१३६ ।। निर्गुण रुपात जावून। दर्शन देई करुणाघन। दूर करितसे अज्ञान। वेळोवेळी धावूनि ।।१३७ ।। समाधिस्थळी जो येई। ठाव तू तया देई। संजीवन समाधी ग्वाही। देतसे भक्ताला ।।१३८ ।। मूर्तितील सजीवता। तारीतसे भक्ता। आहे तू स्थीत तीता। श्रीक्षेत्री

मंदिरी ॥१३९॥ अविनाशी अविकारी। अनसूया करुणाकरी। तूच माता मंदिरी। संजीवन समाधी ॥१४०॥ "आई कधी मरते कां"? । वदे तू तव पुता। म्हणून पूजी भगवता। श्रीक्षेत्री येवूनि ॥१४१॥ श्रीयंत्राची प्रतिष्ठापना। करुनि करावी आराधना। फलदायी होई भक्तगणा। जाणते सांगितसे ॥१४२॥ प्रेमदास महाराज व पुरोहित। सोबत संस्थेचे विश्वस्त। होमहवनादि करी मंदिरात। श्रीयंत्र स्थापावया ॥१४३॥ हवन सुरु असता मंदिरात। घटना घडली अकल्पित। बाजूला पडून होती एक। बालिका निचेष्ट ॥१४४॥ शरीर निष्प्राण झाले। अवयव सर्व गळाले। कोण कुठली बाले। म्हणून सर्वा पूसती ॥१४५॥ सर्व भक्त गोळा झाले। बाळाला निरखू लागले। म्हणे हिला पदरी घेतले। माय माऊलीने ॥१४६॥ एक म्हातारी होती बसून। आली होती वडशाहून। नातीला सोबत घेवून। श्रीक्षेत्री दरबारी ॥१४७॥ होती समाधिजवळी बसून। नातीला गाभाऱ्यात ठेवून। अर्चना करी भावभक्ति अर्पून। श्रीचरणी माऊलीच्या ॥१४८॥ तोंच तिने ऐकला रव। मुलीने सोडिला जीव। धावत आली त्याठाव। ओळखी मृत बालिका ॥१४९॥ जवळ घेवूनी नातीला। आकांत तीने केला। म्हणे अखेर गेली धामाला। श्रीक्षेत्री येवूनी ॥१५०॥ पाहूनी तीचा आकांत। भक्त पडले विचारात। का, घडले हे अवचित। न कळे कुणा काही ॥१५१॥ माते हे तू काय केले। जसे दिले तसे घेतले। कशी जाऊ आता घराले। या बालिके विना ॥१५२॥ आली होती तव दर्शना। न सांगती घरी कुणा। माझाही प्राण घे या क्षणा। न जाई आता येथूनि ॥१५३॥ करुनि आकांत नानापरी। डोके आपटे भुमिवरी। म्हणे आई वाचव लेकरी। संजीवनी नाम तुझे ॥१५४॥ भक्त सर्व पाहती। कैसी आली आपत्ती। श्री यंत्राची अशुभ किर्ती। अपशकुन होतसे ॥१५५॥ प्रेमदास महाराजांनी घेतले मुलीला। समाधीवर ठेवी तीला। म्हणे रक्षावे बालिकेला। अक्षय दान देवूनी ॥१५६॥ जैसी ठेविली समाधीवर। हातपाय







हलवी सत्वर। आई म्हणूनी हाक मारी सत्वरा। स्पर्श होता समाधीचा ॥१५७॥ आनंदिले सर्व भक्तगण। पूजा पाठ करी हवन। श्री यंत्राचा महिमा जाण। शुभ संकेत मिळतसे ॥१५८॥ अचेत झाली शरिरी। समाधी सचेत करी। ऐसी माते तव थोरी। गातसे भक्त तुझे ॥१५९॥ घेवूनी आपल्या नातीला। निरखितसे भक्त वत्सला। म्हणे सार्थ केले नावाला। संजीवनी म्हणूनी ॥१६०॥ श्री यंत्राची शुभवार्ता। तूच असे सर्व कर्ता। जीवनदायी दुःख हर्ता। तूच असे भगवती ॥१६१॥ न जाणता तुझी किर्ती। बोलिले मी अल्पमती। परी तू करी पूर्ती। भक्ता अभय देवूनि ॥१६२॥ बालिकेला घेवूनि जवळ। प्रेमालाप करी निखळ। करी घर जवळ। कृतार्थ होवूनिया ॥१६३॥ ऐसी आई तुझी लिला। दाविली श्री यंत्र स्थापनेला। सार्थ करी तव नामाला। संजीवन दान देवूनि ॥१६४॥ म्हणून समाधी संजीवन। करी मनोरथ पूर्ण। निर्गुण रुपात दर्शन। भक्तांना देवूनिया ॥१६५॥ नामजपाची वाढली थोरी। समाधिस्त झाल्यावरी। नाम मंत्राचा प्रचार करी। "ॐ श्री जय जय अनसूया माता" ॥१६६॥ अनसूया माता नाम जप मंडळ। ग्राम अंबाडा निवास स्थळ। अखंड गाई नाम प्रबळ। तव कृपे भगवती ॥१६७॥ ओंकार भड करी सुरुवात। दवेन्द्र, अशोक करी सोबत। हरी अरविंद देई साथ। जानराव जीवनदास सवे ॥१६८॥ नाही संगीताची जाण। स्वराचेही नाही ज्ञान। परी करीतसे तव कवन। कृपा तुझी म्हणूनिया ॥१६९॥ अंबाडा गावाचे हे मंडळ। श्रद्धा त्यांची निचळ। तूच माते दिले बळ। नाम जप करण्यासी ॥१७०॥ म्हणूनी जाती दूरवरी। घेवूनि नामाची एकतारी। आळवी तुला परोपरी। अढळ श्रद्धा ठेवूनिया ॥१७१॥ एका घरी आली प्रचिती। तव नामाची असे ख्याती। अखंड जपाची करीता पूर्ती। जीवनदान देतसे ॥१७२॥ एक भक्त याच गावी। दुर्धर व्याधी बाळा होई। न चाले उपचार काही। औषध देवूनिया ॥१७३॥ झाला बाळ अति त्रस्त। पडून राहे तो

सुस्त। खानपानाची न मात। काय करावे कळेना ॥१७४॥ पांच सोमवारी केला जप। संजीवनी मंत्राचे अखंड तप। श्रद्धा ठेवूनि चरणी एक। नामस्मरण करितसे ॥१७५॥ नामाची संजीवनी मिळाली। बाळाची प्रकृती सुधारली। खानपानाची शक्ती वाढली। खेळू लागे तव कृपे ॥१७६॥ ऐसे आई तव नाम प्रबळ। प्रचारक बनूनि गाई सबळ। अनसूया माता नामजप मंडळ। गावोगावी जावूनिया ॥१७७॥ तूच माते आशिर्वाद दिला। तूच लाविले गुण गाण्याला। तूच सांभाळी तव लेकराला। मायमाऊलि अनसूया ॥१७८॥ दिव्य भव्य तुझा थाट। मूर्तित दिसे लखलखाट। जाणिव देई तया पुत। महिमा तुझा भगवती ॥१७९॥ पाहूनी तुझ्या नयनी। भक्त आठविती करणी। कैसा उद्धार करी भवानी। पाहूनी एकटक ॥१८०॥ ऐका आता माता कृती। कैसी उद्धारी भगवती। कैसी येई प्रचिती। माता वचनाची ॥१८१॥ आई तुझी सुक्ष्म दृष्टी। पाही भक्ता एकवटी। कृपाप्रसादाची रहाटी। चालतसे मंदिरी ॥१८२॥ कासविची तुझी दृष्टी। परी होई अमृतवृष्टी। मुलाबांळा प्रीती। देतसे निरखूनि ॥१८३॥ न लावती पापणी। एकाग्र दृष्टी निरांजनी। साक्षात तू नारायणी। वंदन तव चरणी ॥१८४॥ भक्त अर्पण करी नारळ। दुर होण्या व्याधी सकळ। पूर्ण पाही तू श्रीफळ। सूक्ष्म दृष्टी ठेवूनिया ॥१८५॥ नारळ आणी नयनासी। संचित जाणे मानसी। गोटा घेई फोडण्यासी। दु:ख हरण्या भक्ताचे ॥१८६॥ लीलया फुटे नारळ। कितीही असे ते सबळ। फेकून देई जवळ। ज्याचे असे त्याला ॥१८७॥ आणि कोणी भाविक। हार बदाम खारीक। ऐकूनि त्याची हाक। ते तू पाहतसे ॥१८८॥ पाहूनि वस्तू एकटक। आणि जे भक्तिने भाविक। जाणूनि त्यांची मेख। लीला तू दावितसे ॥१८९॥ बदाम ठेवूनि वदनी। हार पाही लोचनी। विस्तव आण म्हणूनि। आज्ञा तू करितसे ॥१९०॥ घेवूनि हार करी। धरी तू ज्योतीवरी। जाळूनि तो दूरी। फेकूनि देतसे ॥१९१॥ तोच कर जाई मुखी। जीभेने तू





तया चाखी। भक्ताची भक्ती निरखी। फळ तया मिळतसे ॥१९२॥ कितीही आले भक्त मंदिरी। क्रिया तू हीच करी। कृपादृष्टीची फिरे फेरी। दैन्य दु:ख दूर होई ॥१९३॥ फेकूनि सर्व पदार्थाला। "फेकते थे काय व्हय" पुसी भक्ताला। मग लावी रसनेला। दु:ख हरण्यासी ॥१९४॥ न सांगावे लागे तुला। न मागावे लागे तुला। तूच जाणी त्याची बला। अंतर्ज्ञानी तू असे ॥१९५॥ क्षणात दु:ख दूर करी। नजरेने खेळ करी। कृपाछत्र तव लेकरी। सदैव मिळतसे ॥१९६॥ ताप व्याप असो काही। संतती संपत्ती तूच देई। जो येई तव पायी। दृढश्रद्धा ठेवूनिया ॥१९७॥ जो असे मातृभक्त। तोच आई तव पुत। सेवा करी अविरत। चरण वंदूनिया ॥१९८॥ म्हणून धरा माता चरण। सार्थ करा मानव जन्म। सफल करा जीवन। गुण गाऊनि आईचे ॥१९९॥ दुर्लभ हा मानवजन्म। बहुप्रयासे पूर्वपूण्य। फळा येई संचित जाण। म्हणौनि मिळतसे ॥२००॥ पशूपक्षी कृमीकिटके। जीवन जगी एकटके। परी मानवाचे वहिवाटे। प्राण्याहूनि वेगळे ॥२०१॥ लक्ष चौऱ्यांशी योनी। भोगूनि नरदेह दानी। धरा चरण अनसूया जननी। संसार सार कराया ॥२०२॥ "यमपूरी यमराजा। पहिला काशी दरावाजा"। हेच वदे अनसूया काजा। सार्थक कराया जन्माचे ॥२०३॥

बारा वर्षाचे शिंगुष्ट आल एक।  
काशी खंडाले गेले लोक।  
बारा वर्षान शिंगुष्ट येईन।  
काशी खंडाले गोदी जाईन।  
माह्या गोपीले कोण नेईन।  
एकदा काशी खंडाले जाय रे गळ्या।

नाही तर राहशीन कणस खुळ्या ।। – (अनसूया माता) मातेचे हे अमृतवचन । करी भक्ता पावन । गाऊनि काशी महिमान । भक्ती महात्म्य सांगतसे ।।२०४ ।। न करता भक्ती । सदैव येई आपत्ती । म्हणून सांगे भगवती । भजन करूनिया ।।२०५ ।। "गाणं म्हणं" माता सांगे । बसून जाई तू अंगे । म्हणून पाळा आज्ञा गंगे । भावभक्ति अर्पूनिया ।।२०६ ।। नवविधा भक्ती जरी । तुम्ही करा एकतरी । तेव्हा तराल भवसागरी । आशीर्वादे भगवती ।।२०७ ।।

कलीयुगाची माया न लागो राजसा ।।
जगती या मानसा भाविकासी ।।
सुख भोगाया माया जवळ केली ।
विष अधांतरी मिळे मज ।। – (अनसूया माता)

माते तुझी ही दिव्य वाणी । ऐकता लाभे पर्वणी । सुख समृद्धी येई सदनी । वाचता वर्तताही ।।२०८ ।। भक्तीचे हे गुणगाण । करी माता करुनि भजन । म्हणून धरा चरण । आई अनसूयेचे ।।२०९ ।। संपन्नता येण्या दारी । पौर्णिमेची वारी करी । येवूनि श्रीक्षेत्री मंदिरी । ईच्छा पूर्ति होतसे ।।२१० ।। सद्गुरु पूजनासी । येई या पर्वासी । पाप ताप हारिसी । कृपाप्रसाद देवूनि ।।२११ ।। भक्तांचा अखंड स्त्रोत । वाहतसे एकजात । दर्शनी समाधान पावत । गुरु महिमा गातसे ।।२१२ ।। संत महंत येती । दर्शन देई भगवती । ऋषी मुनी तप करिती । या पावन पर्वावर ।।२१३ ।। अन्नदानाचे मिळे पुण्य । प्रसाद घेई भक्तगण । माता कृपेचे महिमान । गातसे सर्वत्र ।।२१४ ।। किती तरी भक्त येती । प्रसाद घेवूनि तृप्त होती । गाती आई तव गीती । जय जय अनसूया ।।२१५ ।। पंढरपूरची जणू शोभा ।






अवतरली वाटे भुभागा । भावभक्तिची चंद्रभागा । वाहतसे श्रीक्षेत्री ।।२१६ ।। रस्त्यावर उभे राहूनि । पाहूनिया तव धामी । 'पंढरपूर नांदेल' या ग्रामी । म्हणूनि वदतसे ।।२१७ ।। आई तू मंचकी बसूनि । वर करी हस्त दोन्ही । स्मित हास्य करुनि । आशिर्वाद देतसे ।।२१८ ।। ठेवूनि कडेवर कर । उभा ठाकला रमावर । पाहतसे जनसागर । विठ्ठल विठ्ठल म्हणूनि ।।२१९ ।। "जय जय रामकृष्ण हरी । माता अनसूया पंढरी" । वदे माता मंदिरी । ओळख देवूनिया ।।२२० ।। "पंढरी पंढरी कोण्या येडयान पाहिली । डाव्या बाजून रुखमाई राहिली ।"

पंढरी भोवती जोंधळाचे वेल । विळा घेवूनि जनी चाल ।। – (अनसूया माता)

२-४-९६ मंगळवारी । नारायणपूर वाटेवरी । वदे माता वैखरी । आनंदे गाऊनिया ।।२२१ ।। आईचे अमृतवचन । उद्धारी भक्ता जीवन । म्हणून गाती श्रद्धापूर्ण । जय जयकार करुनिया ।।२२२ ।। म्हणून विठ्ठल रखमाई । माझी अनसूया आई । आलो माते तव पायी । उद्धारी तू मम देवा ।।२२३ ।। रुक्मिणी वल्लभाचे रुप । महाशक्तिचे हे प्रारुप । दाखवि तू विश्वरुप । ॐ नमो भगवती ।।२२४ ।। म्हणून वदली तू माता । "जिथ देवाचा हात पुरत नाही तीथं अनसूयेचा पुरते" । दिव्यता जाणूनिया ।।२२५ ।। पौर्णिमेचा पावन दिन । गुरुकृपा होई जाण । म्हणून येती तव धाम । श्रद्धा सुमन अर्पाया ।।२२६ ।। आस असे एक मनी । दर्शन द्यावे तू भवानी । म्हणौनि येती दूरवरुनि । या पावन पर्वावर ।।२२७ ।। सद्गुरुच्या या दिनी । शोभायात्रा निघे गावातूनि । लाजलज्जा सर्व सोडूनि । नाचती नरनारी ।।२२८ ।। दिंड्या पताका डोलती । भक्त गुलाल उधळती । सुखवि महासती । आनंदोत्सवे भक्तांच्या ।।२२९ ।। देवीदेवता सर्व पाही । महाशक्तीची नवलाई । पुष्प उधळत येई । भगवती चरणी ।।२३० ।। पालखी घेई खांद्यावरी । जो तो पालखीस स्पर्श करी । लोटांगण पालखी समोरी । घालतसे भक्त तुझे ।।२३१ ।।

गाती गाण तुझेच आई। नाचती सर्व भक्त माई। हरीनामाचा गजर होई। बँड ताशे वाजूनिया ।।२३२।। आई तू देई आशिर्वाद। पालखीत बसूनि साधे काज। पंढरीची रखमाई आज। अवतरली वाटतसे ।।२३३।। देवादिक आनंदिती। गाऊ नि आईची गीती। किती गाऊ आरती। भगवती चरणी ।।२३४।। अन्नछत्री भक्त बसले। भगवतीचे भोजन चाले। फेकूनि विचारु लागले। "फेकते थे काय व्हाय" ।।२३५।। "भक्ताला जेवू घालते"। तूच वदे उत्तरी माते। म्हणून फेकी अन्नाते। अन्नपूर्णा अनसूया ।।२३६।। न जाणे महिमा। अर्थ न कळे तुजविणा। तूच जाणी करुणाघना। अज्ञामा काय ठावे ।।२३७।। ऋषी मुनी तप करिती। दूर देशी दूर प्रांती। तृप्त करी क्षुधा भगवती। फेकूनिया अन्नाते ।।२३८।। नाव घेवोनि फेकू लागे। मिळतसे तया भागे। जे जे भजती जव लागे। तृप्त होती प्रसादे ।।२३९।। नसे हा कुणा अधिकार। पूर्ण ब्रहम तुम्ही साचार। मी तर असे लाचार। म्हणून आलो चरणासी ।।२४०।। पाहूनि सर्व भक्ताला। माता न्याहाळी मुखाला। 'व्हन तिकडे' एकाला। "बसून जाण" दुज्या म्हणे ।।२४१।। बसून जाण्या चरणासी। तूच सांगे भक्ताशी। गाणे तुझेच गाण्यासी। तूच माता बोलतसे ।।२४२।। दृढभक्ती दृढ भाव। माता चरणाचा ठाव। एकच असे जगी नाव। जय जय अनसूया ।।२४३।। म्हणून यावे माते शरण। करावे तिचेच गुणगान। दृढभावे पूजावे चरण। आई अनसूयेचे ।।२४४।।

लंकेच्या रावनान लंका जागवली।

सीता झोळीत नेली।

लंकेचा रावण जन्माचा पापी।

याने रामाची नेली वस्तू।





देव मारोती घाले गस्त।

गरुड पक्षावर मारोती बसले।

लंकेला जाऊन होम केले।।

सीता व सीता।

सीता मोठी पतिव्रता।

लंकेच्या रावणाच्या हिच्या कपाळी डाग होता – अनसूया माता

गाई माते तू हे गीत। नाचूनि भक्तासमवेत। अमृत वचन तू करी ज्ञात। तैसीच मुद्रा करुनिया ।।२४५।। गाता हे मधूर वचन। भक्ता मिळतसे पुण्य। भाव भक्तिचे हे गाण। अमृत वृष्टी करितसे ।।२४६।। तैसेच मुख करुनि। क्षणात उडी घेवूनि। पाहतसे भक्ता लागूनि। जगदम्बा अनसूया ।।२४७।। म्हण गाणं म्हणौनि सांगे। परी स्वत: गाऊ लागे। भक्त म्हणती तुज मागे। ब्रह्मसुख घ्यावया ।।२४८।। मम दासाला तू सांगितले। गाण म्हणण्या लाविले। कोणते म्हणू म्हणून विचारले। "तुकारामाच म्हणं" म्हणून आज्ञा करी ।।२४९।। तूच माते पात्र करी। लेखनी देतसे करी। गाथा तुझी करी पुरी। तूच माता अनसूया ।।२५०।। तव लीलेचे हे वर्णन। उद्धार कला गावून। अमृत वचनाची करुनि जाण। उत्सव गाण गातसे ।।२५१।। येता माते तव मंदिरी। भक्त आठवि कर्तबगारी। बघता तुझी मुर्ति साजरी। हेचि गाणं गातसे ।।२५२।। एकेक गोष्ट स्मरुनि। आळवि आई भवानी। अश्रू दाटतसे नयनी। माया तुझी आठविता ।।२५३।। म्हणून समाधी संजीवन। काया तुझी निरंतन। जो आला शरण। उद्धार त्याचा होतसे ।।२५४।। आता ऐका अवतरणिका। सांगूनि पूर्ण होई गाथा। भगवती वाचता वर्तता।

सुख शांती लाभतसे ।।२५५ ।। प्रथमोध्यायी मंगलाचरण । केले देवी देवता वंदन । द्वितियोध्यायी जन्मगाण । ग्राम माहात्म्य सांगूनि ।।२५६ ।। तृतियोध्यायी संसार कथा । लौकिक जीवनाची गाथा । कैसी नैनीताल यात्रेची । कैसी त्रासवि माता । कथन करी तव कृपे ।।२५७।। चतुर्थोध्यायी शिवशक्ति गाण । संसाराचे तोडी बंधन । पागलपणाचा उपचार जाण । वेडी म्हणुनि करी ।।२५८ ।। तपश्चर्येचे तपाचरण । पंचमोध्यायी केले कथन । षष्ठोध्यायी शारदा गाण । भक्ति महिमा सांगूनि ।।२५९ ।। सप्तमोध्यायी संत गीती । पुंडलिकबाबा येई क्षेत्री । ओळख करी भगवती । महिमा जाणूनिया ।।२६० ।। अष्टमोध्यायी केले कथन । भक्तोध्दार करी जगत्जीवन । अनुभवाचे करी गाण । भगवत कृपा जया होई ।।२६१ ।। मंदिराचे बांधकाम । करी समिती स्थापून । केले संक्षिप्त विवरण । संस्थान पूर्तिचे ।।२६२ ।। नवमोध्यायी श्वान महिमा । जो अमर करी जीवना । दशमोध्यायी वाचवि ग्रामा । निसर्ग तांडवातूनि ।।२६३ ।। एकदशोध्यायी कवन । मृत गाईशी जीवदान । भावभक्तिचे वर्णन । दृष्टांत देवूनिया ।।२६४ ।। द्वादशोध्यायी कल्लूर कथा । दत्तपौर्णिमेची गीता । आंध्रप्रदेशी वर्तता । पूर्तता होतसे ।।२६५ ।। वीज पडली मंदिरी । रक्षी तू लेकरी । त्रयोदशोध्यायी कथन करी । भक्ती महिमा गाऊनि ।।२६६ ।। दूरवरुन येई भक्त । माते श्री क्षेत्रात । दृष्टांत करी ज्ञात । चतुर्दशोध्यायी ।।२६७ ।। देवी सरस्वतीची महिमा । संतमहंताची करुणा । पंचदशोध्यायी असे कवना । गुरुकिल्ली उध्दाराची ।।२६८ ।। षोडशोध्यायी कथा । हैद्राबादची गाथा । साईबाबाची पूर्तता । माता तू करितसे ।।२६९ ।। दिल्लीचे गाई महिमान । शिवनेसन स्वामीचे गुणगाण । साईनाम जपाचे प्रयोजन । केले शंकर मठी ।।२७० ।। ठिकठिकाणी जावूनि । उध्दार करी जननी । सप्तदशोध्यायी कहाणी । दिल्ली नैनीताल यात्रेची ।।२७१ ।। अष्टादशोध्यायी पाही । नागपूर महिमा गाई । भावभक्तिची ग्वाही । कथा कवनी देतसे ।।२७२ ।। एकोनविशोध्यायी कथा । नागपूर नगरची गाथा । दोन अध्यायी गाई गीता । नागपूरकर भक्तांची ।।२७३ ।। विशोध्यायी केले कथन । समाधी सोहळ्याचे वर्णन । गेली माता सोडून । पोरक्या






करुनि दशदिशा ।।२७४ ।। एकविशोध्यायी वर्णन । कैवल्यपाद कवन । माताकृतिचे कथन । केले माते तव कृपे ।।२७५ ।। निर्गुण रुपात दर्शन । देई समाधी संजीवन । गाऊनि मूर्ति महिमान । गुण गौरव करी ।।२७६ ।। अशी ही अवतरणिका । करी माते तव कृपा । पूर्ण करी मनोरथा । आशीर्वादे तुझेचि ।।२७७ ।। या गाथेचे महत्व फार । कृपा करी दीनावर । वाचता वर्तता महिमा सार । दयासिंधू अनसूया ।।२७८ ।। नित्यनेमे जो पारायण करी । दुःख तू त्याचे दूर सारी । अनुभव घ्यावा सत्वरी । दृढभाव धरुनिया ।।२७९ ।। एक अध्याय अनुदिन । वाचावा नित्यनेमान । पूर्णत्व मिळे तत्क्षण । मनी जे वसतसे ।।२८० ।। दैन्य दुःख ताप व्याधी । दूर करी दयानिधी । मिळतसे सुअवधी । वाचता गाथा आईची ।।२८१ ।। रविवार २१-४-९६ ला । माते तू कृपाहस्त फिरविला । भृकुटीवरुनि चार वेळा । या अज्ञानी बालकाच्या ।।२८२ ।। तूच दिली माते शक्ती । तूच माझी बुद्धीदाती । हस्त फिरवूनि मस्तकावरती । ज्ञान ज्योत लावितसे ।।२८३ ।। म्हणून झाले कवन । तुझ्याच कृपेने दान । तूच करितसे पूर्ण । गाथा तुझी भगवती ।।२८४ ।। २०-१२-९८ रविवारला । पौष शुद्ध द्वितीयेला । पूर्ण करी तू गाथेला । श्रीक्षेत्री पारडसिंगा ।।२८५ ।। द्वितीय पुण्यतिथी दिनी । गाथा करी अर्पण चरणी । स्विकार करी भवानी । सेवाचाकरी लेकाची ।।२८६ ।। वाक्यपुष्प चरणी वाहिले । कृतार्थ मम केले । सदैव असू दे सेवेले । पादपूजा करावया ।।२८७ ।। इतिश्री परमेष्ठी अनसूया गाथा । कवन करी अनसूया माता । निमित्त करुनि तव सुता । एकाविशोध्याय सम्पूर्ण ।।२८८ ।। श्री परमेष्ठी अनसूया मातार्पणमस्तु । शुभंम भवतु । हरी ॐ शांती । शांती ।। शांती ।।।

**।। ॐ अनंत कोटी, ब्रह्मांड नायिका, राजाधिराज्ञी, योगिनी, परमगुरु, परमेष्टी परमानंद स्वरुपिनी, अखंडित लक्ष्मी, अलंकृत विराजीत, राजराजेश्वरी, पारडसिंगा निवासिनी, महाशक्ति भगवती ।।**

**।। अनसूया माता की जय ।।**

## • काकडा •

श्री परमेष्टी अनसूया भावे चरण वंदितो ।
ब्रम्ही ब्रम्हस्वरुपा माते काकडा करितो ।।धृ. ।।

प्रकाशवी संसार माते ज्योत नामाची ।
उद्धारती नर–नारी जया आस चरणाची ।।१ ।।

साई स्वरुपी दर्शन माते भक्ता तू दिले ।
गाणगापूरीला तव भेटीसी दत्तगुरु आले ।।२ ।।

शुद्ध सत्व ठेवूनि अद्वैत काकडा तारी ।
ब्रम्हमुहूर्ती गाऊनी दुःख तूच तया हारी ।।३ ।।

अनसूया आई ठाव देई भावे जो गाई ।
तव नामाची एक तारी अखंड वाजवी ।।४ ।।

विकार जाळूनि स्विकार करी सेवा चाकरी ।
दास तुझा विनवी माते सुखवि संसारी ।।५ ।।





## • आरती अनसूया आईची •

अनसूया आई, भवानी देवी । आदीशक्ती तू जननी ।
अति प्रेमाने करुनि आरती । मस्तक ठेवितो मी चरणी ।।धृ ।।

दिससी वेडी असिसी भोळी । महान शक्ती तुज जवळी ।
येतो प्रत्यय तव भक्तांना । संकट त्यांचे तू टाळी ।।
कुठेही राहशी ग्रामी फिरशी । परी नसे तुज भान मुळी ।
आत्मस्वरूपी तल्लीन असूनि । ब्रह्मानंदे उचंबळी ।।१ ।। अनसूया आई, भवानी .........

अनसूया माते नामे जपता । कळीकाळही थरथरती ।
तव नामाचा महिमा गाता । असंख्य पापे दूर होती ।।
अति श्रद्धेने घेवूनि दर्शन । असाध्य रोगी बरे होती ।
ऐसा महिमा तुझ्या कृपेचा । वर्णू माऊली मी किती ।।२ ।। अनसूया आई, भवानी देवी .........

भक्त तुझे जे धावा करिती । त्यांच्यासाठी धावूनि जाशी ।
अवघ्या चिंता निवारुनिया । संकट मुक्त मग करिशी ।।
दीन दयाळे, भक्त वत्सले । माय माऊली अनसूये ।
पापी जनही उद्धरताती । केवळ तुझिया कृपेमुळे ।।३ ।। अनसूया आई, भवानी देवी .........

चिंध्या चिरकुट्या करी घेवूनि । पिशापरी तू भासविशी ।
भूत भविष्य कथन करुनि । निज भक्तांना वाचविशी ।।
बाळ दिनू हा नम्र होवूनि । आला शरण तव चरणी ।
ओवाळीतो तुला आरती । पारडसिंगा निवासिनी ।।४ ।। अनसूया आई, भवानी देवी .........

## १● नमस्कार ●

नमो परमेष्ठी भगवती भवानी। आदी अंती तूच माता कल्याणी ।।
पाप ताप हारी तू विश्वमोहिनी। नमस्कार माझा अनसूया जननी ।।१ ।।
ब्रम्ह विष्णू हर येई तव धामी। म्हणे वाढ भिक्षा तू नग्न होवूनि ।।
सतित्वाने तुझ्या झाले बाळ तिन्ही। नमस्कार माझा अनसूया जननी ।।२ ।।
सत अनसूया देई तू ममता। जोजवी बाळा तू अवधूत दत्ता ।।
आदीनाथ गुरु तूच तया पूजनि। नमस्कार माझा अनसूया जननी ।।३ ।।
झिजवूनि काया देई तू ममता। त्रासवूनि जीवा तोषवि तू पुता ।।
दिव्यदृष्टी तुला तू ज्ञान दायिनी। नमस्कार माझा अनसूया जननी ।।४ ।।
देवदेवी सकल वंदिती तूजला। उद्धरिले तूचि दुष्ट दानवाला ।।
किर्ती ऐकूनि आलो तव चरणी। नमस्कार माझा अनसूया जननी ।।५ ।।
अनंत जन्माचा माते मी अपराधी। पाजी प्रेमपान्हा तूच दयानिधी ।।
कृपासिंधू माते तू कृपाकांक्षिनी। नमस्कार माझा अनसूया जननी ।।६ ।।
काम क्रोध हेवा न बाधी मनाला। अहंकार वारा न शिवी तनाला ।।
पात्र करी माता तू तया भजनी। नमस्कार माझा अनसूया जननी ।।७ ।।
सदा ध्यास तुझा अंतरी असू दे। चरणावरी या अभय पामरा दे ।।
काय उणे मज या त्रिभुवनी। नमस्कार माझा अनसूया जननी ।।८ ।।
न मागणे तुजला संपत्ती संपदा। तव नामाची गोडी असू दे सर्वदा ।।
तव दासाची ही आर्त विनवणी। नमस्कार माझा अनसूया जननी ।।९ ।।







## ● श्री परमेष्ठी अनसूयाअष्टोत्तर शत नामावली ●

१ ओम अनसूया मातायै नम:
२ ओम अनसूया अनंतायै नम:
३ ओम अनसूया अभव्यायै नम:
४ ओम अनसूया अपर्णायै नम:
५ ओम अनसूया अनेक वर्णायै नम:
६ ओम अनसूया अनाथ नाथ दीन बंधवै नम:
७ ओम अनसूया अमेय विक्रमायै नम:
८ ओम अनसूया अक्षयायै नम:
९ ओम अनसूया आत्मज्योतिषायै नम:
१० ओम अनसूया आदीशक्तयै नम:
११ ओम अनसूया आर्यायै नम:
१२ ओम अनसूया आद्यायै नम:
१३ ओम अनसूया ईश्वरीयै नम:
१४ ओम अनसूया उत्कर्षिणीयै नम:
१५ ओम अनसूया अंबिकायै नम:
१६ ओम अनसूया कलावहौ नम:
१७ ओम अनसूया कर्मशिलायै नम:
१८ ओम अनसूया कोटीब्रह्मांडकारिणीयै नम:
१९ ओम अनसूया कृपानिधयै नम:
२० ओम अनसूया कृष्णायै नम:
२१ ओम अनसूया क्रियायै नम:
२२ ओम अनसूया गंधर्वगाण रसिकायै नम:
२३ ओम अनसूया चन्द्रमण्डल वासियै नम:
२४ ओम अनसूया चेतनायै नम:
२५ ओम अनसूया चित्तरुपायै नम:
२६ ओम अनसूया जयायै नम:
२७ ओम अनसूया जितेन्द्रायै नम:
२८ ओम अनसूया तपस्विनीयै नम:
२९ ओम अनसूया त्रिलोक जननी यै नम:
३० ओम अनसूया दत्तात्रय ध्यान रता यै नम:
३१ ओम अनसूया दत्तात्रय माता यै नम:
३२ ओम अनसूया दारिद्रहारिणै नम:
३३ ओम अनसूया दिगंबरा यै नम:
३४ ओम अनसूया दीन बंधवै नम:
३५ ओम अनसूया दुर्गा यै नम:
३६ ओम अनसूया दुर्गपारायै नम:
३७ ओम अनसूया देवमातायै नम:
३८ ओम अनसूया धनमांगल्यै नम:
३९ ओम अनसूया नक्षत्र रुपायै नम:
४० ओम अनसूया नित्यानंदायै नम:
४१ ओम अनसूया परमानंदायै नम:
४२ ओम अनसूया परमकल्याणै नम:
४३ ओम अनसूया परमात्मायै नम:
४४ ओम अनसूया परब्रह्मायै नम:
४५ ओम अनसूया पारडसिंगावासिनीयै नम:
४६ ओम अनसूया पापनाशिनीयै नम:
४७ ओम अनसूया पांडूरंगायै नम:
४८ ओम अनसूया प्रमोदायै नम:
४९ ओम अनसूया प्राणरुपायै नम:
५० ओम अनसूया पूर्णायै नम:
५१ ओम अनसूया बुद्धिदायिनीयै नम:
५२ ओम अनसूया ब्रह्मांडधारिनीयै नम:
५३ ओम अनसूया ब्रह्मविष्णू महेश्वरायै नम:
५४ ओम अनसूया भवप्रीतीयै नम:

श्री परमेष्ठी अनसूया गाथा

५५ ओम अनसूया भवमोचनायै नम:
५६ ओम अनसूया भव्यायै नम:
५७ ओम अनसूया भगवत्यै नम:
५८ ओम अनसूया भद्रायै नम:
५९ ओम अनसूया भक्तवत्सलायै नम:
६० ओम अनसूया भक्ताभाव प्रदायै नम:
६१ ओम अनसूया भक्तीशक्ती प्रदायै नम:
६२ ओम अनसूया भाविनायै नम:
६३ ओम अनसूया भाव्यायै नम:
६४ ओम अनसूया मंगलयै नम:
६५ ओम अनसूया महाकरणायै नम:
६६ ओम अनसूया महाधात्रीयै नम:
६७ ओम अनसूया महातपायै नम:
६८ ओम अनसूया महाकालीयै नम:
६९ ओम अनसूया महालक्ष्मीयै नम:
७० ओम अनसूया महासरस्वतीयै नम:
७१ ओम अनसूया महादेव्यै नम:
७२ ओम अनसूया महारुपायै नम:
७३ ओम अनसूया मेरेरामायै नम:
७४ ओम अनसूया यतियै नम:
७५ ओम अनसूया योगीणै नम:
७६ ओम अनसूया रामकृष्ण गोविंदायै नम:
७७ ओम अनसूया रामजी आणाई वत्सलयै नम:
७८ ओम अनसूया रुद्रस्वरुपीनीयै नम:
७९ ओम अनसूया लोकमातृकायै नम:
८० ओम अनसूया लोकरक्षिण्यै नम:
८१ ओम अनसूया वसूमत्यैम नम:
८२ ओम अनसूया वाकसिद्धीयै नम:
८३ ओम अनसूया विमलायै नम:
८४ ओम अनसूया वेदमातायै नम:
८५ ओम अनसूया वेदांतयै नम:
८६ ओम अनसूया विशालक्षायै नम:
८७ ओम अनसूया विश्वरुपिणे नारायणायै नम:
८८ ओम अनसूया सतीयै नम:
८९ ओम अनसूया सतपुरुषायै नम:
९० ओम अनसूया सतस्वरुपायै नम:
९१ ओम अनसूया सचिंदात्मैनै नम:
९२ ओम अनसूया सत्यधर्मशांती प्रेमालयाय नम:
९३ ओम अनसूया सत्यानंद स्वरुपिणीयै नम:
९४ ओम अनसूया साहवियै नम:
९५ ओम अनसूया सर्वसिद्धी प्रदायै नम:
९६ ओम अनसूया सर्व विद्यायै नम:
९७ ओम अनसूया सर्व भूतेश्वरायै नम:
९८ ओम अमसूया सर्व ज्योतिस्वरुपीयै नम:
९९ ओम अनसूया सर्व ग्रहरुपिणे नम:
१०० ओम अनसूया सर्व भूतदमनायै नम:
१०१ ओम अनसूया साई गजानन ताजुद्दीनायै नम:
१०२ ओम अनसूया सोहम नाथायै नम:
१०३ ओम अनसूया शाम्भवै नम:
१०४ ओम अनसूया शिवशक्तीयै नम:
१०५ ओम अनसूया श्रृतिरुपायै नम:
१०६ ओम अनसूया हर्षदायिनीयै नम:
१०७ ओम अनसूया ज्ञानायै नम:
१०८ ओम अनसूया ज्ञानेज्ञेय विकाशीनी परमेष्ठी अनसूया मातायै नम:

।। श्री परमेष्ठी अनसूया अष्टोत्तर शत नामावली संपूर्णम् ।।




ग्रंथ रचयिता

**पुरुषोत्तम भड**